# प्राजक्तगंध



डॉ. अरविंद वैद्य

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# प्राजक्तगंध

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# प्राजक्तगंध

लेखक

डॉ. अरविंद वैद्य

प्राजक्तगंध

लेखक... डॉ. अरविंद वैद्य

पत्ता-.सहकारनगर -२, पुणे
M: ९४२०१७५८०३
arvind.vaidya51@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान



www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841



**प्रकाशन : २६ जानेवारी २०२१ (प्रजासत्ताकदिन)**



©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मी डॉ. अरविंद भालचंद्र वैद्य (वय वर्ष ६९ )**



बालपणापासून महाराष्ट्राची सांस्कृतिक नगरी असलेले पुणे. येथेच माझे शालेय शिक्षण श्री शिवाजी मराठा हायस्कुल या बहुजनांचे शाळेत व पुढे फर्ग्युसन कॉलेज पर्यंतचे शिक्षण झाले. शनिवारड्याच्या साक्षीने आचार्य प्र.के.अत्रे , पु. ल. देशपांडे, शिवाजीराव भोसले, यांच्या अमोघ अश्या वक्तृत्वाने व द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्या कथाकथन कार्यक्रमाने बालपण समृद्ध केले. तसेच येथील वसन्त व्याख्यानमाला मधील व्याख्यानांनी ज्ञानाचे भांडार खुले केले असे पुणे. गणपतीउत्सवात अरुण दाते, गजानन वाटवे, बबनराव नावडीकर, यांचे गायन व सुधीर फडके यांचे गीत रामायण याने कर्ण तृप्त केले.

वैद्य- नावाला जागण्यासाठी अहमदनगरच्या कै.गं.शा.गुणे आयुर्वेद कॉलेजमधून बी.ए.एम.अँड-एस. वैद्यकीय पदवीधर (डॉक्टर) झालो. पुढे पुणे महानगर पालिकेच्या आरोग्यविभागात सलग २४ वर्ष वैद्यकीय अधिकारी ते क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी पदावर

कार्यरत राहून पुणेकरांना आरोग्य सेवा दिली. अन २००९ साली निवृत्त झालो.

पेन्शन रुपी आर्थिक ठिबक सिंचन सुरु झाल्याने चिंता अशी नव्हतीच. मंदार -मिलिंद या दोन्ही मुलांनी त्यांचे स्वअध्ययनाचे बळावर इंग्लंड -अमेरिका येथे शिक्षण व आय. टी.क्षेत्रात यशस्वी पणे आपला पाय रोवला. त्यामुळेच आम्हालाही आमच्या पासपोर्टवर त्या त्या देशांच्या व्हिसाचा ठसा सहजपणे मिळाला.

२००७ पासून सुरू झालेले परदेश पर्यटन इंग्लंड -अमेरिका - युरोप-कॅनडा -श्रीलंका - दुबई -या देशांच्या प्रदक्षिणेने २०२० साली चंचू प्रवेश केलेल्या ''कोरोना ''मुळे' भू- स्थिर झाले.

या नेत्रसुखद -विलोभनीय पर्यटनानेच अंगच्या ''सुप्त लिखाणास ''चालना मिळाली. संगणकाशी मैत्री केली अन अनेक मित्र परिवार- नातेवाईकाना घरबसल्या परदेश प्रवास वर्णन इ -.मेल द्वारे पाठविले व आभासी आनंद पोहोचविला. पत्नी सौ.जयश्री हिने न कुरकुरता लिखाणास शांतता व संधि उपलबद्ध करून दिली. आज पुणे मुक्कामी सौ. सह घरामध्येच सुरक्षित राहून दैनंदिन पहाटे व्यायामाचे धडे गिरवीत आरोग्य पूर्ण वाटचाल तसेच लिखाण कामाची ऊर्जा घेत आनंदात वास्तव्य करीत आहे.

डॉ. अरविंद वैद्य –(२८ ऑक्टोबर २०२०)

## मनोगत ----

******

मी डॉ. अरविंद वैद्य, वय वर्ष ६९, ---

एक पुणेकर अन नावाला जागणारा सेवानिवृत्त आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी.

स्वप्नातले मनात, मनातले कागदावर (ब्लूप्रिंट) अन कागदावरील सत्यात उतरविण्यात स्थापत्य अभियंते माहीर असतात.

आम्हा डॉक्टरांनासुद्धा तर रुग्णांच्या वेदनेचे मूळ शोधण्यासाठी त्याना खूप बोलते करावे लागते.

तशी केस हिस्टरी --पेपरवर उतरवून घ्यावी लागते.

त्यावर साधक बाधक विचार करून रोगाचे निदान करून औषधोपचार करावे लागतात.

या मध्ये बऱ्याच वेळा असे लक्षात येते कि बरेच रुग्णांच्या तक्रारी मानसिक रूपाच्या असतात.

सुस्पष्टपणे आपल्या भावना वेळीच व्यक्त न केल्याने,

मनमोकळे न केल्याने, गैरसमजाने अनेक व्याधींना आमंत्रण दिले जाते.

त्यासाठी स्वतःहून व्यक्त होणे खूप आवश्यक आहे.

आपल्या दैनंदिन कार्य बाहुल्य जीवनात कांही वेळा या साठी योग्य वेळ मिळत नाही.

प्रत्येकात काही सुप्त गुण लपलेले असतात. निवांत वेळ मिळाला कि त्याना अंकुर फुटू लागतात.

माझेही कांहीसे असेच झाले.

सेवानिवृत्ती नंतरच्या निवांत वेळात व मुले परदेशी असल्याने खूप मोकळा वेळ मिळू लागला.

संगणकाशी लगेचच गट्टी केली. लेखणी शिवाय केवळ बोटांना नाचवित देखील लिहिता येते हि किमया गवसली.

लिखाणाची सवय होतीच.

त्यामुळे आयुष्यात समोर येणाऱ्या विविध प्रसंगाचे थोडक्यात मनमोकळे टिपण काढण्यास सुरुवात केली.

संगणकात त्याची सुरक्षितपणे साठवण झाली.

संगणकात लिखाण करताना नको असलेले मुद्दे " डिलीट करणे "

अथवा नव्याने सुचलेले मुद्दे " इन्सर्ट करणे " खूपच सोपे असते ह्याची जादू समजली.

. एखादा मुद्दा अडलाच तर " गुगल सर्च सखा " हाताशी आहेच मदत करण्यास याचीहि खात्री झाली.

सुचेल तो, प्रासंगिक दिसेल तो अन आठवेल त्या विविध विषयावर संथपणे संगणकामध्ये लिहीत गेलो.

ई - मेलच्या-- विद्युत वेगाने जाणाऱ्या " सेंड ई - टपाल सेवेने " मित्रां पर्यंत पोहोच देखील झाले.

त्यांच्या पसंतीची दाद उलट " ई -टपालीच " मिळत गेली.

अन थेंबे थेंबे तळे साचे असे कांहीसे त्या विविध विषयांवरच्या लेखांचे झाले.

आता या सर्व लिखणांचा एकत्रित पुस्तकी रुपी बुके असावा असा विचार पुढे आला.

सध्याच्या न्यू नॉर्मलच्या जगामध्ये ई - पुस्तकाची चलती सुरु असल्याने, योग्य वेळेतच

ई -साहित्य प्रतिष्ठान --ठाणे या देवदूताशी ओोळख व मैत्री झाली अन काय जादूच झाली म्हणा ना.

आतापर्यंत माझे संगणकातच असलेल्या अन मुरलेल्या विविध लेख रूपात असलेल्या " प्राजक्तांच्या फुलांचा गंध "

आपल्या पर्यंत २०२१ या नववर्षाची सस्नेह भेट म्हणून आज पोहोचला देखील असेल.

त्याबद्दल ई - साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व समूहास शतशः धन्यवाद... !

या " प्राजक्तगंधाचा " ई -वाचनीय आनंद घेऊन तो कसा वाटला हे सुद्धा मात्र आठवणीने

**ई - टपालाने** अवश्य कळवा त्यामुळेच तो आपल्या पर्यंत पोहोचल्याची खात्री पटेल.

******



# अर्पण पत्रिका... !

**मी** आणि **तू** ही दोन अक्षरे आपले स्वत्व विसरून एकत्र येतात तेंव्हा.. " **मित्र** " शब्द आकारास येतो असे मला आता वाटू लागले आहे. बालपणापासूनच्या " मित्र रुपी "असंख्य शाखा आज सर्वत्र विखुरलेल्या दिसत आहेत. त्याची मधुर फळे सुद्धा चाखण्यास मिळाली. फळे म्हटलेली त्या पूर्वीच्या ----" फुलांचा " मोहोर सुगंध आलाच. आयुष्याच्या आतापर्यंतच्या वळणा वळणावर भेटलेल्या सर्व...

" बालमित्र... शालेय... महाविद्यालयीन.. आरोग्य कार्यालयीन.. कौटुंबिक... तसेच मोजक्याच--" विदेशी सुहृदांना"

... हा माझा नवा ई-शब्दरूप पुस्तक रुपी.

. ". **प्राजक्त गंध** "

२०२१ या नव्या वर्षाच्या शुभेच्छांसह

" सस्नेह अर्पण. "

*****

**डॉ. अरविंद वैद्य**

**" निर्झर " २४, ड्यामको सोसायटी, कोरेगावपार्क**

**पुणे ४११००१**

# संवादानुक्रम



- मला लेखक व्हायचे आहे
- गुरुविण कोण दाखवील वाट
- लेखणीच्या आधारे लखपती
- पिझ्झा -- युक्त जीवन
- ब्यांडेड पुणे
- दिवाळी पहाट
- बी अँड बी
- आम्ही टाऊन सेंटर स्टॉप ला उतरलो
- पत्र नव्हे मित्र
- सिलिकॉन व्हॅली //- एस. एफ. ओ.
- कथा ----नोबेल पारितोषिकाची -----
- पेनलेस...पत्र --(लेटर)
- दूध हे पूर्णान्न तर... शब्द हे ज्ञानान्न... !
- आम्हा जेष्ठांचा बक बक करणारा एक सुरेल जेष्ठ मित्र
- कानामागून आला अन... तिखट झालेला
- झाकोळलेले लेखन ... साहित्य
- रुमानीचे कागदी... पंख... !

- नात्यांची हळुवार नाजूक गुंफण...
- **जग बदलतय... ? अहो बदललय... सुद्धा "**
- **जीवन प्रवास.. गतिमान करणारे ... " कागदी घोडे**
- **" इंद्रधनुष्यातील " रंग- संगतीची-- नवी.. ओळख**
- **फळांचा... चापून घेतलेला समाचार**
- **निसर्गच जेंव्हा आळस झटकतो---तेंव्हा**
- **जीवन सुंदरच आहे... अनुभव घ्या...**
- **मांडीवरील बालकाची ---कमाल "**
- **गोष्ट --बोटांची**
- सा रे ग म प
- प्राण्यांमधील मानवता...
- **फुले ही तर -- देवाघरची --निरागस मुले**
- माझे -- कवडसे.. या प्रथम पुस्तक प्रकाशनाचा वृत्तांत
- **पाश्चिमात्य देशातील  वेळेची बचत**
- काळ्यावरील पांढरे
- **हास्य --एक औषध ---!**
- **जोश्यांची फळबाग ---!**
- **व्यन्गचित्रे ---एक नि:शब्द कला**

- **निस्वार्थ प्रेमाचे---'' नूतनीकरणच जणू '' -----!**
- **दैनंदिन परिचितांचा... संवाद ----!**
- **उत्सुकतेच्या डॉक्टर ---**
- **आषाढस्य प्रथम दिवसे ----!**
- **शब्द पुष्पांची गुरुदक्षिणा**
- **संगीत --उपचार..**
- **आमच्या --फिटनेसचे सीमोल्लंघन...**
- **मधुमेह --अर्थात डायबेटीस चे अंतरंग**
- **कानालाही जेंव्हा कान लागतात**
- हरहुन्नरी संगीतकार --जगदीश खेबुडकर
- **आकाश भरारी घेणारी**
- **मी अनुभवेलला -- '' वजीर ''...**
- **ऐन तारुण्यातील- वैद्यकीय महाविद्यालयातील**
- **मल्हार माचीची मौज मजा**
- **फुलवेड्या डेंटिस्ट**
- **सुस्वरांनी सुखावलेले --'' गीत रामायण ''**
- **वाचाल तर वाचाल**

**मला लेखक व्हायचे आहे ---!**

**या ध्येयाने पछाडलेले**



**पावलो कोएलो** (जन्म २४ ऑगस्ट, १९४७) हे एक प्रसिद्ध ब्राझिलियन लेखक आणि गीतकार आहेत.

त्यांचा जन्म रियो दे जेनेरो, ब्राझील येथे झाला. ते जेसुइट शाळेत शिकले. कुमारवयात कोएलो यांना लेखक बनायचे होते.

जेव्हा त्यांनी आपल्या आईला हे सांगितले तेव्हा त्या उत्तरल्या, " माझ्या बाळा, तुझे वडील एक अभियंता आहेत. ते तर्कशुद्ध आणि योग्य विचार करतात, व त्यांना या जगाची स्पष्ट ओळख आहे.

लेखक बनणे म्हणजे नक्की काय हे तुला कळले आहे का?"

त्यावर कोएलो यांनी संशोधन केले आणि असा निष्कर्ष काढला की लेखक 'कायम चष्मा घालतो व कधीच केस विंचरत नाही'

आणि 'स्वतःच्या पिढीला कधीही आपले विचार समजू न देणे ही त्याची जबाबदारी व त्याचे कर्तव्य असते'.

अवघ्या १६ वर्षांचे असताना कोएलोंच्या अबोलपणामुळे व पारंपारिक मार्गांना विरोध करण्यामुळे त्यांच्या पालकांनी त्यांना-- **मानसिक रुग्णालयात** दाखल केले होते.

तिथल्या त्यांच्या वास्तव्यात ते तीन वेळा पळून गेले होते.

ते २० वर्षांचे असताना त्यांना तिथून सोडण्यात आले.

त्या काळाबद्दल कोएलो नंतर एकदा म्हणाले, "त्यांना मला इजा करायची नव्हती, त्यांना फक्त काय करावे ते कळत नव्हते.

त्यांनी तसे मला उध्वस्त करायला नव्हे तर मला वाचवायला केले होते. "

**'द अलकेमिस्ट'----**हे त्यांचे सर्वात गाजलेले पुस्तक असून सन २००५ पर्यंत त्याच्या ४. ३ दशलक्ष प्रती विकल्या गेल्या आहेत. हे पुस्तक जगातील ५६ भाषांत प्रकाशित झाले आहे.

त्यांनी त्यांच्या दश ध्येय सूत्रानुसार लेखन केले.

*****

१) अर्धवेळ स्वप्न पाहू नका.

२) वर्तमान काळात तन्मयतेने जगा.

३)स्वतःचा शोध घ्या.

४)आयुष्या कडे दक्षतेने पहा

५) धोका पत्करा

६) आपले आदर्श आपणच शोधा

७) निष्पाप पणाला प्रोत्साहन द्या

८)नेहमी उत्साही रहा

९) प्रत्येक क्षणाची साठवण करा

१०) अज्ञानाचा सखोल शोध घ्या

त्यांनी आपले अल्केमिस्ट हे पुस्तक केवळ २ आठवड्यात लिहून संपविले. याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात माझ्या मनात ती गोष्ट तयार होतीच.

त्या गोष्टीचा विषय होता-" आत्मशोध -(स्वतःचे अंतिम ध्येय कसे गाठावे) ".

ओघवती व सहज सुलभ लेखन शैली हे त्यांचे खास असे वैशिष्टय आहे.

या तात्विक पुस्तकात त्यांनी आपल्या आशा नेहमी पल्लवित ठेवाव्यात.

त्यामुळेच सभोवतालचे वातावरणातून आपल्या मनातील तीव्र ईच्छा पूर्ण करण्याचा मार्ग अखेर आपणास गवसतोच याबाबत सकारात्मक लेखन केले आहे.

आपल्या जीवनातील आपल्या साठी परमेश्वराने राखून ठेवलेल्या भाग्याचा वाटा यशस्वीपणे कसा प्राप्त करावा याचा राजमार्ग त्यांनी दाखवून दिला आहे.

अल केमिस्ट-- म्हणजे " आपल्या भल्यासाठी सभोवतालचे वातावरण निर्मित करणारा (परमेश्वर)

त्यामुळे --- धृढ आत्मविश्वासाने, अंतर्मनाचा शोध घेतल्यास -- योग्यवेळी शिसे सुद्धा शुद्ध सोन्यामध्ये परिवर्तीत होऊन रोग निवारण करून जीवन सुसह्य होऊ शकते.

त्यामुळे आपण आयुष्यात अखेर यशस्वी होतो.

असा संदेश या पुस्तकातून आपणास मिळतो.

पावलो कोएलो ---हे ब्राझिलियन देशीय यांची पत्नी ख्रिस्तींना. त्यांना मुलबाळ नाही. त्यांचे वास्तव्य फ्रांस व रिओ या ठिकाणी असते. .

******

# गुरुविण कोण दाखवील वाट----!

******



लेखक / अथवा कवी होणे----

यासाठी वेगळा असा अभ्यासक्रम वा पदवी असत नाही.

दैनंदिन दिनचर्येत, प्रवासात, कार्यालयात वावरत असताना आपल्या सभोवतालचे वातावरण, भेटत जाणारी माणसे त्यांच्या लकबी बोलण्यातील वैविध्य याचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची आवड मात्र हवी.

त्यातही विनोदी अंगाने लिहिणे हे एक दुर्मिळ असे वैशिष्ट्य आपल्या आवडत्या आचार्य अत्रे, (यांच्या वक्तृत्वातून) तर पु. ल. देशपांडे यांच्या लेखणीतून पहावयास मिळते.

त्यांचा वावर तर नाटक --संगीत --प्रवास वर्णन --सिनेमा --कलावंत--अन वक्तृत्व असा चहू दिशेस गवसणी घालणारा असा होता हे आपण याची देही याची डोळा अनुभवले आहे.

त्यांच्या मागेही आपण याचा निर्भेळ असा अनुभव अजून हि घेत आहोत.

गुरुविण कोण दाखवील वाट... ? असेही म्हटले जाते.

पु. ल. हे पी जी. वूड हाऊस या---- विनोदी ब्रिटिश इंग्रजी लेखकाचे खूप चहाते होते.

त्याच लेखकाच्या जीवनाचा हा थोडक्यात घेतलेला परामर्श -

**सर पेल्हॅम ग्रीनव्हील वुडहाउस उर्फ प्लम म्हणजेच पी. जी. वुडहाउस**

हे निखळ विनोदातून वास्तवाचे दर्शन घडविणारे, माणसाच्या गुणदोषांवर सहजपणे लक्ष वेधून घेणारे लेखक होते.

तालेवार घराण्यातील बर्टी वूस्टर आणि त्याचा हरकाम्या नोकर जीव्हज़ या त्यांच्या व्यक्तिरेखांनी वुडहाउस यांना अफाट प्रसिद्धी मिळवून दिली.

(१५ ऑक्टोबर १८८१-----१४ फेब्रुवारी १९७५)

त्यांचा जन्म इंग्लंड मधील गिल्डफोर्ड येथील. ब्रिटिश दंडाधिकारी वडिलांचे ३ रे अपत्य.
शाळा सोडल्यानंतर ते ब्यांकेत कामास लागले पण तेथे मन न रमल्याने शालेय जीवनातील प्रसंगावर लिखाण करू लागले.

त्यांच्या बहुतांश काल्पनिक गोष्टी या इंग्लंड मधील वास्तव्यातील आहेत.

शालेय जीवनातील सुटीत ते आपल्या आत्या व चुलत्यांकडे सुटीसाठी जात असत त्यांना २० आत्या, मावश्या व १५ चुलते व मामा होते त्यांच्या धाकात त्याना राहावे लागे.

एव्हडी माणसे सभोवती असल्याने प्रत्येकाच्या विविध स्वभावामुळे त्यांना लिखाणासाठी उत्तम खाद्य मिळत गेले शालेय जीवनात खेळा बरोबरच, गाणी, मासिक विभागात लिखाण काम करणे अशी कामे केली.

ब्यांकेत काहीकाळ नोकरी केली तेथील अनुभवावर विनोदी गोष्टी लिहिल्या

अमेरिके बद्दल (ल्यांड ऑफ रोमान्स) आकर्षण असल्याने स्वकमाई करून अमेरिकेत स्थलांतरित झाले. . .

१९४७ नंतर त्यांनी आपले बस्तान कायमचे अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे हलविले. आतापर्यंत ते वैविध्यपूर्ण बहू आयामी लेखक म्हणून उदयास आले.

काही नाटके लिहिली. १९१४ साली त्यांचा विवाह एथिल मे या ब्रिटिश विधवे बरोबर झाला.

तिच्या पायगुणामुळे तसेच लाजाळू, व्यवहारशून्य, शाकाहारी, निर्णायक व उत्तम आयोजक असल्याने त्याने वूड हाऊसच्या जीवनाचा ताबा घेतला.

**त्याच्या लिखाण कामाचे छंदास निवांत वेळ मिळेल हे पहात गेली. त्यांना मूल बाळ हि झाले नाही.**

वूड हाऊस च्या म्हणण्यानुसार, जीवनाकडेअगदी सहज सुंदर पणे पाहिले तर त्या मध्ये तुम्हाला हास्य गवसते. कदाचित तुम्ही त्याच साठी जन्मलेले असता.

अमेरिकेतील संगीतातील विनोदाची छाप त्यांच्या लिखाणातून दिसून येई.

It is now abundantly clear that Wodehouse is one of the funniest and most productive men who ever wrote in English.

He is far from being a mere jokesmith: he is an authentic craftsman, a wit and humorist of the first water, the inventor of a prose style which is a kind of comic poetry.

त्यांनी सुमारे ९० पुस्तके ४० नाटके २०० गोष्टी एव्हडे भरघोस लिखाण केले.

१९७५ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी
त्यांनी न्यूयॉर्क मधील सौद्याम्प्टन येथे जगाचा निरोप घेतला.
******

## **लेखणीच्या आधारे लखपती ----!**

******



आपल्या दैनंदिन जीवनात आपण सर्व जण धावत पळत असतो. कामावर वेळेत पोहोचण्याची धडपड करतो.

कारण प्रत्येकास ठाऊक असते " टाईम इज मनी ".

ट्रॅफिक जॅम मध्ये अडकल्यावर तर आपली खूपच चीड चीड होते.

परंतु अश्याच एका प्रसंगी सकारात्मक दृष्टी ठेवून त्या संधीचे सोने करणारी एक अवलिया स्त्री.

तिला अश्याही परिस्थिती एक कथेची कल्पना सुचली.

अन झाले तिने ती लिहून काढली अन हाहा म्हणता ती प्रसिद्धीच्या झोतात आली अन इंग्लंड मधील एक श्रीमंत महिला म्हणून तिची गणना झाली.

त्याच महिलेच्या जीवनाचा हा परामर्श.

जोआन रोलिंग---- ही एक ब्रिटिश लेखिका आहे.

तिने निर्मिलेली हॅरी पॉटर या काल्पनिक व्यक्तिरेखेशी निगडित कादंबऱ्यांची मालिका इंग्लिश साहित्यक्षेत्रात प्रचंड लोकप्रिय झाली आहे.

इ. स. १९९० साली चार तास उशीरा सुटलेल्या **मॅंचेस्टर ते लंडन या रेल्वेप्रवासात** तिला या मालिकेची कल्पना स्फुरल्याचे म्हटले जाते.

हॅरी पॉटर पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत

ज्या आई वडिलांचे प्रेम लंडन मधील किंगज क्रॉस स्टेशन वर जडले अश्या रोवलिंग दाम्पत्याची हि मुलगी.

ती दिवा स्वप्न पहाणारी अशी मुलगी होती. लहानपणी घराशेजारील मित्र होते इयान अन विकी पॉटर.

तिला वयाच्या ६व्या वर्षांपासून गोष्ट लिखाणाची आवड निर्माण झाली.

ती शिक्षण घेऊन शिक्षिका झाली खरी पण तिच्यातील लेखिका तिला स्वस्थ बसू देईना.

असेच एके दिवशी कामावर जाताना रेल्वे मध्ये अडकून पडली असता तिला ह्यारी पॉटर चे स्वप्न पडले. हि कथा लिहिण्यास तिला ६ वर्षे लागली.

मध्यंतराचे काळात ती पोर्तुगाल येथे फ्रेंच शिकविण्यास गेली. तेथे तिला एक पोर्तुगीज टेलिव्हजन पत्रकार भेटला. त्याच्याशी ती विवाह बद्ध झाली. तिची मुलगी जेसीका ३ महिन्याची असताना तिचा घटस्फोट झाला व ती पुन्हा इंग्लंडला आली.

घरी मुलीला सांभाळत पुस्तक लिहिताना अडथळे येत. त्यामुळे ती मुलीला बाहेर फिरावयास नेई. बाहेर ती झोपी जाई व एका कॉफी बार मध्ये बसून ती लिखाण पूर्ण करीत असे.

हॅरी पॉटर हे लहान मुलांसाठी काल्पनिक कथांचे पुस्तक असल्याने --प्रकाशन करताना प्रकाशकाने तिला एका स्त्रीने लिहिलेले पुस्तक मुले स्वीकारणार नाहीत .

तेंव्हा जोआन रोलिंग ऐवजी तुमच्या नावात दोन आद्याक्षरे ठेवा असा सल्ला दिला.

त्यामुळे तिने आपली आवडत्या प्रेमळ आजीचे " कॅथलिन " हे नाव पुढे लावून जे. के. रोलिंग असे नाव धारण केले.

साहित्यातील तिच्या सहयोगामुळे तिला (ओ. बी. ओ) ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर या पुरस्काराने गौरविण्यात आले.

या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना -- लहान मुलांसाठीच्या काल्पनिक जादुई दुनिया--मंत्र तंत्र या द्वारे --मरण या त्रिकालाबाधित सत्या भोवती इंग्लंडमधील वातवरणात काही काल्पनिक पात्रांभोवती गुंफलेली आहे. ज्या मरणाला आपण सर्वजण घाबरत असतो त्यावर विजय कसा मिळवावयाचा अमरत्वाकडे कसे जायचे याचा शोध यातील एक पात्र घेत असते .

जुलुमांचा पाडाव करून जगणे, व अशक्य अश्या अडथळयांवर मात कशी करावी अश्या प्रकारचे मृत्यू पूर्वीचे

जगणे व मृत्यू नंतरचे जगणे याचा वेध घेण्याचा प्रयत्न यातील पात्रांकडून होतो.

तसेच वयात येण्यापूर्वीच्या मुलांना हिंसा --मृत्यू व त्या पलीकडील मानवात अश्या अनोख्या विषयात गुंगवून ठेवण्यातच या पुस्तकाचे अन लेखिकेचे कसब कामी आले आहे.

सात भागांच्या या पुस्तकांचे ८० विविध देशांच्या भाषां मध्ये भाषांतर झालेले आहे. यावरूनच याची लोकप्रियता कळून येते. हा एक विक्रमच आहे.

हॅरी पॉटर नावाचा सिनेमाही त्यावर निघाला व त्यासही बरीच प्रसिद्धी मिळाली.

अमेरिकेतील ओल्यांडो येथील युनिव्हर्सल स्टुडिओमध्ये याचे चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यात उभारलेला गूढ अद्भुत राजवाडा व चित्रीकरण केलेली अन्य स्थळे पाहण्यासाठी आजही बालके गर्दी करतात.

आपल्याकडे विक्रम वेताळाच्या गोष्टी मुलांना जश्या गुंगवून ठेवतात त्याच प्रकारे---- हॅरी पॉटर --या काल्पनिक कथेने अनेक विक्रम केले आहेत.

जे. के. रोलिंग या लेखिका मात्र रखडलेल्या आगगाडीच्या प्रवासात सुचलेल्या कथेच्या व लेखणीच्या साहाय्याने लखपती झाली हे मात्र निश्चित.

सध्या स्कॉटलंड स्थित रहात असलेल्या या लेखिकेलाही ---" कोरोना १९ ची " बाधा झाली होती.

मात्र सुदैवाने ती यातून सही सलामत बाहेर आली आहे असे ताजे वृत्त आहे.



**पिझ्झा -- युक्त जीवन-----!**

******

गरज हि शोधाची जननी आहे... ! असे समजले जाते.

आजच्या फास्ट युगात " फास्ट फूडला " फारच महत्व आलेआहे आणि त्याची चलती अन बोल बाला खूपच आहे.

हे आपण मॅकडोनल्ड --स्टारबक्स-- सब वेज --आणि आपल्याकडील कॅफे कॉफी डे कामत हॉटेल अश्या फूड जॉईंट चेन्स इ. मधून पहातोच आहोत.

अर्थात या फास्ट फूडचे सुद्धा प्लस -मायनस मुद्देआहेतच.

त्याला पर्याय म्हणूनच हल्ली कामाचे ठिकाणी अश्या फूड चेन बरोबरच-- " जिम " ची व्यवस्था असते.



त्यामुळे कॅलरी व हेल्थ कॉन्शस लोकांसाठी तर हि आदर्श अशी कट्टा स्थानके असतात हे दिसून येते.

चांद्रयान मोहिमेच्या आजच्या युगात याचीही तितकीच आवश्यकता आहे हे पण जाणवते.

विविध क्षेत्रे पादाक्रांत करणाऱ्या आजच्या मॉडर्न युगात याची चलती राहणारच आहे.

जन्म--मृत्यू च्या फेऱ्यातून मनुष्य जीवन मार्गक्रमण करीत असतो.

फेरा म्हटलेकी गोलाकार आलाच. पृथ्वी तर गोल आहेच.

परंतु दैनंदिन उपयोगाचा एखाद्या पदार्थाचा फास्ट अँड क्विक पद्धतीने शोधून काढण्यास व त्याचा रिझल्ट येण्याच्या

काळात विविध वळणे अन अडथळे घेत मार्गक्रमणा करावी लागते.

त्यामध्येही यशस्वी होण्यासाठी ठराविक " चौकटीत " राहूनच आपला कार्यभाग उरकावा लागतो.

विविध गणिते मांडावी लागतात.

अन त्यावेळी आपला मनाचा विशाल " दृष्टिकोनही " ठेवावा लागतो. तरच कार्य सिद्धीस जाते.

आता गणिती भाषेत कोन म्हटलेकी म्हटलेकी त्यासाठी ० ते ३६० डिग्री पर्यंतची मर्यादा असते,

याने सुद्धा शेवटी वर्तुळच पूर्ण होते हे समजते.

१८० --डिग्री कोना मुळे अर्धवट दृष्टिकोन तयार होतो.

त्या साठी कोणत्याही निष्कर्षाप्रत वेगवेगळया पूर्ण दृष्टी कोनातून विचार करणे हे आलेच.

हेच तत्व आपणास आजकालच्या दैनंदिन लोकप्रिय " **पिझ्झामधून** " मधून दिसून येते.

पिझ्झा हा पदार्थ तसा " इटलीचा " इटलीकर हा देखील पुणेकरा प्रमाणे पिझ्झा खाऊन १ ते ४ सुस्तावणारा.

पिझ्झा शोधून काढणाऱ्या शेफने.. ? कल्पक वृत्तीने त्यास **प्रेझेंट** केले आहे. त्यामुळेच आज सर्वदूर त्यास पसंती मिळत आहे. तसेच ऑर्डर करायचा अवकाश कि. .. गर्रकन टू व्हीलर / फोर -व्हिलर मार्गे गरमागरम घरपोच हि मिळतो झटकन अन क्षुधाशांती होऊन जाते पटकन.

बालमित्रांमध्ये तर तो विशेष लोकप्रिय झाला आहे.

पिझ्झा पदार्थ -----दिसायला गोल असतो. .

त्याच प्याकिंग -----चौकोनी बॉक्स स्वरूपात असते

खाताना मात्र ----त्रिकोणी आकारात पुढे येतो.

त्या मुळेच वरील सर्व कसोट्या पारकेल्याने " पिझ्झा " आज सगळीकडे घरोघरी आपले अधिराज्य गाजवीत आहे हे दिसून येते

विशेषतः बच्चे कंपनीत तो फारच प्रिय असल्याने वाढदिवशी " पिझ्झा पार्टी " हमखास ठरलेली असते.

सध्या भारतात पितृ पंधरवडा सुरूआहे. त्यासाठी परलोकात गेलेल्या लोकांची पारंपरिक -- " श्राद्ध "-- (!) घालण्याची व त्यासाठी विविध खाद्य पदार्थ करण्याची घरात बेगमी सुरू आहे. .

सध्याच्या युगातील फास्टनेस पहाता.. पिझ्झा --देखील या पदार्थांच्या रांगेत लवकरच आपले " **स्थान निश्चित करील** " यात शंका नाही.



मग काय होऊन जाऊ द्या... एक झकास पिझ्झा पार्टी.. !

*****

**दगडातील देव आणि माणूस ---!**

*****

धन्यवाद मित्रांनो ----!

*****

आम्ही डॉक्टर झालो खरे.

ती झाली आमची जीवन जगण्यासाठीच्या पोट पूजेची सोय.

लेखन- हा झाला हा छंद. आपल्या मनाचे समाधानासाठी. स्वतःचे मनोरंजनासाठी.

अन झालेच.. ? तर इतरांचे प्रबोधनासाठी.

काहींना वक्तृत्वाने ते जमते, काहींना संगीताच्या संगतीने, काहींना कवितातील शब्दांच्या यमकाने, काहींना कॅनव्हास वर विविध चित्रे चितारून

काहींना प्रशासनातील अधिकार पदाने तर काहींना निसर्गातील मनोहारी चित्रीकरणाच्या " क्लिकने " हे साध्य होते.

त्यामुळे डॉ. लागू -डॉ. भावे -डॉ. जब्बार पटेल -डॉ. काशिनाथ घाणेकर - डॉ. नितीन करीर असे प्रथितयश

डॉ. कलावंत निर्माण होतात.

आजच्या "आय फोनच्या " जमान्यात हे सर्व काही आपल्या हातात अन खिशात आले आहे.

त्याचा सर्वजण आपापल्या परीने उपयोग करून घेत आहेत असे दिसते.

आपल्या शरीराचे मोबाईल प्रमाणेच दोन भाग असतात..

प्रत्यक्ष सिम कार्ड अन मोबाईलसेट हे जसे वेगळे घटक असतात.

तसेच शरीराचे प्रत्यक्ष शरीर --आणि मन (अंतर्मन सहित) दोन भाग असतात .

सिम मुळेच स्क्रीनवर विविध छबी उमटतात.

तसेच मन आणि अंतर्मनातील भाव -भावनांचे प्रतिबिंब शरीरावर पडते.

त्यामुळेच शारीरिक अन मानसिक अश्या भिन्न समस्याही उत्पन्न होतात.

आमच्या कार्यालयीन कारकिर्दीत आम्ही सर्व सामान्य रुग्णांच्या व्यथा अन कथाच केस पेपरवर शब्दबद्ध केल्या.

त्यावरील उपाय म्हणून कागदावरच इंजेक्शनचे काही थेंब अन मूठभर मावतील एव्हड्या

गोळयांनी त्यांचे वेदनांवर तात्पुरत्या मलम पट्ट्या केल्या.

त्याचे सेवनाने रुग्णांना तात्पुरते बरेही वाटू लागते.

कांही जण सर्जरी करून, मनाचे समुपदेशन करून तर काही योगोपचाराने

औषधा शिवाय ही रुग्णांचे समाधान करू शकण्यात पारंगत असतात.

कारण बहुतांशी आजार हे मनाशी निगडित असतात.

गोड बोलून देखील आपण लहान मुले पडली धडली तर त्यांच्या वेदना क्षणात दूर होताना आपण प्रत्यक्ष व्यवहारात पहात असतो.

त्यामुळेच डॉक्टरांना' देव '.. ? मानण्यात लोकांना समाधान मिळू लागले.

देवाच्या दारी सुद्धा आपण असेच करत असतो.

मनोमन आपण आपल्या व्यथाचे गाऱ्हाणे देवाच्या दारी डोळे मिटून मांडतो.

मनोभावे नमस्कार करतो.

तेथील चिमूट भर अंगारा --घोटभर तीर्थ --अन दूध - केळाच्या संगतीने " प्रसाद "- झालेल्या द्रोणभर शिऱ्याचा प्रसाद सेवन करून

देवाच्या दारी क्षणभर उभे राहून प्रसन्न मनाने बाहेर पडतो.

अन निश्चिन्त होतो.

यामुळेच तर डॉक्टरांना देव मानण्यात येऊ लागले असावे का.. ?

परंतु कोणताही डॉक्टर आपण शिकलेल्या ज्ञानाशी अन डिग्री घेताना घेतलेल्या शपथेशी (**हिपो क्र्याटिक ओथ**) एकनिष्ठ राहून,

मनापासून आलेल्या रूग्णांवर उपचार करतो व सर्व हवाला त्या अदृश्य अशा जगन्नियंत्यावर ठेवत असतो. .

The **Hippocratic oath** is a long-standing tradition in medicine.

**Named after** the Greek physician **Hippocrates**,

the written **oath** was intended to act as a guideline for those entering the medical profession.

The **Hippocratic Oath** is an **oath** of ethics historically taken by physicians.

It is one of the most widely known of Greek medical texts.

In its original form, it requires a new physician to swear,

by a number of healing gods, to uphold specific ethical standards.

The **Hippocratic oath** covers several important ethical issues between **doctors** and patients.

The **oath** first establishes that the practitioner of medicine gives deference to the creators, teachers, and learners of medicine. ...

The **oath** serves as a contract for **doctors** to work towards the benefit of the health of the public.

त्यात कधी कधी दुर्दैवाने अपयशही येते खरे आहेच.
पण हा सुद्धा झाला दैवयोग.

पण हे पुरते न समजल्यानेच आज समाजात मात्र उठ सूट या

मानलेल्या देवावरच, ----दगडाचाच देव बनलेल्या--- दगडांचा वर्षाव होऊ घातला आहे.

दगड आणि देव यातील फरक समाजाला उमजेल तोच आज सुदिन असेल... !

**ब्रयांडेड पुणे --**

*****

स्वराज्य रक्षक संभाजी लोकप्रिय मालिकेतील ऐतिहासिक वारश्या नुसार तलवार म्हटलीकी ती भवानीच. छावा म्हटलंकी तो संभाजीच. राजा म्हटलेकी रयतेचा जाणता राजा शिवाजीच.

अन चंद्रकोर म्हटलेकी ती पुनवेचीच . असा जणू ब्रयांडच झाला आहे.

पुणे सुद्धा यात मागे नाही.

पगडी म्हटलेकी पुणेरीच, वाडा म्हणजे पुण्याच्या पेशव्यानचा शनिवार वाडा , पुण्यात पूर आला तो पानशेतचा.

तेंव्हापासून पुणे स्मार्ट अन **ब्रयांडेड** होऊ लागले आहे.

पुण्याच्या बेडेकरांची मिसळ असू दे नाहीतर चितळ्यांच्या गरमागरम बाकरवड्या (भले दुपारी १ ते ४ न का मिळेना) पण घ्यायचा त्या पुण्यातूनच.

सोने म्हटलेकी पुण्याचे दाजी काका अर्थात पी. अँड जी. आणि रांका ज्वेलर्स.

पुण्यातील लक्ष्मीरोडची खरेदी अन जंगली महाराज चकाचक रोडवरची खाऊ गल्लीतील भटकंतीला तोड नाही.

आता बाग म्हणाल तर दोनच तुळशीबाग अन सारसबाग या शिवाय महिलावर्गाच्या खरेदीला अन भक्तीला पर्याय नसतोच. तीच गत पुण्यातील पर्वती अन हनुमान टेकडी जणू बलदंडतेचे मापदंडच.

कॉलेज म्हणाल तर दोनच एक म्हणजे फुलपाखरू जीवन अनुभवण्याचे भाऊ अर्थात स. प. महाविद्यालय अन जगप्रसिद्ध थोर अश्या व्यक्तींचे आश्रयस्थान असे फर्ग्युसन महाविद्यालय.

पुण्याच्या जनतेच्या आरोग्याची काळजी घेणारे एकमेव सरकारी सर्व रोग चिकित्सक असे ससून हॉस्पिटल. एके काळी हेच हॉस्पिटल " **ससून व्हेअर यु विल डाय सून** " अश्या अफवेने प्रसिद्ध होते.

कॅम्पमधील मिल्ट्रीचे कमांड हॉस्पिटल देखील रुग्णांचे पसंतीचे गर्दी करणारे असेच आहे.

मेडिकल साठी पुण्यातीलच बी. जे. मेडिकल अथवा आर्म फोर्सेस मेडिकल कॉलेज यालाच सर्वप्रथम पसंती.

सांस्कृतिक आघाडीवर म्हणाल तर वासंतिक वसंत व्याख्यानमाला --" सवाई गंधर्व महोत्सव "अन गणेशकला क्रीडा मंदिरात रंगणारा वार्षिक गणेश उत्सव कार्यक्रम.

जेष्ठांच्या दिवसभराची विरंगुळयाची ठिकाणे म्हणजे नगर वाचन मंदिर अन विभागीय शासकीय ग्रंथालय.

ऐतिहासिक जिजाबागेतील लाल महाल अन वानवडीतील शिंद्यांनी छत्री अजूनही तग धरून आहेत.

रात्र म्हटलेकी आठवते ती सारस बागेतील कोजागिरी आणि पहाट म्हटलीकी स्वरगंगेनी बहरणारी दिवाळीतील प्रसन्न पहाट.

आता लहानसहान गल्ली बोळांचच घ्याना भारदस्त असा नावाचा भाऊ महाराज बोळ अन चिल्लरशा तपकीरगल्ली ची सर दिल्लीला सुद्धा येणार नाही अशी जगात भारी.

वाचकांची तहान भागविणारा ए बी सी अर्थात अप्पा बळवंत चौक अन सुवर्णपेढयांनी वेढलेला अन मढलेला सोन्या मारुती चौक पुण्यातच.

रंगमंदिर म्हणाल तर पुण्याच्या शिरपेचातील बालगंधर्व अन पुरुषोत्तम जिंकल्याचा जल्लोष साजरा करणारे भरतनाट्य मंदिर पुण्याशिवाय कोठे नाही.

कांही मोजके मुजोर रिक्षावाले व शिरजोर असे चेन स्न्याचर दुचाकीस्वार पुण्यातच भेटतील.

मस्तानीचेच घ्याना एक शृगांर रसांनी रसरसलेली बाजीरा मस्तानी अन दुसरी मधुर रसाची सुजाता मस्तानी दोघीनांही जगात तोड नाही.

घाट म्हणालतर दोनच मस्तानी तलावाचे विहंगम दर्शन घेत चढतजाणाऱ्या माऊलींच्या पालखीच्या पायवाटेचा दिवेघाट अन पुण्याचा दक्षिण वेशीवरील चढाचा कात्रज घाट.

टीचभर मजकुराने नख शिखांत पाणउतारा करणाऱ्या पाट्या अन मान उंचावून पहावा लागणार कात्रज तलावात उभारलेला तिरंगा झेंडा पुण्यातच पाहावयास मिळतो.

पुण्याच्या पाण्याचे तर काही विचारू नका. पानशेत - खडकवासला धरणे अन मुळा - मुठा या नावापुरत्या असलेल्या नद्याचे पाणी एकदा प्यालेकी पुणेकर मात्र तृप्त होऊन जातो,

अन जगभरच्या आव्हानाला समर्थपणे समोर जातो
समोरच्या कोणास ही पाणी पाजण्यास सज्ज होतो.

हे झाले जुन्या पुण्याचे.

नवे पुणे तर थेट पिंपरी चिंचवडला जाऊन भिडले अन चोफेर विस्तारलें आहे . पी एम टी चे नामकरण देखील पी सी एम टी झाले आहे.

आय टी पार्क मुळे पुणे हिंजवडी ते हडपसर --कोथरूड ते खराडी --अन कात्रज ते येरवडा असे अमिबासारखेच पसरतच चालले आहे. भरीस भर पडली ती सिमेंटच्या जंगलाची--- पुनावळे ते तळेगाव विस्तारलेल्या पुम्बैची.. (पुणे अन मुंबई -स्यांडविच)

या मुळे मूळ पेन्शनरांचे शांत पुणे मात्र हरवून गेले आहे. फ्लाय ओव्हर --बी आर टी --अन मेट्रोच्या नव नव्या जाळ्यात पूर्णपणे अडकत चालले आहे.

पण तरीही आमचे---- **पुणे तेथे काय उणे** चा पीळ मात्र सुटत नाही हेच खरे.

..

*****

## दिवाळी पहाट

दिन दिन दिवाळी म्हटलीकी गोडधोड फराळाबरोबर सुरांच्या



मैफलींची " दिवाळी पहाट " अनुभवण्याचा प्रघात पुण्यात अनेक वर्षांपासून सुरु आहे. यावर्षी आम्ही त्याचा सुखद कर्णमधुर आस्वाद घेतला.

नावातच पद्म असलेल्या पद्मश्री पद्मजा फेणाणी यांचा कार्यक्रम आण्णाभाऊ साठे सभागृहात होता.

पहाटे लवकर उठून अभ्यंग स्नानादी आटोपून निघालो. रांगोळयांचे नेत्रसुखद गालिचे प्रांगणात अंथरले होते. नवनवे कपडे लेवून श्रोते हळू हळू गर्दी करू लागले. अर्थात जेष्ठांचा भरणा अधिकच होता.

६.. ३० मिनिटांनी सभागृहातील लाल झिरमिरीत पडदा हलकेच दूर झाला अन पद्मजा ताईंच्या गाण्याचे कार्यक्रमास सुरवात झाली.

ती तारक मंत्राने ---

निशंक हो निर्भय हो मना रे ---
प्रचंड स्वामी बळ पाठीशी रे ----

व, गणेश वंदनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. .

हृदयनाथ मंगेशकरांनी शिष्या तसेच लता मंगेशकरांचा वारसा लाभलेल्या पद्मजा ताईंनी त्यांची गाणी गात मैफिल पुढे नेली.

कवी ग्रेस तसेच त्यांच्या आवडत्या कवयित्री इंदिरा संत, बाबूजी अर्थात सुधीर फडके,, कुसुमाग्रज इ. दिगज्जांच्या कविता, गाणी यांचा खमंग स्वराविष्कार सादर केला.

दिवाळी हि नुसती लाडू चिवडा चकली या साठी नसून गाण्यांच्या माध्यमातून गायक आणि श्रोते यांचे नाते धृढ करणारी असते. दिवाळी निमित्ताने आपले नाते संबंधही धृढ होतात. .

हसत मुख पद्मजा ताईंनी लता दीदींची, बाबूजींच्या आवाजाची व हावभावांची नक्कल, करीत विविध गाणी पेश करून वन्स मोअर मिळवून श्रोत्यांना कर्ण तृप्त केले.

सर्वस्व तुजला वाहुनी, माझ्या घरी मी पाहुणी .. हि विंदा करंदीकरांची कविता तसेच सुरेश भटांच्या गजल गात सुरांचा वर्षाव केला.

दिवे लागले रे दिवे लागले..
तमांच्या तळाशी दिवे लागलेरे ---

.. हे शंकर रामाणी यांचे दिवाळी वातावरणाशी एकरूप करणाऱ्या गाण्यांनी श्रोत्यांना मंत्र मुग्ध करून सोडले. याची आठवण सांगताना त्यांनी सांगितले शंकर रामाणी यांनी त्यांचा अगम्य अक्षरात

हे गाणे मला दिले ते मला समजेना, वाचता येईना. मग मी लगेच केमिस्ट कडे गेले त्याचे कडून ते वाचून घेतले. व गाणे समजून घेतले. अशी विनोदाची पेरणी करत कार्यक्रम रंगत नेला.

हासरा नाचरा जरासा लाजरा,

सुंदर साजीरा श्रावण आला... हे कविवर्य कुसुमाग्रजांची कविता आपल्या मधाळ सुरात गुंफत सादर केली

प्रत्येक नव्या गाण्या सह मैफिल रंगत गेली त्यात वादकांचाही सहभाग प्रामुख्याने होता..

संगीत हे अध्यात्म व सूर हा परमेश्वर मानणाऱ्या प्रसन्न सात्विक व हसऱ्या चेहऱ्याच्या पदमजाताईंनी ----

रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा..

सांडी तू अवगुणु रे भ्रमरा ----या ज्ञानेश्वरांच्या अभंगाने दिवाळीच्या पहाटेची सांगता केली. .

महालक्ष्मी वर नितांत निष्ठा असलेल्या पदमजा ताई, त्यांना मिळालेला सुरांचा गोडवा त्या परमेश्वरी वरदान मानतात. संगीत हे अंतर्मुख होऊन ध्यान धारणे प्रमाणेच परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचाच एक मार्ग आहे. असेहि त्या मानतात.

सुरेल सुरांच्या उटण्यांची पखरण व स्वरांची आतषबाजी करीत रंगलेली व दिवाळीच्या दिव्यानी उजळलेली दिवाळी पहाट आज आम्ही २०१८ नरक चतुर्दशी दिवशी अनुभवली. .

******

**बी अँड बी ----**

बस प्रवास अँड ब्रंच --!

*****

रांधा वाढा अन उष्टी काढा. हे स्त्रियांच्या जणू पाचवीलाच पुजलेले असते.

त्यातून एक दिवस सुटका मिळाल्यास किती बरे असे अनेकदा मनात येते.

पण मनी वसे ते स्वप्नी दिसे. असेच बरेचदा होऊन जाते.

या वीक एंडला गेल्या शनिवारी मात्र आम्ही ते सत्यात उतरविण्याचे मुद्दाम ठरवूनच टाकले.

सकाळी चहा पानाचे आन्हिक उरकून घेतले. अन अश्वारूढ पोझिशन घेतली.

कार ला सुद्धा विश्रांती देऊन बसने प्रवास करण्याचे ठरले. खरे तर रिडींग मधील आमचा हा पहिलाच बस प्रवास.

घराचे मागेच हाकेच्या अंतरावर बस स्टॉप असल्याने सर्वजण १० चे सुमारास घराबाहेर पडलो. कोवळी उन्हे थोडेसे ढगाळ वातवरण टिपिकल इंग्लंडला साजेसे असेच होते.

रिडींग बस दर पंधरा मिनिटाला सेवेस हजर होते. अन ती चेरीरेड साडी परिधान केलेली आमच्या पुढ्यात येऊन ठाकली. टुणकन उडी मारून सर्वांनी आत प्रवेश केला. वीकेंडला व ऑफ वेळे मध्ये बस भाडे कमी असते. फ्यामिली व जेष्ठ नागरिकांना सवलत हि असते. व एकदा काढलेले तिकीट चोवीस तास रिडींग मध्ये फिरण्यास व्हॅलिड असते हा नवा शोध आम्हाला लागला.

बस डबल डेकर असल्याने अर्थात सर्व जण वरच्या मजल्यावर फ्रंट सीटवर बसण्यास आसुसले होते. नातू नील व नातं अनुष्का मात्र यात यशस्वी झाले.

स्वच्छ, आरामदायी कुशनची आसने, समोर टी व्ही स्क्रीनवर येणारी प्रत्येक स्टॉप चीसुस्पष्ट नावे वऑडिओ सिस्टीम. अन हवेत तरंगत चालल्याचा फील येऊन सभोवतालचा शहरी माहोल पाहण्यासाठी असणारी काचेची तावदाने. यामुळे आपला ़प्रवाससुखकर होवो अश्या पाटीची गरजच नसते येथे.

सुटीची सकाळ असल्याने रस्त्यावरील तुरळक वाहतूक सुस्तावलेले पदपथ त्याची जाणीव करून देत होते.

आम्ही टाऊन सेंटर स्टॉप ला उतरलो.

आमच्या नियोजित " चेन्नई डोसा " उपहार गृहाजवळ आलो अन काय आश्चर्य --क्लोज्ड ड्यू टू रिन्युएशन या फलकाने आमचे स्वागत झाले. बट यु कॅन एन्जॉय सेम मेनू नियर बाय रेस्टोरंन्ट

असा स्यांडविच मेसेज असल्याने, अपयश हीच यशाची पायरी याचा फील आला.

अन आमची पावले तिकडे आपसूकच वळाली. गर्दी नसलेल्या त्या सुंदर उपहार गृहात स्थनापन्न झालो. प्रत्येकाने आपापल्या आवडीच्या डिशची फर्माईश पेश केली. मेदुवडा, फ्राईड इडली, चणे भटोरे, ओनियन उत्तप्पा, कॉर्न सूप अन



मसाला डोसा अश्या भरगच्च मेनूने टेबल सजले गेले. आजच्या ब्रंचचा संथपणे आस्वाद घेऊन त्यावर गरमागरम फक्कड फिल्टर कॉफीचा अभिषेक करून आजचा विकेंड आनंदात एन्जॉय केला. अन महिला मंडळाचा आनंद द्विगुणित झालेला पाहावयास मिळाला.

ब्रंच म्हणजे इकडील भाषेतील नाश्ता व जेवण अर्थात ब्रेकफास्ट व लंच याचे स्यांडविच. म्हणजेच आपल्या भाषेत एकाच दगडात दोन पक्षी.

तसेच बी अँड बी म्हणजे हॉटेलच्या संदर्भात बेड अँड ब्रेकफास्ट एक रात्री साठी आश्रय घेणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठीची व्यवस्था.

आम्ही बी अँड बी ला बस प्रवास अन ब्रंच असा नवा आयाम देत साजरा केला.



सुखदायी नयन मनोहारी प्रवासाने घरी आल्यावर वामकुक्षीच्या डेझर्ट ने ब्रंचची कहाणी सुफळ संपूर्ण झाली ऊन पावसाचा खेळ खेळणाऱ्या श्रावणाचा आरंभ झाला.

**पत्र नव्हे मित्र ....**

******

**पत्र तुझे ते येता अवचित, लाली गाली खुलते नकळत**

पत्र तुझे ते येता अवचित
लाली गाली खुलते नकळत

साधे सोपे पत्र सुनेरी
नकळे, क्षणभर ठेवु कुठे मी
शब्दोशब्दी प्रीत हासरी
लाज मनाला, मी शरणागत

आजवरी जे बोलु न शकले
शब्दांवाचुन तू ओळखिले
गीत लाजरे ओठावरले
गुणगुणते मी नयनी गिरवित

वेळी अवेळी झोपेमधुनी
जागी होते मी बावरुनी
खुळ्या मनीचा भास जाणुनी
गूज मनीचे हृदयी लपवित

तर असे हे पत्र लिहिणे अन पाठविणे आजच्या इ मेल आणि एस एम एस च्या जमान्यात दुर्मिळ होत चालले आहे.

**पोस्टकार्ड ----** पिवळसर रंगाचे हातभर नव्हे वीत भर आकाराचे हे पत्र पण त्याची आतुरतेने वाट पहिली जायची. पोस्टमन सुद्धा मोठी

आरोळी ठोकून नाव पुकारूनच ते पत्र घरात देत असे. एखाद्या आजी आजोबास ते पत्र असेल तर त्यांना वाचूनही तोच दाखवी व सुहृदांचे- मुलाचे- नातवाचे

क्षेम संमाचार त्यांना मिळत असत. हे छोटेशेच पण मन मोकळे करायला लावणारे पत्रही तसे उघडपणे असल्याने कोणीही सहजपणे वाचू शकत असे, कोणताही

आड पडदा न ठेवता. त्याने पाठविणारा अन वाचणारा यांच्या मनाच्या तर जुळत असत.

**अंतर्देशीय पत्र -----** निळसर रंगाचे तीन घड्या नंतर बंद करावयाचे हे बंदिस्त पत्र. जादा मजकूर अथवा खाजगी बाब असेल तर याचा उपयोग होतो.

या मध्ये सविस्तरपणे आपले मनोगत मांडता येई.

**पाकीट -----** फुलस्केप पानावर लिहिलेले व घड्या करून ते अलगद या पाकिटातून पाठवले जाई. रोम्यानटिक मजकुरास खास गुलाबी कागद

वापरला जाई अन ते वाचताना...। न कळत... गाली लाली खुलत असे नकळत. काही जण तर त्यास सुगंधित करत असत. त्यामुळे वाचताना वेगळाच मूड बनत असे.

**तार ----** खरेतर बिनतारी पद्धतीने हा संदेश **कड कट्ट- कड कट्ट** अश्या आवाजात एका पोस्टातून दुसर्या गावातील पोस्टात पाठविला जाई. यास मात्र

शब्दांचे बंधन असे. शुभ संदेश - परीक्षेत यश - अभिनंदन पर संदेश ---कोणी निवर्तल्याची दु:खद घटना अश्याना विशीष्ठ क्रमांक असत. त्याचा फक्त नंबर द्यावा लागे. काही

तासान्नी हि बातमी संबंधिता पर्यंत पोस्टमन मार्फतच पोहोचत असे. ता----र असे करत तो दारात हजर होई.

परंतु बर्याच वेळा तार आली म्हटलेकी कोणीतरी गेले असेच समजले जाई. तार म्हटले की ती वाचे पर्यंत अंगावर काटा येत असे.

अशी ती काटेरी तार होती ती. अभिनंदनपर किंवा इतर महत्वाच्या निरोपाच्याही तारा पाठविल्या जात असत. अशी हि जलद संदेश तार सेवा ११६ वर्ष्यानंतर आता कायमची

पडद्याआड होत आहे. कड कट्ट -कड कट्ट आवाजाने आता कायमचा अखेरचा श्वास नुकताच घेतला आहे.

**भेटकार्ड -----प्रासंगिक भेट कार्ड स्वतः हाताने बनवून पाठविली जात. राख्या - तिळगुळ पाकिटातून पाठविले जात.**

**व दूरचे स्नेह बंध अधिकच बळकट होवून जात असत.**

आता मात्र एस एम एस -फेस बुक -ट्विटर मार्फत क्षणार्धात निरोप जात असल्याने त्यातील-- अधीरताच लयास गेली आहे असेच दिसून येते.

असो काळाचे ओघा बरोबर आता फ्लाय ओव्हर- मेट्रो - भुयारी मार्ग -ग्रेड सेपरेटर मार्गे जसे दूरचे अंतर थोड्या अवधीत कापले जाते तसेच काहींसे झाले आहे.

अन विमानाद्वारे तर एका देशातून दुसर्या देशात अन आंतरदेशीय प्रवासही वेगाने होत आहे. हे आपण दररोज अनुभवतो आहोतच की .

******

**// सिलिकॉन व्हॅली //- एस. एफ. ओ. // -कॅलिफोर्निया//**

*****

(सत्यम - शिवम -सुंदरम)

---

शालेय जीवनातील भूगोलाचे पेपरात थोडक्यात उत्तरे द्या असा एक प्रश्न हमखास असायचा

. "खालील शहरांची थोडक्यात माहिती व वैशिष्ठय सांगा ". व नकाशा आवश्यक.

त्याच शहरात आज प्रत्यक्ष हिंडून फिरून आल्यावर त्याची आजच्या घडीची प्रत्यक्ष उत्तरे खालील प्रमाणे देता येतील. ती अशी. -----

सिलिकॉन व्हॅली -----

******




आपल्या कडील कोकण किनारपट्टी प्रमाणे अमेरिकेतील क्यालिफोर्नियाची ९०० मैल लांबीची ही प्रशांत महासागराची आय. टी. वाल्यांची गळेपडू अशी किनार पट्टी.

यातील मध्य भागास -सिलिकॉन व्हॅली म्हणतात. डॉन हॉफलर याने सिलिकॉन व्हॅली--- नावाची इलेक्ट्रॉनिक विश्वातील घडामोडी सांगणारी मालिका वर्तमान पत्रात जानेवारी १९७१ पासून चालवीत होता.

" सिलिकॉन " या घटकाचा मुबलक वापर कॉम्पुटर क्षेत्रात केला जातो. व कॉम्पुटर तयार करणाऱ्या कंपन्या बहुतांशी याच भागात वसलेल्या होत्या.

तेंव्हा या भागास व्हॅली ऑफ हार्ट डिलाईट असे नाव होते, या भागातील फळ बागांची जागा हळू हळू या फर्म्सने घेतली.

एका साधे " ग्यारेज " हे सिलिकॉन व्हॅलीचे जन्म स्थान आहे. हे सांगितले तर कोणास खरे वाटणार नाही




तेच ग्यारेज आज आय. टी. क्षेत्राचे मूळ ऐवज आज ऐतिहासिक वारसा म्हणून जतन केले गेले आहे.

आज जभरातील कॉम्पुटर कंपनीचे भलेमोठे जाळेच याभागात पसरले आहे. आणि सायबर सिटी म्हणूनहि मान्यता पावलेली आहे.

प्रामाणिक पणे केलेल्या कामाचे चीज झाले. शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी असे आपल्याकडे म्हणतात तेच खरे.

**कथा ----नोबेल पारितोषिकाची -----**

******



अल्फ्रेड नोबेल -- (१८३३-१८९६) हे स्वीडिश येथील केमिस्ट व इंजिनिअर. यांनी --" स्फोटकांचा शोध लावला ". व आपल्या मागे ठेवलेल्या संपत्तीतून नोबेल पारितोषिकांची व्यवस्था करून ठेवली आहे.

दरवर्षी हे पारितोषिक-- शांतता --साहित्य --फिजिक्स --केमिस्ट्री -फिजिओलॉजी -व मेडिसिन या सहा विभागात उत्कृष्ट समाज उपयोगी असामान्य कार्य करणाऱ्या कोणत्याही देशाच्या नागरिकास बहाल करण्यात येतात.

१९०१-- पासून हि पारितोषके देण्यास स्टोकहोम -स्वीडन येथे त्यांच्या जन्म गावी सुरुवात झाली.

बालपणा पासून अत्यंत बुद्धीमान असणाऱ्या नोबेलने १६व्या वर्षी एक प्रतिथयश केमिस्ट म्हणून तयार झाला तसेच स्वीडिश - फ्रेंच - जर्मन - इंग्लिश व रशियन अश्या भाषेवर प्रभूत्व मिळविले होते.

एकाकी व परखड असे व्यक्तिमत्व होते. तो अविवाहित होता.

त्याचे वैयक्तिक विचार ----

१) If I have a thousand ideas and only one turns out to be good, I am satisfied.

२) I intend to leave after my death a large fund for the promotion of the peace idea,

but I am skeptical as to its results.

३) Hope is nature's veil for hiding truth's nakedness.

**पारितोषिका मागील -- एक मजेशीर गोष्टआहे --**

******

१८८८ मध्ये "**मर्चन्टऑफ डेथ इज डेड** "----- या मथळ्याखाली नोबेल अल्फ्रेडची--" मृत्यू वार्ता " त्याच्याच वाचनात आली. त्यामध्ये त्याचे बरेच गुणगान करण्यात आले होते. खरेतर त्याचा भाऊ निवर्तला होता.

या घटनेने त्याना आपण मृत्यू नंतर लोकांच्या आठवणीत रहाण्यासाठी काहीतरी खास केले पाहिजे हि भावना दृढावली.

त्या खरेतर" वाईट वाटणाऱ्या " बातमीने एक चांगल्या घटनेची निर्मिती झाली -----

नोबेल पारितोषिकांची मालिका-----

*****

पहिले नोबेल पारितोषिकचे मानकरी ठरले ----

--फिजिक्स मधील - विलहेल्म रोंटजेन याना ---एक्स रे साठी जाहीर झाले.

---फिजिओलॉजी मधील --- एमील व्हॉन बेहरिंग --- डेव्हलपड -- अँटॉक्सिन फॉर डीपथेरिया

**पहिले भारतीय पारितोषिक विजेते ----**

रोनॉल्ड रॉस -----मेडिसिन

रुडयार्ड किपलिंग ----साहित्य

रविंद्रनाथ टागोर -----साहित्य

सी व्ही रमण ----फिजिक्स

हर गोबिंद खोराना ---मेडिसिन

सुब्रह्मण्यन चंद्रशेखर --फिजिक्स

अमर्त्य सेन ---- इकॉनॉमिक स्टडीज

वेंकटरमण रामकृष्णन ---केमिस्ट्री

कैलास सत्यार्थी ----शांतता

पहिली महिला ----

******

अमेरिकन -मेरी क्युरी ----फिजिक्स // केमिस्ट्री अशी दोन नोबल्स तिने मिळविली आहेत.

भारतीय -----महिला..

*****.

मदर टेरेसा... शांतता

नोबल पारितोषिक विजेती सर्वात तरुण व्यक्ती ---

*****

मलाला -(पाकिस्तान) -----शांतता

मलाला म्हणते, ----

" Let us remember: One book, one pen, one child, and one teacher can change the world. Let us make our future now, and let us make our dreams tomorrow's reality.

There should be no discrimination against languages people speak, skin color, or religion. When the whole world is silent, even one voice becomes powerful.

"-

*****



**पेनलेस...पत्र --(लेटर)**

******

शालेय जीवनातील एक आठवण ... वार्षिक परीक्षेचा ५-६ वी ची इंग्रजी विषयाचा पेपर होता. विरुद्ध अर्थामध्ये **युस्फुल** चा विरुद्ध अर्थ द्या असा प्रश्न होता. एका वर्ग मित्रास त्याचे उत्तर माहित नव्हते. तो सरळ पर्यवेक्षक यांचेकडे गेला व हळूच त्याना त्याचे उत्तर विचारले. त्यांनी हि त्याची----**युस-लेस** कुठला, परीक्षा चालू आहे ना, जा जागेवर बस जा. असे खड-सावून सांगून त्याची बोळवण केली.

तर असे फणसा प्रमाणे बाहेरून कठीण तर आतून प्रेमळ असे शिक्षक होते. वर्ग मित्रास... उत्तर तर मिळालेच आणि शिक्षकाना रागावल्याचे समाधानही. एकाच दगडात दोन पक्षी. आताची माध्यमिक शाळेतील पिढी मात्र... **एक्झाम लेस** चाच अनुभव घेत आहेत.

आज सुधा आपण अनेक अश्या **लेस....** च्या आहारी गेलो असल्याचे दिसून येते.

**पेपर लेस** ... ऑफिस च्या दिशेने आगेकूच चालू आहेच. **पेनलेस रायटिंग** दररोज मोबाईल व ल्यापटोपवर सुरु आहेच. तेही अंगठे बहाद्दराचे मदतीने आहे की नाही गम्मत, आजच्या युगाची. कालचे युगात अंगठे बहाद्दर म्हणजे निरक्षर तर संगणक युगात याचे शिवाय एस एम एस पुढे सरकत नाही अन. की - बोर्ड सुद्धा जागचा हलत नाही. कालाय तस्मैः नमः /

कांही महाभाग **वेट लेस** च्या मागे हि लागल्याचे दिसते जणू काही अंतराळातील प्रवासासच निघायचे आहे या थाटात ते असतात. स्लिम अन झिरो फिगर च्या नादाला लागतात. महिला वर्गात यांची संख्या जास्तीची असते हे आपण सर्वजण जाणतोच कारण... बेबोचा आदर्श.

त्यातच **स्लीव्ह लेस** पेहेराव घालण्यातहि त्यांची आघाडी दिसून येते. कांही उत्साही उथळ भवान्या तर **टोप लेस** च्या उंबरठ्यावर उभ्याच आहेत युसलेस कुठल्या .... !

पूर्वी **बुटाची लेस** बांधणे पुरुष मंडळी झोकात करत असत. अर्थात **लेस् च्या बुटांची** एक वेगळीच शान असते. इंग्रजी माध्यमांच्या मुलांना त्याचे बाळकडूच मिळत असते. पण आता

त्याची जागाही झोकदार **कट शूज** ने घेतली आहे. आणि **लेस् चा पत्ताच कट** केला आहे कांही अंशी, असे दिसते आहे.

**सीड लेस** …द्राक्षहि आता आपणास कांही नवीन नाहीत. **फ्याट लेस** दूध तर हवेच असते सर्वांना कोलेस्टेरॉल पासूनच्या बचावासाठी. अन **बोनलेस….** डीश तर सगळयांनाच प्रिय असते.

**क्याश लेस…** व्यवहार तर फारच लोकप्रीय होऊ लागले आहेत डेबिट अन क्रेडीट कार्ड च्या सहाय्याने. त्यानेच तर आपला ब्यांक ब्यालन्स रसातळाला जावून पोहोचतो हे जाणवते.

तर या **लेस** पासून जरा सावधांनच राहणे बरे नाही का…?

अहो पण हे पत्र मात्र तुमच्या पर्यंत येईल **पेन- लेस**... च्या लिखित स्वरूपानेच. हे मात्र नक्की.

प्रिय,

चि. अनुष्का ----

इस सस्नेह आशीर्वाद,

यंदाच्या दिवाळी पाडवा व भाऊबीज बरोबरच आलेल्या १६ नोव्हेंबरच्या एका नव्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

या वाढदिवसाला तुला आई- पप्पानी..

" न्यू मेकओव्हर केलेले --" २२ ब्यूशिफ क्लोज " घरच प्रेझेंट दिले आहे असेच वाटते.

आत नवीन घरात खूपच छान वाटत असेल.

त्यामुळे मजाच मजा. दिवाळीच्या आनंदातच आलेला. वाढदिवस..

म्हणजे दुधात साखरच जणू.

मजा करा..


यंदा फटाके उडवू नका. घरात राहूनच दिवाळीचा आनंद घ्या.

आम्ही देखील नवीन केलेले घर प्रत्यक्ष पाहण्यास खूप उत्सुक आहोत.

परंतु एक दोन वर्ष तरी शक्य होईल असे वाटत नाही.

२०१६.. मध्ये घेतलेल्या या घरात आमूलाग्र बदल करून एक मॉडर्न व सुंदर ब्याक यार्ड असलेलं घर म्हणजे --एक. " स्वप्नशिल्पच "या आहे.

१४ नोव्हेम्बरला भारतात --बालदिन साजरा केला जातो.



**स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वाढदिवस.**

**बालपणी त्यांचे कपडे इंग्लंड धुण्यासाठी पाठविले जात असत.**

**काश्मिरी पंडित कुटुंबात अलाहाबाद येथे त्यांचा जन्म झाला.**

**शिक्षणासाठी ते इंग्लंड मधील ह्यारो व केम्ब्रिज येथे झाले.**

त्यांना लहान मुले फार आवडत ते लहान मुलांमध्ये गप्पामारण्यात रमत असत.

त्यांना मुले आवडीने " चाचा नेहरू " असे म्हणत. .

त्यांना गुलाबाचे फुल फार आवडे. त्यांच्या कोटावर ते नेहमी लावत असत.

त्यांच्या विषयी गुगल वरून सर्व काही जाणून घे.. तुझे जनरल नॉलेज वाढव.

ती माहिती तुझ्या मैत्रिणींना सांग.

त्यातील मजा घे.

असो आम्ही देखील आता येथील सहकारनगरचे रेंटेड फ्लॅट सोडून कोरेगाव पार्क येथील आपल्या-- " निर्झर "-- या घरात रहावयास जाणार आहोत.

त्याचेही नूतनीकरण -- मेक ओव्हर चालू आहे.

असो नॉटी -- नील काय म्हणतोय... ?

आनंदात एन्जॉय करा आजचा ह्यापीवाला बर्थ डे... !

घरातील सर्वांना बेस्ट विशेस ---!

बर्थडेची रिटर्न गिफ्ट म्हणून तू मराठीत पत्राचे उत्तर पाठविण्याचा प्रयत्न कर.

विल विल फाईंड अ वे... हे तुला माहीती आहेच.

*****

# दूध हे पूर्णान्न तर... शब्द हे ज्ञानान्न... !

*****

दूध हे पूर्णान्न आहे. हे विज्ञानाचे पुस्तकातील सत्य आपणास लहापणापासून माहित आहे. त्या पासूनच पुढे दही - ताक - लोणी अ... न लोणकढे तूप तयार होत जाते. यात प्रत्येक पायरीवर त्या पदार्थांचे वस्तुमान कमी कमी होत जाते. आणि त्यातील गुणवत्तामात्र वाढीस लागते. दूध बलवर्धक - दही - ताक पाचक, लोणी स्नेहक चविष्ठ तर तूप जड पदार्थांचे पचन सुलभ होण्यास पोषक असे चमचा भराचे औषधच... म्हणाना.

महिनाभर दूधाचे जेतेम १ लिटरभर तूप बनते. यानेच तर त्यातील औषधी गुणधर्म वाढीस लागतात. आयुर्वेदिक शास्त्र शुद्ध तूप वर्षानु - वर्ष टिकून राहते. आणि ह्याच गरमागरम तुपाच्या... चमचाभर धारेने वरण तूप भातास सात्विक अन्नाचा उच्च दर्जा मिळतो. हृद्य अश्या... पुरण पोळी - मोदकाचे जठरात सुलभपणे हवन होते. मन तृप्त अन जठराग्नीही शांत होतो आणि वाम कुक्षीलाही वेगळीच.. धुंदी येते. त्याने आपणासही गप्पामध्ये लोणकढी थाप मारण्याची... सुप्त - शक्ती प्राप्त होते. -----

" राग- मत्सर- द्वेष या पेक्षा प्रेम- आपुलकी-दातृत्व हे गुण अंगी बाणवावेत "... !

हा झाला एक विचाराला चालना देणारा " मोजक्या. ". ' शब्दातील सुविचार '. पण गहन गर्भितार्थ असलेला, अन बुद्धीला चालना देणारा. शब्दांचे महा राज्यात नेमकी उलट परिस्थिती असते. हे आपल्या लक्षात येते. सा- रे- ग- म चे सुरेल सप्त स्वर, इंद्रधनू सोबतीचे नवरंग, अ आ ई या बारा - खडीच्या तंबूतील क ख ग घ... मुळाक्षरे अगदी... ह ळ क्ष ज्ञ पर्यंत अगदी सळो की पळो करून सोडतात बालवयात.. त्यात पुढे भर पडते ती ए- ई- आय- ओ- ऊ या इंग्रजी स्वरांची व तब्बल सहवीस .. ए बी सी डी या व्यंजनांची. अन त्यातच ते असते... "वाघिणीचे दूध ". हळू हळू ते ही पचनी पडते एखाद्या चीज स्यांडविच-- पिझ्झा प्रमाणे.

अ- अननस, ब- बदक, क- कमल... कानाशी रुंजी घालू लागतात. त्यामधूनच स्वराक्षरांचे गाणे बनते. बालसुलभ वयात त्यांचे पाठांतर होते. कवींना कविता सुचत जाते. . ते पाहून संगीतकारास त्यातील आत्मा-(मेलडी) गवसतो. अन कवीश्रेष्ठ

मंगेश पाडगावकरांचे शब्दांना महान संगीतकार श्री निवास खळे यांची साथ मिळते अन... सुरेल सुरातील..

श्रावणात... घन निळा बरसला...

रिमझिम रेशीम धारा... हे कर्ण मधुर गाणे... जन्माला येते.

सुजनांच्या मनाचा ठाव घेते चिरकाल पर्यंत.

विचारांना पंख फुटतात अन ते सुद्धा...

. बगळयांची माळ फुले अजून अंबरात... प्रमाणे मुक्तपणे भरारी घेत रहातात स्वच्छंद पणे.

शालेय जीवनातील वह्या - पुस्तकातील शब्दांची शिदोरी आयुष्यभर" जीवन सागरात दीप स्तंभा प्रमाणे" मार्ग दर्शक ठरते. महाविद्यालयीन जीवनातील पुस्तकातील घावूक शब्दांची उलाढाल आर्थिक स्थैर्याला आधारभूत ठरते व जीवन सुकर अन समृद्ध होत जाते. अन फावल्या वेळातील वाचन... खाद्य... सुक्या मेव्या पेक्षा कसुभरही कमी नसते याचा अनुभव पदोपदी येतो.

पुं ल - अत्रे - फडके - खांडेकर असे महान लेखक याच शब्दांना धरून आपणास... पुस्तक रूपाने जगाची नव्याने ओळख

करून देतात. जीवनाची काटेरी पावूल वाट, नदी नाल्यांच्या व निर्झरांच्या जलाने मऊशार बनते. रस्त्याचे कडेने वृक्षराजी पाने फुलतात फुले बहरतात व हिरव्यागार गालिच्यांच्या पायघड्या तुडवीत आपण राजमार्गाला कधी येवून पोहोच तो हे समजतही नाही. एखाद्या जिवलग सख्या सोबती प्रमाणेच " ही पुस्तके" आपणास साथ देतात. आपले जीवशच्य कंठशच्य सवंगडी बनून रहातात. आयुष्याला सुवर्ण झळाळी देवून जातात. सुहृदांना भेटीदाखल देव घेव करून आपल्यातील स्नेहबंध अधिकच दृढ करतात.

सोबत हिंदी - इंग्रजी - संस्कृत भाषे सारखी दिव्या गीर्वाण भाषा सोबतीला असतातच. सवंगडी बनून. आपले जीवन अधिकाधिक समृद्ध करण्यत त्या अग्रभागी असतात. काही महाभाग जर्मन - ज्यापनीज- फ्रेंच या सारख्या परदेशी भाषांशी सूत... जमवितात.

दूधा पासून जसे पुढे... पेढे - बर्फी - गुलाबजाम - पनीर - रसगुल्ले असे पचायला जड व जपूनच खावे लागणारे सुमधूर पदार्थ आपल्या जिव्हेला मोहात पाडतात. तसेच असंख्य शब्द

सरितांचा एकत्रित असा महासागर... " ग्रंथ "... स्वरुपात अथांगपणे पानापानाच्या काठावर विहरत रहातो व ज्ञानाच्या कमी अधिक उंचीच्या लाटावर स्वार होतो.

या रत्नाकराचे आकंठ भरलेल्या साठ्यातूनच ,... महर्षि व्यासांचे महाभारत - वाल्मिकींचे रामायण - श्री कृष्णाची गीता, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग तसेच येशूचे... बायबल - इस्लामच्या शिकवणुकीचे... कुराण यासारखे " शाब्दिक अमृत मंथन " आपसूकच बाहेर पडते. व अक्षर ओळख असलेल्या मानवास वरदानच मिळते. तर अशिक्षित करंटे महाभाग... महासागर तटावर असूनही तहानलेलेच रहातात कायमचे.

आपल्या जीवन प्रवासाच्या आचरणाचा आदर्श राजमार्गच.. या ग्रंथातून गवसतो. त्यामुळे... **ग्रंथ हेच आपले गुरु... !** अन ग्रंथालये हीच आपली ज्ञान मंदिरे. कोणत्याही मंदिर - मस्जिद - चर्च प्रमाणेच पवित्र तसेच आपली कवाडे सदैव ज्ञान दानासाठी खुली ठेवणारी असतात हेच आपणास जाणवते. म्हणूनच आपले मस्तक नम्रतेने आपसूक झुकतातच.

**मन:शांतीची प्राप्ती होते... !. न विद्या विनयेन शोभते... !** याची उजळणी होते. .

**आणि तेथे कर माझे जुळती... ! .**

अश्या मोजक्याच परंतु... " अर्थगर्भ ".. शब्दांचीच पुन्हा पुन्हा आठवण येते आणि कृतीत उतरते सुद्धा.

नाही का... ? आपला काय अनुभव आहे... ?

**"आम्हा जेष्ठांचा बक बक करणारा एक सुरेल जेष्ठ मित्र"**

*****

रेडीओ # अर्थात # आकाशवाणी

******

" गगन सदन तेजो मय

तिमिर हरून करुणाकर

दे प्रकाश, देई अभय...

वसंत बापट यांचे ' उंबरठा ' चित्रपटातील सुरेल गाणे रेडिओवर ऐकले अन... ' उंबरठ्याच्या ' आतीलच एका जुन्या दोस्ताची ' नव्याने ' ओळख झाली नव्हे पटली. मित्र.. आपले मनोरंजन करतो, सुख दु:खात बरोबर असतो व समरस होऊन जातो अन प्रसंगी वेळेला धावून येतो तोच खरा मित्र. नाही का... ?

घरातील आज थोडा... दुर्लक्षित असा हा... रेडीओ... नव्याने आम्हा जेस्ठानचा एक सहकारी बनला आहे. त्याचीच ही सुरस कथा.

पहाटेच्या शांत समयी गच्चीवर ' बलोपासनेस ' सुरुवात होते ती त्याच्यासवेच सकाळी ५ ते ७ चालणाऱ्या... मोर्निंग मंत्रा (९३. ५ रेड एफ एम) आणि.. देवराग(९८. ३) .. या कार्यक्रमातील भावपूर्ण भक्ती गीते अन भावगीते अभंग ऐकतच मन- प्रसन्न अन शरीर- ताजेतवाने व हलके होऊन जाते.

पुढील दिन क्रमास उत्साहाने सज्ज होते. यामध्ये अधून मधून ' भगवद गीतेवर ' आधारित सुविचारांची पखरण ही दैनंदिन जीवनास मार्गदर्शक अशीच असते. त्यामुळे वेळ कसा पळतो... हेच कळत नाही. तो पर्यंत व्यायामही... ' घामाघूम ' अवस्थेने पूर्णत्वास येवून ' शीर्षासना ' नंतरच्या ' शवासनाच्या ' मुद्रेत येवून - भूस्थिर होऊन जातो.

. चहा पाणी व नाश्ता व स्नानादी कर्मे होऊन झाल्यावर -- मन करारे प्रसन्न... (१०१ MH)

विश्वात विश्वास निर्माण करण्यासाठी असणारी, डॉ. संजय उपाध्ये यांचा मनास उभारी देणारा असा १५ मिनिटाचा कार्यक्रम

आपल्या आचरणास वेगळीच दिशा देवून जातो अन डोळे अन कान उघडे ठेवण्यास भाग पाडतो.

तसेच सुश्री यांचे ' ह्यापी थोट्स ' हा सुद्धा १५ मिनिटाचा आध्यात्मिकाचा प्रवचन डोस आठवड्यातून एकदा देवून जातात.

अधून मधून चौफेर पसरलेल्या अश्या जगाचा कानोसा घेणारया बातम्यांची पेरणी असते.

आम्ही इंग्रजी शिकतो ... हा मुलांसाठी इंग्रजी भाषा बोलण्याचा सराव करणारा मार्गदर्शनपर कार्यक्रम पुणे जिल्हा परिषदे मार्फत सादर होतो. तो ही छानच असतो.

भुले बिसरे गीत... सकाळी ७... विविध भारतीवर 1950 पासूनची हिंदी सिनेमातील गाणी ऐकावयास मिळतात.

सकाळी १० ते १२... या वेळात दररोज बदलते विषय असलेले कार्यक्रम असतात.

ग्रीटवेल-- संदेशे आते है -----...

या मध्ये पुणे रेडीओ केंद्राने... दिलेल्या फोन वर कॉल करून आपल्या प्रिय जनांच्या वाढ दिवसा प्रीत्यर्थ त्यांना शुभेच्छा व्यक्त करून एखादे छान से गीत सुचवायचे असते. असंख्य वेळा फोन लावून यशस्वी झालेले भाग्यवान आपली फरमाईश सांगतात व गाणे ऐकण्यातील आनंद घेतात व देतात. यामधून अनेकदा भाव भावनांचा संवाद निवेदक व श्रोत्यांमध्ये होतांना दिसतो. मन मोकळे करून आत्मीयतेने आपल्या भावना व्यक्त करत असल्याचे जाणवते. प्रत्यक्ष काही वेळा आपण जे बोलू शकत नाही ते या फोन इन रेडीओ च्या माध्यमातून आपल्या प्रिय जनापर्यंत खुबीने पोहोचविले जाते.

संजय भुजबळ, - सिद्धार्थ बेंद्रे, - नेहा वैशंपायन, -अनुष्का बेंद्रे, - मंगेश वाघमारे' स्वाती मिराशी, प्रतिमा जगताप असे एकापेक्षा एक सरस अन हजर जबाबी व श्रवणीय अशी वाणी असलेले निवेदनात व संबंधित विषयात माहीर असलेले असे हे निवेदक या कार्यक्रमात सळसळती जान व महेक आणतात व श्रोत्यांना अर्धातास रेडीओशी खिळवून ठेवतात.

रेडीओचे आपले एक बरे असते... आपली घरातील दैनंदिन कामे करत करत याचा आस्वादक कानोसा घेता येतो. त्यामुळे तो गृहिणी - कामगार - ड्रायव्हर्स - टेलर - अंध बांधव - सेवा निवृत्त जेष्ठ नागरिक असे असंख्य लोक या कार्यक्रमाचा आनंद घेताना फोन वरील संभाषणातून कळून येते .

रवींद्र फर्निचर--' मनातली ' मराठी गाणी --

हा एक नवीनच व श्रवणीय असा नवा कार्यक्रम. यात आपल्या स्वतःच्या मनातील पसंतीच्या गाण्याची फरमाईश सांगायची. या मुळे अनेक दुर्मिळ भावपूर्ण अशी गाणी आपोआपच ऐकावयास मिळतात. जुन्या नव्या गाण्याचा श्रोत्यांच्या पसंतीचा हा अनोख्या गाण्याचा संगम मनास भावतो व वेगळाच आनंद देवून जातोव आकाशवाणीला एक ' आव्हानात्मकच ' असाच कार्यक्रम आहे. सर्व श्रोत्यांच्या आवडी निवडी सांभाळताना त्यांची जय्यत तयारी असल्याचेच जाणवते.

एक कलाकार --

या मध्ये कलाकारांचा - मग तो नट असो नटी संगीतकार वा गीत कार ज्याचा वाढ दिवस - स्मृतीदिन - जयंती असो, हे निमित्त साधून त्यांच्या विषयीच्या आठवणी जागवून त्यांच्या संबंधात

हिंदी चित्रपटातील गाणी ऐकविली जातात. या मध्ये आपणासही ज्ञात -अज्ञात अश्या गोष्टींची व त्या बरोबर गाण्याची झकास श्रवणीय मेजवानीच असते.

ब्यांड बाजा बारात --

श्रोत्यांनी आपल्या लग्नात घडलेली गमतीशीर - गंभीर घटना थोडक्यात सांगायची व त्यास समर्पक असे हिंदी - मराठी गाणे सुचवायचे व जुन्या आठवणीत रमून जायचे.

मनदर्पण --

यात एखाद्या सामाजिक विषयावर मग तो पाणी वाचवा - स्त्री भ्रूण हत्या -- पर्यावरण - सार्वजनिक स्वच्छता - वृक्षारोपण - त्र्याफिक समस्या असा कोणताही असो त्यावर आपली मते मांडून एखादे गाणे सुचवायचे.

हमतुम --

ह्या कार्यक्रमात - फक्त द्वंद्व गीतांचाच समावेश असतो. त्यामुळे गाणे सुचविताना त्यांचे भान ठेवावे लागते. ह्या कार्यक्रमातूनही सदाबहार अशी समर्पक अशी गाणी ऐकावयास मिळतात.

दुपारच्या वामकुक्षी नंतर... ३ नंतर विविध भारतीवर' पिटारा. '. सदरात . सखी सहेली ... सेहद नामा

स्त्री - पुरुषांच्या --- बाबतीतील विविध समस्यांवर डॉक्टरांशी चर्चेचा कार्यक्रम असतो व मध्ये मध्ये त्या पाहुण्या डॉक्टरांच्या पसंतीचीच गाणी ऐकविली जातात. अश्या प्रकारे ज्ञान आणि मनोरंजन यांचा मिलापच असतो... .. रेणू बन्सल या सुश्राव्य निवेदिका हा संवाद घडवून आणतात.

--ह्यालो फरमाईश... दुपारी ४ ते ५

या भारत भरातील श्रोत्यांच्या फोनवरील सुचविलेल्या गाण्याचा पसंदी गा प्रोग्र्याम आसतो. या कार्यक्रमात लहान लहान खेड्यातून शेतकरी - कामकरी - विद्यार्थी - गृहिणी यांचे फोन असतात. त्यांच्या गावांची चित्र विचित्र नावे आपणास समजतात. त्याच्याशी निवेदक खूपच आपुलकीने बोलून त्यांनाही मनमोकळे बोलण्यास भाग पाडतात. आपण कोठून बोलत आहात... काय काम करता -- घरात कोण कोण असते -- शैक्षणिक पात्रता काय -- आपल्या गावात काय समस्या आहेत

हेच गाणे का सुचविले - हा सिनेमा पहिला का -- तो आवडला का -- त्यातून काय बोध घेतला... ?असे एक ना अनेक प्रश्न विचारून श्रोत्यांना आपलेसे करून घेतात व आकाशवाणीचा श्रोतृ वर्ग वाढविताना दिसतात.

४ ते ६ या वेळात आमचा छोटासा शिकवणी वर्ग सुरु होतो ". मयूर - मादी - माहेश्वरी - मैथिली " या योगायोगाने जमलेल्या म च्या बाराखडीतील शिष्यां समवेत वेळ मजेत जातो.

६ वाजता नाट्य गीतांचा कर्णास्वाद दहा मिनिटे घेता येतो व माहोल नाट्यमय होऊन जातो व गरमागरम' चहा ही फक्कड होऊन जातो.

६ ते ७ च्या सायंकाळच्या बागेतील फेर फटका मारण्यास चांगलाच उत्साह येतो व पायपीटही त्यासुरांच्या आठवणीत सहज सुलभतेने

होऊन जाते..

७ नंतर असते आपल्या फौजी भाईयोन्की पसंदीचा... हिंदी फिल्मी गाण्यांचा त्या द्वारे त्यांचे व आपलेही मनोरंजन होत असते.

' संस्कृत बातम्या '... सायंकाळी ७ वाजता... . संस्कृत या ' देव ' भाषेचा दिवा अखंडपणे तेवत ठेवण्याची जबाबदारी अजूनही इमाने इतबारे आकशवाणी जपत आहे. त्यासाठी तीस मन:पूर्वक धन्यवाद... !

सायंकाळ रंगते ती" रेडीओ मिरची ९८. ३ वरील आर जे स्मिता--- संचलित.. पुराणी जीन्स हा जुन्या हिंदी तसेच' मराठी लयींचा ' सदाबहार व स्वीट ड्रीम... असा श्रवणीय व मन रमणीय करणारा सुश्राव्य कार्यक्रमाने.

रात्री १०. ३० वाजता... जितेंद्र घोडके सराफ... '. मधुमालती. '. ऐकत झोपी जाणे हा एक स्मरणीय (घोरणीय पूर्व तयारीस उत्तम)  असाच असतो.

अन त्यानंतर अंगाई गीत... माहोलात... स्वीट ड्रीम झोप केंव्हा लागते त्याचा पत्ताही लागत नाही.

रविवारी ... विशेष... संडे मिसळ असतेच झणझणीत स्वरुपात -- या केंद्रांवर.

...

या सर्व संगीतमय माहोलातून दिवस भरात. बोअर.. व्हायला अन ती... बो-- अ-- र... ख - णा - य - ला क्षणभराची सुद्धा उसंत मिळत नाही. .

- आकाशवाणी - रेडीओच्या " बहुजन हिताय बहुजन सुखाय... ! या उक्तीस अनुसरून वाटचाल सुरु असते. लहानपणा पासूनच्या कांही आठवणी अजूनही ताज्या आहेत '. बालोद्यान ' हा सई परांजपे व गोपीनाथ तळवलकर यांचे समवेतचा कार्यक्रम. अमीन सयानींची कर्ण मधुर अशी बिनाका गीतमाला.

-- पुन्हा प्रपंच... घरगुती गप्पांच्या, नीलम प्रभू - बाळ कुडतरकर या गुणी--- भाषांवर प्रभुत्व असलेल्या कलाकारांची त्यावर ' मोहोर' असलेला निखळ विनोदी मालिका आणि मनोरंजक श्रृतिकांचा कार्यक्रम.

पु ल--- वसंत देव - सुधीर फडके - ग दि मा यांची कारकीर्द येथेच उभारली गेली. विजय मर्चंट यांची भारदस्त ओघवत्या इंग्रजीतील क्रिकेटची रनिंग कोमेंट्री - तर बाळ पंडित व बाळ करमरकर यांचे मराठी समालोचन ऐकूनच " संजय उवाच "... या महाभारतातील रणांगणावरील महायुद्धा प्रमाणेच रंगणाऱ्या

क्रिकेट मैदानावरील सामन्याचे... आंखो देखा हाल... ऐकूनच... मनाचे समाधान व... कर्णही तृप्त होत असतात.

असा हा आमचा जिवलग सखा " रेडीओ " घर बसल्या दूर - दूरवरच्या ओळखी व अनोळखी अश्या-- सुहृदांची गाठ - भेट घडवून आणतो न दमता अन न थकता अहोरात्र. नव नवीन... विचारांचे खाद्य देणारी ही... द्रौपदीची अक्षय थाळीच.. जणू.

आपण या... अक्षय थाळीचा लाभ... कधी काळी घेतला असेलच... , !

नसेल तर अजूनही वेळ गेलेली नाही. असंख्य सुश्राव्य अश्या नव्या - जुन्या गाण्यांच्या कार्यक्रमांनी सजलेली, अवर्णनीय अश्या या श्रवणीय थाळीचा जमेल तसा अवश्य अनुभव घ्यावा अशीच आहे, याची खात्री ही होईल. -----

**कानामागून आला अन... तिखट झालेला.**

". टी. व्ही. " अर्थात " व्ही. टी. "

*****

" दूर दर्शन... "...

खरे तर यामध्ये दूर - दूरच्या गोष्टी आपण जवळूनच पहात असतो. सुरवातीला... " जपून टाक पावूल जरा.. ! "अश्या गजगतीने आलाही मोठ्या झोकात, गळ्यात हार तुरे व उदबत्तीच्या सुगंधात न्हावून निघत.

(त्याची मुहूर्त मेढ खरी तर महाभारत काळातच रोवली गेली असणार हे नक्की असेच वाटते. ' संजय उवाच '... अंध धृतराष्ट्राला आपल्या दिव्य दृष्टीने रणांगणा घडणारे ' महाभारत ' अर्थात त्या काळच्या अन वेळच्या टी व्ही मध्ये पाहूनच सांगत असणार... असेच राहून राहून आता वाटते नव्हे खात्रीच पटते. असो याची सुरवात ' आपल्या ' महान भारतात झाली हे ही नसे थोडके. त्यानंतर तुकारामांचे ' पुष्पक विमान ' (राईट बंधूंच्या अगोदर) अन संत ज्ञानेश्वर यांचे ---रॉकेट कम... भिंत चालवण्याचा पराक्रम सर्व काही भारत भूमीतच.

तसेच अल्लाउद्दीन चा जादूचा दिवा म्हणजे ---आपला आताचा कॉम्पुटर - ल्याप टोप .. दुसरे काय... ?. जरा कुठे... की बोर्ड.. वर बोटे घासली... व गुगलच्या विन्डोला... आदेश देण्याचा अवकाश की लगेच... तो अवलिया.. ' जीन '... संपूर्ण माहिती फोटो सह हजर होतो नजरे आड न होता. अन आपण तीच बोटे तोंडात घातल्या वाचून राहूच शकत नाही. भारतीय (आपलेच पूर्वज... ते) .. महामानवाला अर्थात त्याच्या.. डोक्यालीटीला त्रिवार सलाम.. !)

सुरवातीला काळ्यावर- पांढरे करत हळू हळू टी व्ही ने घरा घराचा कब्जा घेतला अन आता तर तो डोक्यावरच बसला नव्हे घेतला आहे त्याला त्याच्या. रंगीबेरंगी कपड्यांसह.. नव्हे कॉसंट्युम सह. रेडीओची जागा आता याने भरून काढली व तो जरासा बाजूला झाला.

रेडीओ प्रमाणे... हा टी व्ही मात्र मानवाच्या फक्त... ' कर्ण स्पर्शावर ' समाधान न मानता त्यांचे... दृष्टीलाच हात घालतो व कांही जणांच्या तब्येतीचे तर.. " वाटोळे " करण्यासही (काळजी

न घेतल्यास)  मागे पुढे पहात नाही. त्यानेच दृष्टी दोष - वजन वाढ असे दोष उद्भवतात.

सलामीला कृष्ण धवल रुपात... ' मूक'... सिनेमाच्या काळाची कल्पना देवून गेला खरे पण पुढे पुढे हळू हळू घरातील लोकांच्या संवादालाच " मुके " करून टाकण्यात यशस्वी सुद्धा झाला यांचे राहून राहून आश्चर्य वाटत रहाते.

टी व्ही घरात स्थिर झाला. एक उत्तम' दृक श्राव्य ' माध्यम उदयास आले. न्याशनल दूरदर्शन अर्थात दिल्ली हून प्रक्षेपित होणारे कार्यक्रम सुरवातीस दिसू लागले. नरोत्तम पुरी यांची क्रिकेट कोमेंट्री -- हिंदी -सा रे ग म प -- अजय दुवा -अन दाढी मिशातील रुबाबदार व्यक्तिमत्व प्रणव रॉय... यांचे अभ्यासपूर्ण... निवडणूक विश्लेषण त्या कृष्ण धवल वातावरणात ही खूप रंगत आणत असे. मिनू अन कोमल सिंग (मास्क फेस)  या वृत्त निवेदिका त्याच काळातील. ... " मेरी आवाज सुनो... ! " कार्यक्रमातून आजची प्रसिद्ध गाईका सुनिधी चौहान उदयास आलेली पाहिली. कमल नाथ यांचे निवेदन असलेले... हमलोग - श्वेतांबरा. सारख्या टी व्ही च्या पडद्यावर दृष्टी खिळवून ठेवणार्या

गूढ मालिका अजरामर झाल्या. त्याची आठवण आज ही अजून ताजी आहे. .

१९८२.. चे सुमारास खेळ जगतातील एशियाड स्पर्ध्येचे यजमानपद भारताकडे होते. व त्या दिल्लीच्या नव्याने बांधलेल्या स्टेडीयम मधील विविध खेळांचे सामने प्रथमच... दूर-दर्शन... मुळेच अगदी... जवळून पाहण्याचा आनंद घेतला गेला अन खेळाचे नवे विश्व दृष्टी क्षेपात आले. . नव नवीन लोक थेट घरा घरात पोहोचले अन होमसिकही झाले.

मुंबई दूरदर्शन केंद्र --- वरळी येथे सुरु झाले. आताशा टी व्ही सह्याद्रीच्या कुशतील घरा घरात व खेड्या पाड्यात पोहचू लागला होता. भक्ती बर्वे - शोभा तुंगारे या सारख्या मराठी वृत्त निवेदिकांचा लाभ झाला. पुण्या- मुंबईच्या कलाकारांना वाव मिळू लागला. सुहासिनी मुळगावकर यांचा मुलाखतींचा कार्यक्रम मजा आणे.

तसेच आज काळ हळू हळू दूरदर्शनचे रंग पालटू लागले व सप्त रंगात न्हाऊन निघाले सुद्धा लवकरच. चित्रपट पाहण्यास- व

दर रविवारची सकाळ - रंगोली हा हिंदी सिनेमा गाण्यांचा कार्यक्रम पाहण्याची वेगळीच ओढ निर्माण झाली.

सिद्धार्थ काक व रेणुका शहाणे यांचा भारतीय सांस्कृतिक ठेव्याचा एक श्रवणीय अन देखणीय असा -- सुरभि... कार्यक्रम खूप काळ गाजला होता. तसेच दर रविवारी ---- आंतरराष्ट्रीय संगीत कोंसर्ट चे सुरेल कार्यक्रमही पहावयास मिळत. त्यामुळे रविवार संस्मरणीय होत असे.

आज मात्र या दूरदर्शन... ची दुर्दशा झालेली पहावयास मिळते. हजारो च्यानल्स ची भाऊ गर्दी नव्हे मंडई च जणू. आजतक सारखे च्यानल सुरवातीस बरे वाटले. सुमार कार्यक्रमांची रेलचेल. भडक आणि भरकटलेल्या दे मार मालिकांचा भडीमार. असे असले तरी काही निवडक मालिका.

. डिस्कव्हरी व पर्यटन विषयक माहितीने अन... सोनी ... कौन बनेगा करोडपती... ? सारख्या कार्यक्रमाने ज्ञान व मनोरंजन दोन्ही साधते. थेट भेट - हार्ट टु हार्ट या मुलाखतींचा कार्यक्रम छान वाटतो. अन्यथा विविध मिडीयाच्या बातम्यांचा बेसूमार... भडीमार नुसता भंडावून सोडतो झाले. अर्थात रिमोट आपल्याच

हातात असतो पण एकंदरीत सर्व चालले आहे ते कमर्शिअल अन डोळयात धूळफेक करणारे

एका लग्नाची दुसरी गोष्ट - अश्या लवकर संपणार्या मालिका मनोरंजन करून जातात. तर जुन्या काळच्या---- उंच माझा झोका सारख्या मालिका उत्सुकता वाढवितात. तर बहुतांश मालिका का सुरु होतात... ? व सुरु झाल्याच तर कधी संपतात एकदाच्या... ? अश्याच स्वरूपाच्या असतात. .

आस्था... वरील... " अवेकनिंग विथ ब्रह्मा कुमारीस " ... हा ... चर्चात्मक कार्यक्रम आध्यात्मिक विचारणाना चालना देतो. व मनः शांती देवून जातो. व जीवनाला नवी दिशा देतो. तर राम देव बाबांचा योगाभ्यास... आपणास स्व स्फूर्तीने' बलोपासने सह योगाभ्यास ' करण्यास ' उद्युक्त करतो. तर क्रिकेट मैदानातील रणधुमाळीची मजा मैदानात होणारा कोणताही त्रास करून न घेता... घरबसल्या घेण्यास उपयोगी पडतो

. साम... वरील बालाजी तांबे यांचा गीतायोग व्हर्जन २०१२, फ्यामिली डॉक्टर कॉन्फरन्स चांगली माहितीप्रद असते.

झी २४ तास... ने सुरु केलेला... " सवाल हक्काचा आहे... ! " हा कार्यक्रम एक आशादायी वाटतो. या कार्यक्रमाद्वारे सरकार दरबारी अडवणूक होत असलेल्या लोकांची मदत करून त्यांचे काम मार्गी लावले जाते.

असा हा जवळचा एक आधुनिक सुहृद ---दूर दर्शन उर्फ टी व्ही आणि व्ही टी सुद्धा. (व्हिजुअल टोरचर) ...

... एल सी डी - हाय डेफिनिशन -- ब्लुरे सिस्टीम अश्या विविध फॉर्म मध्ये मुबलकपणे उपलब्ध आहे. आपापल्या पसंतीनुसार.

त्यास आपलेसे करू यात... नव्या आनंदात अन नव्याच उत्साहात गणेशाच्या साक्षीने.

----

## " झाकोळलेले लेखन ... साहित्य "... !

******

**" अंगठे बहाद्दर.. "** अशी बिरुदे मिरविणारा... अशिक्षित... समजला जातो. पण ह्याच अंगठ्याचा ठसा... ' सहीस पर्याय ' म्हणून उपयोगीही पडतो. आहे की नाही गम्मत. आता तर बरेचसे ' व्यवहार ' हे कॉम्प्युटर द्वारे होताहेत. अश्या वेळी तेथे सहीची आवश्यकताही नसते. त्या मुळे अशिक्षित आणि सुशिक्षित यातील फरकच नाहीसा होऊ लागला आहे. त्यातच अंगठ्या एव्हड्याच... असणारा " **पेन ड्राइव्ह** "आपले डोक्यात.. लिखित साहित्य - गाणी -याची अफाट स्मृती ठेवून असतो.

तो एकदा ल्यापटोपच्या गळयात अडकविला की झाले. त्यातील गाणी तासन तास ऐकवून आपले मन प्रसन्न करतो व डाटा ट्रान्स्फर ही करतो. अन डोळे दिपवून अन कर्णही तृप्त करून टाकतो.

ऐतिहासिक काळात... **भूर्ज पत्र - शिलालेख - ताम्रपट- मोर पिसाच्या लेखणीने लिहिलेले लखोटे** या द्वारे लिखित

साहित्याची देवाण घेवाण होत असे. हा इतिहास आपण अभ्यासला आहेच. . त्यांचे दाखलेही आपणास विविध पुराणवस्तू संग्रहालयात आढळून येतात. अन इतिहासाचा मागोवा ही घेता येतो. अन पुढील पिढीनसाठी त्याची माहिती आवश्यक असते.

आपल्या पिढीच्या लेखनाचा श्री गणेशा झाला तो "श्री गणेशाय नमः... //" अशी अक्षरे **काळ्या दगडी पाटीवर पांढरया पेन्सिलीने** गिरवूनच. पेन्सिल द्वारे आपण अ- आ - ई-- ची बाराखडी गिरविली. व पुढील आयुष्याची गणितेही सोडविली. सहज पुसता येईल अशी पाटीची व्यवस्था असल्याने अनेकदा त्याची गिरवून गिरवून उजळणी ही सहज करता येई, . व अक्षर आपोआपच सुबक - वळणदार होत जाई. मराठी लिपीस... देव नागरी लिपी 'असे संबोधले जाते. त्यामुळे ' देवाचा सहवास ' मिळाल्याचा फील येत असे.

विजया दशमी - दसऱ्याला होणाऱ्या पाटी पूजनाने, त्यावरील.. ' सरस्वतीच्या अधिष्ठानाने ' त्यावर ठेवलेल्या गुळ खोबर्याचा वाटीने, झेंडूच्या सुवर्ण फुलांनी अन आपट्याच्या सुवर्ण पानांनी मन प्रसन्न होवून जाई. अंगावर मुठभर मांस अन

बुद्धीत भर पडल्याचा भास होई. भरीस भर गुरुजनांचा लाभणारा शुभ आशीर्वाद, ' सोनेपे सुहागाच जणू.

(सध्याच्या टी. व्ही. वरील " उंच माझा झोका " मध्ये रमा-माधव यांची अक्षर ओळखीची दोनशे वर्षा पूर्वीची स्थिती पहावयास मिळत आहे. चुलीतील धग... पोटाची भूक शमविते. तसेच वेळेला जळक्या लाकडाची... कल्पक लेखणी सुद्धा अभ्यासाची.. ' भूक ' भागविण्यास उपयोगी पडते. या वरूनच त्यांची प्रतिकूल कळत देखील अभ्यासाच्या ध्यासाची कल्पना येते.)

वरच्या ईयत्तेत... गेल्यावर पाटी सोबतच वहीची भर पडली अन... " **शीस पेन्सिलीची** " नव्याने ओळख झाली. अन पांढर्यावर काळे करणे म्हणजे काय असते... याची ओळख पटली. . त्यातच मध्ये मध्ये लुडबुड करणारा ' रबर' हा... खोडकर सवंगडी (जुळा भाऊच जणू)  पण मदतीस आला. त्याने नवीनच जादू केल्याचा भास होई अन मन आनंदून जाई.

त्याचा सराव होतो न होतो तोच --कित्ता.. गिरविण्यास ' **बोरू '** नावाचा मोरू स्नेही डोळे वटारून पहावे तसा सुरवातीला

भासला. पण त्यांचे संगे शाईने कित्ते गिरविण्यात खूपच मजा येई. कित्ते गिरविता - गिरविता अक्षर ही डोळयात भरे व त्याचा वळणदार पणाही आवाक्यात येवू लागला; मनामध्ये ठशा प्रमाणे ठसू लागला. यामुळेच अक्षराची गोलाकार वळणे... सरळ वळणावर येवून थांबल्याचे जाणवले.

शाळेतील शिक्षकांनी हातातील **खडूने...** काळया फळयावरील सांडलेले" शुभ्र ज्ञानकण वेचण्यात " मजेत वेळ गेला. कधी त्या खडूचा तुन्डका डोक्यावर येवून देखील आदळला अन खडखडीत... जाग ही आली. तसेच चित्रकला शिक्षक श्री. वि. द. देशपांडे -पांढरे शुभ्र धोतर- सदरा व डोक्यावर गांधी टोपी. अशी शिडशिडीत मूर्ती समोर आली. त्यांनी शाळेच्या प्रवेशद्वारा जवळील फळयावर लिहिलेले " सुवाच्च अक्षरातील " सुविचार - सूचना व कोपऱ्यात रेखाटलेली चित्रकला डोळयासमोर उभी राहिली.

प्राथमिक शाळेत... नाजूक टोकदार **' निब '** असलेल्या बारीक अंगकाठी असलेल्या टाकाशी व पर्यायाने **" टाक - दौतीशी** "अजोड अशी गट्टी जमली. राणी छाप निब व निळी

शाई यांची दोस्ती बरेच वर्ष टिकली. शाईची दौत सांभाळून... शाळेत नेताना कसरत करावी लागे. अन्यथा वह्या -पुस्तके आणि पांढरा शुभ्र सद्राही तिचे जवळकीच्या.. " जाचातून " सुटत नसे. आणि घरी... " सर्फ एक्सलं " नसल्याने.. दाग अच्छे है,, ! असे म्हणण्याचीही सोय नसे. घरच्यांचा.. वेंधळा कुठला साधी' शाईची दौत नीट सांभाळता येत नाही... ?असा" घरचाच आहेर " मिळत असे तो वेगळाच. पण टाकाने वहीवर येणारे वळणदार अक्षर पाहून शिक्षक मात्र खूष असत.

वरच्या इयत्तेत गेल्यावर अभ्यासाचा पसारा अन वह्यांची संख्या वाढली' क्लासच्या फेर्यांची त्यात भर पडली. त्यामुळे वापरावयास सोपा अश्या **" द्रवरूप- शाईचे पेन "** शी नव्याने मैत्री झाली. काळे कंपनीचे दर्जेदार ग्यारंटीचे पेन व शाई पुढे बराच काळ वापरात होते. घारे आणि कंपनी च्या शुभ्र कागदाच्या वह्या सुंदर वळणदार अक्षरांनी भरत असत. " सुंदर अक्षर " स्पर्धेत बक्षिसेही मिळत. आमचा वर्ग मित्र... सुभाष नाईक... यात आघाडीवर असे. पुस्तकातील... छापील अक्षरा प्रमाणेच हुबेहूब त्यांचे हस्ताक्षर अजूनही' जसेन तसेच ' आहे. शालांत परीक्षे पर्यंत शाई पेन ची अखंड अशी ' साथ- संगत ' होती. शालेय वार्षिक

ग्यादरिंग निमित्त काढलेले " हस्त लिखित " त्यातूनच रंगत पणे तयार होई.

कॉलेज जीवनात.. **' बॉलपेन. '** नावाचे ' द्रवरूप शाई भरावी.. " न " लागणारे, अश्या अजब पेनशी नव्याने ओळख झाली. हलके फुलके वापरावयास सोपे असल्याने तसेच.. ' शाई सांडण्याची'... जरादेखील शक्यता नसल्याने सोयीचे वाटू लागले. पण याची सवय नसल्याने अक्षर सुरवातीला बिघडूही लागले. हळू हळू सरावाने गाडी पुन्हा रुळावर येवू लागली. पुढे काळाचे ओघात ' टाक व शाईची दौत " मागे पडली अन तिचा विसरही पडला कळत न कळत.

पुढे पुढे या बॉल पेनचे ही भाऊ बंध... **जेल पेन - स्केच पेन - मार्कर पेन** अक्षरे हायलाईट करणारे **फ्लुरोसनट पेन**.. हेही मैदानात उतरले ओळख झाली संपर्क ही वाढू लागला अन यांच्यातच कसे रमलो कळलेही नाही. शाळेतील फळा----- काळा व खडू पांढरा वा रंगीत असे. आत्ता फायबरचे---- पांढरे फळे व काळया मार्कर पेन अश्या लेखणीची चलती आहे, अशी '

विपरीत ' अवस्था आली आहे. कालाय तस्मै:नमः... ! दुसरे काय... ?

आज मितीला तर या इनस्टन्ट " आय टी " युगात... पेपर लेस ऑफिस चे प्रमाण (फ्याड)  वाढू लागले आहे. कॉम्पुटर ल्यापटोप- मोबाईल यांचे प्रस्थ वाढीस लागले आहे. अन डिजिटल बटना द्वारे, स्क्रीन वर उमट णाऱ्या आभासी अक्षरांतच रमावे लागते आहे. अश्या वेळी'... " झाकोळलेले लिखाण... साहित्य " या पुढील पिढीस... एखाद्या ' पुराण वस्तू ' संग्रहालयातच दुरून पहावयास मिळणार असे वाटते.

आज आम्ही ' आजी- आजोबा' झाल्याने... घरातील एका... पूजेच्या निमित्ताने ' लेखन साहित्याचा ' पूजेचा विधी' असल्याने पुन्हा एकदा --- त्या जीवश्च कंठश्स्च्य अश्या शालेय जीवनात " अक्षर ओळख करून दिलेल्या " टाक व शाई दौत " या शालेय सुहृदांची... फारा दिवसानी गाठ भेट झाली.

श्री. शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे. मधील शालेय आठवणीने मन आणि नेत्र भरून आले. इनस्टंट अश्या

आधुनिक **'' द्रव रहित लेखणी ''** द्वारे ल्याप टोपचे स्क्रीनवर बोटाचे सहायाने, डिजिटल बटनावरील' अक्युप्रेषरने ' व आभासी स्पर्शाने या देवनागरी शब्द - रुपात झटपट ओघळूनही गेले**.** अन क्षणार्धात ते जी- मेलचे बोट धरून" सेंड " च्या मार्गाने एव्हाना आपल्या भेटीशी आले सुद्धा. आहे की नाही गम्मत आणि जम्मत देखील.. या आधुनिक.. आय. टी. युगाची.. त्यास त्रिवार सलाम... !

**-----**

**" रुमानीचे कागदी... पंख... ! "**

*****

**पंख हवे मज पोलादाचे**

**शूर लढाऊ जटायुचे... !**

" माणसाला पंख असतात. "... या १९६० मधील चित्रपटातील, पी सावळाराम रचित व मीना खडीकर यांचे संगीत व लता मंगेशकर यांचे गाणे तसे ऐकण्यास मिळणे दुर्मिळच. कारण **माणसाला पंख असणे तर त्याहून अशक्य प्राय अशी गोष्ट... !**

**परंतु कवी - लेखक** महाशय, या सर्वांवर मात करू शकतात आपल्या **भाषा समृद्धीच्या शब्द सामर्थ्याने**. बोलून चालून माणूसच तो. त्यालाही अशक्य असे आता काही राहिले नाही.

अमेरिकेच्या ' **राईट** ' **बंधूनी** अहोरात्र प्रयत्नांती माणसाचे (राईट)  - स्वप्न - सिध्द ही करून दाखविले. माणूस आकाशात ' **अवनी** ' वरून सहज पणे झेप घेवू करू लागला. या देशातून

सहजपणे त्या देशापर्यंत' आर- पार ' करू लागला. परंतु **प्रत्येक माणूस ' वेगवेगळा'** खरा पण काहीवेळा नावे ' **समान'** असू शकतात. त्यामुळे **देश- पार करताना ' पारपत्राची ' आवश्यकता** भासू लागली असावी. त्यावर दोन्ही **अस्सल ' कान '** शाबूत असल्याच्या पुराव्याचा फोटो सुद्धा आवश्यक असतो. (भले त्यास ऐकू येत नसले तरी... ! हरकत नसावी) पारपत्र अधिकाऱ्यास या बाबतीत जरासुधा **कानाडोळा** करून चालत नाही. त्यासही ' **सरळ '** नजर ठेवूनच पहावे लागते.

मग तो माणूस लहान असो वा मोठा, सर्वाना येथे सामान न्याय असतो. साधारण पणे बालकास जन्मल्यानंतर वयाच्या २ - ३ महिन्यानंतरच विमानातून प्रवासाची परवानगी मिळते. अहो पासपोर्ट - व्हिसा काढे पर्यंत तेव्हडा काळ सहज लागतोच मुळी असो तर अंदरकी बात अशी आहे तर... !

याच कारणास्तव आमची **नात... नंबर दोन... ' रुमानी '** हिचे पारपत्र काढण्याची लगबग सुरु झाली. कारण पप्पान प्रमाणे तीही त्यांना भेटण्यास आतुरलेली होती. ऑन लाईन सर्व पूर्व सोपस्कार केले. **मुंढवा** येथील पारपत्र कार्यालयात समक्ष

हजर राहण्याचा व त्या दिवशी " शहाण्यासारखे वागण्याचे " नाटक तर तिला करावेच लागले. त्याचेही तीन अंक झाले. प्रोमंटर - दिगदर्शन - पळापळ बाबांची (आजोबांची) तर आईचे नेपथ्य उत्तम वठले.. ! त्यामुळे शांतता पूर्वक **पारपत्र नाट्य... सुरळीत** पार पडले एकदाचे.

या तीन अंकी नाटकाचा शेवट... **२४ सप्टेंबर २०१२** रोजी पार पडला, अन ' रुमानीचे ' पारपत्र **(NO... K 5 4 6 4 8 6 0)**

**पुणे पासपोर्ट..** कार्यालयातून उडून पुण्यातील लक्ष्मी छायेतील आजोबांचे हातात २७ सप्टेंबर २०१२ रोजी विसावले सुद्धा. **२३ सप्टेंबर २०१७** पर्यंतच्या पंचवार्षिक" हवाई प्रवासाच्या योजनेची **" बेगमी झाली.**

या **" कागदी पंखा "..** मुळेच **रुमानीच्या प्रथम हवाई प्रवासाचा** मार्ग सुकर होणार आहे. आता फक्त **व्हिसाची पुरवणी** जोडणे बाकी आहे. यथावकाश तीही पूर्ण होईलच व आमची ही दुसरी सोनुली - इटुकली - पिटुकली **नात अनुष्का दीदीच्या पाठोपाठ -- सात** समुद्र पार करण्यास सज्ज होईल. अन नवा इतिहास ' **जमा**'... होईल.

आता सोबत पारपत्र रुपी **कागदी पंखाची छोटीशी घडी उशाशी** - तसेच जोडीला **विमानाचे विखुरलेले भक्कम पोलादी पंख,** आईची उबदार कुशीत- खुशीत राहून आजी आजोबां सोबत हे ' धाडस ' ती लवकरच करून दाखवेल. **थोडे थांबा अन पहाच...** घोडे मैदान जवळच आले आहे.

**आमच्या द्वितीय नातीच्या (चि. रुमानीच्या) हवाई प्रवासाच्या.. " श्री गणेशास "... आमच्या हार्दिक शुभेच्छा... !**

जा उडुनी जा पाखरा
नयनमनोहर पाहुनी परिसर भुलू नको रे जरा

चंचल खग हे पंख पसरुनी आक्रमिती अंबरा
स्वातंत्र्याची मंगल गीते गात चालले घरा
तूही उडूनी जा पाखरा

दिशादिशा या गुलाल उधळीत करिती सण साजरा

रवीकिरणांनी आज उजळला गगनाचा उंबरा

जा जा सोडुनी ह्या तरुवरा

... या " **नयन तुझे जादुगार "या नाटकातील , पुरुषोत्तम दारव्हेकर रचित, प. जितेंद्र अभिषेकीच्या संगीताने नटलेल्या व "अरविंद पिळगावकर "यांच्या सुरांच्या साथीनेच...** ...

******

पणजी # पणजोबा

आजी # आजोबा

काका # काकू

अनुष्का दीदी

निखील मामा सह...

**अनंत चतुर्दशी**

" नात्यांची हळुवार नाजूक गुंफण... ! "

******

सौ साल पहले मुझे तुमसे प्यार था,... आज भी है और कल भी रहेगा... //

या गाण्यामध्ये गीतकाराने.. माणसांचे आयुष्य.. " शंभर " वर्ष्यांचे असते हे अधोरेखित केले आहे. त्याची पूर्तता करणे हे शेवटी त्यांचे कर्मावरच अवलंबून असते. हे ठरते ते त्यांचे आहार- विहार - अन त्यास असलेल्या मन:शांतीवर.

आध्यत्मिक दृष्ट्या तर... ". चिंता अन दु:ख मुक्त आयुष्य. "... ४०० वर्ष्यांचे असू शकते असे म्हटले आहे. त्यासाठी मनुष्याचा जन्म मिळणे आवश्यक आहे. अन तो मिळणेही त्याच्या हातात नसते. सम विचारी स्त्री - पुरुषांच्या विवाहोत्तर... मनमोकळ्या आकर्षणातील मिलनातून - यथावकाश स्त्रीस गर्भ धारणा होते अन नऊ.. महिन्याच्या गोड आणि आवश्यक अश्या गर्भाशयातील तपश्चर्ये नंतर तो अथवा ती या मुक्त जगात दाखल होतात . आईच्या गर्भात असलेला व नाळेने जोडलेल्या अत्यावश्यक संबंधाला ही आता निरोप द्यावा लागतो. अन सुरु होते बाह्य जगताची अखंड अशी... जीवन यात्रा.

आई - वडील... ह्याच मूळ भक्कम धाग्यांतून सुरु होते नव नवीन नात्यांची हळुवार गुंफण. न ऋण जन्मदेचे फिटे... ! त्यामुळे ते कायमच आपल्या पाठीशी भक्कम पणे आशीर्वाद रूपाने पाठलाग करत असते व सावली प्रमाणे मागोमाग येत रहाते. वडील तर १६ वर्षानंतर आपल्याशी मित्रत्वाचे नाते निभावून... अ फ्रेंड इन नीड ईज अ फ्रेंड इन डीड... ! अश्या नात्याने सदैव साथ देतात. हीच ठरते आपल्या जीवनाची मार्गदर्शक अशी भरपेट शिदोरी.

घरात उपस्थित असलेल्या आजी - आजोबाना " दुधाच्या साई " मुळे झालेल्या आनंदाने, त्यांच्या सहवासाने प्रेमळ नात्यांच्या विणीस भक्कम पणा येवू लागतो. हल्ली मात्र बऱ्याच जणांचे नशिबी त्यांचा सहवास लाभणेही दुरापास्त झाले आहे. असो आखिर... हर एकका नशीब अपना अपना होता है न/

तिन्ही सांजेची शुभं करोती.. अन देवापाशी दिवा लावून आई - आजी आपणास पुढील मार्ग क्रमणेस सहाय्य भूत ठरतात. रात्री झोपताना राजा राणी - पशु पक्षी - तसेच रामायणातील गोष्टींच्या सुरम्य जगताची सफर घडविण्यात दोघेही हातभार लावतात व बालपण रमणीय तसेच स्मरणीय करून टाकतात.

आईचा भावू -- मामा एक वेगळाच भाव खावून जातो कारण पुढे.. " लग्नकार्यात " तो एक आवश्यक घटक असतो ना. त्यामुळेच म - म मका... मी तुझा मामा... अन दे मला मुका // अशी लाडी- गोडीही लावतो,... तो त्या न कळत्या वयात.

झुक झुक... आगीन गाडी... पळती झाडी पाहू या... / मामाच्या गावाला जावू या... // अशी आळवणी करून मामाच्या गावची मजा लुटण्याची संधीही मिळते बालवयात.

आईची बहिण मावशी ही तर खूपच मायेची असते. म्हणूनच,.. एक वेळ, माय मरो पण मावशी जगो असेही म्हणतात. मावशी लळाही लावते तसाच अन मायेची उब ही देते क्षणोक्षणी.

वडीलांचा भावू--- काका मात्र पुतण्या - अगर पुतणीस धाकात ठेवण्याचाच प्रयत्न करतात. त्या मुळे प्रथम पासून एक आदर युक्त भीती असते.

पण कधी कधी... काका मला वाचवा... ! काका मला वाचवा... ! असे म्हणण्याची वेळही येते अत्यावश्यक वेळी.

आत्या बाईंचा तोरा... काही वेगळाच असतो. पण लग्ना अगोदर मंडपातील प्रवेशा पूर्वी " नवरदेवाचे पाय धुण्यास " पाण्याची कळशी घेवून सरसावून स्वागत करण्याचा व औक्षण करण्याचा मानही यांचाच असतो बर का.

यथावकाश... सहोदर म्हणून भाऊ किंवा बहिण येते... प्रथम सवंगडी म्हणून दाखल होतात. त्याची पण हल्लीच्या. ". हम दो हमारा एक " या नाऱ्या मुळे याची ही वानवाच असते घरोघरी. पण दर वर्षी येणारया राखी पोर्णिमा -भाऊबीज - व लग्नामध्ये एकदाच असणाऱ्या कान पीळी विधीने दोघाच्या नात्याची वीण अधिकच घट्ट होत जाते.

वर्ष्या मागून वर्ष मागे पडतात... ऋणानु बंधाच्या या गाठी पुनश्य भेटीत तृष्टता आणतात हेही नसे थोडके.

बहिण मोठी किंवा छोटी असली तरी" लग्नाच्या बोहल्यावर चढण्याचा मान ताईचा किंवा माईचाच असतो. गंगा- यमुनेस वाट मोकळी... करून देत तिची सासरी रवानगी होते. अन दिल्या घरी तू सुखी रहा... अश्या भावनेने तिला पतीचे हाती सुपूर्द केले जाते. अन ताई ही आनंदात, अत्तराचा फाया तुम्ही मला आणा राया... असे हट्टाने गाणे गुण गुणते अन सुखी संसारात रमून जाते.

" जावई " नावाचा भला अन नवा शोध लागतो. व मानाच्या पानाचे महत्व समजू लागते. सर्वच व्यवहार जरा जपून अन शब्द तोलून मापून वापरावे लगतात. अन्यथा,... फट म्हणता ब्रह्म हत्येचे पाप लागण्याची भीती असते.

सासरी आनंदात रमूनच... गोरी गोरी पान फुलासारखी छान दादा मला एक... " वहिनी " आण... अशी आळवणी केली जाते. थोड्याच अवधीत नाजूक प्रेमळ विनम्र अशी,... नववधू प्रिया मी बावरते... ! म्हणतच घरात गृहलक्ष्मी बनून ती आगमित होते, तिच्याशी गट्टी पण जमते. अन घरातील लहांनाना तिला साखरेचा पापा देण्या घेण्याची संधी मिळते. घरा दारावरील रंगी बे रंगी तोरणे अधिकच खुलतात व दारापुढील रांगोळी सप्त रंगानी उधळून निघते.

काकू म्हणून... कानामागून येवून तिखट होणार्यांचीही हजेरी लागते घरात. पती -पत्नी- दीर- भावजय- नणंद -सासू- सासरे अशी नात्यांचा गोफ तयार होतो . कधी कधी भांड्याला भांडे ही लागते... कळत न कळत. जास्तच आवाज होऊ लागला तर... रंग माझा वेगळा... ! म्हणत वेगळी वाट चोखाळली जाते व दुरून डोंगर साजरे... होऊन जातात. वेग वेगळी घरांची जंगले... फ्ल्याट स्वरुपात वाढीस लागतात. अश्या वेळी नात्यांची... घट्ट गुंफण एक तर अधिकच घट्ट होते अथवा सैल ही होऊ लागते हे अवलंबून असते एकमेकातील प्रेम बंधनाच्या.. " भावनिक ओलाव्याच्या " कसोटीवर.

अधून मधून घरातील सुख - दुःखाचे प्रसंगी मिनी अथवा मेगा संमेलन ही भरतात वडिलोपार्जित घरी अथवा वडील भावाचे घरी. एका पिढीचा प्रवास आता दुसऱ्या पिढीच्या रुळावरून धावू लागतो सुरळीत पणे.

आताच्या आधुनिक वातावरणात इंग्लंड -अमेरिकेत परदेशी जावून आपले भवितव्य अन भविष्य अजमिविण्याची एक महत्वाकांक्षी टुम निघाली आहे. त्यामुळे तर.. वसुधैव कुटुंब कम... ! अशी अवस्था झाली आहे. पाखरांचे पंखात नवे बळ संचारले आहे. डॉलर अन पौंडांची नवी ओळख होऊ लागली. आधुनिक श्रावण बाळ आय टी त पारंगत होऊन, ऐटीत आई-वडिलांनाही परदेश वारी पंढरीच्या वारीच्याच झोकात घडवून आणत आहेत. ह्यातच धन्यता आहे हे जाणवते.

असेच सुख दुःखाचे... उंच झोके घेत - एका लग्नाची दुसरी गोष्ट रंगत जाते व जीवनाचा भावार्थ उमजतो अन समजतो.

अन सहजच स्वर स्फुरतात

... या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे... ! शतदा प्रेम करावे... !

## " जग बदलतय... ? अहो बदललय... सुद्धा "

******

**जग बदललय का हो.. ?.**

यांचे असंख्य पुरावे आपल्याला मिळतात. एका सामान्य खेडवळ स्त्रीस या बाबत विचारले असता त्या बाईने अगदी मार्मिक व सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली.

ती म्हणाली... " माझा दृष्टीने एका गोष्टीत निश्चित बदल झालेला दिसतो, तो म्हणजे किनई, " पूर्वी लोक घरचे खात असत व बाहेर मोकळया वावरात जावून ' शौच्यानंद ' घेत होते तो एक वेगळाच आनंद असे.

" आज गावे ' हगणदारी मुक्त ' होऊ लागली आहेत त्यामुळे लोक... बाहेरूनच चापून खावून येतात व घरात येवूनच बंदिस्त WC मध्ये त्याची विल्हेवाट लावतात. "

असा हा आमुलाग्र झालेला बदल सगळीकडेच पहावयास मिळतो आहे. ----

बालकाचा जन्म घरातच अंधाऱ्या खोलीत दायी द्वारे करण्यात येई. आज मात्र प्रत्येक मूल हॉस्पिटल मध्येच कसे जन्मास येईल हे पहिले जाते.

जन्मास आल्यानंतर बालक सभोवतालच्या महिला वर्गात व लहान बालकांचे गराड्यात सामील होवून त्यांचे सहाय्याने कसे मोठे होई कळतही नसे. आज एक घर एक मूल तेही विभक्त-चोकोनी कुटुंबातील. त्यास ही पाळणाघर नामक " भाड्याचे घरात " अन परक्याचा दारात काही काळ घालवावा लागतो.

बालकास मनसोक्त असे आईचे दुध मिळे. आज... " आडातच नाही तर पोहर्यात कसे येणार ".. ? अशी अवस्था असते. त्यामुळे डबाबंद पावडरचे दूधाची जरुरी भासते आहे. (नुकत्याच दिवंगत झालेल्या डॉ. वर्गीस कुरियर यांच्या कृपेने)

शाळेत गेल्यावर... छडी लागे छम छम... विद्या येई घम घम // असा त्या मास्तरांवर विश्वास अन खात्री होती . आजकालच्या ह्याच सरांना मात्र छडी हातात धरण्याचीच भीती वाटू लागली आहे कारण तिचा वापर केल्यास केंव्हा... जेलची हवा खायला लागेल... ? या विचारानेच त्यांनाच घाम फुटतो आहे.

अवघड विषय गुरुजनांचे घरी जावून वेळीच समजावून घेता येत होते. आजकालची मुले मात्र अवघड विषय वाटल्यास सरळ... " देवा घरचा रस्ता " आत्महत्येच्या सहाय्याने पकडतात अन त्यातून कायमचीच सुटका करून घेतात .

कॉलेज मध्ये जाईपर्यंत भाजी पोळीचा डबा असे. आज त्याची जागा ' वडा पाव ' - पिझ्झा - कॉफी **CCD** यांनी कुरकुर(रे) न करता घेतली आहे.

अहो कंदील- चिमणी या वरून आलेल्या... ' दिव्या खाली अंधार '... या पारंपारिक म्हणीस ही आजच्या जगाने खोटे ठरविले आहे. आता असतो दिव्याखाली चक्क आणि ल्लख प्रकाशच प्रकाश जणू ' फ्लड लाईटच '.

तार - पत्र - अंतर्देशीय पत्र ही संपर्काची माध्यमे फार ' जिव्हाळयाची ' होती. ' गुलाबी ' कागदावर प्रेम व्यक्त करून ते बंद पाकिटातून.. त्यावर " खाजगी इतरांनी फोडू नये " असा शेरा बिनदिक्कत मारून दूरवर पाठविता येई. आज मात्र एकमेकांशी--- मोबाईल वरील एस एम एस---- तर फेस बुक - ओर्कुट- ट्विटर वरून खुल्या आम - गप्पाना पूरच येतो जणू.

" शुभंकरोती " साठी दिवेलागणीला सातच्या आत सर्वजण घरात असत अन मंगलमय - शांत व धाकमय वातावरण तत्परतेने तयार होई. आजची तरूण पिढी मात्र उत्तर रात्री पर्यंत ' डी जे ' च्या अशांत वातावरणातच घराबाहेर राहून ' चिल्लर पार्ट्या ' साजऱ्या करून पालकांनाच निरुत्तर करून सोडत आहेत व त्यांचा जीवच टांगणीला लावत आहेत व डोकेही भणाणून सोडत आहेत असे दिसते.

गुळपाणी - सरबत - पन्हे अथवा दुध- शेवयाची ची खीर यांनी पाहुण्यांचे स्वागत होई व त्यांचे ही मनस्वी समाधान होई. आजमात्र दारू - बियरचा पूर व सिगारेटच्या धुरातच तारुण्याचा चक्काचूर होवून राहिला आहे.

अंगभर वस्त्रात स्त्रियांची शालीनता चेहर्यावर शोभून व उठून दिसात असे. पण मोडर्ण जमान्यात कमीतकमी कपड्यात' तिला ' बेमालूम लपेटण्याचा, आटा पिटा होताना दिसतो आहे व वेळ आलीच तर मात्र ' तोंड ' लपविण्यास मात्र ' स्कार्फ ' नावाचा

हातभार कपड्याचा पातळसा ' पदर '(साडीस पर्याय म्हणून... ?) मात्र जवळ बाळगण्यात धन्यता मानली जाते आहे.

तारुण्यातील गप्पा' चार हात ' दूर राहूनच रंगत असत. खाली पाहून डोक्यावर पदर घेवून पतीच्या मागे जाणारी स्त्री कुलीन घराण्याची शान समजली जाई. आज तर त्या अंगभर पदरालाच.. ' फाटा ' दिल्याने तिची वाट चुकीच्या दिशेनेच होत आहे हे स्पष्टपणे जाणवते. स्वयंचलित वाहनावरील वीतभर जागेत ' दोघेही ' बेमालूम सामावून जात आहेत व भरधावपणे नजरे आड होत आहेत. वेगाचा आवेग हाताबाहेर गेला तर मात्र... दृष्टी आड सृष्टी... एव्हडेच भासते.

एखादी डिग्री हाताशी आली की नोकरी पण सहज मिळून जात असे. अन छोकरी मिळण्याचा मार्ग सुकर होई. आता मात्र पी जी करूनही रांगेत थांबावे लागते. छोकऱ्या ही कमावत्या झाल्याने त्याही हाताबाहेर गेल्या आहेत. अन अधिकच चोखंदळ झाल्या आहेत.

" स्त्री शिक्षण " हे फारच दुर्मिळ समजले जात असे नव्हे विरोधही होत असे. आज मात्र त्यांची भरारी अंतराळाला जावून भिडली आहे. कल्पना चावला व सुनिता विल्यम यानी ते सत्यातही उतरविले आहे. " शिक्षणाच्या धाडसानेच... ". उंच माझा झोका घेता येतो " हे सर्व जगाला दाखवून दिले आहे.

एकाच घरात वा वाड्यात तीन तीन पिढ्या आनंदाने एकत्र रहात असत. आज त्या वाड्यांची पडझड होऊन गेली आहे. व त्यांचे रुपांतर सिमेंटच्या घरात नव्हे कबुतरखान्यात (फ्ल्याट मध्ये)  झाले आहे. माणसांच्या गोतावळा जावून... फर्निचर च्या भाऊ गर्दीत राहिलेल्या जागेत माणसे विसावत आहेत तेही फक्त रात्रीच्या सक्तीच्या विश्रांती साठी. हम दो हमारा एक... चा जमाना सुरु आहे. त्यामुळे " इन मीन तीन " चा जमाना आला आहे

ती मुलेही... वसुधैव कुटुंब कम... / या मूल- मंत्राचा अवलंब करून आज ' देशो देशी ' संचार करीत आहेत. अन जगाच्या काना कोपऱ्याचा ठाव ठिकाण घेत आहेत.
खरेतर **पृथ्वी गोल असल्याने काना कोपरे हे**

**नसणारच** त्यामुळे सहजच ' घरंगळतच चालली ' आहेत असेच जणू भासते आहे.

उन्हाळयाच्या सुटीत मामाचे गावाकडे जाणे होई. आज मात्र पोलीस ' मामाच ' वरचे वर भेटत असतो. व आजोळ नावाचे मायाळू बागेचे' ओयासिसही ' लुप्त होते की काय... ?अशी अवस्था आली आहे.

घरातील शुभ मंगल सोहळा चांगला ८ - ८ दिवस चाले. पाहुणे रावळे त्यामुळे आबाल वृद्ध खुश व फ्रेश होत असत. दारी मांडव अन कमानी पडत व चांद्रमोळी घर राजशाही थाटात शोभून दिसे. आनंद सोहळा चिरस्मरणीय होऊन जाई.

आज नवरदेव नाशिकचा तर नवरी मुंबईची अन लग्न मात्र " पेशवाई थाटात " चक्क पुण्यातील चकाचक मंगल कार्यालयात. सर्व काही एक दिवसाचे प्याकेज स्वरुपात. सकाळी मोठ्या थाटात मंगल सनई च्या सुरात झोकात सुरु झालेला सोहळा सायंकाळ पर्यंत सुशोभित मांडव, आपापल्या गावी परत फिरणार्या पाहुण्याचा रोडावलेल्या गर्दीने ओका बोका भासू

लागतो. वन डे शो... द एंड पर्यंत... अर्थात वधूच्या. साश्रू नयनांनी पाठवणीच्या हृद्य अश्या पारंपारिक प्रसंगानेच होतो. .

जहाज मार्गे करावा लागणारा परदेश प्रवास प्रदीर्घ असा महिना दोन महिने चाले तो करणारे मोजकेच महाभाग असत. व खुशाली तदनंतर तीन महिन्याने मिळे. हवाई मार्गे विमान प्रवास हा फारच दुर्मिळ व खर्चिक असे.

आज मात्र तोच प्रवास हवाई वेगाने, एक - दोन दिवसाच्या आवाक्यात आला आहे. घरोघरचे बुद्धिमान अशी मुले अन मुलीही एकट्याने हा प्रवास करू लागली आहेत. व आई बाबानाही तो एकट्यानेच करावयास भाग पाडत आहेत. देशीय व अंतर्देशीय प्रवास सहज सुलभ झाला आहे.

" बंदा रुपया " जवळ असणे महत महदभाग्याचे समजले जाई. त्यातच पोटभर अन्न व मानसिक समाधान मिळत असे. तोळाभर' सोने ' गाठीशी असेल तर मुठभर मांस अंगावर चढे.

तोच " रुपया " आज डॉलर व पौंडा पुढे... खुजा होत जाताना ' अदृश्य ' होण्याच्या मार्गावर असल्याचे भासते आहे. पण आधुनिक तरुण पिढी मात्र मोठ्या दिमाखात. डॉलर - पौंड

या दोन घोड्यांचा दिमतीने मोठ्या दिमाखात चोफेर ' अश्वमेघ ' आरंभताना दिसत आहेत.

असंख्य कळा देवून माता बालकास जन्म देई. त्यामुळे मायेचा पान्हाही लवकरच फुटे. आज विविध यंत्रांचे - शोधांचे जोरावर सारे काही पेनलेस अन पेपरलेस होऊ लागले आहे. सरते शेवटी ते युसलेस न ठरो एव्हडीच अपेक्षा.

हवेत तरंगण्या पूर्वी जमिनीवरील मातीत भरभक्कम पाय रोवल्या नंतरच मनुष्याने आत्मविश्वास पूर्वक अंतराळात झेप घेतली. ती ही वसुंधरेच्या साक्षीनेच. अन आपले पहीले पावूल शुभ्र चंद्रावर उमटविले ". नील आर्म स्ट्रोन्ग " या प्रतिनिधी मार्फत. अन आता झेपावला आहे लालसर मंगळाच्या शोधात. लवकरच त्यासही यश येईल. मानवाच्या शोधाला अन संशोधक वृत्तीला सलाम... !

**असे हे जग बदलत आहे बदलेही आहे... . बदल नाही तो निसर्गातील पंच महाभूतात** ---पृथ्वी फिरतच आहे,




पाण्याचा जीवन प्रवाह वाहतोच आहे, सूर्य पूर्वेलाचं उगवतो आहे, चंद्र मवाळतीलाच मावळत आहे. आगीचा चटकाही अजून बसतच आहे. पाण्याचा जीवन प्रवाह वाहतोच आहे. वाराही क्षणभर कुणाच्या वाऱ्यालाही थांबत नाही. आकाशातील वीज ही चमकल्या वाचून डोळे मिटत नाही. अवकाशाची सर्व समावेशक अशी महाकाय शक्ती अजूनही तशीच आहे.

याची किल्ली मात्र मनुष्याला अजून गवसत नाही. तीला न शोधण्यातच तो तूर्त धन्यता मानत आहे. स्वतः मात्र नव नव्या

' मानव सुखाच्या शोधात ' भर घालीत भिर भिर- असा भिरभिरतोच आहे. न दमता अन न थकता अनंत काळ पर्यंत. ----

## " आपला - जीवन प्रवास.. गतिमान करणारे

## ... " कागदी घोडे "... !

******

**आपला जीवन प्रवास...** आपणास प्रत्येक वळणावर नवा आनंद देत रहातो. त्याचा आपण मनसोक्त आनंद उपभोगावा.

**" रम्य अश्या बालपणात"...** पावसाच्या पाण्यातील झुळझुळ वहाणार्या ओहोळातून सुरु केलेला कागदी ' **होड्यांचा '** प्रवास आठवत असेलच. **कोणत्याही सामानाशिवाय व.. ' जागेवरच बसूनच '** करावयाच्या त्या अनोख्या प्रवासाची मजा काही औरच असते. आयुष्याच्या पुढील प्रवासात त्या प्रवासाच्या मधुर आठवणींची शिदोरीच मार्ग दर्शक ठरते. हीच पावूल वाट पुढे आपणास योग्य अश्या राजमार्गावर आणून सोडते. निश्चिंत पणाने. त्याचाच हा मागोवा.

### १) स्टेम सेल प्रीझर्व्ह प्रमाण पत्र...

बालक जन्मानंतर... लगेचच बाळाची.. " **नाळ प्रीझर्व्ह** " करून ठेवण्याची **नव्याने सोय उपलब्ध झाली आहे**. त्यामुळे पुढील आयुष्याच्या वाटचालीत काही शारीरिक व्याधी साठीच्या सहाय्यासाठी ह्या स्टेम सेल्स फारच उपयुक्त ठरतात. याची पूर्व

तयारी मात्र प्रसूतीपूर्व... ७ महिन्यापासूनच करून ठेवावी. संबंधित संस्थेशी संपर्क करून त्याबाबतची माहिती घ्यावी लागते. बालकाचा जन्म होताच... संबंधित यंत्रणा ती घेवून जावून त्याच्या भावी काळातील सुरक्षततेची व्यवस्था करते.

**२) BIRTH- CERTIFICATE... (जन्म दाखला -- प्रमाण पत्र)**

बालक.. जगात दाखल होताच प्रथम याची ' दखल' घेण्याची व त्याची योग्य त्या दप्तरी नोंद करून घेण्याची धावपळ आई -बाबांना हल्ली आजी आजोबांना करावी लागते. यथावकाश आपल्याच जन्माचा हा सज्जड पुरावा आपल्या आयुष्याच्या पुढील वाटचालीत वेळोवेळी आपली साथ संगत करत जीवनात नव नवे रंग भरत रहातो. त्यामुळे याची प्राप्ती आपल्या गावातील... शासकीय कार्यालयातून, आपल्या ' **बिनचूक जन्म दिनांक व नावासहित** ' त्वरित उपलब्ध करून घेणे फारच शहाणपणाचे ठरते. या मध्ये बालकाचे जन्मास घालणारे आई वडील यांचे ही पूर्ण नाव व पत्ता ही असतो. जेणे करून त्यांचे संगोपन करण्याची कायदेशीर जबाबदारीही त्यांचेवर

आपोआपच येते. यात कसूर केली तर मात्र आपल्याच... जन्माची कहाणी... कोर्ट कचेर्याच्या फेऱ्यात फिरत रहाते व वेगळ्याच चक्रात अडकवून बसते. याची जाणीव बर्याच जणांना नसते.

असो... याचाच उपयोग आता आपणास व्हिसा - पासपोर्ट साठी उपयुक्त ठरतो. अन जीवनाच्या वाटेवरील विविध वळणाची सरळपणे ओळख पटत जाते. याचा अनुभव नंतर येतो शाळा प्रवेशाचे वेळी. या शिवाय शाळेचे पानच हलत नाही व शाळा प्रवेशाचे आपले.. ' घोडे ' पुढेही सरकत नाही. एकदा का याचे सोपस्कार झाले की.. शालांत परीक्षे पर्यंत आपण निर्धास्त राहू शकतो. एव्हडेच याचे मोठे समाधान असते.

**३) PASS PORT -- पारपत्र.. व्हिसा...**

हल्लीच्या आय टी युगात आई - वडीलच देशोदेशी फिरत असल्याने बालकांना सुद्धा हा प्रवासास आवश्यक असणारा पास पोर्ट व तद अनुशंगिक लागणारा ' व्हिसा ' काढण्यास प्रथम फोटो काढावा लागतो. व निघेल तश्या बालपणाच्या चेहर्याची छबी सहित त्याचा स्वीकारआपणास करावा लागतो. व आपण देशो देशी पाच वर्षापर्यंत फिरण्यास सज्ज होतो.

**४) IMMUNIZATION CERTIFICATE... लसीकरण केलेले प्रमाण पत्र...**

बालक जगात आल्यावर त्यास अनेक बाह्य जगतातील असंख्य रोगाचे... संकटाशी सामना करावा लागतो. त्यासाठी हॉस्पिटलमधील डॉक्टरांचे मार्गदर्शनानुसार बीसीजी -टायफोईड - काविळ -डांग्या खोकला - गोवर - कांजिण्या आणि पोलीओ अश्या विविध रोग प्रतिबंधक लसी अर्थात.. कवच कुंडले धारण करावी लागतात. हे प्रमाणपत्रही आपल्या कडे कायमस्वरूपी असणे आता अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा यांचे अभावी काही देश तुम्हास यांचे अभावी प्रवेश नाकारू शकतात अथवा त्या लसी तोच्यन घेण्यास भाग पाडतात याची माहिती असू द्यावी. अर्थात हे आपल्याच हिताचे व भल्यासाठी असते.

**५) HEALTHY CHILD... CERTIFICATE सुधृड बालक प्रमाणपत्र...**

अनेकवेळा सुधृड बालक... अश्या प्रकरच्या आरोग्य स्पर्धेत भाग घेतल्यास हे प्रमाणपत्र मिळते. हे आपल्याकडे असल्यास अधिकच चांगले.

दिवस भराभर पळत असतातच आणि याची जाणीव आपणास आपण माध्यमिक शाळेत प्रवेश केंव्हा आलो हे ही कळत नाही. आणि अश्या वेळी आपणास जरुरी भासते ती... **पोकेट मनीची.** या चलत्या नाण्याची नवीनच ओळख होते, ती विविध रंगांच्या रुपयांच्या नोटांची. व्यवहारातील मौल्यवान अश्या चलनी प्रमाण पत्राची.

शालेय जीवनात बहु सुश्रुता व अभ्यासाचे नव नवे पैलू अंगी यावे म्हणून विविध विषयांच्या स्पर्धेस - परीक्षास सामोरे जावे लागते.

सुंदर हस्ताक्षर - हिंदी - मराठी - संस्कृत - इंग्रजी या भाष्यां सोबत गणित प्रावीण्याचा परीक्षेस बसून त्यात उत्तीर्ण झाल्याची विविध प्रमाणपत्रे आपल्या गाठीशी असलेले बरे असते. असा अनेकांचा अनुभव आहे

. चित्रकला ह्या विषया कडेही दुर्लक्ष्य करू नये. गायन वादनाची आवड ही असू द्यावी त्याचेही बरेच फायदे होतात पुढे. वेळात वेळ काढून एखाद्या खेळात पारंगत होता आले व त्यामध्ये राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली तर त्या बाबतचे प्रमाणपत्र चांगली नोकरी मिळण्यासही सहाय्य भूत ठरते.

**६) शालांत परीक्षा प्रमाणपत्र -----**

हे प्रमाण पत्र म्हणजे अ ते ज्ञ आणि ए टु झेड या बाबतीत आपण गेल्या १६ वर्षात कोठ पर्यंत मजल मारली याचा आरसाच जणू. आणि पुढील शिक्षणाच्या वाटचालीची गुरुकिल्लीच म्हणावी लागेल. खरे तर ह्या प्रमाणपत्राने असून अडचण नसून खोळंबा अशीच अवस्था होते. कारण कोणतीही नोकरी मिळण्याची खात्री हे देत नाही. पण पदोपदी याचीच जरुरी असते.

**७) स्कूल लिव्हिंग...**

षोडशे तू प्राप्ते... झाल्यावर, शाळा सोडली एकदाची असली... तरीही त्याचेही प्रमाणपत्र आपली काही पाठ सोडत नाही. त्यास घेवूनच पुढील वाटचाल सुरु असते. जणू एखादा वाटाडीच, नव्हे.. " दीपस्तंभ "च असतो तो.

**८) बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र...**

. हे नसले तर तुमच्या आयुष्याचेच... " बारा वाजले " म्हणून समजा. तेही भरपूर मार्कस असलेलेच हवे तरच मेडिकल - इंजिनिअरिंग - सी ए - आर्किटेक्ट या. सारख्या अभ्यास क्रमास सुलभतेने प्रवेश. नाहीतर" आय टी आय " ची वाट धरावी लागते. भाग्य चांगले असेल तर मात्र ऐटीत मुंबई - कानपूर - खरगपूर - अहमदाबाद आय आय टी अश्या नामांकित संस्थेत प्रवेश मिळवू

शकता याचे सहाय्याने. त्यामुळे खूप अगोदर पासूनच आपले ध्येय निश्चित करावे लागते.

**९) कास्ट (जात) प्रमाणपत्र...**

आपला.. ' भारत ' अठरा पगड... जातीमध्ये विभागलेला असल्याने. जात निहाय आरक्षण पद्धत अजूनही चालू आहे . आपण कोणत्या जातीचे आहात... ? त्यांचे तसेच ते प्रमाणपत्र अधिकृत असल्याचे... आणखी एक... " **जात पडताळणी प्रमाणपत्र** " या दोन लंगोटी वेळेत मिळाल्या शिवाय तुमचा येथील " आरक्षण आखाड्यात " निभाव लागणे अशक्यच. त्यासही.. पालकांचे उत्पन्नाचे क्रिमी लेयरचे ठिगळ सुद्धा जोडावे लागते. तेंव्हा कोठे ----जातीचा खऱ्या अर्थाने उद्धार होतो व गंगेत घोडे न्हाल्याचा आनंद मिळतो बरेच टक्के टोणपे खावून दमल्यावर.

**१०) ड्रायव्हिंग लायसन...**

एव्हाना आपणास मिसरूड फुटून काही वाहने चालवून.. करामती दाखविण्याची खुमखुमी सुरु होते. त्यासही ड्रायव्हिंग लायसन नावाचे स्मार्ट कार्ड... आवश्यक असते. अन्यथा रस्त्या वरील सफेद वर्दी धारी... मामाची वक्र दृष्टी पडून खिश्याला चाट कधी पडेल हे सांगता येत नाही.

**११) पी यु सी प्रमाण पत्र... आर टी ओ रजिस्ट्रेशन...**

आपण चालवीत असलेले वाहन अधिकृतपणे आर टी ओ कडे नोंद केलेले आहे. अन तेही आधुनिक नियमाप्रमाणे " पोल्युशन फ्री " आहे या बाबतचे प्रमाणपत्र जवळ बाळगणे ओघाने आलेच हे ही विसरून चालत नाही. हे ही ध्यानात असू द्यावे.

**१२) निवडणूक ओळख पत्र...**

लोकशाही प्रधान अश्या आपल्या महान भारतात मत-दानाचे पवित्र कार्य कर्म वयाच्या १८ वर्ष्या नंतर ईमाने - इतबारे निभवायचे असेल तर हेही जवळ असणे अत्यावश्यक आहे. हेच भारतीय नागरिक असल्याचा पुरावा म्हणूनही उपयोगी ठरते.

**१३) ब्यांक पास बुक... ए टी एम... क्रेडीट कार्ड...**

आर्थिक चणचण. भासू नये व पाहिजे तेंव्हा पैसे काढता यावे यासाठी ब्यांक पासबुक आवश्यकच होऊन बसते. हे खाते ब्यांकेत उघडण्यास वरील कागद पत्र जोडावी लागतातच. तसेच हवे तेंव्हा पैसे उपलब्ध होण्यास ए टी एम कार्ड व क्रेडीट कार्ड हे जुळे भावू खिशात गुण्या गोविंदाने कुर कुर न करता खिशातील पाकिटात दाटीवाटीत ही गुमाने आनंदात रहातात हे सांगणे न

लगे. आपली स्व कमाई सुरु होई पर्यंत याचे वापरावर बरेच स्पीड ब्रेकर असतात.

**१४) डिग्री प्रमाण पत्र...**

एखाद्या विषयात पारंगत असल्याचे प्रमाण पत्राचे भेंडोळे हाताशी आले की आपले... ' पाय ' ही काही काळ हवेत तरंगू लागतात. व नशीब ... नावाचे भाग्य जोडीस असेल तर नोकरीही मिळून जाते लवकरच. त्यामुळे ब्यांक ब्यालंस ही फुगू लागतो. अन खर्चा वरील निर्बंध ही ढिले होऊ लागतात आपोआप.

ए टी एम व क्रेडीट कार्ड ही आनंदात आत बाहेर करू लागतात.

**१५) ब्लड ग्रुप कार्ड...**

**.** रक्तदान हे एक पवित्र काम ऐन तारुण्याच्या उमेदीत असताना करता येते. त्यासाठी आपला' रक्त गट ' माहिती असू द्यावा. ब्लड ब्यांकेत आपला संपर्क नंबर देवून ठेवावा व वेळ पडल्यास... रक्तदान अवश्य करावे.

**१६) मोबाईल ग्याजेट...**

... . हाताशी डिग्री आल्यावर कानाशी मोबाईलही गुजगोष्टी करू लागतो. सर्व जगच जणू मुठीत आल्यासारखे वाटते. पण हे

सुद्धा काळजी पूर्वक वापरावे याचे भान असू द्यावे विशेषतः... ' ह्यांडस फ्री 'चा वापर करताना विशेस काळजी घ्यावी.

**१७) इंडेक्स २... ७/१२ चा उतारा प्रमाण पत्र...**

भावी जीवनातील स्वप्ने रंगू लागतात. अन त्यात एक सुंदरसे घरही दिसू लागते. नोकरीच्या जोरावर कर्ज सहज मिळत असल्याने. २-३ बी एच के फ्ल्याट बुक करून त्यांचे सरकार दरबारी नोंदणीचे दस्त अर्थात इंडेक्स- २ अथवा ७/१२ चा स्थावर मालमत्ते संदर्भातील महत्वाचा कागदी ऐवज मिळूनही जातो.

**१८) म्यारेज प्रमाणपत्र...**

त्यानंतर छोकरीच्या अर्थात लाईफ पार्टनरच्या शोधाची भुण भूण सुरु होते. " नव नव्या कढईतील कांदे पोह्यांचा " खमंग वास आसमंतात अन मनात दरवळू लागतो. अन दोनाचे चार कसे होऊन जातात हे कळतही नाही. अन त्या पवित्र बंधनाचे.. म्यारेज सरटीफिकेटची फाईल मध्ये जमा होते. त्यामुळे वारसाची नोंद करणे सोयीचे होते.

**१९) एफ. डिज, ठेवी प्रमाणपत्रे...**

आर्थिक जबाबदारी वाढत चालल्याने ब्यांकेत काहीठेवी जमवून ठेवल्या जातात. व भविष्याची हळू हळू तजवीज होऊ

लागते. एल आय सी अथवा मेडिक्लेम सारख्या पॉलीसीज घ्याव्यात.

**२०) प्यान कार्ड... इन्कम ट्याक्स सरटी फिकेट... आधार कार्ड...**

गाडी घेणे - ब्यांक व्यवहार करणे यासाठी आवश्यक असे आपले' प्यान - कार्ड.. ' काढून ते पदरी असणे अत्यावश्यक असते. आता " **आधार कार्ड "** ही मिळते. इन्कमट्याक्स भरल्याचे प्रमाणपत्र. ही सर्व प्रमाण पत्रे जवळ असणे महत्वाचे ठरते... " **व्हिसा** " साठी आवश्यकही असतात.

**२१) डॉलर - पौंड -युरो... ...** हे. देशोदेशीच्या प्रवासातील आपले खास **" नव्या दमाचे उमदे घोडे "** ठरतात ते वेगळाच मनस्वी व हृद्य आनंद देवून जातात.

**२२) जी आर ई...** टोफेल परीक्षा देवून. कंपनी तर्फे परदेशात जायचे असेल तर. संबंधित देशाचे चलन पौंड -डॉलर - युरो याची व्यवस्था करून ठेवावी लागते. एव्हडे सर्व कागदी घोडे जमा करून करून खूपच दमछाक होऊन जाते.

वरील सर्व " **कागदी घोड्यांच्या " मदतीने आपण आपला जीवन प्रवासाचा अश्वमेघ... " चोफेर " उधळू**

**शकतो.** व त्यानंतर जीवनाकडे मागे वळून पहाताना आपण काय कमावले व काय गमावले... याचा शांतपणे अंतर्मुख होऊन विचार करावा. आपले जीवन सार्थकी कसे होईल या बाबत विचार करावा.

**२३) विल पत्र...**

जीवन हे... क्षण भंगुर असते म्हणून आपण आयुष्यात आपल्या मालकीच्या वास्तू, वस्तू पैसा अडका, दाग दागिने याचा विनियोग भावी पिढीने कसा करावा... ? याबाबतचे आपण स्वतः स्वखुशीने केलेले विवेचन. आपल्या पेक्षा... कमी वयाच्या दोन साक्षी- दारांच्या उपस्थितीत त्यांच्या व आपल्या स्वाक्षरीने करून ठेवावे हे बरे असते अन मानसिक समाधानही मिळते.

**२४) देहदान वा अवयव दान प्रमाण पत्र...**

.. आपणास आपल्या... " मृत्यू पश्चात " देहदान वा नेत्र दान -अवयव दान करावयाची इच्छा व मानसिक तयारी असेल तर तेही आपण वेळीच स्व.. खुशीने आपल्याच शहरातील मेडिकल कॉलेजमध्ये जावून पूर्व.. नोंद करू शकतो. याची माहिती आपण घरातील जबाबदार मंडळीना सांगून ठेवावी. त्यासाठीचा फॉर्म व

माहिती घेवून हे काम अगोदरच समजावून घेवून त्याची पूर्तता करावी लागते. तेंव्हाच त्याची पूर्तताही होऊ शकते व अखेर... दानाचे पुण्य ही पदरी पडू शकते जाता जाता.

या नंतर मात्र... आपण आपल्या आप्त- नात्वान समवेत " **कागदी विमाने अथवा होड्या "..** संगे मनसोक्त खेळण्याचा आनंद घेवू शकता नव्हे घेत राहण्यातच मनस्वी मजा येते. पुन्हा नव्या... बालपणात रमून जाण्या सारखा... स्वर्गीय आनंद दुसरा नाही याची जाणीव होते.

## २५) DEATH CERTIFICATE... मृत्यू प्रमाणपत्र...

**आपल्याच नावाचे...** असणारे हे प्रमाण पात्र आपले असूनही आपणास **याची देही याची डोळा हे मिळविता येत नाही व पाहताही येत नाही. ...**

जन्मास आलेल्या प्रत्येकास या अखेरच्या प्रवासास निघावेच लागते. ते सुद्धा हे... महत्वाचे असे... कागदी प्रमाण पत्र घेवूनच. . शेवट पर्यंत कागदी घोड्याच्या सहवासातून सुटका

नाही हे ध्यानात येते. हे प्रमाणपत्र मिळविण्याची... धावपळ मात्र आपल्या मागे राहिलेल्या वारसांना करावी लागते.

**" जन्म - मृत्यू " कार्यालयातूनच..** हे मिळते. आपण मागे मागे ठेवलेल्या ठेव्याचा -- मेवा मिळविण्याची. ही " **गुरुकिल्ली "** च ठरते आणि असतेही.

हे मात्र आपल्या... ". **स्व**... **जीवन प्रवासाचे " अखेरचे अदृश्य असे... तिकीट,. नव्हे.. ' कागदी घोडा '** असतो. तोच आपणास कायमची विश्रांती... देतो अन स्वतः घेतोही.

मागे उरतात त्या आपल्या कर्तुत्वाच्या... पावूल खुणा अन " स्नेहपूर्ण " जनमाणसांचा मेळावा.

**जगात चालत्या बोलत्या माणसाची एकमेंकाशी ' ओळख पटविण्यास ' हे सर्व २५ " कागदी घोडे " आपल्या पदरी " बाळगावेच " लागतात. त्यानेच जीवनाला गतिमानता येते... अन एखाद्या " चांद्र मोहिमे प्रमाणे " कायमच्या भू -स्थिरतेत त्याची... अखेरही होते कायमच्या... पावूल खुणा मागे... खुणावत ठेवूनच .**

**----- " इंद्रधनुष्यातील " रंग- संगतीची-- नवी.. ओळख ----**

******

गतकाळात मुरलेला... -- **नवरंग...** -असो की... आजचा फ्रेश मूड मधील... **नटरंग...** --असो दोन्हीही चित्रपट सुरांच्या... नव रंगानी व सप्त सुरांनी आपले मन रिझवून अन सहजपणे मोहवून टाकतात.

त्यातील प्रत्येक रंगाचे आप आपले असे वैशीष्ठ्य असते ते वेगळेच. शालेय जीवनात यांची ओळख होते ती. "**. जातानाही पानी पी**" अथवा " **ताना पीहीनी पाजा** " अश्या कोड्यात टाकणाऱ्या शब्दांनी पण त्या मुळेच त्यात रंग भरण्यास सुरवात होते व ते पुढे पुढे... गहिरे होत जातात.

**काळा- रंग...** - तसा दुर्लक्षित असा आहे. व या कोड्यात टाकणाऱ्या समुहा बाहेरचा. पण त्यालाही संक्रातीचे काळात... सोन्याचा भाव असतो. महिलांच्या अंगावरील साडी सुवर्ण अलंकारांनी अधिकच शोभून दिसते त्यांचे पार्श्वभूमीवर .

आपल्या लाडक्या ' सोनुल्याला ' दृष्ट लागू नये यास्तव **काळे**-तीट अन डोळ्यात **काळे** - काजळच त्याचा बचाव करू शकते या बद्दल त्यांना दृढ आत्मविश्वास असतो. नवीन घराची वास्तू शांती असल्यावर **काळी** बाहुलीच दर्शनी भागावर शोभून दिसते. पण अपराधी भावनेने कधी कधी मानवास.. तोंड काळे करण्यासही भाग पाडतो नाही का.. ?

तरीही --... **हम काले है तो क्या हुवा... दिलवाले है** / असे म्हणून वेळ निभावून नेतो झाले.

कधी कधी... घनन घन... ! घनन घन... ! करत येणाऱ्या काळ्या मेघांना.. **काले मेघा काले... मेघा पानी तो बरसाओ**... अशी आळवणी करावी लागते तीही डोळ्यात... पाणी आणून. ----

**पांढरा रंग** - शुभ्र बगळा... निळ्याशार तलावातील पाण्यात अन हिरव्यागार वनश्रीत अधिकच खुलतो. अन दृष्टी स्वच्छ अन पवित्र करून टाकतो. कारण सप्त रंगाच्या मिलाफानेच त्यांचे अस्तित्व असते याची पुसटशी जाणीव ही होऊ देत नाही. माणसाच्या शारीरिक रंगास मात्र.. " गोरा " असे संबोधले जाते. त्यामुळेच... सर्वांना हवी हवीशी... **गोरी गोरी पान**

**फुलासारखी छान**... वाहिनी आणण्यास विनवणी केली जाते. आपल्या आवडत्या दादास.

तिरंग्या मध्ये तर हा दुवाच असतो अशोक चक्र धारी. आध्यात्मिक वातावरणात या पांढऱ्या रंगातील कपड्यांमुळे एक.. सात्विक वातावरण मनशांती देवून जाते. याचा हमखास अनुभव येतो. व जीवन समृद्ध करून टाकतो. अन हाच जीवनाच्या.. अखेर पर्यंत साथ करतो इमाने इतबारे... मूकपणे. ----

**जांभळा- रंग...** जांभळाच्या टपोर्या तुकतुकीत फळावरच गडद पणे विराजमान झालेला छान पणे पहावयास मिळतो. व त्याची मधुर चव चाखताच जिभेवर विराजमानही होऊन जातो. अन... **जांभूळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजतो... ?** ची हमखास आठवण रहाते.

**तांबडा रंग** --- आपल्या तांबड्या मातीशी इमान राखून असतो. आपल्या अंगातील रगाच्या जोरावर भली भली मोठी वाहनेच नव्हे तर धडाडती... रेल्वे देखील थोपवून धरतो. नवरदेवाला लाल सिंदूर पत्नीच्या मस्तकावर भरावयास भाग पाडून त्यास लग्न बंधनात अडकवून आपण मात्र नामा निराळा

होतो. जेवणानंतरच्या... तांबुल सेवन करणाऱ्या दोस्तांशी गप्पा मारीत गट्टी करतो. तिरंग्यात तर तो उच्च पदावरच असतो दिमाखात फडकत रहातो सर्वांना स्फूर्ती देत. ----

-**नारिंगी रंग** ---- नागपूरच्या... संत्र्यांशी जवळीक साधतो अन हिवाळी अधिवेशनास येणाऱ्या मंत्र्यांची बडदास्त राखतो. . फ्यानटा व मिरिंडा रसपानात रममाण होतो. लेमलेटच्या गोड गोड गोळ्यात जावून बाल मित्रांशी मजेत खेळत रहातो. -----

**हिरवा रंग -----** पोपटास... मिरची वा पेरू खाण्यात दंग करतो. अन पावुस येताच साऱ्या वनश्रीस हिरव्यागार शालूची सप्रेम भेट देवून स्वतः मात्र मधुर शीळ मारत रानोमाळ हिरवेगार मखमली गालिच्यांच्या पायघड्या घालतो व नेत्राना सुखावतो. नववधूस हिरव्या चुडयानी भारून टाकतो. तळाशी राहून तिरंग्यात तर तो भक्कमपणे आधार स्तंभच बनून रहातो प्रसन्नपणे. **श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे...** सारख्या शब्दांची गुंफण करण्यास कवीला भाग पाडतो.

पारवा----हा तर गुटर्गुम करीत परवा परवा पर्यंत खिडकीच्या आडोश्याला सौ. सह फेर्या मारत बसलेला दिसत होता. आणि... **गार... वा...** हे मिलंद इंगळे यांचे गाणे गुणगुणत असल्याचाही भास होतो.

---

______________

**निळा...** कोल्ह्याची फट फजितीची गोष्ट सर्वश्रुत आहेच. निळ्या आकाशाची मेघ डंबरीही-- निरभ्र आकाशात दूरवर क्षितिजा पर्यंत पसरलेली अन पहुडलेली पहावयास मजा येते. अश्या वातावरणात... **बगळ्यांची माळ फुले अजून अंबरात... !** हे गाणेही सहजच ओठी येते आणि गतस्मृती चाळवून जाते. -----

पिवळा रंग **----** हा तर अर्ध्या हळकुंडातच पिवळा होऊन जातो. सुवर्ण अलंकारांना आगळीवेगळी झळाळी अन धमक आणतो. झेंडूच्या- फुलां बरोबर दसर्याचे दिवशी आपल्याच रंगात अन ढंगात गावभर मिरवत असतो. अन दिवाळीत मोतीचूर लाडू अन जिलेबी सवे तो तर पाकातच डुंबून निघतो. पावसाळ्यातील

दुषित पाण्याने तो तर काविळीच्या रुग्णातील डोळ्यातही उतरतो अन त्यास... गर्भ गळीत करूनच सोडतोझाले.

लग्न समारंभाची तर ... **पिवळी पिवळी. ...** हळद लागली भरला हिरवा चुडा...

वधू लाजरी झालीस... तुग सांगे तो चौघडा // या गाण्या शिवाय पूर्तताच होत नाही.

त्यानंतरच... " नव.. वधु-वर "... मोठ्या दिमाखात आपल्या भावी आयुष्याच्या... इंद्रधनू.. दुनियेच्या स्वप्नात रममाण होवून जाण्यास प्रस्थान करतात. आपल्याच नव्या बंधनातील धुंदीत अन मस्तीत.

दाटून आलेले काळे - कुट्ट मेघ.. जलधारांच्या वर्षावा नंतर रिते होतात. त्यातूनच पसरणाऱ्या सोनेरी सूर्य किरणांशी फेर धरून आकाशाला गवसणी घालणारे... **इंद्र धनुष्यच...**
सर्वांना आपल्या सप्त रंगानी मन मोहून टाकते, आणि
वातावरण उल्हसित करून सोडते...

// **पैल तीरीचे --यापल** ----//

******

" An Apple a Day--keeps Doctor Away. "...

याच मधुर अश्या- यापलच्या सहाय्याने आपले शरीर, व मनाला नवी स्फूर्ती तर बुद्धीला चालना मिळते.

याची प्रमुख तीन उदाहरणे म्हणजे -----१) अडम- ईव्हने ---- -- खाल्लेले-----

२) सर एझ्याक न्युटनने----- पाहिलेले...

३) स्टीव्ह जॉब्ज ने---- निर्मिलेले...

" सफरचंद "खावून--- मानवी बुद्धीची उंची किती अमर्याद उंची पर्यंत गाठू शकते याची कल्पना येते. अशीच एक अदभूत व्यक्ती -- अमेरिकेच्या भूमीवरून (पृथ्वीवरून) कायमची -पैलतीरी गेली. स्टीव्ह जॉब्स. ----या महामानवाने आपल्या अल्प आयुष्यात निर्मिलेले -- महान कार्य ---मागे ठेवून जगास--- पुढे प्रगती पथावर जाण्याचा मार्ग आखीव रेखीव पद्धतीने मांडून ठेवला आहे.

खेळणे म्हटले की ते सुरक्षित, हाताळण्यास सोपे व आकर्षक असे असेल तर बाल मनाला लगेच भावते. व त्यांचे प्रेमातच पडते"**. वालट डिस्ने"** यांनी बालमनाला भावतील असे----

मिकी माउस -मिनी -डोनाल्ड डक -गुफी अशी खेळणी निर्माण करून बालविश्व समृद्ध केले त्याचे -- भव्य असे साम्राज्य उभारले व त्या खेळण्यांना जीवंत करून अजरामर करून सोडले. ते कायमचे.

आपल्या तल्लख बुद्धीच्या जोरावर---- **स्टीव्ह जॉब्स** ने --- यापल --आय पोड --आय नोट बुक --अशी तरुण -तरुणींनाच्या चंचल -मनाला भुरळ पाडणारी इलेकट्रोनिक -ग्याजेट्सची निर्मिती केली. एखाद्या खेळण्या प्रमाणेच ती आता आबाल थोरांच्याही अंगा खांद्यावर. मांडीवर अन खिशात बसून सर्वत्र संचार करीत आहेत. सर्वांचे ज्ञान आणि -मनोरंजन सहज सुलभ पणे करीत आहेत. सर्वत्र अधिराज्य गाजवीत आहे.

(२४ फेब्रुवारी -१९५५ ---६ आक्टोबर -२०११) अमेरीकेतील - स्यान प्रयान्सिस्को येथे जन्मलेल्या हे बालक लहान pna पासूनच प्रतिकूल परीस्थित जगावयास शिकले. खऱ्या आई - वडिलांपासून दुरावून क्यालीफोर्नीयातील - पॉल व क्लारा जॉब्स या दाम्पत्यांनी त्यास दत्तक घेतले. व पुढील शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. परंतु घरच्या नाजूक आर्थिक परिस्थितीने त्याच्या --आवडत्या रीड कॉलेज मधून त्यास बाहेर पडावे

लागले. जुजबी तांत्रिक -- ज्ञानावर व आपल्या बुद्धी कौशल्यावर भरवसा ठेवून मित्राचे सहाय्याने घरच्या ग्यारेज मध्येच - 1976 साली -- यापलचा जन्म झाला. आणि - येशू प्रमाणेच - जन माणसाना नव नवे धडे-----परंतु -- आपल्या तांत्रिक 'ग्याजेटच्या ' सहायाने देत राहिला. काम प्रगती पथावर असतानाच काही मतभेदांमुळे या यापलच्या जन्मदात्यासच आपल्या अपत्या पासून दूर व्हावे लागले. या अशांत मानसिक अवस्थेत मनशांती मिळविण्यास --भारतात येऊन शोध घेतला.

त्याच अजाण बालकास प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली अन हा मातृ हृदयी जन्मदाता यापलच्या उर्जीतावस्थेस धावून आला अन त्यास दिगंत अशी कीर्ती मिळवून देवून स्वतः मात्र --- पैलतीरीच्या अगम्य यात्रेस निघून गेला. ५ आक्टोबर २०११ रोजी -ज्या दिवशी भारतात -- आपण आपल्या शसत्रास्त्राना अर्थात आपल्या वापरातील "ग्याजेट्सना " एक दिवस विश्रांती देवून त्यांची पूजा करतो, त्याच दिवशी हा महामानव -- अनेकांच्या-" जॉब्जला "... हातभार लावणारा --स्टीव्ह जॉब्स स्वतःच ---प्यान्क्रियाटीक क्यानसरच्या आजाराशी ५-६ वर्ष सामना करत --चिर-विश्रांती घेण्यास आवडत्या-- यापलला मागे ठेवून --- पैलतीरी --आपल्या कार्याची कीर्ती --ऐलतीरी--- ठेवून निघून गेला.

मरावे परी--" कीर्ती " रुपी उरावे ----! या शब्दांना -- एक नवा सोबती---- कायमचा-जावून मिळाला.

त्याचे स्मृतीस ----- शतश: प्रणाम... !

असेन मी नसेन मी. तरी असेल गीत हे ----

फुला-फुलात येथल्या उद्या हसेल गीत हे -----या श्ब्दानाही अर्थ प्राप्त होतो.

-----



**// फळांचा... चापून घेतलेला समाचार... !!! // -- 3**

**...**

**// कर्मण्ये - वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन... !!-- असे म्हणतात. //**

**...**

*** * * केळ... 3**

**...**

" केळ " --खायला असा वेळच कितीसा लागतो म्हणा त्यामुळे अगदी आज कालची मऊशार -- चोकलेटची वडी खावी त्या वेळातच त्याचा फडशा पाडता येतो. त्यसाठी... " वेळ" नाही असे म्हणणारी व्यक्ती मला अजून तरी भेटलेली नाही. इतके सहज सोपे -विना बियाचे असे हे सर्व सामांन्यांच्या आवाक्यातले-- एकमेव फळ असावे. मधुर अशी एकच चव थोडी कमी अधिक प्रमाणात त्याची असते. रूपही गोजिरवाणे, आटोपशीर हलके फुलके. पण वेळेला २-४ केली खाली तरी भूक भागून जाईल एव्हडी ताकद त्यात नक्की असते. त्याचा हंगाम म्हणाल तर----- बारमाही पिकासारखाच असतो. बरे भावही--- जास्तीचा खात नाही कधी. इतर फळांचे मानाने सर्व सामान्यांना

परवडणारे व चांगलेच असल्याची खात्रीही बाह्य रुपा वरूनच मिळते. ह्याला रंग रूपही फार नसते. सुरवातीला कच्च्या स्वरूपातील हिरवे व नंतर हळू हळू पिवळे होत जाणारे. व गोडी वाढल्याची सूचना तो अंगावर छित्री डॉट ची... मेंदी काढून सांगून मोकळा होतो. ह्या मनमोकळया स्वभावाने सर्वांचाच ते फळ आवडते असते. झाडावर सरडा आपले रंग-- झटपट बदलतो पण याची याबाबत मंदगती चाल असते.

पूजा आदी धार्मिक विधी उपासतापास यावेळेला " केळ " म्हणजे एक हुकमी एक्काच असतो. त्याची उपस्थितीही प्रार्थनीय असते. अहो आपण नेहमी झटपट खाणारा शिरा वा उप्पीट-- डीश भर खाल्ला तरी पोट भरत नाही. पण-- केळाच्या-- परीस स्पर्शाने त्याच एरवीच्या --गोड शिऱ्याचा - सत्य-नारायणाचा -"- प्रसाद -"-होतो. त्याच्या लहानश्या- द्रोणातील अस्तित्वाने- अन शुद्ध तुपाच्या चवीने-- मन आत्मिक समाधानाने भरून जाते व त्यातही अनेकजणांना आपण सामावून घेतो . केव्हडे हे - असामान्य.. संग महात्म्य. दुधाच्या मैत्रीने त्यांचे "शिक्रणात "रुपांतर होते. तर- कस्टर्डच्या सानिध्याने ते -"-फ्रुटस्यालड "-- अश्या झोकदार- नामकरणाने --' टाय 'घातलेला जंटल- मन होऊन जाते अन--- पंच तारांकित हॉटेलमधील मेनुतील-डेझर्ट -

सेक्शन- मध्ये स्थलांतरित होते व वेगळीच किमती- उंची ही गाठते.

. दाक्षीणात्य लोकांमध्ये केळाचे----- 'वेफर्स 'हा खारा-- पदार्थ लोकप्रिय आहे. त्यामध्ये मात्र तो आपल्यातील-" कडकपणा" प्रथमच लोकांपुढे आणतो कारण त्यालाही बरेच दिवस-- टिकून राहायचे असल्याने --" कडक" तेलाच्या सहाय्याने आपोआपच" वाण नाही पण गुण लागतो " तसे होते. याचेही काही-- खुजे भाऊबंध आहेत त्यांना "सोनकेळी" संबोधले जाते. ती तर नेहमीच्या केळ्यानपेक्षा अधिक गोड असतात म्हणूनच लहानमुलांना माझ्या "सोन्या " असे म्हणत असावे बहुतेक. एके काळी--पेशव्यांचेवास्तव्य असलेले --छोटे - वसई हे गावही .. केळ्यांसाठी प्रसिद्ध होते आता तेथेही सिमेंटची जंगले वाढल्याने वसई करांना सुद्धा आता जळगाव व इतर ठिकाणच्या केळांची-- वेशीवर आतुरतेने वाट पहावी लागत आहे अशी अवस्था आहे.

लहान लहान केळीचे--- खुंट सत्यनारायणाचे धार्मिक - पूजेला चौरंग सजविण्यास लागतात. तसेच लग्न समारंभाचे वेळेस मोठे खुंट - प्रवेश द्वाराशी उभारतात. त्यामुळेही वैवाहिक आयुष्यास-- बळकटी येत असावी. केळयाचा भरभक्कम बुंधा -- झाड तसेच

केळयांच्या घडांचा भार आणि लांब रुंद डोलणाऱ्या पानांचा-- तोल भक्कमपणे सांभाळत असल्याने त्यास "खुंट " म्हणत असावे. आपणही व्यवहारात एखादी गोष्ट पक्की करून घेण्यास "अगदी खुंटा हलवून बघितला "--- असे म्हणतोच ना. केळीची- हत्तीच्या कानाप्रमाणे झुलणारी पाने आतील फळांना उन- पावसा पासून जपतात. ह्या पानांचा उपयोग -शाही जेवणावळीतही करतात. या हिरव्याकंच पानावर मांडलेले सात्विक गोड-धोड - भोजन- सुवार्णालंकार -ल्यालेल्या नववधू प्रमाणे नेत्र सुख तर देतेच पण जिव्हा सुखाने दोन घास जास्तीचे जावून उदरभरण ही.. चापून होते.

झाडावरील केळयांच्या समूहास" घड " म्हणतात तर गाडीवरील लहान समूहास" फणी " म्हणतात. अशी फणी शुभ कार्यात शोभून दिसते. उपवर मुलींच्या ओटीतही अशी फणी घालण्याचा प्रघात आहे... काही म्हणा या केळयांच्या देखणेपणातच एक वजनदारपणाही जाणवतो तो काही वेगळाच. रुबाबात आरामखुर्ची टाकून... समुद्रकिनारी ओळीने हवा खात बसावे तसा.

पण एकदा का ती----मऊशार- खुर्ची सोडली तर त्या सालीची

अवस्था मात्र--- " सैर भैर" होते अगदी खुर्ची गमावलेल्या--- राजकीय पुढाऱ्या प्रमाणे, (केळाची --साल-- काहीशी- हलकी- फुलकी व केळ खावून झाल्यावर मात्र लगेच लेची पेची अन नकोशी होते) . पण त्याही अवस्थेत आपल्या योग्य त्या मानाच्या -जागेच्याच -अपेक्षित असते ---" सालीची " - योग्य ती ' बडदास्त 'ठेवली नाही व तिला योग्य ते " मानाचे " सुरक्षित स्थान-दिले गेले नाही व... पायदळी तुडविण्याचा प्रयत्न केलातर, -----ती सुद्धा---- भल्या भल्यांना--" आस्मान "दाखविल्याशिवाय रहात नाही हे... मात्र अवश्य ध्यानी असू द्यात म्हणजे झाले.

... तू-- जपून टाक पाऊल जरा... जीवनातल्या मुशाफिरा /----- !!

---या गाण्याची अन माझीही नीट --" आठवणही "- ठेवा एव्हडेच सांगते बिचारी... ". ती केळयाची साल. "

**// फळांचा... चापून घेतलेला समाचार... !!! // --१**

...

**// कर्मण्ये - वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन... !!-- असे म्हणतात. //**

...

नारळ --१

-----

कोणत्याही कार्यक्रमाचा शुभारंभ "नारळ " वाढवूनच केला जातो. त्यामुळेच त्याला.. श्रीफळ असेही म्हणतात. त्याचे मातेस तर-- कल्पवृक्ष असे संबोधले जाते. नारळाशिवाय खरे तर पान हलत नाही. कारण विड्याच्या हलक्या फुलक्या पानावर तर तो कायम विराजमान असतो. जणू त्याचे वाहनच. बिचारे पान त्याच्या सहवासाने सुरवातीला हरखून जाते खरे पण नंतर त्याच्या अवजड भाराने कोमेजतेही.

गृहिणीच्या तर
हा कायम हाताशी असतो एखाद्या आज्ञाधारक मुलासारखा. बर्फी करा - चटणी करा वा दीपक पाचक अशी आमसूल घालून सोलकढी करा -----अन जेवणावर --

हवा- तसा बिनधास्त ताव मारा. त्याच्या नावाची खास --नारळी-पोर्णिमा सुद्धा श्रावणात असते. मग काय तो
त्यादिवशी गोकुलातच नांदत असतो. स्त्रियांच्या ओटीत तर याला कायमच अढळ असे मानाचे स्थान असते.

लग्नात "व्याही भेटीत " पट्ट्या दोन्ही बाजूच्या सर्व मानाच्या पानांचा समाचार.. एकटाच की हो घेतो. त्यावरूनच त्याच्या सुप्त शक्तीची कल्पना येते. -----त्यामुळेच कोणाला नकळत निरोप द्यावयाचा असेल तरी त्याचे हातावरी "महाशय -" शालीचे उबेत तोंड लपवून रुबाबात बसून, यजमानांचे डोळ्यात मात्र पाणी आणतात हे नक्की.

आणि हो पावसाळ्यातील खवळलेल्या समुद्राचे पोटात बेमालूम शिरून त्यालाही वठणीवर आणून दर्यावर्दी बंधूंचा सागरी मार्ग खुला करतो.

लग्न समारंभ -- गणपती उत्सव --यावेळी तर
याच्या भाऊ बंधांची तर ही -----गर्दी होते की
काही विचारू नका. नवरात्रातपण हे महाशय रात्र रात्र जागवून काढत त्या महिशासूर -मर्दिनी देवीचे दर्शनही अगदी तीच्या गळ्यात पडूनच घेतात. केव्हडे हे... धैर्य अन शौर्य.

... "कोवळया" अश्या नाजूक - वयात तर हे आपला बाजारच रस्तोरस्ती मांडतात. देवळे अन हॉस्पिटल्स ही त्यांची "इराणी हॉटेल " प्रमाणेच मोक्याची हेरलेली ठिकाणे असतात. आजारी रुग्णांना तर हे "संजीवनच "ठरतात. अन उन्हाळयात तर पान्थस्थानच्या घश्याला, एव्हर -रेडी राहून थंडगार - मधुर अश्या हृद्य --नैसर्गिक -पाण्याची "ओंजळ " (-प्लास्टिकच्या बाटली मधील - बिसलेरीच्या.. श्री -मुखात भडकावून देतच) ----- रिती करण्यातच धन्यता मानतात.

त्यामुळेच ----

कोकणची माणसे ---साधी भोळी ----

काळजात त्यांच्या भरली----- शहाळी-----

या शब्दानाही कर्णमधुर असे स्वर-माधुर्य प्राप्त होते ते वेगळेच.

----

**// फळांचा... चापून घेतलेला समाचार... !!! // -- 2**

**...**

// कर्मण्ये - वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन... !!-- असे म्हणतात. //

...

**आंबा---२**

**...**

नाच रे मोरा ----"आंब्याच्या " बनात नाच
अश्या बाल गीता पासूनच आपली नि- आंब्याची ओळख होते.
बालमित्रच तो. त्याला विसरणे शक्यच नाही.
परंतु मोठे झाल्यावर तो
ही आपल्याला विविध कारणांनी पारखा होतो व वर्षातून एकदाच
कधी काळी मात्र आवर्जून भेटतोच भेटतो, तसेच--
- आंबाही मुलांना न चुकता त्यांना सुटी पडण्याच्या उन्हाळी
मोसमातच भेटण्यास येतो व
पाऊस येई पर्यंत मनसोक्त खेळत रहातो. त्यामुळे मुलाचं तो
जिवलग मित्रच असतो.

मोर हा तर आपला राष्ट्रीय पक्षी -- नयन मनोहारी पिसारा डोक्यावर तुरा, लांबलचक पिसारा मोठा राजशाही थाटच जणू.

म्हणजे राजाच ---तोही फळांच्या -

- राजाच्याच आमराईत आनंदाने नाचतो. काय योगोयोग पहा. पावसा पूर्वी ढग जमा होतात त्यावरून पावसाचा अंदाज शास्त्रज्ञ बांधतात. तसेच आंब्यालाही "तूऱ्या प्रमाणेच दिसणारा मोहोर येतो. शेतकरी - बागायतदार खुश होऊन आपल्या आंब्याचा पिकाचा अंदाज घेतात. थंडी संपत येते तसा आंब्याच्या पिकाला बहार येतो.

आंब्याचे झाड दारी असणे म्हणजे ते एक स्वपनच असते.

असावे घर ते आपुले छान --!!

पुढे असावा बाग बगीचा
वेळ मंडपी जाई जुईचा
" आम्रतरूवर " --मधु मासाचा
फुलावा मोहर पानोपान -----असावे...

(पी. सावळाराम -दशरथ पुजारी --सुमन कल्याणपूर)

वास्तू शांती - पूजा -अथवा कोणतेही शुभ कार्य म्हटले की आंब्याची डहाळी - पाने हमखास हवीतच. मांगल्याचे प्रतीकच.

आंब्याचा आकारच साधारण माणसाच्या " हृदया" प्रमाणे असतो. त्यामुळेच तो प्रत्येकाच्या मनात घर करून रहातो व " हृद्य " असा बनतो.

त्याचे रंग रूप उगवत्या --सूर्याला साजेसे असे "मोहक " असते. आगमनालाच मात्र तो फार-- भाव --खाऊन जातो. फक्त उच्चभ्रू लोकच त्यांचे दर्शन घेण्यास धजावतात. इतर - मात्र वर्तमान पत्रातील फोटो पाहूनच -दुरून डोंगर साजरेचा अनुभव घेतात. हळू हळू तो चोर पावलाने दबकत बाजारात येतो.

ऐन तारुण्याच्या --भरात आणि भाराने लहान थोर -तीच्या मोहक हिरव्या कंच तोंडला पाणी सुटणाऱ्या
अवस्थेने मोहात पडतात. "कैरी " नावाने तो - नावारूपास येतो.
कैरीच्या पन्ह्याने उन्हाळयाची चाहूल लागते.
चैत्र - मासाचा आरंभ होतो. हळदी कुंकू समारंभ - भिशी पार्टी - पुष्करणी अथवा कल्याण -भेळे मध्ये आवर्जून तिची हजेरी असते. कैरीची डाळ --म्हणजे तर खमंग फोडणी देवून चापण्याचा

मोह आवरत नाही. अशी एकेक पायरी चढत तो -- अंतिम " हापूस पायरी " च्या पदवी पर्यंत पोहोचतो.

सर्व सामान्यही आपापल्या मुलांच्या परीक्षा
तर महिला उन्हाळी कामे उरकण्याच्या बेतात असतात.
*अक्षय तृतीयेच्या --मुहूर्तावर -आंब्याचा --
आम जनतेच्या घरात मात्र पूजा करून प्रवेश होतो. तो पर्यंत त्याच्या गोडीत --आणि कोकणातून भरभरून येणाऱ्या -गाडयात --वाढ होत राहते. थोड्याच अवधीत तो मग --केळी-द्राक्ष यांच्या हातगाडीवरील जागेचा ताबा-- हक्काने घेतो सर्व बाजार पेठ -सुगंधीत अन रंगीत करून सर्व सामन्यांवर मोहिनीच घालतो जणू. घरोघरी -आमरस पुरीचे बेत सुरु होतात. आणि वेगळीच बहार येते. सर्व गाव भर एखाद्या-- वळू -- प्रमाणे धुमाकूळ घालतो. करंड्या -लाकडी पेट्याच्या
वाहनात बसून ऐटीत घरोघरी पोहोचतो. शहरातील ओसंडून कचरा पेट्याही त्याची साक्ष देत रहातात.

दुकानांवरील येथे "रत्नागिरी हापूस मिळतील "व त्यावरील मोहक भुरळ पाडणारे चित्र पाहून पावले आपोआपच दुकानाकडे वळतात. व हापूसचा वेध नव्हे वास घेऊ लागतात. काही

व्यापारीतर खास "देसाई आंबेवाले --बेहेरे आंबेवाले "अश्या थाटातच प्रसिद्ध आहेत. त्या आता नव्याने भर पडली ती अल्पावधीतच -- रेडीओ मिरचीच्या खुश्कीच्या मार्गाने - घरोघरी थेट किंचन टेबलवर जाऊन बसलेले "म्यान्गोवाले डॉट. कॉम हे नव्या दमाचे..
घराघरात आकर्षक बॉक्स मधून घरपोच डिलिव्हरी देत पोहोचलेले नाव.

कार्पोरेट जगतात ही-- तो-- आता आपली वाट -- आकर्षक रंगीत बॉकस द्वारे साहेबांचे थेट ए. सी. केबिन मध्ये जावून शोधतो .. व्यापारी मंडळी... "आम्र मोहोत्व्सव " भरवून मोठ्या धूम धडाक्यात त्यास लोकांचे दारा पर्यंत तर अगदी सामन्यांच्या खिशा पर्यंत पोहोचवतात. मे -महिन्याचा उकाडा याचे अस्तित्वा मुळेच सुखावह होतो. आईस्क्रीम चा रंग आणि नूरही पालटतो. आम्रखंड - आम्र शिरा -नव्हे तर आम्र मोदक ही जेवणावळीत दिसू लागतात. ----सर्वांची मने तर जिंकतोच पण व्यापार्यांच्या ध्यानी - ----मनीची ---चिंताही दूर करतो. हल्ली तर काही तरुण उदयोज्कांनी --- ई-

मेल जगताचा फायदा घेत, ऑन लाईन बुकिंगची व्यवस्था करून आंब्याला घरपोच सन्मान पूर्वक व
आस्थेने पोहोच करण्याची व्यवस्था केली आहे. एव्हडेच नव्हे तर --परदेशस्थ -इंग्लंड - अमेरीका येथील सग्या -
सोयर्यानाही म्यान्गोवाले डॉट कॉम वाले --४--५
दिवसात आंबे पोहोच करण्यात यशस्वी झाले आहेत.
कोकणचा हापूस -पायरी आता थेट वाशिंग्टन - क्याली फोर्नियात आरामात पोहोचतो आहे.

अश्या प्रकारे थोड्या अवधीतच ...
जगभराचा कानोसा घेतो. आपले भाऊ बंध -देवगड - कर्नाटक - मद्रास -लंगडा-तोतापुरी -केसर - गावठी -आंबा यानाही थोडी वाट मोकळी करून देत --तो, धावपळ करून
दमल्याने परतीच्या मार्गाला लागतो. तो सर्वांनाच हूर हूर लावून जातो पण त्यापूर्वी वर्ष भराचे सोबती साठी...
उरल्या सुरल्यांना घेऊन निर्वात क्यान व बाटल्यांमध्ये --पल्प --स्वरुपात पिवळया - केशरी रंगांत बंदिस्त होतो व--- फ्रीजची --थंडगार हवा खात निवांत बसतो.

अन मागाहून येणाऱ्या आपल्याच बोजड रुपामुळे - कासव गतीने येणाऱ्या हिरव्या रंगाच्या -- भाऊ बंधांना-शिक्षा करतो. कच्च्या स्वरूपातच-- सुऱ्यावर चढवून --- महिलांचे ताब्यात देवून मोकळा होतो. त्याही त्यांचा तिखट - मीठ तेल --- लावून चांगलाच समाचार घेतात. अन चवदार होण्यास मात्र त्याची-- चीनी मातीच्या --अंधार कोठडीत रवानगी करतात. -- प्यारोल-- वर बाहेर येण्याची संधीही वर्ष-भर अधून मधून मोकळी हवा घेण्यास मिळत राहते.

कवी महाशय मात्र -----

आला ग बाई आला ग बाई आला ---

पाडाला---- पिकलाय आंबा..

वास बघुनी तुम्ही जाणा हो पाव्हन

नमुना बघून तुम्ही जाणा हो पाव्हन...

आंब्याचा रंग केशरी

वर लांब शोभे शेंदरी

तोंडाला तुझ्या पाणी सुट

घेवून टाक लगी म्हंजी काळजी मिट...

घुटमळू तू नग.. बाबा

पाडाला पिकलाय आंबा ----

(गीत, संगीत- तुकाराम शिंदे ----- स्वर- सुलोचना चव्हाण)

अश्या स्वर मधुर गाण्याच्या... सुरा द्वारे केंव्हाही त्या रसाळ आंब्याची -"आभासी" भेट घडवून आणतात. हेही नसे थोडके.

अन एव्हाना आपली नजर चुकवून ---- " मोरही " -- पावसाची-- ढगाळ चाहूल -लागल्याने आपल्या-- प्रेयसीच्या शोधात आंब्याचे वनात धूम ठोकून, पिसारा फुलवून मुक्तपणे आमराईत नाचत नाचतच वनविहार करण्यास केंव्हाच पसार झालेला असतो...

...

**// फळांचा... चापून घेतलेला समाचार... !!! // -- ४ --**

**...**

// कर्मण्ये - वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन... !!-- असे म्हणतात. //

...

**सफरचंद --४**

...

" सफरचंद " याच्या नावातच-- **सफर--** असल्याने त्यास लांबून 'काश्मीर ' अथवा पाश्चिमात्य देशातून मार्ग काढत काढतच आपल्या पर्यंत यावे लागते.
अन्यथा आपल्यालाच त्यांचे
माय भूमीचे दर्शनानिमित्त विमान सफरीचा योग येतो. त्यास अर्थात " **चंद** " पैसेही खर्च होणार हे आलेच. दक्षिण व उत्तर धृवावरील जन्मजात खळयानमुळे त्याचा चेहरा - मोहरा अधिकच खुलून दिसतो.

**"AN -- APPLE A DAY-- KEEPS THE DOCTOR --- AWAY "...**

हे वाक्य देखील सारखे सारखे उगाळून ----स्वतः---प्रमाणेच गुळगुळीत झाले आहे. हे फळ-- हृदयाला जरी बलवर्धक असले तरी या- वाक्यांमुळे काही काही डॉक्टर मंडळींच्याच--- हृदयाचे ठोके---- कधी मधी चुकतात. यास्तव ही म्हण- म्हणे अभ्यासक्रमातूनच- वगळावी असे आपले म्हणणे पटवून देण्यासाठीचे व त्यासाठी उपोषण केल्याचे दाखले--- पौराणिक इतिहासाच्या - आधुनिक दाखल्यात पहावास मिळतात. परंतु वाटाघाटीनंतर ते उपोषण -"-सफरचंद ज्यूस"---पिऊनच संपवावे लागले. जगभर हे आंदोलन पेटू नये म्हणून काळजी घेतली गेली. त्यात काही सफरचंद ज्यूसचे व त्यापासून वाइन निर्मितीत गुंतलेल्या" डॉक्टर "मंडळींचाच हात असल्याचे आतील गोटातून समजले... जोक्स अपार्ट ----

सफरचंदे---- ही लाल -हिरवी -पिवळी -मरून-व लाल पिवळी अश्या विविध रंगात आढळतात तरी त्यांच्यात वर्ण भेद असल्याचे ऐकिवात अद्याप तरी आलेले नाही. सर्वजण साधारण एकाच आकाराची व आंबट- मधुर चवीची असतात. मेंदू - हृदय -फुफुसे -पोट - आतडी -सांधे यांचे बलवर्धनास उपयुक्त असे हे फळ. शरीराच्या मध्यवर्ती- महत्वाच्या अवयवांची.. खुबीने

काळजी घेते म्हटल्यावर डॉक्टरांची गरजच काय... ? मात्र आर्थिक दृष्ट्या -उच्च वर्णीयांच्या आटोक्यात असतात ती फळे. त्यामुळे गरिबांना पेरू - बोरे असा अश्या... रानमेव्याचाच आश्रय घ्यावा लागतो.

सफरचंद- --न कापताच... आपले दात भक्कम असल्याची खात्री असल्यास खाता येते.
त्यासाठी याचा उपयोग दंत मंजनाचे जाहिराततही केल्याचे दिसून येते त्यातूनही आपल्यास
सृष्टी आणि दृष्टी सौंदर्याचा लाभ होतो तो वेगळाच. इतरांनी ते सुरीने चार फोडी करूनच खाण्यात मजा आहे. त्यात बिया जरा बारीक व कमीच असतात. त्यामुळे टाकाऊ भागही तसा -कमीच त्यामुळे पैसे वसुलीची फुल ग्यारंटी. हे फळ - कापण्याची एक गोलाकार--चकती हल्ली मॉल मध्ये--- (बाजारात) मिळते. उत्तर ध्रुवावर ती ठेवून थेट दक्षिण धृवामार्गे बाहेर काढायचा अवकाश की अनावश्यक भाग बिन बोभाट (बियांसहीत) वेगळा होतो व फोडीही आकर्षक दिसतात व संपतात ही लौकरच . आजारी व वृद्धाना ज्यूस देणे उत्तम. कापलेले फळ उघडे ठेवल्यास रंग बदलतो यास्तव लगेच संपवावे.



हेच--- सफरचंदाचे फळ झाडावरून खाली पडताना पाहून " सर एझ्याक न्यूटन"या पाश्चिमात्य शास्त्रज्ञाने गुरुत्वाकर्षणाच्या भौगोलिक -शास्त्रीय सत्याचे - नियमाचा असा - महत्वाचा शोध लावला. हेच फळ खावून---- म्हणे "आदम व इव या प्रेमिकांचे प्रेम वाढीस व भरभराटीस - लागले अन जगाच्या इतिहासात भल्या मोठ्या पृथ्वीवरील--- लोक संख्येच्या.. भू ---वरील अनेक ---गोलात रुपांतर झाले आहे. तीच्या स्वतःच्या - सुरक्षितते साठी व माणसांच्या प्रचंड --ओझ्याखाली वाकण्या पासून बचाव करण्यासाठी अजूनही ती अशी --- वण- वण फिरतेच आहे ----फिरतेच आहे---- ----सूर्योदयापासून---क्षितिजा पलीकडील ---- सूर्यास्ता पर्यंत --त्याच सफरचंदाच्या--?-- शोधात, त्याच्याच आकारात, - पण ----- भव्य अशा विश्व रुपात. ...

... अज्ञात -- तीर्थ यात्रा आभाळ गूढ वरती... /

मागे ----वळून बघता डोळे तुडुंब भरती ---- (रमेश वैद्य- --- सुधीर मोघे ----रवींद्र साठे)

असे सूर काढीत...

आणि विशेष आनंदाची बातमी म्हणजे --" आम्हाला ते भूतलावरच "-- सापडलेही पण-- एक ----



- -

" **छोटासा टवका तोडलेले सफरचंद** "

अश्या छायाचित्र स्वरुपात. आजच्या आय. टी. च्या ग्लोबल युगात --- A -for Apple ---ला एक वेगळेच संदर्भ आले आहेत.. हेच सफरचंद- छायाचित्र "ब्र्यांड " म्हणून वापरणाऱ्या या कंपनीने - Apple हे बुद्धीवर्धक असते याचा पुरावाच आपल्या पुढे ठेवला आहे. व त्यांचे संगणक --मोबाईल्स -आय पोड्स - आय नोटबुक्स -आय बुक्स या पंच ज्ञानेंद्रिया रुपात. असंख्य ग्राहकांना त्याचा आज फायदा होत आहे. घर बसल्या जगातील कानाकोपर्यातील इत्तमभूत माहिती त्यांना एका क्लिक चे

सहाय्याने मिळत आहे. " हे विश्वची माझे घर " या स्मृतींनाही मोठा उजाळा मिळत आहे.

---- एका जगप्रसिद्ध -अशा ऑपरेटिंग सिस्टीम व हार्ड वेअर कंपनीच्या ल्याप टोप चे - Apple हे नाव म्हणून उदयास आले आहे. हे सर्व श्रुत- आहेच. * हे सफरचंद म्हणजेच -- गुरुत्वाकर्षण- शोध लागल्याच्या आनंदाच्या भरात = न्यूटनने त्याची मधुर - चव घेऊन पहिल्याचा पुरावा. हेच.. जगासमोर आलेले *सफरचंदाचे पहीले अधिकृत-छायाचित्र होय. * हा शोध - निबंध आम्ही -(लेखकाने) कंपनीस सादर करून त्यांचे- पेटंट- घेण्याचा मानस व्यक्त केला असता त्यांनी ते गुप्तपणे-पण प्रांजळपणे मान्य केले आहे व लवकरच त्या बद्दल -- अमेरिकेचे पहीले - " ई -अंब्यासडार "चा किताब मिळणार आहे. हा पुरस्कार मिळविणारे ते पहीले च भारतीय -पुणेकर -मराठी - त्यातही महाराष्ट्रीयन -नागरिक असणार आहेत याची नोंदही "गिनीज बुक रेकोर्ड मध्ये होणार आहे. हा पुरस्कार वितरण अमारंभ --Apple - कंपनीचे प्रवेश दारातच आयोजित केला जाणार आहे. " टवका तोडलेले ई -Apple -व उबदार ई - शाल " देवून होणार आहे. त्यांचे ई - प्रक्षेपणही ही होणार आहे. सर्वांनी आवर्जून हा कार्यक्रम पहावा अशीच ई-पूर्व सूचना देत

आहोत. लक्ष असू द्यात. तसेच एका पुरुषाच्या यशा मागे एक स्त्री असते याची खात्री झाल्याने आमच्या -सौ. जयश्री वैद्य यानाही त्यावेळी ई -रिंग देवून गौरविण्यात येणार आहे. याचाही विशेस आनंद आहे. त्यांना अन मला... सुद्धा.

विशेस म्हणजे "ऑक्सफर्ड च्या पी. एच. डी. "- पाठोपाठ - अवघ्या दहा महिन्यात " हा" पुरस्कार मिळविणारेही ते पहीलेच पुणेकर- मराठी - भारतीय नागरिक आहेत याचा सर्व पुणेकरांना (... आमच्या सह) -- अभिमान आहे.

(.. एक टवकारलेल्या -----स्वप्नमय जगताची.. फ्यान्टसी ' सफर '--(चंद) --) त्यावरच ----तूर्त समाधान मानू यात... !!---- कसे... OK टेक केअर --अन्ड Have -- " An Apple A Day. "

किती --सांगू मी सांगू तुम्हाला आज-- आनंदी आनंद झाला... //

आणि आम्ही "टब "-----ऐवजी ---अंगणातील पावसात नाचू लागलो... //

**// निसर्गच जेंव्हा आळस झटकतो---तेंव्हा --- !!/**

/ १ /

...

वादळ वार सुटलं गो,... वाऱ्यान तुफान उठल गो

भिर भिर वाऱ्यात ----पावसाच्या पाण्यात...

सजनान होडीला पाण्यात लोटलं -----

वादळ वार सुटल ग -----

निसर्ग म्हणजे पाच भावंडांचा-- लपंडावाचा खेळ जणू. पण त्यांना.. " भूत " हे नावही दिले आहे साधे सुधे नव्हे ----तर "पंच महाभुते ". मग काय त्याना---- आयतेच फावले की कधी कधी त्यांचा अवतार दाखवायला. वेळ आली की ते आपले रुद्र अवतार दाखवितात. आणि माणसाला सळो की पळो करून सोडतात हे आपण नेहमीच अनुभवतो आहोत.

पृथ्वी --आप --तेज --वायू --आकाश ---हीच ती सर्व गुणसंपन्न अशी गुणी पाच भावंडे. म्हटले तर देवदूत ---अन्यथा भूत. !

पृथ्वी (वसुंधरा) ----. पाऊस कधीचा पडतो... म्हटले की ती मोहरून जाते. आपला सुगंध पहिल्या पावसात सर्वदूर पसरून

मनमोकळी होते झाले. सर्वच सुखावतात. शेतकरी- कामकरी- अबाल-वृद्धही. हळू हळू ही अंगावर हिरवा शालू नेसून नख शिखांत सजू लागते . पर्वत राजीतून पांढऱ्या शुभ्र वाहणाऱ्या " निर्झर " बटांनी अधिकच खुलून दिसते . रंगीबेरंगी फुलांनी बहरते. सप्त रंगांत हरवून जाते खरी. खोटेपणा तिला रुचतही नाही. यशोदेने बाल श्री कन्हैय्यावर माखन चोरीचा आळ घेतला तेंव्हा तर त्याचे मुखात --- विश्वरूप दर्शन की हो झाले तिजला या वसुन्धरेचे. ही निसर्गातील चौथाच भाग व्यापून असते. पण माणसाला ही पुरून उरते हे ही खरेच नाही का... ?

. अशी ही लाख मोलाची ----- पृथ्वी घनघोर पावसाने भिजताच मात्र आपलेच खांद्यावरील कडे अंगावर ओढून घेवून आपला राग व्यक्त करते, रुद्र रूप धारण करते. कोकण रेल्वे ठप्प होऊन जाते. नदी नाल्यांचे पाणी गढूळ करून टाकते. आपल्याच कुशीतील आलेल्या पिकांना गिळंकृत करून बळीराजाचाच बळी घेते. ओल्या दुष्काळाची वाटेकरी होते. सुपीक --बागायती जमिनीतून पैश्याचा पाऊसही पाडते, द्राक्षाचे मळे फुलविते. तर काहीना नुसतेच झूलविते. तळी- नद्या विहिरीची अंगे शहारतात - सुखावतात. धरणांच्या खुशीला पारावार राहत नाही. पण एखाद्या

बेसावध क्षणी धरणीकंप होऊन गावेच्या गाव गिळंकृत केल्याशिवाय गप्पच बसत नाही. नदीचे पात्रच विखरून टाकते अन कधी ल्हावा रसाची गरळ बाहेर टाकून आपलाच भूगोल बदलून भुताचे रुपात समोर येते तेंव्हा मात्र माणूस हतबल होऊन जातो. सिमेंटची जंगले उभी करणारा तिचे शृंगालंकार ओरबाडणारा माणूसच---- तिच्या " आळस झटकण्याच्या "-- आगळया वेगळया रुपाकडे क्षणभर पहातो आणि गुमान सारवा सारवीच्या तयारीस लागतो मान खाली घालून, आपल्याच नशिबाला दोष देऊन, --

जगण्याची नवी उमेद घेऊन. पुन्हा नव्या जोमाने उभारी घेतो पुढील पावसाकडे----- डोळे लावून बसतो --- डोळयातीलच ---- -उरलेले दोन थेंब --पाणी पुसत अन वसुन्धरेनेच पोटात घेतलेल्या----- सीता माईचे शोधात... !!

... भाग (१) ...

**//... निसर्गच जेंव्हा आळस झटकतो---तेंव्हा --!!/**

**/ २ / आप /**

...

पहले आप- पहले आप----- असे म्हणत आपण पाहुण्यांचे स्वागत करून त्यांना चहा -पाणी करण्याचा आग्रह करतो. अन त्याचवेळी बाहेर पावसाळी हवा असेल तर रंग छानच रंगततो अन जोडीला भजीही खाविशी वाटतात. अन तोंडालाही, कितीही नाही म्हटले तरी पाणी सुटतेच. तर असे हे पाणीदार पाणी.

टप टप काय बाहेर पडतंय ते पाहू ----

चल ग आई चल ग पावसात जाऊ -----

असे बालसुलभ--- हट्टही आपण पुरवून त्यांचे बरोबर अंगणात नव्हे... आजकाल "टेरेसवर, अथवा गच्चीतच "जावून मनसोक्त भिजू लागतो. पहिल्या--- पावसाचा आनंद लुटू लागतो. या आनंदाचा आनंद न घेणारा नसेलच कोणी --अरसिक. पाऊस कसा पडतो यावरही आपला मूड बदलत रहातो.

समुद्राच्या पाण्याची वाफ --नंतर ढग --पांढरे --काळे --कालेकूट्ट घनघोर अश्या स्वरूपाचे त्यातही वेगळे सौंदर्य असते.

दररोज जरा आकाशाकडे नजर लावून तर पहा कधीतरी ... नाही ----!! एखाद्या दिवशी ---

" बगळ्यांची माळ फुले अजून अंबरात (निळ्याशार) ----- याची अनुभूती आली तरच नवल... !

याची आपणच काय ----चातक पक्षी --- देखील "जलद" --गतीने - वाट पहात असतो. पण यालाच - खट्याळ वार्याची --झुळूक मोहरून जाते, अन त्या"मेघदुताचे"----- हृदयाचे पाणी पाणी होऊन जाते. अन थेट धरणीकडे ओढ घेते. ओढे -नदी, नाले. विहिरी भरून जातात. माणसाच्या -प्रेमीजनांच्या मनामनातील प्रणयाने सर्वांगावर काटा येतो नव्हे---- ते असतात न बोचणारे शहारे. एकमेकांना जवळ आणणारे अन जीवनात बहार आणणारे एव्हडे नाजूकसे. त्या पावसाचीही भावंडे आहेतच की --रिप रिप --पीर पीर --झिम झिम --मुसळधार --हत्तीचा पाऊस -हस्त नक्षत्रातील --वळवाचा पाऊस ---व अवकाळी येणारा. आंब्याचे----बनातील मोरही नाचू लागतात याच्या आगमनाचे खबरीने.

साऱ्या सृष्टीचीच , --नजर लागावी अशी दृष्टी बदलून जाते अन नेत्र सुखावतात. बळीराजा कामाला जुंपून घेतो. . वेळेवर आला तर ठीक. नाहीतर हाच पाऊस---- तोंडचे पाणी सुद्धा

पळवितो कधी कधी. राजकारणी लोकही त्याचा कित्ता गिरवून राज्या- राज्यात तेढ निर्माण करतात अन लोकांच्या डोळयात पाणी येई पर्यंत वेळ आणतात. राजकारणाचा---- खेळ खंडोबा करतात माणसे असूनही.

चला आता धरणे ---- ९५ % भरली पिण्याच्या पाण्याची काळजी मिटली अशी बातमी येते अन सगळे जण आनंदात

"जय गंगे --भागीरथी" म्हणत दोन तांबे जास्तच अंगावर घेतात व फ्रेश होऊन जातात. गंगाच जणू घरी आली असे समजून त्यानेच तर --" जीवनातील आशा पल्लवित होऊन जातात. आप-- आपले दैनंदिन आरोग्य सुधारतात. काशीला जावून आलेले भाविक "गंगा पूजनही करतात व पुण्य गाठीशी बांधतात.

त्याच पाण्याचे खुबीने शास्त्रीय --भाषेत --- H 2 O-- असे " नामांतर " केले आहे . याला--- विरोध करण्याचे धाडस कोणीही करत नाही- ब्र- सुद्धा काढत नाहीत कारण-----त्यातही शास्त्रज्ञांनी दोन --हायड्रोजन --बॉम्ब-- पेरून ठेवले आहेत. वेळ पडलीच तर जोडीला-- ऑक्सिजन ही आहेच. मग कोणाची टाप --विरोध करण्याची. त्याच पाण्याचे वाटपासाठी परिषदही भरविली जाते. तेथेही सुरळीत कामकाज चालत नाही पाहून पाण्यालाही कधी कधी राग येतो. अन आपला शांत --तरल

स्वभावाचा--- आळस झटकून त्यातील --H2-- चा इंगाच दाखवितो सर्वांना आणि सळो की पळो करून टाकतो झाले.

नद्या, नाल्यांना पूर येतो गावेच्या गावे उध्वस्त करते. सभोवती पाणी पण पिण्यास नाही"पिण्यालायक" पाणी अशीही गत होवून जाते. कांही महाभाग यांचे अती जवळ जाण्याचा प्रयत्न करतात त्या पूर आलेल्या पाण्यात उत्साहाचे भरात उडी मारतात. अन पाणी पिण्यासही पुन्हा रहात नाहीत. खवळलेल्या पाण्याशी कधीही खेळू नये हा साधा नियमही पाळता येत म्हणजे काय ---? यमुनेलाही पूर येतो आणि मोहन --गायब होतो. गंगा दुथडी भरून वाहू लागते. सागरही आपल्या सर्व सैन्यांना - सहकारी नद्यांना तातडीने बोलावून घेतो व दर्यासागर बनून सारे पाणीच-- खारे-- करून टाकतो झाले.

रागाने उसळया घेवू लागतो तेही याचा जिवलग सखा वाऱ्यासंगे. आणि अधिराज्य गाजवू लागतो अन सेनापतीच बनतो जहाजावरील. पण नारळी पोर्णिमेच्या---- " "श्री फळाने " ते टणक असूनही याचे हृदय द्रवतेच. शेवटी काट्यानेच काटा काढण्यात माणूस हुशार असतोच ना... !!!

पृथ्वीवर त्याचेच तर राज्य आहे -- ७५ % भागात त्यांचे भाऊबंध दूरवर पसरले आहेत. प्यासिफिक महासागर --बंगालचा

उपसागर -- हिंदी महासागर --अरबी समुद्र --अटलानटीक ओशन . त्यांचे काही वेगळेच असे मोहक सुंदर रूप असते काठाशी. त्यामुळेच गोरी गोमटी आबाल वृद्ध मनमोकळया गप्पा करतात. ललनानाही तो मोहित करतो त्याही त्यांचे सौंदर्याने मोहित होतात व त्यांचे कुशीत-- खुशीतच असतात. अन बेभानही होऊन जातात . त्यांचे काठाशी रंगीबे रंगी कपड्यात वावरतात. निळ्याशार सागराची नवलाई अनुभवतात. त्यातील बेटांवर सफरीवर जातात --क्रुज. --घेवून अन रात्र रात्र जागवतात धुंदीत अन नाच गाण्यांच्या मस्तीत.

पण हे---- अथांग पसरलेल्या-- महाशयांचे ही अंगातही येते कधी कधी. अन ते आपले रूपे अक्राळ विक्राळ रूप दाखवतात --आयरिन --हुरिकेन -- टोर्नाडो -सुनामी --चक्री वादळे स्वरुपात. "अंग - अंग झटकून, आळोखे पिळोखे देऊन" मोकळा होतो खरा पण अगदी त्यांचे सभोवताली होणारे परिणाम व पुरेशी पूर्व व्यवस्था करण्यातच खजीना रिकामा करण्याची वेळ येते माणसांवर. दैनंदिन व्यवहारही ठप्प करून टाकतो आपल्या मनगटी-- "लाटांचे" जोरावर.

पण एव्हडा तात्पुरता आळस झटकल्यावर-----तो ही शांत होतो आपले बी पी चा दाब आवरता घेतो. माणसाच्या धैर्याला

दाद देतो. अन आपली संपत्ती --पोटातील गुप्त धन त्यांचे समोर मनमोकळ्या मनाने रिते करतो. ते त्यातील शंख, शिम्पल्यानी. विविध मोहक रंगांच्या रत्नांनी, रंगी बे रंगी माश्यांनी. खवैयांसाठी माश्यांच्या असंख्य प्रकारांनी. आपल्या खांद्यावर अजस्र अश्या जहाजांचा भार वाहून" श्रावणबाळ" ही होऊन जातो आणि लोकांना यात्राही घडवितो देशोदेशीच्या.

त्यांचे गुण गान ही माणसे आनंदाने गातात----

आप -आपल्या परीने

सर सर चालली होडींची नाळ...

दूर वर उठली फेसांची माळ...

कमरेत जरा वाकुनिया

पान्यामंदी जाल फेकुनिया

नाखवा माजा --दर्याचा राजा--

लाखाच धन त्यान जाल्यात लुटलं

वादळ वर सुटल गो ----!!-(शांत शेळके --हृदयनाथ मंगेशकर --लता मंगेशकर)

*****

**//... निसर्गच जेंव्हा ----आळस झटकतो---तेंव्हा ---!!/---- / 3 / तेज //**

**...**

तपत्या--- झळा उन्हाच्या झेलीत मी चाललो...

मी ----- बीज सावल्यांचे पेरीत चाललो... //

मध्यान्ही चा सूर्य आपल्या सावल्यानाही आपल्या पायाशी आणतो. आणि उन्हाच्या तप्ततेची जाणीव करून देतो. त्याच वेळी माणसाच्या दैनंदिन उदरभरणाची ही वेळ झालेली असते. न कळत आपली पावले याच अग्नीवर तयार केलेल्या --घरच्या अन्न-पूर्णेच्या रुचकर अश्या स्वैन्पाकाचा समाचार घेण्यास वळतात. पोटातील आग (कावळेही) -- शांत होते त्या स्वादिष्ट अन्नाने अन घोट घोट पाण्याने. आत्मिक तृप्ततेने अन नव्या उत्साहाने आपण कामास लागतो मिळालेल्या नव्या उर्जेने.

माणसाचे डोळेही तेजाचे प्रतिक आहेत. पाणीदार डोळेच अधिक तेजपुंज दिसतात. डोळे बोलके असतात हे त्याच्या मूक अभिनयाने आपण अनेकदा वापरून पाहतोच की. रागाने अन अती जागरणाने तेही लाल बुंद होतात. म्हणूनच रात्रीच्या

उशिराच्या विमान प्रवासालाही -"-रेड-आय फ्लाईट "असे म्हटले जाते.

संत -महात्मे यांच्या चेहऱ्यावर असते ते सात्विक -"तेज" ते वेगळाच आत्मिक संदेश देवून जाते. जीवनाला एक नवी वैचारिक दिशा मिळते व जीवन समृद्ध होऊन जाते. व आपल्याही डोक्यात "प्रकाश" पडतो अन डोळेही उघडतात ते वेगळेच.

याच ---तेजाचे मदतीने -- शास्त्रज्ञानी वाफेचे इंजिनाचा शोध लावून दळणवळणाला नवी वेगवान गती दिली.

----यत्र यत्र धुमः तत्र तत्र वन्हिः // याचीही सार्थकता पटते ती...

-----झुक झुक आगीन गाडी...

धुरांच्या रेषा हवेत काढी... हे पाहून

सूर्य नारायणाच्या तेजाचे --मदतीनेच सागराची वाफ -त्यांचे ढग --नंतर पाणी-- त्यांचे धारातीर्थी होऊनच सागराची निर्मिती होते व आपले -- बंधू प्रेम दाखविण्याचीही संधी त्यास मिळते. हिमालया सारख्या महान हिम पर्वतास ही आपला ताठपणा

सोडण्यासही हा मदत करतो व... मवाळ धोरण स्वीकारून तो ही आपला नम्रपणा व्यक्त करतो.

अग्नी परीक्षा --ह्या साठीही मोठ्या दिव्यातून --" जानकी " मातेस ही सामोरे जावे लागले. आपले -" क्यारेक्टर "

पणास लावावे लागले आपली शुद्धता सिद्ध करावी लागली. त्यापासूनच सोन्यालाही --" २४-" क्यारट "च्या "परीक्षेत उतरण्यास अग्नी परीक्षा द्यावी लागते तेंव्हाच सोनाराचे आणि ग्राहकांचे समाधान होते. त्यातूनच सुवर्ण अलंकारांना झळाळी प्राप्त होते. ----तेजाचे महत्व पणास लागते. शेतातील जमीन भाजून काढण्यास व तिची सुपीकता वाढीस लागते असा फायदाही होतो आगीच्या धगीने. सौम्य प्रमाणात शेक घेण्यास, कणसे भाजून व गरमागरम भजी खाण्यातही पावसाळयात मजा येते. आणि पोटोबा शांत होतो जीव्हेच्या तृप्ततेने. शेकोटी पेटवून

थंडीची मजा लुटता येते व बाळबाळनतीणीस सर्वांगास शेक मिळून झोपही छान लागते. देव घरातील दिव्याची ज्योत मंद तेवून देवाचा

मनातील भाव ही व्यक्त होतो शांतपणे. भाव तेथे देव---! याचीही प्रचीती येते क्षणभरातच ...

येथ पर्यंत सर्व काही ठीक... मोठ मोठ्या वीज प्रकल्पातून ही भावंडे धुमाकूळ घालून वीज निर्मिती करतात. पण त्यात थोडा जरी हलगर्जी पणा झाला तर सारेच भस्मसात होऊन जाते. पावसाळयात वीज चमकते, ढगांच्या गड गडाटाने

वीज पडतेही मोठे नुकसान होऊन जाते. शोर्ट- सर्किट ने सुद्धा दूरवर वाईट परिणाम होतात याचे . आग लागून अग्निशामक दलाची धावपळ उडते ती वेगळीच.

वैशाखात... मात्र जंगलात झाडे एकमेकावर पडून वणवा पेटतो. ---घर्षणाने वीज निर्मिती होते या शास्त्र नियमांची खात्रीपटते. आपल्या ज्वाळानी त्यास ही भस्मसात करतो आपले आळोखे पिळोखे देत---- सारे रान पेटवून देत उजाड वाळवंट तयार होते. भडक डोक्याने स्वतःस काही माणसे पेटवून घेतात व आपला जीव "शंभर टक्के" धोक्यात टाकतात . त्या धोक्याची तीव्रता अश्याच टक्के-- पद्धतीने... वैद्यक शास्त्रात मांडतात. ५० - ६० टक्केच्यावर शरीर भाजणे म्हणजे मृत्युच्या दारात जाण्यासारखेच. तेंव्हा असा अविचार करण्यापूर्वी... थंड डोक्याने विचार करण्यातच शहाणपणा आहे हे ध्यानात असू द्या. अर्थात नैसर्गिक मृत्यू आला तरीही या तेजपुंज ज्वाळेचाच आधार घेवून माणसाचा --"अग्निसंस्कार " करावा लागतो. यानेच तो पंचत्वात

विलीन होऊन जातो अखेर. आणि मागे राहिलेले आप्तजन --नव्या उमेदीने आल्या प्रसंगाला मूकपणे सामोरे जातात ---- आणि


उषःकाल---- होता होता काळ रात्र झाली ----

अरे, ---पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...

या गाण्या प्रमाणे-----

असे आवेगाने... सूर काढीत नव्या जीवनाला सामोरे जाण्यास सज्ज होतात... नव्या उमेदीने. !!

----



**//... निसर्गच जेंव्हा ----आळस झटकतो---तेंव्हा ---!!/----वायू --(४)**

**...**

मनोजवं--- मारुत तुल्य वेगम... /
जितेन्द्रियं, बुद्धिमताम वरीश्ठम... /
वातात्मजं, वानर यूथ मुख्यं... /
श्रीराम द्यूतं शरणं प्रपद्ये ----/-----

अशा प्रकारे त्या---- वीर हनुमांनाचे-- वर्णन श्लोकात आढळते व त्यानेच त्या वाऱ्याचीही आपणास प्रथम ओळख होते. वारा---- --हलणाऱ्या हवेस- वारा-- म्हणतात. तो असतो पण दिसत नसतो-- फक्त भासतो. असा आगळा वेगळा त्या लहरी वाऱ्याच्या आपला परिचय-- तो ही हवेतीलच असतो. वाऱ्याचा एकदा का परिचय झाला की तो हवा हवासा वाटतो.

हव्या हव्याश्या हवे ---- वाचून खरेतर आपण... क्षणभर देखील राहू शकत नाही. नाकाच्या दोन छोट्याश्याच प्रवेश दारातून ती सर्व शरीरभर खरे तर फुफ्फुस भर संचार करते. काळे कृत्य करून काळीमा फासणाऱ्या-- "कार्बन" बंधूस थेट

फुफुसाबाहेरचा रस्ता दाखविते. व प्राण नावाचा-- सुशील बंधू आपले शरीराचे संरक्षण व पोषण करतो. त्यांचे नत्र-वायू ही वनस्पतींना त्यांचे अन्न --सूर्यप्रकाशाचे सहाय्याने तयार करण्यास मदत करतो. प्राणवायूचे प्रमाण एकूण हवेत २० टक्के इतकेच असते पण ते... १०० टक्के कामास येते. कुविख्यात -कार्बन मात्र वनस्पतींच्या "दिवसा"-- फक्त उपयोगी पडतो. तो झाडांच्या पानाफुलातून आपल्या बंधूचा-- प्राणवायूचा वचपा काढण्यास मागे पुढे पहात नाही त्यालाही -- तेथून हाकलतो खरा पण माणसेच त्या-- झाडांचे आश्रयास येवून त्यांचे सांत्वन करतात तेथेच बसून सावलीच्या आश्रयाला. अशी ही गम्मत चालू असते दिवसभर. त्या दोघांची-भांडणे, --- मात्र असतात रात्रंदिवस माणसाच्या दिमतीला. अहोरात्र --"ड्युटी " असतेच असते. सुटी नाही --इमर्जन्सी --सेवेत ते असतात ना... ! पाण्या प्रमाणे या प्राणवायुसही -- धातूच्या बाटल्यातून सीलबंद राहून रुग्णांच्या सेवेसाठी दक्ष रहावे लागते रुग्णालयातून.

कवी आणि प्रणयातूर प्रेमिकांचा हा आवडता सखा. त्यांचे लेखी तो खट्याळ -मुजोर -हलकेच स्पर्शून जाणारा --आल्हाद दायक वारा असतो...

आनंदी आनंद गडे --जिकडे तिकडे चोही कडे ----

वरती खाली मोद भरे, वायू संगे मोद फिरे ----

नभात भरला , दिशात फिरला जगात उरला

मोद विहरतो चोही-कडे... आनंदी आनंद गडे ---- असे काव्य त्यांना सहज सुचते.

वारा गाई-- गाणे --प्रीतीचे तराणे

धुंद आज वेली.. धुंद फुल पाने -----(जगदीश -प. हृदयनाथ -लता)

वारा सुटे सुखाचा, आनंद मेघ आले...

मी अमृतात न्हाले ----

अश्या गाण्यातून तो आपणास भेटतो. लहान मुलांसंगे तो पतंग उडवीत पटांगणात खेळतो. रंगीबेरंगी फुग्यांचे गाल फुगवून त्यांना रमवितो. वेळूच्या बनात शीळ मारत घुमतो. मोठ्या गायकांच्या सहाय्याला येवून बासरीतून लपाछपीचा खेळ खेळत मंजुळ-- स्वरही काढतो अन रसिकांचे मन ही रिझवितो... राधाही-- बावरी होऊन जाते हरीची.

कधी कधी मात्र ----हाच स्वच्छंदी वारा वादळाचीच ---- वाट स्वीकारतो.

वादळे उठतात किनारे सुटतात ---

नशिबाशी फुटतात लाटा---

चक्री वादळे येतात,.. सोसाट्याचा वारा येतो, बरोबर पावसालाही घेऊन येतो. सोसायट्यात घुसून त्यांची वाट लावतो. झाडे उन्मळून टाकतो. वेगात येऊन बेभान ही होतो. समुद्रात तर तो -- खारे वारे, मतलई वारे, अशी--- भूगोलाची उजळणी घेतो. त्सुनामी -- हरिकेन --टोर्नाडो --ट्विस्टअर्स अश्या विचित्र रूपातील----- भूतांचे रुपात समोर उभा रहातो. दे माय धरणी ठाय. करून सोडतो. माणूस ही हतबल होऊन जातो बिचारा. अन ते वारे---- निमाल्यावर शांतपणे पुढील दिवसाच्या भविष्याची वाट पहात या पंच महाभूतांशी नव्याने सामना करण्यास जोशात तयारही होतो.

हे ऋतू कोणते येत जाती असे

जीवनाला नवे देत जाती पिसे

थांबणे नसतेच चालणे असतेच

रस्त्यांना फुटतोच फाटा ----हे --" आई शपथ "मधील (सौमित्र --अशोक पत्की --देवकी पंडित)

गाणे गुण गुणत...

...

**//... निसर्गच जेंव्हा ----आळस झटकतो---तेंव्हा ---!!/--आकाश --(५)**

...

थोडी सागर निळाई ---थोडे शंख नी शिंपले --
कधी चांदणे टिपूर----तुझ्या डोळ्यात वाचले
कधी उतरला चन्द्र --तुझ्या माझ्या अंगणात
स्वप्न पाखरांचा थवा--माझ्या ओंजळीत ----

कधी काळोख भिजला --भिजली पहाट
हुंकारला नदीकाठ --कधी हरवली वाट
वाऱ्या पावसाची गाज--काळे भास गच्च दाट
कधी धूसर धूसर -----एक वादळाची वाट -----(मंगेश कुळकर्णी ---अशोक पत्की ----देवकी पंडित -- स्वप्नील बांदोडकर)

--"वादळवाट" या मालिकेच्या शीर्षक गीतात -- "पंच महाभूतांचे" भाव अप्रतिम पणे टिपले आहेत.

आपणही लहानपणी ----देवा तुझे किती सुंदर--" आकाश ", सुंदर प्रकाश-- सूर्य देतो ----असे म्हणत त्या निळयाशार आकाशाची ओळख करून घेतली आहेच. खग -पक्षी, मुक्तपणे संचार करून विहंगम दृश्याचा लाभ घेतात. मनुष्यानेही त्याचे बुद्धी चातुर्याचे जोरावर, पवन पुत्र हनुमानाकडून स्फूर्ती घेवून -- त्यासाठी विमानाचा शोध लावलाच अन आकाशाकडे झेप घेतली. संत तुकाराम महाराजांना ही" पुष्पक " विमानाद्वारे त्याची वाट सापडली.

आकाशाचे आसमंतातील दृश्य म्हणजे दृष्टीला तृप्त करणारे जणू पंच-पक्वान्नानी भरलेले चांदीचे ताटच. सूर्य -चन्द्र -चांदण्या - पहाटे चमकणारा शुक्र तारा- मंद वारा- पिवळसर धूसर मंगळ-- ध्रुव तारा --अन सभोवती सप्तर्षींची-- महिरप अन अथांग अशी आकाश गंगा. हे पाहून तन आणि मन तृप्त झाल्यावर एक दिवस उपवासाचा ही असतोच त्याचा ---अमावसेचा, अन पूर्णपणे विश्रांतीचा. आकाशाचे अंतर्गत गोटात ही खजिना आहेच की -- मंगळ -बुध -गुरु -शुक्र -प्लुटो -शनी आदी नव ग्रहांचा. त्यासाठी मात्र ----टेलिस्कोपिक -- अशी --लांबवरची----- दूर दृष्टी लागते तेंव्हाच ते दृष्टोत्पतीस पडतात.

आकाशही---- तसे रसिकच बालगंधर्व या रसिक नटाप्रमाणे. सकाळ - दुपार - संध्याकाळ नेत्रदीपक रंगीबेरंगी अन वेगवेगळे शालू पांघरण्यात. निळयाशार पार्श्व भूमीवर तर ते अधिकच खुलून दिसतात. अन मनालाही -- लुभवतात नाही का... ? त्यास दृष्ट लागू नये म्हणुन तर --चंद्र ग्रहण व -सूर्य ग्रहणाची--काळी भोर तीट लावावी लागते अधून मधून. तेंव्हाच ते कंकण शोभून दिसते अन खुलतेही उठावदारपणे.

पतंग उडविण्याचा आनंद लुटताना ते थंडीचे दिवस ही --- उबदार बनतात, रंगीबेरंगी अन मनमोहक पतंगानी.

२६ , जानेवारीला दिल्लीहून होणाऱ्या विमानांच्या कसरती पाहून --- हवेतील त्या शूर वैमानिकांना सलाम केल्याशिवाय -"- मान---- खालीच होत नाही. सायंकाळच्या----- गोरज मुहूर्तावर धूसर अश्या आकाशातून " उडत जाणारी बगळयांची माळ " ही आकाशालाच -----चार चांद लाऊन जाते ती मजा काही वेगळीच असते. आकाशाशी असे अनेक प्रसंगांनी आपले नाते अतूट असेच होऊन जाते. अन न कळत.

आकाशासी जडले नाते

स्वयंवर झाले सीतेचे.. , स्वयंवर झाले सीतेचे... हे गाणे स्मरते.

श्रावण महिन्यातील---- रिमझिम-पाऊस ---पडून गेल्यानंतर सूर्याच्या किरणांनी विखुरलेली----- ". सप्तरंगी इंद्रधनू कमान " म्हणजे तर आकाशाच्या शिरपेचातील अर्थात कोंदणातील हिराच जणू. निसर्गातील अवर्णीय असा ठेवा. तो ही अतीउच्च स्थानावर सर्वांना सहज दृष्टीस पडेल असा आणि सुरक्षित देखील. -----

' मेघ दाटून आले की" पावसाळ्यात दिवसा देखील अंधारून येते. विजा ही कडाडतात. डोळेही वटारतात-घनगर्जना होते. अन त्या -- आकाशाचा--" भूत अवतार " पहावयास मिळतो अन एखादा जीव दुर्दैवाने ---- "स्वर्गवासी " होतो.. हेही कटू सत्य असते नाही का... ?

आकाश पांघरून ---जग शांत हे झोपले हे -----

घेवून एक तारी--- गातो कबीर दोहे ---- गातो कबीर दोहे -----

// **जीवन सुंदरच आहे... अनुभव घ्या... !!** //

(दिनचर्येचा -- एक '-**आध्यात्मिक** '-- दृष्टीकोन)

******

नितळ निळाई आकाशाची अन क्षितिजाची लाली...

दवात भिजल्या वाटेवरती किरणांची रांगोळी...

चौकट - राजा, मधील सुधीर मोघ्यांच्या-- या गाण्यातील ओळींचा आपण दररोज अनुभव घेत असतोच की. पण आपल्याला असे-- शब्द--सुचत नाहीत. दररोजच्या धकाधकीच्या जीवनात अश्या ओळी मात्र मनावर, पागोळयातून पडणाऱ्या पावसाच्या थंडगार शिडकाव्याने आनंदाची लहर (लकीर)  उमटवून जातात. गाणे म्हटले की---- -" गीतकार - संगीतकार -स्वर "या त्रयींचा मिलाप अटळ असतो. हे तिघे एकत्र आले- भट्टी जमली की मनाला धुंद करणारी सुमधुर सरगम --- मन - कर्णास तृप्त केल्याशिवाय रहात नाही. त्याने जीवनही सुरेल बनते. त्यासाठी दररोज स्वतःसाठी अल्पसा वेळ-- मात्र काढला पाहिजे.

ब्राह्मे मुहूर्त---- उत्तीष्ठे.. !अर्थात सकाळच्या प्रसन्न वेळी उठावे. दैनंदिन- आन्हिके उरकून शांतपणे आपल्या इष्ट देवतेचे स्मरण करीत शांतपणे निसर्गातील --गीत -संगीत कारांचे मधुर गायनाचा आस्वाद घेत - शांतपणे-मुकपणे एका विशीष्ठ ठिकाणी बसून कांही क्षण अंतर्मुख व्हावे. यासच --मोडर्न भाषेत "मेडीटेशन" असे संबोधतात. याने आपली आपल्यालाच- दररोज नवी ओळख होते. प्रत्येक मनुष्य- मुळात जन्मतःच... -"-ज्ञान -पवित्रता -शांती -प्रेम- सुख-आनंद -शक्ती- " ----- या सात गुणांचाच -सतोगुणी निर्मळ-- "आत्मा " असतो. त्यावर आपल्यावर होणाऱ्या संस्कारानुसार.. राग -लोभादी दुर्गुणाचा संसर्ग होऊन तो -आत्मा मलीन- होत जातो. त्याचाच परिणाम म्हणून आपण आपल्या भावना-- स्मित हास्य -द्वेष -चीड चिडेपणा-हात मुठी आवळून -प्रसंगी त्याचा प्रत्यक्ष वापर करून समोरील व्यक्तीच्या वागण्यानुसार करीत असतो. अश्या प्रकारे-शुभ्र कपडा जसा दिवस भराच्या वापराने मलीन होतो तसा --निर्मळ --असणारा आत्मा मलीन होत जातो. कपडे मळलेले दिसून येतात व लगेच साबण लावून धुताही येतात व स्वच्छ होतात. पण मनाचे काय... ? तुकारामांनी म्हटलेच आहे ----नाही निर्मळ मन(आत्मा)  --काय करील साबण... ?

आत्मा--म्हणजे हो काय.. ?.. अन तो साफ कसा करायचा आम्ही. ?. !... हे समजून घेणे आलेच.

आत्मा हणजे----शरीरातील- चैतन्य शक्ती - थोडक्यात - आपल्या मोबाईल मधील -- सीम कार्डच.. यांचे महत्व आपण जाणतोच. भल्या भल्या महागड्या आकर्षक मोडेलचे, त्याचे दृष्टीने- नगण्य- किंमत असलेल्याच्या- अस्तित्वा शिवाय पान हलतच नाही. त्यासही दिवस अखेर --डिस्चार्ज झाल्याने -पॉवर सप्लायशी जोडून चार्ज करावे लागतेचकी हो. अगदी तसेच आहे. आत्मा- म्हणजे आपला तिसरा -ज्ञान नेत्रच असतो. तो दोन्ही डोळयांच्या मध्यभागी 'भृकुटी' मध्ये निवास करतो. जेथे आपण गंध, बिंदी लावतो तेथे. त्यामुळेच आपण समोरच्या व्यक्तीचे -फेस रीडिंग -करू शकतो.

आणि--''मेडीटेशन '' म्हणजेच' आत्म्याचा' त्या पॉवरफुल' परमात्म्याशी (आपल्या प्रत्येकाच्या मनातील परमेश्वर---ईश्वर -अल्ला -येशू -नानक -ज्योतीर्बिंदू स्वरूप) 'संबंध जोडणे. त्यामुळेच त्याची दैनंदिन आवश्यकता असतेच असते. अन्यथा

सचेतन आत्म्या शिवाय -शरीर म्हणजे-- 'मृत देहच'. जसा किमती -- मोबाईलही--- सीम कार्ड-- शिवाय. सजीव व निर्जीवात फरक एव्हडाच असतो. त्यामुळेच मृत देह -"ती व्यक्ती कितीही प्रिय - लोकप्रिय असली तरी प्रत्येकाच्या धार्मिक प्रथेनुसार --निसर्गाच्या स्वाधीन करावीच लागते. ---- हे जगातील कटू सत्य आहे. हे आपण जाणतोच ना... ?

तर अश्या या आपल्या महत्वपूर्ण---- प्रिय--- 'आत्म्याशी' दररोज-मेडीटेशन- माध्यमातून- बातचीत करण्याचे महत्व ध्यानात आले असेलच. त्यानंतर आपापल्या दैनंदिन कामास--प्रसन्नपणे शुभारंभ करावा. आंघोळ -चहापाणी-नाश्ता-मात्र दररोजच्या --" वर्तमानपत्रास " हातही न लावता. कारण तेच एक सकाळीच आपला मूड --खराब करणारे गुप्त --आत्मा मलीन करणारा नंबर एक शत्रू (अस्त्र)  आहे. हे नीट ध्यानात घ्या. त्यास दुपार नंतर - वाव द्या. कारण त्यातील --भयानक अपघाती बातम्या -दृश्ये - आवडत्या व्यक्तीची बदनामी -यांनी आपला सबंध दिवसाचा अक्षरशा:- सत्यानाश होवून जातो कधी कधी हे आपण अनुभवलेही असेल. तसेच टी. व्ही. च्या बाबतीत. मोजकेच मनोरंजनाचे साधन म्हणून सह कुटुंब- नेत्र सुखद दूरदर्शन घ्यावे.

रडक्या -द्वेष पूर्ण भावना भडकविणाऱ्या मालिका- चित्रपट (आपल्या भावनांना- न कळत दुखावतात -द्वेष -उद्वेग आणतात) पाहूच नयेत. त्या ऐवजी- ज्ञान पूर्ण माहितीप्रद --प्रवास वर्णन - निसर्ग दर्शन - अथवा संगीतमय असे कार्यक्रम तेही मोजका वेळच पाहावेत. कारण नंबर दोनच शत्रू तो हाच. अन्न हे पूर्ण ब्रह्म ----हे ध्यानात घ्या तेंव्हा वर्तमानपत्र -टी. व्ही. --व जमल्यास मोबाईलचा वापर --अन्न ग्रहण करताना --टाळावाच --वदनी कवळ घेता नाम घ्या श्री हरीचे -- ---! हे शांतपणे त्याचा आस्वाद घेत---अन्नपूर्णेला दाद देत करावे. मग लवकर तर होतेच पण अंगीही लागते-- रसनेला स्वादही चांगला येतो.

आपले दैनंदिन कामास लागावे. -ऑफिसमध्ये सर्वांशी हसतमुख चेहऱ्याने सामोरेजावे अगदी खडूस बॉस असो की शत्रू. कारण----- हेच आपले--(आत्म्याचे) अगोदर सांगितल्या प्रमाणे--- मूळ सरूप आहे. हे सतत ध्यानांत असू देत. आपल्याला कोणी रागावलेतर चालेल का... ?आपला कोणी अपमान केला तर चालेल का... ?आपला स्वाभिमान दुखावलेला सहन होईल का...? कारण काही ही असो. तसेच प्रत्येकाला मनोमन वाटत असते. यास्तव सौजन्याला " " टोप प्रायोरिटी " असू द्या. आपले काही

चुकल्यास- त्वरित--'दिलगिरी'--व्यक्त करा मग समोरचा लहान असो वा मोठा --मानाने वा पैशाने ----सुद्धा. घरातही तेच आचरण असावे. " बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले "----- !! हे संतानी म्हटलेच आहे ना ----? डोक्यावर बर्फ --तोंडात साखर --व पाय जमिनीवर अश्या प्रकारे आपले वर्तन असावे.

आत्म -समाधानी असावे. प्रगती पथाकडे वाटचाल करत रहावे पण भर्रकन ' यशाची वा अधिक पैशाची अपेक्षा ठेवू नये' वा मिळाल्यास त्याचा व्यर्थ- अभिमान असू नये. कारण ----- भाग्यसे ज्यादा और समयके पहले किसीको कुछ नही मिलता... है / हा विधिलिखित नियमच आहे. ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत त्याबद्दल जरासुद्धा वाईट वाटून घेऊ नये... . (उदा. ----- वय--दिवसातील तास -- लहानपणचा काळ -त्र्यापिक जाम-- लोकांचे वागणे --रांग---हवा --झालेल्या चुका--मुडी सहकारी -- आपल्या मागे केलेली निंदा) उदा. त्र्यापिक मध्ये अडकलो तर त्रागा न करता शांत रहावे त्यावेळात "परमात्म्याचे " स्मरण करत रहावे. पैसे हरवले -चोरीला गेले -वस्तू हरवली--- -विसरली. त्या वेळीही शांत रहावे बाबत फारशी चर्चा करू नये. ती परत मिळावी याबाबत संकल्प मात्र " परमेश्वरावर " सोपवून मोकळे व्हावे.

Don't try to change others --change yourself. हा मूलमंत्र नेहमी ध्यानात असू द्यात. त्यात वेळ घालवू नका. आपल्या वर्तणुकीतूनच समोरच्याला बदलण्यास भाग पाडा. (उदा. हसमुख रहा ---समोरचा हसेल) Forget and forgive. हा अजून एक उपयुक्त मंत्र आहे. (उदा. समोरचा वाईट बोलला --अपमान केला -शांत रहा. मनोमन त्यास क्षमा करा- Don 't Argue with him or her.)

Act-- but - Don t -React... Think Positive---and ----be positive... रागाच्या--(... भरात अन बहरात) वाऱ्याला-- सुद्धा उभे राहू नका. ... !! EGO-----पासून दूर रहा -... आत्म-हत्त्या --सारखे विचारांचे थाऱ्याला --- सुद्धा कधी उभे राहू नका... !!!!! जीवनाच्या अंतिम क्षणाचाही आनंद घ्या. अन जीवन मुक्तीचा आनंद लुटा.

रात्री झोपण्याची व सकाळी उठण्याची वेळ ठरवून त्याप्रमाणे अमलात आणा. झोपताना त्या -जगन्नियत्या परमेश्वराचे जरूर स्मरण करा. प्रत्येक दिवस म्हणजे आपला एका दृष्टीने - पुनर्जन्मच असतो. त्यांचे सकाळी उठल्यावर आभार माना. आणि फक्त आजचाच विचार करा. (Forget about--

Past ---Don't worry about --Tomorrow ---just care for ---Present तेच तुमचे -- त्याचेकडील ---प्रेझेंट- असते)

-----He is just like your Father-Mother -and beloved Friend. Be free with him. Empty your mind in front of him in-----" TWO MINUTES---SILENCE ". ----आई - वडिलांवर -प्रेम करा --कारण ---FAMILY -म्हणजेच -Father And Mother I LOVE You. हा सुप्त अर्थ आहे. कारण जगाच्या पाठीवर इतरत्र ते ----कुठेही उपलब्ध होऊ शकत नाहीत.

" The fish in the water is --- silent---the animals on the earth are --- noisy, the bird in the air is ---singing--. --But man has in him---the silence of the --- sea. noise of the --- earth and the music of the ----air, -----TAGORE.

विक एन्डला -किंवा सुटीत सहलीचे नियोजन अगोदर करून ठेवा. शक्यतो गर्दीचे ठिकाण-- वगळा. अन्यथा----- चीड

चीड होण्याचीच जास्त शक्यता असते. ---(उदा. लोणावळ्यात एकाच भुशी ड्याम वर होणारी गर्दी व त्र्याफिक जाम कसली मजा---नुसता मनस्ताप ---व मग तेथे --- चहा -वडा-पाव देखील मोठा--- सव्वा-शेराचा भाव खावून जातो. . ----SILENCE IS POWER ---"SILENCE IS GOLDEN. " तेथील शांत वातावरणाची काही क्षण अनुभूती घ्या. आपल्या धार्मिक ठिकाणांना गर्दीत भेट देऊ नका. ----भाव तेथेही देव असतोच. ---- हे ध्यानात असू देत. अस्वच्छता - गोंगाटाचे ठिकाणी परमेश्वर भेटणे ही-----अशक्य प्राय गोष्ट आहे. आपल्या-- धार्मिक प्रथा घरात तसेच---अवडंबर विरहीत ठेवा.

वर्षातून एकदा----आरोग्य तपासणी तसेच, सहा महिन्यातून एकदा--- दाताची तपासणी अवश्य करून घ्या. दर रविवारी-सुटी दिवशी -----निसर्ग सानिध्यात चक्कर मारा. आपले धन सुरक्षित ठिकाणी गुंतवा. जमेल तसे पर्यटन करा अनुभव सिद्ध व्हा. एखादा जिवलग मित्र जोडीला असू द्यात. अन चिंता मुक्त रहा. मग पहा--- सुख - सुख-- काय म्हणतात ते दाराशी येते की नाही आपोआप चालत.

असे करून एक वेळ--- अनुभव तर घेऊन पाहायला काय हरकत आहे. अनुभव हीच खात्री ती ही स्वतःची. अवघड वाटते, ना... ?!! ----- पण अशक्य मात्र नाहीच नाही... वाचा ---विचार करा ----दुसऱ्यानाही विचार करण्यास भाग पाडा.

तेंव्हाच -----

जीवन गाणे गातच रहावे

झाले गेले विसरुनी जावे, पुढे पुढे चालावे

जीवन गाणे गातच रहावे ----

या, शांता शेळके यांच्या गाण्यातील जीवनाचा खरा-- अर्थ उमजेल --!!

**(... स्वानुभवाचा --एक -अध्यात्मिक -विचार करायला लावणारा---- --सुविचार...)**

**" मांडीवरील बालकाची ---कमाल "----!!**

******

**मुलाचे पाय पाळण्यात दिसतात... !!**, मुलींची हुशारी हल्ली ----- शाळेत चमकते,... या बालकाचे पावले मात्र जगभर उमटत आहेत. हे बालक हळूहळू घराघरातही आपले पाऊल हळूहळू उमटवीत आहे. ते बाळ म्हणजे. आजच्या आय. टी. युगाची ओळख असलेला---- "**ल्याप टोप "**

याचे पूर्वज-भाऊ बंध काही फार जुने नव्हेत. आपल्या भारतात तर--- राजीव गांधी हे तडफदार तरुण पंतप्रधान आल्यानंतर त्यांनी कॉम्पुटर युगाला प्रोत्साहन दिले आणि ग्लोब-लायझेशनचे बीज रोवले. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. त्याच्या छायेत अनेक आय. . टी. . पदवीधर आश्रयास राहिले आहेत.

आपल्या.. १५ -- २० वर्षामागे भारतातही कॉम्पुटर-इन्जिनियरिंग युगास प्रारंभ अर्थात आय. टी. -- इनफरमेशन टेक्नोलॉजीची चलती सुरु झाली. शहरामध्ये ----- साखर कारखान्यांच्या खालोखाल या कॉलेजचे पिक सुरु झाले. पदवीधर बाहेर पडले. कॉम्पुटरची अविरत कामाची अनाकलनीय झेप व त्यास पदवीधरांच्या कष्टाची जोड मिळाल्या ने जगभर संगणक युगास

प्रारंभ झाला. एक नवी क्रांती उदयास आली.

मानवाचे हाडा मांसाचे बनलेले शरीर व त्याचा मेंदू हा तसा 'पद्धतशीर " गुंतागुंतीचा विषय आहे. स्री -पुरुषांच्या शरीरातील--- एक्स आणि वाय---- या सूक्ष्म दोन पेशींपासून बनलेला व दिसामाजी त्यात मातेच्या गर्भाशयात भर पडून. बालक जन्मास ९ महिन्याचा प्रदीर्घ कालावधी लागतो. त्याची १८ वर्षा पर्यंत पुढे वाढ होत रहाते. त्यापुढे मात्र शारीरिक उंची खुंटते. फक्त अंतर्गत पेशींची वाढ व क्षय होत राहतो. ते ही आपल्या न कळत. माणसाचा मेंदू
त्यातील चेतनामय शक्तीने अविरत काम करत राहतो,
तो त्यांचे अंतिम श्वासा पर्यंत. त्यात चेतनामय -हालचाल - स्मृती-विस्मृती ई. क्रिया कळत न कळत होत रहातात.

याच बुद्धिमान मनुष्याने निसर्गातील गोष्टींवर मात करून त्यावर ---- विजय मिळविण्यास सुरुवात केली. पक्ष्या प्रमाणे विहंगम दृष्ये पहाता यावीत म्हणून ----विमान --
समुद्रातील संपत्तीच्च्या शोधासाठी पाणबुडी -
अवकाशातील शोधासाठी चांद्रयान -
दूरवरच्या संपर्कासाठी फोन -मोबाईल --व
घरबसल्या दूरचे दर्शन देणारे टी. व्ही. असे एक ना दोन असे असंख्य शोध लावले. ---त्यातील अलीकडचा -----परम बिंदूचा ---- नवा शोध म्हणजे --"कॉम्पुटर "त्यास

सर्वांनीच डोक्यावर घेतले. खरे तर त्याचा तरी काय दोष म्हणा. --
आपल्या बोटाचे तालावर आपल्या
डोक्यातील मेंदूचे इशाऱ्या वरच तर तो नाचत रहातो. व
चुटकी सरशी आपली कामे हलकी करतो. ते ही न दमता. त्या
मुळेच आज तो वारसा हक्का---- प्रमाणे बसणाऱ्या मुलाप्रमाणे--
--- मांडीवर येऊन केंव्हा बसला हे कळले देखील नाही --हो ना...
? सुरवातीस घरातील टेबल व्यापणारा हा सुहृद आज "
मांडीवरून " थेट आता खिशात बसण्याच्या तयारीत आहे हेही
आपण पहात आहोतच. त्यासाठी आपले ---"खिसे रिकामे
करून" स्वतःसाठी योग्य तेव्हडी जागेचीही पूर्व तयारीही
हुशारीने करतो हे सांगणे नकोच.

अशी एकदा का --- अढळ ध्रुवाप्रमाणे जागा मिळविली
की मग तो आपल्याला ---सर्व जग माझ्या मुठीत आहे चा---
फील देतो. सकाळी उठताच हवामान कसे आहे... ? ते- त्याच्या -
- "वेदरची" कळ दाबताच कळवून मोकळा होतो. महत्वाच्या
बातम्या हव्यात दाबा-न्यूजची कळ -- गाणी ऐकायची जा ---
यु ट्यूबवर तेथे हिंदी --मराठी गाण्यांचा,
आवडीनुसार त्याच मेनू तयार असतो. सकाळ वाचायचा " ई-
सकाळला"-- समोर बोलवा आणि आरामात एन्ट्री घ्या. दूरच्या
मित्राशी बोलायचे-- जी टोक वर जा -- दूरच्या आप्ताशी गप्पा

मारायच्या तर स्काय पी चे---- निळेशार आकाश मोकळे आहेच की फक्त--- वेब क्याम लावायचा अवकाश---!एखादी माहिती हवी आहे फक्त---" ललाटी"-- त्यांचे नाम ओढायचाच अवकाश की त्याची इत्तमभूत माहिती समोर हजर. स्वैन्पाकाचा कंटाळा आलाय---- पिझ्झाची - आउटलेट शोधून फोन
करा अर्ध्यातासात गरमागरम पिझ्झा दारात हजर. जी. के. वाढवायचं---स्पेलिंग दुरुस्त करायचय--आलेलं महत्वाच पत्र बघायचं तर जी मेल आहेच ---जी हाजीर करत . वाढदिवसाचे अभिनंदन करायचं --फक्त १-२-३ म्हणायचा अवकाश की त्यांचे दारात--- (मेल बॉक्स) ग्रीटिंग कार्ड पोहोचलेच समजा. ते ही या कानाचे त्या कानास न कळता एक--- सेंड ची कळ दाबताच काम ---फत्ते. परत पोच पावतीपण आठवणीने पोहोच करतो. लिखाण काम करायचं इंग्रजी -मराठी - हिंदी कोणत्याही---- भाषेच त्याला वावड नसते. कारण तो--आपल्याच---मनचा----राजा असतो. केव्हडी ही-----पळापळ ती ही मांडीवर बसून.

अश्या या कमालीच्या गुणी----- बाळाला दररोज मांडीवरठेवून न कुरवाळालं तरच नवल होईल नाही का... ?

**गोष्ट --बोटांची**

*****

शपथ या बोटांची --शपथ या ओठांची

तुझी मी जोडीदार -----

हस्तिना-पुर नावाचे एक गाव होते. तेथे पंच क्रोशीत-- मिळून --२० --भावंडे दोन वेगवेगळया अश्या --कर कमल व पाऊल वाट अश्या दोन स्वतंत्र बेटावर रहात होती.

अहोरात्र माणसांच्या सेवेत दंग. एकदा ती सहजच एकमेकांशी गप्पा मारीत बसले. ----काय होत्या त्या गप्पा ----जाणून घ्यायच्या आहेत. --चला तर-----

मनगटी हाताच्या --" चौथरा "--- तळहातावर निवांत पणे उभे राहून गप्पात दंग होती. एक---- अनामिक सर्वांची हजेरी घेत होता.

वा वा ---" **अंगठे महाशय** "-- मजा आहे बुवा तुमची ---! शिक्षणाचा तर काही पत्ता नाही अन रुबाब केव्हडा मारता... एखाद्या मंत्र्या प्रमाणे. अगदी---- पासपोर्ट---- ही तुमच्या---ठश्याविना मिळत नाही. अन सलामी ठोकताना सर्व भावंडांना उचलूनही घेता रुबाबात. तुमच्या--- मुख कमलाचे दर्शना शिवाय... ब्यान्केतून पैसेही मिळत नाही अशिक्षितांना. एखादी गोष्ट दुसऱ्यास न मिळाल्यास---- स्वदर्शनाने वाकुल्या

दाखवायला मोकळे अन नामानिराळे होता. त्यामुळेच हाताला दुखापत झाली तर प्ल्यास्टर करताना डॉक्टर ही वेगळेच ठेवतात तुम्हाला, तुमच्या या अश्या विचित्र वागण्याने. एखादा शिकला नाही तरी --"अंगठे बहाद्दर"-- म्हणून मिरवता, गावभर दवंडी पिटता त्याची... धन्य धन्य तुमची... !! त्याची कथा वेगळीच --धनुर्धारी --एकलव्याने तर गुरुदक्षिणा म्हणून आपला "अंगठा " देण्यासही मागे पुढे पाहिले नाही. धन्य धन्य --- ती गुरु निष्ठा.

कस काय चाललय **--अंगुली निर्देशकबाई** ---तुमचा आपला तोरा वेगळाच. दुसऱ्याकडे बोट दाखवून मोकळ्या सदानकदा नामा निराळयाच. शिंप्याचा हाताना इजा होऊ नये म्हणून" हेल्मेट " ही घालता डोक्यावर --अंगुस्तान नावाचे व त्याचे रक्षणही करता त्याच प्रमाणे स्वेटर विणताना सुईच्या तालावर नाचता ही छान तुम्ही दोघी बहिणी मिळून. कोणतीही निवडणूक आली की तुमचा भावही वाढतो. तुमच्या कपाळावर मतदान केल्याचा शिक्का बसतो अन वरती एक पवित्र कार्य केल्याचे पुण्यही पदरी पाडून घेता पदरात.

काय हो---**" मधले-- बोट भाऊ "**... म्हणून तुम्ही चांगलीच मधे---- मधे राहून लुडबुड करता. डॉक्टरांना रुग्णांच्या तपासणी कामास मदतही करतात सगळेजण मिळून मिसळून. आणि स्वतःची मान उंचवित.. रहात असता सदानकदा. लहान

मुलातील भांडणे ही मिटविता शेजारणीच्या मदतीने कळत न कळत.

**रिंग फिंगर बाई**----- तुमचा तर तोरा काही वेगळाच आहे नव्हे असतोच. नव वधू -वरांच्या आणा भाकाचे साक्षीदार वर साखर-पुड्याला सुवर्ण - हिऱ्याची अंगठी गळयात चढवून गावभर -- मिरविण्यास मोकळया होता तुम्ही लगेच. ,... बराच भाव खावून जाता अन तोऱ्यात की -- हो मिरविता गावभर. मजाच मजा तुमची.

**लिटल फिंगर बाई** ----तुमचा - आपला सदानकदा --- आरामशीर अश्या "रेस्ट रूम मध्ये जाण्याचा ध्यास... ! लोकांना व्यापातून चार घटका विरंगुळा देताही जमेल तेंव्हा हळूच इतरांना खुणावून. लहानमुलांच्या भांडणात तर तुमचा-- विशेस सहभाग असतो. तुम्ही---- कट्टी करायची अन अंगुली बाई अन मधले-बोट यांनी----बट्टी करून मध्यस्ती करायची झाले. असा लपा छपीचाखेळ चालू असतो बालपणात.

आणि हो तुम्ही सगळेजण एकत्र आलात की मुष्टी योद्ध्याची लढत ही देखणी होऊन जाते. तसेच" भेंडीच्या भाजीलाही" चांगली चव येते. तसेच सगळ काही, " यमी यमी " असल्याचे दोन्ही हातांनी दाखविता येते. नेल पेंट तोंडाला फासून छानपणे मिरविता येते. सगळे काही आल- बेल असल की --" पांचो

उंगलिया-- घी मे, आहेतच " आरामात लोणी खायला. हे सांगणे नकोच... !

**पाऊल वाटेवरील--**-- बेटावर फार गडबड दिसून आली नाही. त्या आपल्या दिवसभर संपूर्ण --" संपूर्ण शरीर भार 'वाहण्याचे भारदस्त कामातच व्यस्त असतो आम्ही दोघी . थोडी देखील उसंत नसते. या सवयीनेच --पाऊले चालती पंढरीची वाट ----- सुखी संसाराची सोडुनिया वाट चालत चालत ---थेट पंढरी गाठतात--एकादशीला. जरासुद्धा इकडे तिकडे स्वतंत्रपणे हालचाल अशी करता येत नाही. माणसे रुबाबदार बूट चढवून उबदारपणा देतात कधी कधी. तर हौशी ललना.. " हाय हिल "घालून आम्हाला कसरत करायला लावतात.

लग्नाचे वेळी मात्र--- नव वधू हमखास "मेंदीने आम्हास मढवतात, मोठी मजा असते आमची . उम्ब्र्यावरील---- माप ओलांडताना, तसेच घरभर पावले उमटविताना-- लक्ष्मीचा मान मिळताना धन्यता ही वाटते. पायातील पैंजण. व बोटातील विरोदया - जोडवी असे चांदीच्या अलंकारांनी ---- कृत कृत्य होऊन जाते झाले जन्मभराची.

...

सा रे ग म प --- // **थापाड्या ----- //... (. सा)**

*****

थापा मारायला कोणाला आवडत नाहीत ---. प्रत्येकाने कधीतरी थाप मारलीच असेल की, आठवून तर पहा. कधी ती हसवते तर कधी फसवते. पण असाच एक---- थापा---- सहन करणारा महाभाग आहे. तो मात्र इतर वेळी मूकपणे कोपऱ्यात उभा असतो. पण जेंव्हा थापा खायला सुरवात करतो तेंव्हा मात्र ---थापा देणारा व थापा घेणारा समोरच्याला मात्र मंत्र- मुग्ध करून सोडतात.

ह्यांची नेहमी जोडी असते जुळे भाऊच जणू. त्यालाच "हिंदुस्तानी शास्त्रीय -म्युझिकल ड्रम -असे भारदस्त नावही आहे. शुद्ध मराठीत त्याला ---**तबला -- डग्गा** असे म्हटले जाते. अर्थात त्यांचे -मूळ पूर्वज ही आहेत. पखवाज --ढोलक --नगारा--मृदंग.

प्रत्येकाची एकेक खासियत असते ढोलक ----- लावणी-- धोलक्याशिवाय रंगत नाही. पखवाज --नगारा यांचा डौल काही वेगळाच असतो. तबल्यावर ----थाप मारून मात्र अनेकांनी आपली---- छाप जगासमोर उभी केली आहे. त्यापैकी एक महत्वाचे नाव म्हणजे -- उस्ताद झाकीर हुसेन बंधू प्रसिद्ध तबला पटू उस्ताद अलारखा यांचे चिरंजीव. यांची तबल्यावर लीलया पडणारी थाप--- भल्या भल्यांना मंत्र मुग्ध करते.

तबला-डग्गा --- लाकडी ठोकल्या प्रमाणे दिसला तरी डौलदार

असतो. यांचे विशेष म्हणजे यांच्या कातडीने - मुसक्या बांधल्याकी व त्यास योग्य ताण दिला व हळुवार थाप मारली की कर्ण मधुर स्वरात-- "बोल"-- बोलायला लागतो. गायकांचे गाणे यांच्या साथीने अधिकच खुलते. जोडीला--" संवादिनी --पेटी "-. असली तर स र ग म अधिकच फुलते.  याची आराधना खूप ----- काळ करावी लागते १२----१२ वर्ष तप केल्याशिवाय फलश्रुती नाही. याची अजून एक विशेषता म्हणजे तोंड -बांधले --कणकेचे गोळे भरविले --शाईच्या काळया डागाची तीट लावली की --- स्वारी खुश होते---- अन दिमाखात... भाव खावून जातो.  आणि का एखाद्या कसबी--- कलाकाराची बोटे -व हाताची थाप यांच्या चेहऱ्या वरून फिरू लागली की पाहणार्यांचा चेहरा मोहरा असा काही खुलतो की---- पुछो मत --/ आणि महफिल -अथवा बासरी बरोबरची जुगलबंदीचा योग म्हणजे तर ----ताक---धिना -धिन ---ताक --धिना --धिन, -----ताक ---धिना ----धिन
एखादी लावणी अथवा फडावरील तमाशा तर पाहून बघा..
तुमचे**--१२** वाजल्याशिवाय रहाणार नाही, अन सपनात पन--
**अप्सरा** आल्या बिगर रहाणार नाही... मग काय ----लागा तयारीला लगोलग.

**----(सा)**

**सा रे ग म प...**

**संवादिनी... (रे)**

******

दोन मऊशार कापडी--कड्यांवर उभे राहून तासंतास थापांच्या- गप्पात ते दोघेजण रमतात. त्यामध्ये "दबक्या चालीने येऊन " आपले सूर हळूच - बेमालूमपणे मिसळणारी ही - संवादिनी मोठी भाव तर खाऊन जातेच पण गायकाच्या - गळयावर सुरांचा साज चढवून मोकळी होते.
अन ऐकणार्या श्रोत्यांच्या -हृदयाचा ठाव घेते. त्यासाठी तिची ' त्या ' मागील पाठ मात्र लहान मुलांप्रमाणे थोपटावी-----
!- एव्हडी मात्र तिची निर्विवाद अट असते.

चोकोनी आकाराच्या पोकळ लाकडी खोबणीत दोन प्रकारच्या दंत पंगती तिच्या 'कवळीत ' असतात.
त्यातही वर्ण भेद दिसून येतो. कृष्णवर्णीय आपली
चूल वेगवेगळी तर मांडतातच पण
आपलेच वर्चस्व तिच्यावर गाजवतात- वर प्रत्येकजण आपली
'जोडीदारीण ' मात्र गौर-
वर्णीय अशी पटकावण्यात यशस्वी होतात. यात मात्र

त्यांच्यात एकवाक्यता दिसून येते. त्यामुळेच त्यांचा पुढील--
- हवेशीर संसार- सुरेल झाल्याचे दिसून येते.

कै. अप्पासाहेब जळगावकर यांच्या हातातील ती तर एक दिमाखदार खेळणेच होते. पु. ल. देशपांडे यांनीही तिला रेडिओ-दूरदर्शन वर नावारूपास आणले. तिचीपाश्च्यात्य देशात एक बहिण असते तिला- हार्मोनियम -असे इंग्रजाळलेले नाव आहे. तिची मात्र --पाय दाबून सेवा करावी लागते, तर दोन्ही हातांनी दात साफ करून हातही वरचेवर साफ करून घ्यावे लागतात.

इंग्रजांच्या काळातील नाटकात सर्वांच्या नाकावर टिच्चून ती पुढ्यातच बसून रहात असे.

पुढे पढे सिनेमात पार्श्व संगीत आल्याने तिला मात्र पडद्यामागेच रहावे लागले. पण गाण्यातून मात्र ती डोके वर काढून आपले अस्तित्व आपल्या सुरावटीतून दाखवतच असते.

हल्लीचे ख्यातनाम गायक -संगीतकार. श्रीनिवास खळे, अशोक पत्की, सुरेश वाडकर, श्रीधर फडके, डॉ. सलील कुलकर्णी यांचे तर हिच्याशिवाय हात (पान) हलतच नाहीत एव्हडा तिचा लळा लागलेला दिसून येतो. "जगाच्या पाठीवर" असा मान मिळणारी दुर्मिळच सुरेल गायिका

असेल. गायकाचा सूर पकडून त्यास मार्गी -
- लावण्यात तीचा हातखंडा असतो. सूर बरोबर लागला नाहीतर गायकाचे अन श्रोत्यांचे -- लक्ष नीट लागत नाही व गाणेही सुरेल होत नाही. हीच्या संगतीने गायकाचा
गळा पाण्यासारखा वाहू लागतो व त्यात जो जो रंग भरावा तसा तो रंगुही लागताना दिसून येतो. सूर आणि स्वर यांच्या स्पर्शाने गाणे अमृतमय होऊन जाते...

आणि ---अमृताहुनी गोड नाम तुझे देवा ----नाम तुझे देवा --

मन माझे केशवा का बा न घे ----

हा संत नामदेवांचा, बाळ
माटे यांनी संगीत बद्ध केलेला आणि माणिक ताईंच्या सुरेल गळ्यातील

अभंग... अजरामर असाच झाला आहे.

त्याची मजा आजही ऐकताना -- काही औरच येते... नाही का.. ?

सा रे ग म प -----

" सनई " ----(नी)

----



या अश्या शहनाईच्या-स्नेहमय- भावपूर्ण सुरातच बहिणीला तिच्या हक्काचे पतीगृही पाठविण्याची थोर परंपरा

आपल्या भारतात पूर्व परंपरागत चालत आली आहे.
त्या शहनाईचे... सुरास
अजून तरी प्रतिस्पर्धी पहावयास मिळत नाही.

अशी ही अजोड--पण बोजड नसलेली ----
हलकी फुलकी सुरेल नजाकतीची---- शहनाई. !!!

खरेतर सुरवातीस एकाने एका --पुंगी सदृश--एका
छोट्या पण कर्कश आवाजाचे वाद्य बनविले होते. .
त्याचा उपयोग गारुडी --साप पकडण्यासाठी वापर करत. त्यास...
बिन --असेही नाव होते.

त्यात सुधारणा होवून मंजुळ आवाजाची नाजूक अशी...
शिडशिडीत आकाराची... " सनई "---बासरीची सुधारित आवृत्ती
तयार झाली. एक- शाह नावाचा " नाई " व्यावसाईक या
सनईचे निर्मितीस कारणीभूत असल्यानेही त्यांचे नाव ---
शहनाई... असे पडले असे सांगतात. ही
ची निर्मिती काश्मीर सारख्या भारताच्या शिर पेचात झाली
असल्यानेच तिला आणि तिचे -सुप्रसिद्ध वादक --

बिस्मिल्ला खान. (... बिहारचे)  यानाही सर्वोच्च असे.. "
भारत रत्न " पदक देऊन गौरविण्यात आले आहे.

बासरी---- प्रमाणेच या वाद्यात
तोंडाने फुन्क्कर मारून लाकडी नळीचे
छिद्रांची उघडझाप करून... सुरेल कर्ण
मधुर आवाज काढण्याची किमया वादक
यामध्ये करतो व वाहव्वा.. !! उस्ताद... !!! वाहव्वा... !!!! ---
अशी वाहव्वा मिळवतो.

" शहनाई "... हे एक "भाग्य खेचून आणणारे --मंगल वाद्य "
मानले जाते. त्यामुळे त्यास व वादकासही राजाश्रय मिळत
आला आहे. लग्न समारंभ -व मंदिरातील पूजा अर्चा
याची सांगता सनईच्या सुरांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.
तसेच तो सह- हृदयी - आवाज ऐकल्या शिवाय आपल्या
लाडक्या लेकीस --बहिणीस --हक्काचे सासरी...
पती गृही पाठविल्याचा आनंदही मिळत नाही हे
त्रिवार सत्य आपण प्रत्येकाने... तिच्या लग्नानंतरच्या

पाठवणीच्या वेळच्या ... आनंदाच्या साश्रू. ... नयनांनी अनुभवले ----- आहेच... ना... !!! तसेच ----

सूर सनईत नादावला ----
पूर नयनात या दाटला
सांग विसरू कशी मी... तुला ?

पुण्यवन्तापरी घरी या जन्मले
सात जन्मातले भाग्य जे लाभले
सात या पाऊली विस्मरू मी कशी
मूर्त आई तुझी ----... वत्सला.. ?

सान होते कशी मूक वेडी कळी
अमृताने तुझ्या वाढले मी खुळी
रोमरोमी जयाच्या तुझ्या भावना
गंध विसरेल का गे... फुला... ?

पूस डोळे नको हुंदके आसवे

चालले गे जरी मी पतीच्या सवे

माउली तू मला साउली जीवनी

मी तुझी लाडली प्रेमला... ?

(शांताराम नांदगावकर ----अनिल- अरुण-----उषा मंगेशकर)

या सहृदयी सुरेल गाण्यातील भावार्थाला --

खरा... अर्थ प्राप्त होतोच होतो अन उमगतो ही.. !!!! खरे ना... ?!

----(* समाप्त *) ----

*****

**सा रे ग म प -----**

**तंबोरा -----(म)**

******

" भोपळा फोडणे " ही एक तारेवरची कसरत असते. मग तो खेळातील असो की अभ्यासातील. शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणे हा तर एक तपश्चर्येचाच भाग आहे. त्याचा सुद्धा या भोपळा आणि तारेशी संबंध येतो. तो त्यातील अविभाज्य अश्या.. "तंबोरा " च्या सह-भागाने. याचे हाताळणी शिवाय संगीत शिकणे म्हणजे पाण्याविना- पोहण्याचे धडे घेण्यासारखे आहे. सा रे ग म प ----या स्वराची पक्की ओळख होते ती या तंबोऱ्या द्वारे. हा संगीतातील -साधू पुरुषच जणू. त्यांचे स्वर सतत कानाशी घुमावे लागतात त्यानेच पुढे कान तयार होऊन -- तानसेन नाही पण कानसेन तरी बनता येते. तंबोरा हा तर संगीताचा आत्माच असतो वीणा----ही त्याचीच एक बहीण. ही तर' सरस्वतीचा ' उजवा हातच. विद्याभ्यासाप्रमाणे याचीही आराधनाच करावी लागते वर्षानु वर्षे. तिचे ही चित्र - विचित्र असे प्रकार असतात. रुद्र वीणा ही त्यात आलीच.

' सितार '---- च्या कर्णमधुर अश्या कंपनाने अनेक हृदयांच्या तारा छेडल्या जातात. सितार - वादन करण्यात एक वेगळाच रुबाबदार पणा असतो. दोन्ही मांड्या भोवती मान तिरकी करून ती तासंतास उभी राहते व श्रोत्यांना मंत्र मुग्ध करते, पण ती प. रविशंकर या सारख्या निष्णात-बुजुर्गाच्या हाती असेल तर ती अधिकच देखणीही होऊन जाते अन-" तपश्चर्येचा " खरा अर्थ कळतो.

'संतूर '----हे सुद्धा तार वाद्यातील एक वेगळे रूप. ही सर्व वाद्ये---- बसूनच वाजवावी लागतात. तेंव्हाच त्यांच्यातील ---- उठावदार पणा खुलतो, अन मन-कर्ण देखील प्रफुल्लीत होतात .

गिटार - मेंडोलीयन-ही पाश्चात्य-धाटणीची तर एकतारी व तुणतुणे ही भारतीयांच्या " तुण तुण्या "प्रमाणेच उभे राहून सुद्धा वाजविता येणारी अशी-- तार

सप्तकातील वाद्ये आहेत.

एक तारी शिवाय भजनाची -भक्ती मिळणे अन --- तुण -तुणे - या शिवाय तर तमाशा - लावणीची --खमंग फोडणीची -भट्टी पेटणे शक्यच नाही.

काही -उणे दुणे राहिलेही असेल. असो.

अश्या वाद्यांच्या संगतीनेच आपल्याला---- संगीताच्या -कर्ण-

मधुर अश्या विश्वात ---तरतरीत पणे पारंगत होता येते. त्याचा आनंद घ्यायचाय.

चला तर --ऐका --कोहिनूर मधील -----

मधुबनमे राधिका नाचे---- रे -----!

किंवा ---

भाभी की चुडिया मधील -----!

ज्योती कलश छलके ----- !

हुवे गुलाबी लाल सुनहरे--- रंग- दल बादल के ----!ही गाणी अन, --त-रंगून जा एका अनोख्या दुनियेत.

...

**विविध वाद्ये - माझ्या लयीतून**

व्हायोलिन (Violin) (६)

*****

गायक आपल्या गळयातून सुस्वर काढून प्रेक्षकांना मंत्र मुग्ध करून सोडतो.

परंतु वाद्याची एक बाजू गळयाशी टेकवून दुसऱ्या हाताने त्याच्या तारा छेडून त्या वाद्यासच गायला लावणारे एक कलाकार म्हणजे पंडित प्रभाकर जोग.

त्यांचे गाणारे व्हायोलिन प्रसिद्धच आहे.

व्हायोलिन एक तंतुवाद्य आहे. सर्व रसांमध्ये वाजविले जाणारे 'व्हायोलिन' हे एकमेव वाद्य आहे, असे विख्यात व्हायोलिनवादक मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात.

व्हायोलिनलाच फिडल म्हणतात. भारतात या वाद्याला बेला हे नाव आहे..

हे वाद्य वाजविण्यास तसे खूप अवघड आहे.

त्यावर प्रभुत्व मिळविणे फारच दुर्मिळ आहे.

उजव्या हातातील तारेवर फिरणाऱ्या भागास " बो " असे म्हटले जाते.

मृत घोड्याचे केसांपासून ते तयार केले जाते.

व्हायोलिन या वाद्य वाजविल्याने आपला मेंदू अधिक तल्लख होत जातो.

चित्रपट, नाटक, शास्त्रीय संगीताची मैफल, लोकगीते यांमध्ये 'व्हायोलिन'चा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो.

चित्रपट, नाटक, शास्त्रीय संगीताची मैफल, लोकगीते यांमध्ये 'व्हायोलिन'चा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो.

चार्ली चापलिन यांच्या सर्व चित्रपटांना व्हायोलिनचा वापर करून पार्श्वसंगीत दिले गेले आहे.

मोहब्बते या हिंदी चित्रपटात शाहरुख खानने व्हायोलिनचा उपयोग प्रेमाची वातावरण निर्मिती करण्यासाठी केला आहे.

ऋषी कपूर, राज कपूर यांनी देखील आपल्या गीतांमध्ये व्हायोलिन वापरले आहे.

आनंद, दुःख, गंभीरता, शांतता, मनाची द्विधावस्था इत्यादी सर्व प्रकारांत व्हायोलिन वाजवून वातावरण निर्मिती केली जाते.

साथ-संगतीसाठीही इतर वाद्यांबरोबर व्हायोलिनचे वादन केले जाते.

भारतीय वाद्यसंगीत परंपरेत तंतुवाद्यांना खूप प्राचीन परंपरा आहे.

या परंपरेनुसार तंतुवाद्याचे तारा छेडून वाजवावयाची वाद्ये व गजाने वाजवावयाची वाद्ये, असे दोन प्रकार अस्तित्त्वात आहेत.

भारतामध्ये व्हायोलिनची प्राचीन जातकुळी सांगणारी वीणाकुंजू, पुल्सुवन, केंदू, पेना, बेनाम, किन्नरी, रावणहट्टा ही तंतुवाद्ये आहेत, असे मानले जाते.

व्हायोलिन हे वाद्य भारतीय नाही.

जरी ते परकीय असले, तरी आज देशामध्ये मैफलीच्या मध्यभागी विराजमान झालेले ते वाद्य आहे.

वरील वाद्ये व्हायोलिनप्रमाणेच उलटी धरुन गजाने वाजविली जातात. या वाद्यांचा वापर अभिजात शास्त्रीय संगीतात आढळत नाही.

त्यांचा विशेष वापर लोकसंगीतात होत होता

युरोपपासून भारतापर्यंतचा प्रवास करण्यास व्हायोलिनला फारसा काळ लागला नाही.

पाश्चात्त्य लोकांमुळेच त्याचा आपल्या देशात प्रसार आणि प्रचार झाला.

या वाद्याचा भारतीय संगीतात पहिला प्रवेश दक्षिण भारतातील संगीतामधून झाला.

त्यानंतर कर्नाटक संगीतातील वासूस्वामी दीक्षितार, मुत्तुस्वामींचे शिष्य वडिवेसू यांनी त्याचा वापर केला.

आज दक्षिण भारतातील कोणताही संगीत प्रकार व्हायोलिनच्या साथसंगतीशिवाय सादर होऊ शकत नाही.

महाराष्ट्रात व्हायोलिनला स्वतंत्र स्थान मिळवून देण्याचे श्रेय कै. पंडित गजाननबुवा जोशी यांना जाते. त्यानंतर पंडित व्ही. जी. जोग, प्रभाकर जोग,

सारंगी, व्हायोलिन, सनई, बासरी ही वाद्ये गायकी अंगाने वाजविली जातात. गायक गळ्याने गातो, तर वादक बोटाने गातो.

गायकाच्या कंठाला (गळ्याला) जे शक्य नाही ते बऱ्याचवेळा वादकाच्या बोटाला शक्य असते.

म्हणूनच गायनशैली व वादनशैली यात फरक पडतो. आज व्हायोलिन वादनाच्या मैफलीची एक खास शैली बनू पाहत आहे.

रागांची शास्त्रशुद्ध मांडणी, ताल-लय यांचा क्रमबद्ध विकास, याबरोबरच गजकामाच्या कसरती, फिंगरिंग बोर्डचा अवांतर वापर,

तबल्याबरोबरचे सवाल-जवाब, भन्नाट लयीत पोहोचणारा 'झाल्या'सारखा प्रकार, या सर्व आतषबाजींकडे व्हायोलिनवादनाची मैफल झुकू लागली आहे.

भारतातील श्रेष्ठ वादक-कलाकार पंडित व्ही. जी. जोग, उस्ताद बिस्मिल्ला खाँ, पंडित सामता प्रसाद या त्रिकुटाने व्हायोलिन-सनई-तबला या वाद्यांच्या जुगलबंदीने अफाट लोकप्रियता मिळवली होती.

व्हायोलिनचा जो एक मोकळा, दमदार, घुमदार आवाज आहे, तो त्याच्या लाकडी 'बॉडी'मुळे. त्या बॉडीलाच 'ध्वनिपेटिका' असे म्हणतात.

हे लाकूड विशिष्ट प्रकारचे असते. आपल्याकडे जसे तंबोऱ्याचे भोपळे पंढरपूर, मिरज या भागातच होतात, तसे व्हायोलिनचे लाकूड युरोपातील विशिष्ट प्रदेशात उपलब्ध होते.

म्हणूनच इटालियन व जर्मन बनावटीची व्हायोलिने जगात सर्वोत्तम मानली जातात.

या विशिष्ट लाकडापासून बनविलेली व्हायोलिनची ध्वनिपेटिका, त्याचा विशिष्ट आकार, धातूच्या तारा यामुळे व्हायोलिनला विशिष्ट आवाज प्राप्त झाला आहे.

तरफांच्या जादा तारा लावताना व्हायोलिनच्या ध्वनिपेटिकेला कडेने खुंट्यांची सोय केली जाते. त्या वेळेस ध्वनिपेटिकेचे लाकूड दाबले जाते व त्यातून बद्ध व दबलेला आवाज येतो.

हे वाद्य जितके मधुर वाजते, तितकेच सुंदर दिसते. याचा नाजूक, आकर्षक, कमनीय आकार व बदामी तुळतुळीत रंग प्रथम दर्शनीच लक्ष वेधून घेतो.

केवळ चार तारा सुरांत लावल्या की, मनात योजाल ते संगीत साकार करता येते. या वाद्याला कोठी (बॉडी), त्याला लागून असलेली लांब दांडी आणि गज असे तीन भाग आहेत.

कोठीला चार तारा असतात. धातूच्या या तारांची लांबी सारखी असली तरी जाडी कमी-जास्त असते.

जाडीवर तारेच्या स्वरांची उंची अवलंबून असते. तारेची लांबी व तिची कोठ्यापासूनची उंची यांचे प्रमाण व्यस्त असते.

तार जितकी लांब तितका स्वर ढाला, खर्जातला असतो. तार जितकी आखूड तितका स्वर उंच असतो. लांबीला समान असणाऱ्या व्हायोलिनच्या तारांचा स्वर त्यांच्या जाडीवर अवलंबून असतो.

चला तर घ्या या गाणाऱ्या वाद्याचा कर्ण मधुर आस्वाद... !

*****

//... प्राण्यांमधील मानवता... //--- (एक दृष्टी क्षेप) जी. के.

...

मनुष्य हा एक--- प्राणी आहे. हे आपण आदी काळापासून जाणतोच आहोत. मनुष्य आणि प्राणी यात फरक तो काय... ?
प्राण्यांना मानवा प्रमाणे बोलता व हसता येत नाही म्हणून काय झाले... ?. पण मनुष्यच अनेकदा पशुवत वर्तन करताना दिसतो. आणि आपलेच हसे करून घेतो. हे आपण दररोज वर्तमान पत्रातून व चित्रपटातून पहातच आहोत.
मग प्राण्यांनीच आपल्यातील ----- " मानवता " प्रगट केली तर - !!!!-ती ----माणसास एक आदर्श व मार्गदर्शकच असते.

राजहंस -- हा ज्ञान व पवित्रता दर्शवितो ----- त्यामुळेच तो श्री सरस्वतीच्या सोबत असतो.
मोर ---- सौंदर्य -व रंग-संगतीचा आगळा " रुबाब "दर्शवितो तो ही सोबतीला असतो.
गरुड ---- हा आपल्या अफाट शक्तीने आसमंतात विहार करतो तो विष्णूला अर्थात जगंनीयत्याला प्रिय आहे.
नंदी बैल ----- हा तर " शिव " शक्तीचे प्रतीक साक्षात शिवाचा साथी.

वाघ - सिंह ----- हे तर वेग व बळाचे बाहू आणि " दुर्गा मातेचे "जणू दोन हातच.

हत्ती ---- हा तर भरभराट व नशीब याचा त्यामुळे लक्ष्मी च्या बाजूला.

घोडा ---- हा रुबाबदारपणा व वेगाचा भक्त तो शिवाचा सोबती.

कुत्रा ---- हा तर इमानदार व विश्वासू ---- मानवाचा सोबती.

-----



## // फुले ही तर -- देवाघरची --निरागस मुले... //

*****

इंद्रधनुच्या सप्त रंगांची फक्त - पावसाळ्यातील निसर्गाच्या मौज - मजेनंतर ती रंगपंचमी (... सप्तमी) वर्षभरासाठी वसुंधरेच्या असंख्य अश्यानिसर्गातील - निरागस --बालकांचे अर्थात फुलांचे - मुख कमलावर विराजमान होत राहते. हिरव्या शालूवरील वेलबुट्टीच्या रूपा प्रमाणेच ती मोहक अन आकर्षक दिसतात. अन सर्वांनाच प्रफुल्लीत करतात.

गणरायाचे आगमन होताच तळ्यातील---- कमळे अन जास्वानदाची फुले लाजून अधिकच मोहक अन लालबुंद होऊन गणपती पुढे झुकतात. आघाडा-
दुर्वा आपल्या पंखांनी लम्बोदारास-- A C
चा फील देऊन दिव्यांच्या रोषणाई चा दाह कमी करतात.
व त्या गजाननास मोदकांचा आस्वाद निवांतपणे घेण्यास अनुकूलता आणतात. सत्यनारायणाचे पुढील परडीत देखील दाटीवाटीने लाल- पिवळी-केशरी -पांढरी फुले हिरव्या पानासमवेत, तुळशीच्या मंजुळासंगे कुजबुज करीत...
बालवाडीतील मुलांप्रमाणेच हरखून जातात.

दहा दिवसांच्या मंगलमय भक्तीचा लाभ घेऊन ती सर्वजण-----
शाळा सुटल्याचा आनंद घेत, नदी -तळी-
विहिरीच्या पाण्यात पोहोण्याचा आनंद लुटतात.
तर काहींची रवानगी हल्लीच्या पर्यावरणाचे संतुलनासाठी --
खत प्रक्रियेसाठी होते. त्यातही ती
आपले जीवन सार्थकी लागल्याने धन्यताच मानतात.

विजया दशमीचा आनंद लुटण्यास---
केशरी पिवळा झेंडू आपल्या लहान -मोठ्या -
गुबगुबीत भावंडासह मोठा भाव खातच मैदानात उतरतो. अन
सगळीकडे सुवर्ण झळाळी आणतो ती वेगळीच.
त्यासोबत आपट्यांच्या कोवळया -जून पानांच्या शिराही
फुलतात. शालेय जीवनात पदार्पण करणाऱ्या बालकांचे कोऱ्या
करकरीत पाट्यांवर विराजमान होवून- ज्ञान यज्ञाचा धने-
गुळ खोबऱ्याचा आस्वाद

घेवून--श्री गणेशाही करतात अन धन्य होतात. एकमेकांच्या
स्नेहमय देवाण घेवाणीच्या आनंदात, क्रिकेटमधील ---
'वन डे'च्या उत्साहाने सामीलही होतात. अन
दिवसभराच्या धावपळीने दमूनही जातात बिचारी अन

कोमेजतातही. दसरा हातपाय पसरतो न पसरतो
तोच दिवाळी दाराशी येवून उभी रहाते.

साफसफाईस सुरवात होते. दारावरील -पाट्यांवरील जेष्ठ-वाळलेल्या पर्ण-फुलांना पायउतार व्हावे लागते. त्या चकाचक जागेत आता असंख्य जाती-जमातीची एकत्रित -- जत्रा भरावी तशी -शेवंती - गुलाब - जरबेरा-. झेंडू-पांढरी- गुलछडी-ऑस्टर-इतर वेळी न बोलणारा ---चाफाही मन मोकळा बोलू लागतो. व आपले वेगळे पण सुगंधाने मोहवीत डोळे दिपविण्यास
भाग पाडतो. फुलांचे बुके -माळा- तोरणे सजू लागतात व
रंगीत दिव्यांशी अटी तटीची रस्सीखेचही खेळत बसतात तासान तास.

नव्या नवलाईत अल्लड मुले. मुली सडा-संमार्जन, रंगीत रांगोळयाचे नक्षीकाम - करण्यात रमून जातात. दिवाळीचे पाचही दिवस विविध फुलांनी बाजारपेठ बहरते. फटाक्यांचे -- रंग फुलांप्रमाणेच रंग उधळीत रात्रही उजळून टाकतात. लहान थोर ही आनंदून दिवाळीच्या ---दिवस
रात्रीच्या मोहक रंगात रंगून जातात. बाल-दिन, --स्वतंत्र -भारताचे

पहीले पंतप्रधान यांचा वाढ दिवस, व्ह्यालन टाईन डे तर गुलाबा शिवाय साजरे होणे शक्यच नाही.

दिवाळी नंतर तुळशी विवाहाचे सु -मुहुर्तावरच सुरु होतो घरोघरीच्या नववधूच्या सासरी पाठवणीचा खेळ. .
मंगल कार्यालय- म्हणजे तर फुलांचा कुंभ-मेळाच. छोटे छोटे - गुलाब आपले
काटे लपवितच पाहुण्यांच्या हातात विराजमान होतात. लग्न मंडपात तर दाटी वाटीतच नटून थटून सुवासिक अत्तराचा----- मंद, उग्र वासही सहन करतात. आपले सुवासाचे घोडे - एक पाऊल मागे टाकीत गुपचूप बसून - हाताची घडी अन तोंडावर बोट ठेवून देतात झाले. काही फुलांना मात्र नव वर- वधू- प्रमाणेच त्यांचा सहवासात-- त्यांच्या गळयात पडूनच राहण्याचे भाग्य लाभते. अन त्यांच्या गुलू-गुलू --गप्पांचा अन पुढील-हनिमूनच्या गोड-गोड बेतांचा कानोसाही सहजपणे घेता येतो. अन दिवस कसे मजेत निघून जातात कळतही नाही. काही गुलाब पाकळया -- तर त्या दोघांच्या पहिल्या वहिल्या सहवासाचा आनंदही लुटतात. त्यांची सुहाग रात सुगंधमय अन आनंदमय करून भावी जीवनाच्या यशस्वी वाटचालीला शुभेच्छा

देऊनच निरोप घेतात.

गत वर्ष्याच्या नव वधुनी आघाडी घेऊन आई बाबांच्या पदवीच्या-----पूर्व - तयारीत असतात. त्यांच्या ओटी भरण कार्यक्रमास परडीभर भरून हजेरी लावतात. त्या अवघडलेल्या स्थितीतही तिला नख शिखांत आपल्या सहवासाने मोहरून टाकतात व तिच्या भावी काळास सुयश चिंतितात. काही महाभागांनी ती पदवी - मिळवलेली असते. त्या पदवीदान - नामकरण समारंभासही ही--" फुले -देवाघरची मुलेच " असल्याने त्या नवागत बालकाचे आगमनाचे आनंदात हसत खेळत सामील होतात. त्यांचे भोवती पाळण्यावर चढूनच शुभेच्छांचा वर्षाव करतात.

दत् जयंतीस पिवळी शेवंती खूपच भाव खाऊन जाते. त्रिमुखी दत्तही आगळया वेगळया अश्या पिवळया फुलांनी-रंगानी दिवसभरात न्हाऊन निघतो. लगोलग - धावत पळतच "ख्रिसमस"ची पोतडीभर भेटी घेऊन- सांता-क्लॉज धावतच येतो. त्यावेळचा आनंद व चर्च तसेच वेगवेगळया लोकांचा सहवासही आगळा वेगळा असा अनुभवता येतो.

नव वर्ष्याची सुरवात होते. २६ जानेवारी अश्या राष्ट्रीयसणा दिवशी तर फुले अभिमानाने फुलून जातात. काही भाग्यवंतांना तिरंगी राष्ट्रध्वजाच्या राष्ट्र अभिमानाने फडकतानाच्या वेळच्या सहवासाचा थोडावेळ का होईना सहवास लाभतो. हे ही नसे थोडके.

हळू हळू पानगळ सुरु होते. काही फुलांचा हंगाम संपतो तर काहींचा सुरु होतो. उन्हाळा जवळ येतो तसा मोगरा - कदंब -गुल मोहर बहरू लागतो व उन्हाळाही सुसह्य करतो. मे -फ्लावर नामक एक दूरचा भाऊबंध ही आवर्जून भेटीस येतो. मोगऱ्याच्या सुवासाचा आनंदही मन मोहरून टाकतो. अशी ही अल्पायुषी फुले ही जीवन सुगंधीत करून जातात. प्रत्येकाने आपले जीवनही अश्या प्रकारेच, आपले अन आपल्या सहवासाने आप्त - मित्र - सगे -सोयरे याचे सह जीवनाचे काळात स्नेह व्यवहार ठेवून जीवनाचा आंनद घ्यावा आणि इतरानाही द्यावा. अशानेच जीवन सुंदरच आहे याची खात्री पटेल.

कवी मनासही ही निरागस फुले -- भुरळ पडतातच -----आणि त्यातूनच मधुर काव्य जन्मही घेते --गीत रूपाने.

संत ज्ञानेश्वर -यांनाही----

मोगरा फुलला ----मोगरा फुलला ----

फुले वेचिता बहरू कालीयासी आला ----

असे म्हणण्याचा मोह आवरला नाही.

प्रभू रामचंद्राचे स्वागतही अयोध्येत --- प्राजक्ताचा सडा शिम्पुनच केले गेले.

प्रभू आले मंदिरी ---सडा शिंपला प्राजक्ताचा -

शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी -----

प्रीतीचा पारिजात फुलला -----

सुगंध त्याचा तुझिया नी माझिया हृदयी दरवळला...

फुल ते संपले गंध न राहिला. ----

फुललेरे क्षण माझे फुललेरे...

फुला फुला रे फुला फुला...

मी लपले तू शोध मला --

गंध कुठे तू शोध मला... (. ग. दि. मा. ----सुधीर --आशा)

अजून त्या झुडुपांच्या मागे, ----सदा फुली दोघांना हसते-----

अजून आपुल्या आठवणीनी,... शेवंती लजवंती होते...

तसे पहाया तुला मला ग,... दव बिंदू थरथरतो...
अर्ध्या मुर्ध्या कान गुजास्तव... अजून ताठर -- चंपक झुरतो...
(वसंत बापट --दशरथ पुजारी) .

या फुलां पासूनच बनणारे सुवासिक अत्तरही आपल्या सुवासाने कवीला मोहात पाडते...

अत्तराचा फाया तुम्ही आणा मला राया ----
सुगंधाने झाले धुंद, ----जीव झाला ग बेबंद
देह भान मी विसरावे... अशी करा माया...
अन अशी कविता ----कवी संजीव यांच्या लेखणीतून प्रसवते.
आणि वसंत कुमार मोहिते यांच्या संगीत साजाने व
आशा भोसले यांच्या स्वरालंकारांनी, भाऊबीज -(१९५५) या मराठी चित्रपटाची आठवण देवून जाते.

आकाशी फुलला, -- चांदण्यांचा मळा
बाग तो आगळया----- चंद्र्म्याचा

सुगंध लेवून उभी जाई जुई...

देवा ही पुण्याई तुझीच रे -----(वामन देशपांडे ---श्रीनिवास खळे ---रामदास कामत)

आज कळीला एक फूल भेटले ----
हृदय चोरिले, कुणी - हृदय चोरिले... . (जगदीश खेबुडकर)

अंगणी गुलमोहर --फुलला
लाल फुलांच्या लिपीतला अर्थ मला कळला... (ग. दि. माडगुळकर)

अंगणी पारिजात फुलला ---
बहर त्याला काय माझ्या प्रीतीचा आला ----(विद्याधर गोखले)

अशी एक ना असंख्य --काव्य सुमने --आपले कान अन मन तृप्त करून जातात. अन जीवनाला नवा अर्थ प्राप्त होऊन जातो.

एका निराश क्षणी कवी देखील त्यांचाच आधार घेतो अन ----

त्या--- कोवळया फुलांचा बाजार पहिला मी -----
पैशात भावनेचा व्यापार पहिला मी -----

अंधार वेदनांनी आक्रन्द्तो तरीही --
नजरेत वासनेचा शृंगार पहिला मी -----(अनिल कांबळे --सुधीर फडके)
असेही विदारक रूप पुढे ठेवून त्या फुलांचे व मानवाचे --
जीवनातील गुढार्थ ---आपल्या पुढे मांडतो.

--माणसाच्या अखेरच्या, जगाच्या निरोपाच्या क्षणीही... करांजलीतून ओघळणाऱ्या या फुलांनाच मूकपणे आपली श्रद्धांजली वाहून शेवटचा निरोप द्यावा लागतो. तरीही ती फुले मात्र----- टवटवीत राहूनच आपला कार्यभाग उरकून... मागे राहिलेल्यांना, ----मानवी --जीवन ही --आमच्या जीवना प्रमाणेच "क्षण भंगुर "आहे तरीही ---- त्याचा शेवट पर्यंत आमच्या प्रमाणेच हसत मुख राहून -- आनंदाने स्वीकार करा-----!!!! हाच एक मूक- संदेश देत असावेत नाही का... ?!!!
----

माझे -- कवडसे.. या प्रथम पुस्तक प्रकाशनाचा वृत्तांत

*****

आप्त -- स्नेही नात्यांची भेळ मिसळ ----!

******

सरत्या वर्षाला निरोप अन नव वर्ष्याचे स्वागत यामध्ये आपण सर्वजण आपापल्या परीने व्यस्त होतो.

आम्ही वैद्य कुटम्बियांनी सुद्धा २०१८ ला आगळया पद्धतीने निरोप दिला तो आप्त स्नेही जणांचा एक मेळावा भरवून.

निमित्त होते ते माझ्या " कवडसे " या पुस्तक प्रकाशनाचे.

२३ डिसेंबर २०१८ रविवारची संध्याकाळ --संत एकनाथ सोसायटीचे सभागृहात सायंकाळी हळू हळू निमंत्रितांना भरू लागले.

कवडसे या पुस्तकात आतापर्यंत केलेला प्रवास. - भेटलेली माणसे -जुळलेले नाते संबंध याची परामर्श घेतलेला आहे

. त्यामुळेच शालेय जीवनातील बाल मित्रांपासून आज सेवानिवृत्तीच्या दशकोत्तरवर्षा पर्यंतच्या प्रवासातील भेटलेल्या विवध व्यक्तींचा त्यात उल्लेख आलेला आहे

या समारंभास पुढील व्यक्तींची उपस्थिती होती

१) **शालेय मित्र परिवार ----**

श्री. सुभाष नाईक -- जेष्ठ पत्रकार --डॉ. हेमंत सातारकर-- (तालुका वैद्यकीय अधिकारी) --शिरीष कारले ---(आय ए एस - अधिकारी) शांताराम लाड --अजित दरेकर --अशोक सुतार -- अशोक गायकवाड -मधुकर राऊत --दीपक येनगुल

शुभ संदेश... राजीव सावंत.. अरूण पाटील... धनंजय पासलकर

२)गुणे आयुर्वेद **वैद्यकीय महाविद्यालय अहमदनगर, मित्र परिवार --**

डॉ. चंद्रशेखर पेशवे --डॉ. सौ. रेखा पेशवे

शुभ संदेश.. डाॅ. शरद खोमणे..

डाॅ. गौतम कोठारी.. (जळगाव)

३)**पुणे महानगर पालिका आरोग्य विभाग सहकारी --**

डॉ. रविंद्र भागवत --डॉ. श्रीमती निरुपमा शिरोळे --डॉ. वसुंधरा चौधरी --डॉ. राजेश दिघे --श्री नामदेव भंडगे (सी एस आय)

डॉ. मधुसूदन झंवर (जेष्ठ नेत्र तज्ञ

४) **ड्यामको गृहरचना सोसायटी ---**

डॉ. रणजित वाघ, सेक्रेटरी

५) **अमेरिकेत भेटलेले भारतीय मित्र --**

श्री. मार्कुस डाबरे--- संपादक वसई टाईम्स (संदेश रूपाने उपस्थित)

श्री. प्रकाश पगार --नाशिक (एक्स रे टेक्निशियन)

**६) आप्त मंडळी -----**

आम्ही सर्व पाच बंधू भगिनी ---दोन्ही व्याही --सुना ---नातवंडे

आजोळकडील समस्त पांडकर परिवार ---

मेहुणे श्री. पांडुरंग गोडसे --श्री. विश्वास भागवत परिवार

डॉ.. नवले. श्री. वसंतराव मेहेत्रे --डॉ. सुहास तारळेकर डॉ. सौ. वैशाली तारळेकर, डॉ. योजना शिंदे (डे. डायरेक्टर सिरम इन्स्टिटयूट)

सौ. व श्री राजेंद्र वरुडे (द्राक्ष -एक्सपोर्टर)

अभिजीत भसाळे --(आंबा -एक्सपोर्टर)

शुभांगी चोथे -वैशाली चोथे

सासुरवाडी कराडचे मेहुणे.. डॉ. अमृत गुरसाळे. सौ. सुनीता गुरसाळे.. संजय गुरसाळे.. सौ. राणी. साडू राजेंद्र बागडे... सौ. कुंदा बागडे.

७) **स्नेही मंडळी -----**

उमा आंद्रे ---जगताप ताई --अनिल हजारे.. जमाल (व्होल्गा हॉटेल)

8)सौ. चे.. भिशी मंडळ... सौ. ताम्हणकर.. ढेकणे...

8)शुभ संदेश... डाॅ. धनंजय चांदककर.. डाॅ. दिलीप जगताप... डाॅ. विलास सातारकर.. डाॅ. बोटकर. (. नाशिक) श्री व सौ. डाॅ. बागडे..

परदेशी नागरीक... लीओनी बोर्स... हाॅलंड

कार्यक्रम घरगुती असल्याने...

कवडसे पुस्तक प्रकाशन...

शुभ हस्ते... प्रा. अनंत ना. डोईफोडे.. ज्येष्ठव्याही

मंचावरील इतर पाहुणे... बालमित्र सुभाष नाईक.. डॉ. हेमंत सातारकर... चंद्रकांत भसाले

कार्यक्रम संयोजन ----श्री. अतुल गोडसे (भाचा)  व डॉ. सौ. दीपाली गोडसे

सूत्र संचालन -----सुनबाई --सौ. अश्विनी व सौ. प्राजक्ता वैद्य

सहाय्यक -----मंदार व मिलिंद वैद्य

विशेष सहाय्यक लुडबुड ---नाती -- चि. अनुष्का --रुमानी --रावी आणि नातू नील

वरील सर्व जणांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला व स्नेहभोजनास आप्त - स्नेही जनांची खमंग भेळ मिसळ जमून आली आणि जीवनातील एक आनंदी दिवस सरत्या वर्षात पार पडला.

अन नव्या २०१९ वर्ष्याच्या स्वागताला नव्या उमेदीने सज्ज झालो.

******

**सध्याचे निवांत घर बसल्या --जुन्या आठवणींना उजाळा... !**

*****

थंडगार हवेचा वर्ष अखेरची चाहूल देणारा मार्गशीर्ष महिना, गरमागरम कॉफीचा आस्वाद घेत जमत गेलेली मित्र मंडळी सगे सोयरे यांनी संत एकनाथ सोसायटीचा हॉल भरत गेला.

**कवडसे-** या माझ्या पहिल्या वहिल्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा ठेवणीतले दागिने --पैठणी साड्या जश्या एखाद्या कार्यासाठी काढाव्यात तशीच आयुष्यात जमविलेली स्नेहीजन मंचावर स्थनापन्न झाले.

गेल्या दशकात केलेल्या प्रवास वर्णनाचे आणि ललित साहित्याची रोजनिशीतील पाने, वेलची, लवंग, बडीशेप, मधुर गुंजपाला अन त्यावर किसलेल्या खोबऱ्याची पखरण करून विडा

बांधावा तशी बांधली अन कवडसे रूपात आपल्या समोर पेश केली.

कौतुक अन शाबासकीची थाप घरच्या मंडळीं कडून मिळाल्यास त्याचे जास्त अप्रूप असते. तसेच आज झाले.

१०५ अपेक्षित निमंत्रितांपैकी १०३ लोकांनी आज हजेरीलावून प्रत्यक्ष सोहोळ्यात रंगत भरली. त्यामुळेच दशकभर चाललेल्या या लेखणी यज्ञाची सांगता-- मन अन नेत्र सुखावून गेली.

कार्यक्रमात नातवांची उत्साहात चाललेली लुडबुड -सुनांचे कर्ण मधुर सूत्रसंचालन, शालेय मित्रांच्या मधुर आठवणी अन व्याह्यांची आपल्या मुलीबद्दलची निश्चिनचितता व समोरचा उत्साही आप्तगण- मित्र सहकारी डॉक्टर श्रोतृवृन्द. भट्टी चांगलीच जमून आली होती.

छोटेखानी कार्यक्रम--- सात्विक भोजन आणि कवडसे पुस्तकाच्या सस्नेह भेटीने,

२०१८ मधील सुवर्णक्षणाचे "आठवणींच्या " कुपीत बंदिस्त झाला.

**सर्व उपस्थितांचे मन:पूर्वक धन्यवाद... !**

*****



**पाश्चिमात्य देशातील  वेळेची बचत -(डे टाईम सेव्हिंग)... !**

*****

विज्ञानातील नियमानुसार उष्णतेने पदार्थ प्रसरण पावतो व थंडीने आकुंचित होतो.

हाच नियम भोगोलिक परिस्थितीलाही लागू पडतो असे दिसून येते.

चंद्र - सूर्याच्या लपंडावाने रात्र व दिवसाचा खो खो चा अव्याहत खेळ सुरूअसतो. .

उन्हाळयात उष्णतेने दिवस मोठ मोठा होत जातो व थंडीत तो लहान लहान होत जातो.

याचा दैनंदिन जीवनात वापर करून घेण्यास पाश्चिमात्य देशात एक पद्धत आहे. त्यासच " **डे टाईम सेव्हिंग** " असे संबोधले जाते.

याचाच फायदा घेऊन उन्हाळयाची चाहूल लागताच घड्याळे मध्यरात्री १ तास पुढे केली जातात.

त्यामुळे जास्त वेळ सूर्याचा वावर असल्याने दिवस मोठा असल्याने त्या प्रकाशाचा उपयोग करून घेता येतो.

याचा वापर प्रामुख्याने इंग्लंड - अमेरिका युरोप मधील काही देशात केला जातो.

आपल्या भारतासारख्या विषुवृताजवळ असणाऱ्या देशात त्याचा फारसा फरक पडत नसल्याने आपल्याकडे या पद्धतीचा वापर केला जात नाही.

तरीही आपल्याला संकष्टी चतुर्थीच्या चंद्रोदयाच्या वेळा उन्हाळयात मे महिन्यात रात्री १० पर्यंत उशिरा व थंडीत नोव्हेंबर महिन्यात रात्री ८ पर्यंत लवकर असल्याचे दिसून येतेच की

जॉर्ज हडसन या खगोल शास्त्रज्ञाने या पद्धतीचा वापर १८९५ पासून सुरू केला.

व्यावहारिक सोयीसाठी १ तास घड्याळ मध्यरात्री पुढे केल्याने

उन्हाळयात सूर्य लवकर उगवून उशिरा मावळत असल्याने नेहमीची ऑफिसची वेळ.. सकाळी ९ ते ५ असलेली.

ती आता खरी तर सकाळी ८ पासूनच सुरु होते.

पण घड्याळ १ तास पुढे केल्याने प्रत्यक्षात घड्याळात सकाळी ८ ऐवजी ९च वाजलेले असतात.

त्यामुळे ऑफिसची वेळ प्रत्यक्षात ९ ते ५ अशीच असते.

यात घोटाळा होऊ नये म्हणून उन्हाळयात मध्यरात्री १ तास घड्याळच पुढे नेले जाते.

याची विशेष दखल सर्वांनाच घ्यावी लागते. विमान, रेल्वे यांनाही योग्य ते बदल लक्षात घ्यावे लागतात.

हिवाळा सुरू होताना दिवस लहान होत असल्याने हा केलेला बदल पुन्हा पूर्ववत करण्यात येतो.

अर्थात मध्यरात्री १ तास घड्याळ मागे केले जाते.

या वेळ बदलाचे वर्षातील दिवस ठरलेले असतात.

अमेरिकेत हे बदल उन्हाळयात मार्च महिन्यातील दुसऱ्या रविवारी व हिवाळयात नोव्हेंबरच्या पहिल्या रविवारी केले जाते.

भौगोलिक परस्थिती नुसार इंग्लंड मध्ये ---हेच बदल मार्च महिन्यातील शेवटच्या रविवारी व ऑक्टोबर महिन्याचे शेवटचे रविवारी केले जाते.

युरोपियन देशात सुरवातीस या पद्धतीचा वापर केला जात नव्हता.

त्यावेळी बेंजामिन फ्रँकलिन या माणसाने त्या साठी उन्हाळयाचे दिवसात खुबीने ---

**Early to bed and early to rise makes a man healthy and wealthy and wise.** या म्हणीस प्रसिद्धी दिली.

परंतु रेल्वे --विमाने यांच्या वेळेत गल्लत होऊ नये म्हणून त्यास पुढे मान्यता दिली गेली.

या बदला बाबत विविध चांगली वाईट अशी मते पुढे आली याचा आरोग्यावर चांगला तसेच वाईट परिणाम होतो असे आढळून आले आहे.

त्यामुळे २०२१ पासून युरोपीय देशामध्ये अशी वर्षातून दोन वेळेस घड्याळे बदलणेची पद्धत बंद होण्याचे मार्गावर आहे.

त्यामुळे त्यांना उन्हाळयातील वेळच वर्षभर बदल न करता हिवाळयासाठी सुद्धा मानावी लागेल.

******

काळयावरील पांढरे ----!

******

विचारवंतांची व्याख्याने आपल्याला अंतर्मुख करण्यास भाग पाडतात. ८ जानेवारी २०२० रोजी सहकारनगर मधील मुक्तांगण सभागृहात सहजीवन व्याख्यान मालिकेचे पुष्प जेष्ठ विधिज्ञ अडव्होकेट पदमश्री श्री. उज्ज्वल निकम यांनी व्याख्यान रूपाने गुंफले

पांढऱ्या कोटा मधील डॉक्टरांची प्रसिद्धी त्याने किती रुग्णांना जीवदान देऊन वाचविले यावरून ठरते.

या उलट काळया कोटा मधील वकिलाची प्रसिद्धी मात्र त्याने किती आरोपीना जन्मठेप अथवा फाशी सुनावली या वरून ठरते हा मोठा विरोधा भास आहे.

शहाण्यांनी कोर्टाची पायरी चढू नये असे म्हणतात पण योग्य न्याय मिळण्यासाठी तज्ञ वकील हाताशी असावाच लागतो.

त्यामुळे वकीलांवर मोठी जबाबदारी असते.

देवाशपथ खरे सांगेन खोटे सांगणार नाही अशी शपथ घेऊन, साक्षीदारांना पेचात पकडणाऱ्या वकिलांची कसरत न्यायालयात पाहावयास मिळते.

पण सर्व सामान्य माणसांना असे यशस्वी व प्रसिद्ध वकील प्रत्यक्ष पाहण्याची संधि दुर्मिळ अशीच असते. ती उणीव या व्याख्यानाने भरून निघाली.

त्यांचा मुख्य विषय होता हैद्राबाद मधील बलात्कार करणारे दोषीं आरोपीना प्रत्यक्ष घटनास्थळी गोळया घालून ठार करण्यात आले हे योग्य कि अयोग्य... ?

कायदा गाढव असतो असेही म्हटले जाते. कारण अनेक आरोपी सुटले तरी चालतील पण निरपराध व्यक्तीस शिक्षा होता कामा नये. असेही सूत्र वकिलांना व न्यायाधीशांना ध्यानात ठेवावे लागते.

उज्ज्वल निकम यांनी आपल्या ज्ञानाचे जोरावर अनेक आरोपींना शिक्षा सुनावली आहे.

त्यांनी आपल्या भाषणात न्याय लवकर मिळावा अशी व्यवस्था असावयास हवी हे मान्य केले. परंतु एकूणच खटल्यांची संख्या वकिला / न्यायाधीशांच्या तत्परतेच अभाव दिसून येतो.

तसेच फाशीच्या शिक्षेस राष्ट्रपतींकडे गेलेल्या दयेच्या अर्जास हि ३ महिन्याचा कालावधी असावा अन्यथा तो अर्ज अमान्य झाला असे समजून पुढील कार्यवाही व्हावी असेही त्यांनी आपले मत मांडले.

अन्यथा न्याय दानास उशीर हा देखील अन्याय ठरू शकतो.

पोलीसही चार्ज शीट ठेवताना अनेक निरपराध व्यक्तींना अडकवू पाहतात हेही त्यांनी सोदाहरण पटवून दिले.

हैदराबाद केस मधील आरोपीना तात्काळ यमसदनास पाठविल्याने सर्व सामान्य जनतेस आनंद झाला असला तरी अशी प्रथा योग्य नव्हे.

त्यामुळे अनेक सत्य गोष्टी पडद्याआडच राहिल्या आहेत.

म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो असे म्हणतात.

प्रश्नोत्तराचे काळात अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

भावी वकिलांना तुम्ही काय सल्ला द्याल यावर त्यांनी

प्रामाणिक पणे सचोटीने अभ्यासपूर्ण अशी आपल्या पक्षकाराची बाजू मांडावी उगीचच न्यायाधीश आपल्या ओळखीचे (खिशात)  आहेत हे दाखवून आपणच केस जिंकू अश्या भ्रमात राहू नये.

(अलोट गर्दी जमल्याने)  त्यांची व्याख्यानाला गर्दी जमेल का.. ? या शंकेने कार्यक्रमास येऊ शकत नसल्याचा निरोप दिला होता.

परंतु संयोजकांच्या प्रेमळ आग्रहा मुळे आपल्या झेड सुरक्षांसह त्यांनी मात्र आज सहकार नगर मध्ये हजेरी लावली अन श्रोत्याना मंत्रमुग्ध करून सोडले..

*****

*** आपलीच नाडी ओळखणारे --कलावंत डॉक्टर !**

**डॉ. मोहन आगाशे (४)**

*****

पुणे तेथे काय उणे. याच पुण्यात " पुरूषोत्तम करंडक " ही एकपात्री नाट्य प्रयोगाची आंतर महाविद्यालयीन स्पर्धा भरत नाट्य मंदिर येथे १९६३ पासून भरत असते.

याच माध्यमातून पुढे प्रथितयश नाट्य व चित्रपटात अनेक कलावंत चमकले आहेत.

याचे मूळ संस्थांपका पैकी एक होते पुरुषोत्तम वझे. नू. म. वि. शाळेतील एक शिक्षक होते.

मुलाचे पाय---- पाळण्यात दिसतात तर शिक्षकांना ते---- वर्गात दिसतात.

हेच वझे मास्तर मोहन आगाशे यांच्या घरी एकदा आले व माधव आगाशे याना तुमच्या मुलास मी नाटकात घेतो आहे हे सांगण्यास आलो असे सांगितले.

डॉ. मोहन आगाशे---- हे मराठा-भारतीय नाट्य व चित्रपट अभिनेते आहेत. एप्रिल, इ. स. १९९७ ते एप्रिल, इ. स. २००२ या कालखंडात हे एफ. टी. आय. आय. या संस्थेचे सर्वसाधारण संचालक होते.

इ. स. १९९६ साली नवी दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने संगीत नाटक अकादमी पुरस्कार देऊन यांना गौरविले.

शब्द गप्पा -- या कार्यक्रमात मुलाखत देताना ते फारच मनमोकळे बोलले. .

डॉ. मोहन आगाशे यांच्या जन्म भोर येथील. नू. म. वि. --एस पी --नंतर बी जे मेडिकल येथे मानसिक रोग शाखेत एम डी.. केले व तेथेच अनेक वर्ष प्राध्यापक म्हणून काम पहिले.

शाळेपासूनच त्यांनी नाटक व अभ्यास याचा समतोल राखीत आघाडी घेतली.

सई परांजपे यांच्या बालनाट्य संस्थेपासूनच त्यांची कारकीर्द सुरूझाली. बी जे. मेडिकल कॉलेजमध्ये जेष्ठ हौशी दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी त्यांना हेरले.

घाशीराम कोतवाल हे नाटक बसविले.

नाटकाच्या हौसेपायी त्यांनी बी जे मध्ये " शैक्षणिक आषाढी --कार्तिकी वाऱ्याहि " केल्या. याची प्रांजळ कबुली त्यांनी दिली.

त्यामुळे घरच्यांनाही मेडिकलचा अभ्यास खूप ---"अवघड असतो " याची जाणीव झाली ती वेगळीच.

घाशीराम नाटकातीळ उत्तम अभिनयाने त्याना चांगलीच प्रसिद्धी दिल्याने सुमारें २० वर्ष त्याचे प्रयोग चालू होते.

पुस्तक वाचून जसे लगेच स्वैपाक जमत नाही तसेच नाटकाच्या तालमी शिवाय ते चांगले वठत नाही.

२५ व्या वर्षी त्यांनी ६० वर्षाच्या नानाचा अभिनय केला होता.

त्यांनी पुढे जाऊन महाराष्ट्र शासनाचे मदतीने मानसिक आजार या विषयी संशोधनासाठी एक शैक्षणिक संस्था सुद्धा काढली.

आपल्यातील कसबी कलाकार व एक उत्तम डॉक्टर याचा मेळ त्यांनी आपल्या जीवनात छान साधला आहे.

सध्या ते भारत अमेरिका यांच्या सांस्कृतिक जीवनातील अतिश्रमामुळे होणाऱ्या विकारावरील संशोधनात प्रमुख पदावर कार्यरत आहेत.

समाजातील रुग्ण व डॉक्टर यांचे संबंध पूर्वी प्रमाणे सुरळीत व्हावे म्हणून त्यांनी... " जरा समजून घ्या " हा प्रयोग त्यांनी सुरु केला आहे.

विविध पदे व नाटक -सिनेमा याचा मेळ तुम्ही कसे राखता यावर त्यांनी, " गृहिणी जसे घरातील स्वैपाक --व कुटुंबाचे हवे नको व आजार पण या बाबत समतोल साधते त्याच प्रमाणे मी करतो असे सांगितले "

तसेच आयुष्यात.. " लग्न ही वेळेवर विशिष्ट वयात करावयाची गोष्ट ". ती मात्र त्यांना त्यांच्या व्यस्त आयुष्यात जमली नाही. अशीही पुस्ती जोडली.

जैत रे जैत... या गाजलेल्या चित्रपटात त्याना त्यांच्या भूमिके नुसार, अंगावर पुरेसे कपडे देखील व्यवस्थित घालावयास मिळाले नाही.

त्यामुळे मित्रही म्हणत किती रे लो बजेट चित्रपटात तू काम करतोस..

त्याची भरपाई त्यांनी स्वित्झर्लंड येथे चित्रित झालेल्या चित्रटातील प्रेसिडेंट च्या भूमिकेत दररोज नव नवीन टीप टॉप सूट घालावयास मिळे व देखणी गोरीपान नटी सुद्धा सोबतीला होतीच व ८-१० दिवस तेथील हॉटेल वास्तव्याचा लाभ झाला, याने भरून निघाल्याचे सांगितले.

त्यांच्या दोन रशियन मैत्रिणी आहेत. त्यापैकी एकीला त्यांनी मराठी शिकविण्याचे काम केले. एकीने पंढरीची वारी व पुण्यातील गणपती मिरवणुकीत नृत्यही केले आहे व त्यांवर प्रबंध लिहिला आहे.

त्यांनी अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले त्यावेळी अध्यक्षीय भाषण अगोदर लिहून न ठेवता उत्स्फूर्त पणे ऐनवेळी केले. ते केवळ नट असल्यानेच जमले.

राजकारणातील मुरब्बी मा. शरद पवार यांनी त्यावेळी वादग्रस्त ठरलेल्या " घाशीराम कोतवालच्या रशिया दौऱ्याचे

वेळी " गुप्तपणे मध्यरात्री स्पेशल विमानाची व्यवस्था केल्याचा प्रसंगही त्यांनी सांगितला.

त्यांच्या नाटकातील ग्रुप मध्ये चान्गल्या पैकी इंग्रजी त्यानाच बोलता येत असल्याने एकदा अमेरिकेत त्यांच्या ग्रुपचे पासपोर्ट गहाळ झाले असता. विविधदेशातील मित्रांच्या साहाय्याने एका दिवसात पर्यायी पासपोर्ट मिळविल्याचा प्रसंग हि त्यांनी सांगितला.

पदमश्री -पुरस्काराने सन्मानित डॉ. मोहन आगाशे यांनी डॉक्टर --ऍक्टर -कौन्सिलर --डिरेक्टर अश्या विविध पदावर आपला ठसा उमटविला.

अलीकडेच त्यांचा " अस्तु हा चित्रपट " व एका लग्नाची तिसरी गोष्ट ही मालिका चांगलीच गाजली आहे. ती सर्वांनी आवर्जून पहावी असे त्याना वाटते.

*****

**हास्य --एक औषध ---!**

*****

घरात हसरे तारे असता मी पाहू कशाला नभाकडे... ?

यावरूनच आपल्या हसऱ्या बालकांचे हास्य किती महत्वाचे असते ते आई कडून कळते.

Laughter is the Best Medicine.. ! असे हि म्हणतात.

हास्यासाठी मागील काळात सर्कशीतील जोकर ---पु. ल. सारखे विनोदी लेखक, अत्रें सारखे हशा आणि टाळया घेणारे वक्ते, शंकर पाटील, द. मा. मिराजदार सारखे
विनोदी कथाकथन करणारे लेखक,

यावर आपण अवलंबून रहात असू.

आजकाल मात्र त्यासाठी हास्य क्लब, प्रसार माध्यमांमुळे पाहू शकणारे,... हवा येऊ द्या, फु बाई फु, हास्य सम्राट, हास्य कवी संमेलन तसेच कीर्तनकार हा. भ. प. इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन सारखे विविध कार्यक्रम याची जोड त्यास मिळाली आहे.

त्यासाठीही डॉक्टरांचाच पुढाकार आहे, मुंबईचे डॉ. मदन कटारिया आणि टी व्ही वरील डॉ. निलेश साबळे

पौराणिक कथेच्या दाखल्यानुसार, प्रियकर नलाच्या विरहामुळे आजारी पडलेल्या दमयंतीला औषधाची विचारणा केली असता तिने "**औषध** नलगे **मजला**" असे उत्तर दिले त्यावरून इतरांनी "तिला **औषध** नको (**न लगे**) "असा अर्थ काढला तर खरे पहाता तिच्या मनातून "मला नल हेच **औषध**(नल गे)" असे तिला खरे तर म्हणायचे आहे.

हास्यामुळे आपल्या मनावरील ताण कमी होऊन स्नायूंना शिथिलता येते, आपली रोग प्रतिकारशक्ती वाढीस लागते आणि तणाव निर्माण करणारे हॉर्मोन्सचा स्त्राव घटतो.

हास्यमुळे वेदना शमतात, आपली क्रय शक्ती वाढते, हृदय व मेंदूकडे प्राणवायू पुरवठा सुस्थित होऊन सहन शक्तीवाढीस लागते.

इ. स. १३०० मध्ये हेन्री मोंडेव्हीले या शल्यविशारद डॉक्टरांनी ऑपरेशन नंतर या हास्य उपचाराचा प्रसार केला. नॉर्मन

कोसीन ह्या पत्रकार व प्रोफेसर याने सुद्धा हास्यावर आधारित उपचाराची पद्धती विकसित केली .

हास्यामुळे रक्तवाहिन्या व हृदयाचे स्नायूंचे नुकसान होण्यापासून संरक्षण मिळते.

१० -१५ मिनिटे हसण्याने ५० पेक्षा जास्त उष्मांक (कॅलरीज) खर्च होतात.

१ पौंड वजन कमी करण्यास मात्र १२ तास सतत हसण्यावाचून पर्याय नसतो असे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे.

हास्यामुळे आयुर्मान वाढते.

हास्याचे काही प्रकार सुद्धा आहेत ---

आनंद --अडचण --फजिती --गोधंळलेली अवस्था, नैराश्य, उपहासात्मक, शिष्ठाचार, विकट, दुर्दैवी रावण हास्य.

हास्यामुळे शरीरात कांही रासायनिक बदल घडून येतात. एनडॉर्फिन द्रव्य मेंदूतील मज्जातंतू मार्फत स्त्रवले जाते. या मुळे आपल्या मनात चांगली भावना तयार होते.

खोटे खोटे हसले तरी हे द्रव्य स्त्रवलेच जाते कारण मेंदू खरे खोटे हास्य यातील फरक जाणत नाही. हसतानाच्या चेहऱ्यावरील स्नायूंच्या हालचालीवरून हे द्रव्य स्त्रवते.

हसल्याने फुफ्फुस पेशींतील अशुद्ध हवा बाहेर पडून त्यांचे आकारमान वाढते व प्राणवायूचा जास्त पुरवठा होतो.

हास्य हे सांसर्गिकही असते. हसण्याच्या आवाजाने व केलेल्या विनोदाचा परिणाम चेहऱ्याच्या स्नायूंवर होतो व सहजपणे हसू फुटते

मानवी आरोग्यास हास्य फायदेशीर असले तरी " **हास्य हे दुधारी शस्त्रा** "प्रमाणे आहे हे हि ध्यानात घ्यावे लागते.

हर्षवायू नावाच्या प्रकाराने मृत्यू देखील संभवतो. अत्यानंदाने हसू आल्यास अति तेथे माती अशी अवस्था होऊन जाते. खूप जोर जोरात हसल्याने गुदमुरून मृत्यू ओढवू शकतो.

प्रमाणात केलेले हास्य हृदयास उपयुक्त असले तरी अति हास्याने श्वसनास अडथळा निर्माण होऊन नायट्रस ऑक्साईड या हास्य वायूच्या अतिरेकाने मृत्यू ओढवतो.

याच वायूचा संमोहन शास्त्रात (अनास्थेशिया) अल्प प्रमाणात उपयोगकरून रुग्णावर विना वेदना शस्त्रक्रिया केली जाते.

अतिहास्यामुळे मेंदूतील रक्तवाहिन्या फुटून, हृदय क्रिया अचानक बंद पडणे, फुफ्फुसे अकार्यक्षम होणे. फिट्सचे झटके येणे, गुंता गुंतीचा हर्निया अश्या विविध कारणाने मृत्यू ओढवू शकतो.

"It seems that it's absolutely true that '**laugh** and the whole world laughs with you, " said Sophie Scott, a neuroscientist at the University College London.

फक्त मनुष्य प्राण्यासच हास्य कला अवगत आहे.

हसा आणि लठ्ठ व्हा असे म्हणण्याचा हि प्रघात आहेच की.

मग काय थांबलात का... ?

हसताय ना ----हसायलाच पहिले.. !

******

**जोश्यांची फळबाग ---!**

**(नाट्य- टी व्ही- सिनेकलाकार --हृषीकेश जोशी यांच्या कॉमेडी ट्रीट --- वर आधारीत)**

******

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा चन ----!

असे जरी गीतेमध्ये म्हटले असले तरी हल्लीच्या स्मार्ट युगात लगेचच फळे देणारी झाडे उपलब्ध आहेत.

त्यातही फळझाडे जास्त जवळची वाटतात.

फळे हि केंव्हाही आपल्या पोटाला आधार वाटतात. न्याहारी असो, उपवास वा भोजनोत्तर डेझर्ट.

आजच्या इन्स्टंट टीव्ही वरील जाहिराती , नाटके व सिनेमा यामुळे त्यातील कलावंताना लगेचच प्रसिद्धी मिळते.

त्यामुळे त्यांच्या मुलाखती, सुपारी मिळणे असे प्रकार सुरु होतात.

त्यांच्या मुलाखतीत त्याना एक प्रश्न आवर्जून विचारला जातो.

काहो... आपण जाहिराती- नाटके -सिनेमा -
सिरियल्स यामध्ये लीलया मुक्त संचार करत असता.

या मध्ये काम करताना नेमका काय फरक तुम्हाला जाणवतो... ?.

त्याची उत्तरे आपापल्या कुवतीनुसार प्रत्येकजण देत असतो.

पण हृषीकेश जोशी या हरहुन्नरी कलाकाराने तर आपल्या पुढे याच प्रश्नाचे उत्तर देताना -----

त्याची फळबागच आपल्या पुढे उभी केली आहे.

त्याचाच हा परामर्श लेख -----

१) सिरीयल मध्ये काम करणे ----(हे सीताफळ खाण्यासारखे आहे)

******

सीताफळ हे फळ बाहेरून दिसते तसे अजिबात नसते.

ते खाण्याची काही ठोस पद्धत नाही, जो तो आपल्या वकूबा नुसार खातो, त्यामुळे कसेही खाल्ले तरी ते खाताना बर्बट होतेच होते.

ते एकतर खात खात थुंकावे लागते किंवा थुंकत थुंकत खावे लागते.

सीताफळा मध्ये खाण्या पेक्षा फेकण्याचा भाग अधिक असतो त्यामुळे दोन चार सीताफळे खाल्ली तरी त्याने पोट भरत नाही.

तसेच हे ४-८ दिवसात खराब होणारे फळ आहे.

सीता फळाचा एक उत्कृष्ट चवीचा (सीताफळ रबडी)  काळहि येतो.

पण हा काळ कधी येईल हे सांगता येत नाही.

#

२) जाहिरातीत काम करणे -----(हे केळे खाण्यासारखे आहे)

******

केळ हे बारमाही उपलब्ध असते. ते अलगद सोलून सम्पुर्णपणे पटकन खाता येते.

त्या केळया प्रमाणेच ते खाल्ल्याने आपल्या चेहऱ्यावर तकाकी येते. , भरपूर जीवनसत्वे त्यातून मिळतात.

भुकेला चार केळी हाताशी असले की भागून जाते व जेवणानंतरही भरल्या पोटी खाण्यास हरकत नाही आरोग्यास उत्तमच.

तसेच आपण कधी कधी निष्काळजी पणाने त्याची साल रस्त्यात फेकली तर त्यावर पाय देणाऱ्यास आस्मान हि लगेचच दिसून येते.

#

३) सिनेमात काम करणे ----(आंबा खाण्यासारखे आहे)

******

आंबा हे एक एक उच्च प्रतीचे फळ आहे. तो चिरून फोडी करून अथवा रस करून खाता येतो.

आंबा आणायला जाताना तो खरेदी करण्याची आपली ऐपत आधी सिद्ध करावी लागते.

चिकू आणायला जातो असे म्हणून जाता येत नाही.

त्यामुळे आपल्याला आवडणाऱ्या मोजक्याच मित्रांना बोलावूंन याचा आस्वाद घेता येतो.

याचे गाव जेवण घालता येत नाही.

आंब्याच्या लोणचे --आईस्क्रीम ---मस्तानी असे लोकप्रिय व आवडीचे पदार्थ बनविता येतात.

हापूस --पायरी --देवगड --कर्नाटक --लंगडा --तसेच शेवटी चोखून खाण्याचा गावठी आंबा.

आंबा हा आंबाच असतो तो त्याच चवीने खाल्ला जातो.

तरीही सुरवातीचे काळात एकाच वेळी छान लागतो म्हणून वाटेल तसा हादडता येत नाही.

अन्यथा धेंडाळी लागलीच म्हणून समजा. त्यामुळे थोडा थोडा असाच त्याचा समाचार घेत जावा.

एकदा सवय झाली की मग सिझन संपे पर्यंत आंब्याचा यथेच्च समाचार घेतला जातो.

आंबा जसा फळांचा राजा गणला जातो तसेच नटाची इति कर्तव्याता सिनेमातच उठून दिसते.

#

४) नाटकात काम करणे -----(सुपारी सारखे असते)

*****

सुपारी हि कोठेही टांझानिया मिझोराम अश्या ठिकाणी उगवत नाही

. परंपरा असलेल्या मातीमध्येच (कोकणात)  ती उगवते

सुपारी चांगली असेल तर वर्षानुवर्षे टिकते. पण खराब असेल तर त्याची त्याची भुकटी होण्यास अजिबात वेळ लागत नाही. .

सुपारी हे एक व्यसन --लत असते.

भरल्या पोटी किंवा उपाशीपोटी सुपारी खाण्याची मजा काही औरच असते.

लहान मुलांनाही त्याचे आकर्षण असते.

आपल्या समोरची व्यक्ती मुजोर असेल तर सुपारी फेकून मारण्या सारखे कडक दुसरे हत्यार नाही.

तात्काळ घायाळ करण्याची तिच्यात ताकद असते.

. सुपारी हि बारीक तुकडे करून तोंडात टाकल्यानंतर हळूहळू बारीक करून मग त्यात हळूहळू गोडी उतरते. त्यास बराच कलावधि जातो.

त्या दरम्यान सुपारी कधी कधी लागते--जीभ फाटते --हिरड्यातून रक्त येते असे प्रकार होतात पण ते इतरांना त्यातील काहीही समजत नाही.

त्यामुळे सुपारी हे एक कठीण असे फळ आहे हे ध्यानात येते.

#

५) नट -----(ऊसा --प्रमाणे असतो)

नट हा घरातील ठेवलेल्या काठी प्रमाणे असतो. .

परंतु ऊसालाही उत्तम प्रकारची माती लागते. भरपूर पाणी लागते. खाण्या योग्य होईपर्यंत खूप काळजी घ्यावी लागते.

एकदा का तो खाण्या योग्य झाला की या पुढे त्याच्यावर असंख्य अत्याचार होत जातात.

त्याला शेतातून उपटणे --त्याचे बुढके -शेंडे कापणे. त्याच्या मोळ्या करून बैल गाडीत भरणे. (दौऱ्यावर जातानाची अवस्था)

साखर कारख्यान्यात नेऊन त्यास चरकात घालून " चिपाड " होईपर्यंत रस काढून घेणे व नंतर त्यास फेकून देणे.

अश्याच प्रकारे नटाची अवस्था शेवटी होत जाते. व हाच नटसम्राट ---

कोणी घर दे ता का घर म्हणून टाहो फोडू लागल्याचे आपणास दिसून येते.

******

https://www. youtube. com/watch?v=kfnfEcywI_

यु टब वर याचा व्हिडीओ उपलब्ध आहे त्याचाही आस्वाद घ्यावा.

*****

**मुलखावेगळ्या मुली… … !**

**शाळे बाहेरच्या शाळेतून घेतलेली उंच भरारी… !**

*****

ही आवडते मज मनापासुनी शाळा,

लाविते लळा ही जशी माऊली बाळा!!

ही झाली आपली पारंपरिक शाळेबाबतची कल्पना.

परंतु शाळेतील शिकवणे मनापासून न आवडणाऱ्या आपल्या मुलीला ८ वी पासूनच सरळ शाळेतून काढून घरीच राहून,

शिक्षण घ्यावयास लावून १० वी व १२ वी च्या किचकट, अवघड परीक्षेस चक्क फाटा देऊन,

थेट अमेरीकेतील मॅस्याच्युसेट येथील विद्यापीठात प्रवेश मिळविलेल्या मुलखावेगळ्या मुलींचीचीच आहे हि असत्य---- वाटणारी सत्य कथा.

डोंबिवली-- मुंबई येथील सुप्रिया जोशी --या कॅन्सर झालेल्या मुलांच्या उपचारासाठी असलेल्या केंद्रात कामास होत्या.

त्यांची मुलगी मालविकाने - आपले शाळेत मन रमत नाही अशी तक्रार केली.

कारण एके वेळी तिला भूगोल विषयात फारच कमी गुण पडले.

मुलीच्या या तक्रारीकडे त्यांनी फार गंभीरतेने पहिले.

त्या दिवशी त्यांनी फायू स्टार हॉटेल मध्ये जाऊन त्यांना आनंद दिला.

शाळेला ८अव्या इयत्तेतच राम राम ठोकून घरूनच शाळा शिकण्याचा धाडसी निश्चय केला.

येथे मात्र --शाळा सुटली पाटी फुटली. असा अनुभव आला

७ वी पास असलेल्या विद्यार्थ्यास बाहेरून १० वी बोर्डाचे परीक्षेस बसता येते असं नियम आहे.

विल विल फाईंड अ वे.

प्रयत्ने कण वाळूचे रगडीता तेल हि गळे.

या शाळेत अभ्यासलेल्या म्हणींचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे ठरविले.

आपल्या मुलीच्या कलाने तिच्या आवडीच्या मोजक्याच विषयानुरूप घरीच शिकविणे सुरू झाले.

मालविका, अर्थातच आनंदाने व उत्साहाने अभ्यासात रस घेऊ लागली.

. शिक्षण घेताना मुलं खुशीत असणे फार महत्वाचे असे तिच्या आईचे मत होते.

पारंपरिक शाळेत नावडत्या विषयांचाही नाईलाजाने परीक्षा असल्याने अभ्यास हा करावाच लागतो.

हे त्यांना मान्य नव्हते.

.

त्यामुळे मध्यमवर्गीय असून हि व मालविका शाळेतील अभ्यासात हुशार असून हि घरी राहून शाळा शिकविण्याचा मोठा धाडसी निर्णय घेतला.

व आपली नोकरी देखील त्यांनी सोडून दिली.

मध्येच मालविका म्हणे आई. आपला हा निर्णय चुकला तर... ?

या वर आईने उत्तर दिले यात आपण यशस्वी झालो तर... ?

अन सुरू झाला दाट अंध:कारातून एका नव्या न दिसणाऱ्या उजळ प्रकाशाकडे वाटचाल.

आजूबाजूच्या पालकांना आश्चर्याचा धक्का अन त्यांनी आपल्या मुलींना शाळा " सोडलेल्या " या मुलीपासून--- दूर दूर रहाण्याचा सल्ला न दिला तरच नवल.

मालविकाने एकटीने आपला अभ्यास भला न आपण असे आईच्या सहकार्याने पुढील वाटचाल सुरु ठेवली.

मालविकाही मोजक्याच आपल्या आवडीच्या विषयाचा अभ्यास आवडीने व एकाग्रतेने करू लागली.

गणित व कम्प्युटर प्रोग्रयामींग या विषयात तिला अधिक रस असल्याचे त्यांना आढळले.

कांही तंज्ञांचं मार्गदर्शन मिळाले.

घरीच अभ्यास करूनही जात्याच हुशार मालविकाने चेन्नई येथील म्यॅथेम्याटिकल इन्स्टिट्यूट एम. ए. सी. कोर्स ला प्रवेश मिळाला.

पुढे इंटर न्याशनल प्रोग्रयामींग ऑलिम्पियाड मध्ये तीन वेळा भारताचे प्रतिनिधित्व केले. व दोन वेळा रौप्य व एक वेळा ब्राँझ पदक मिळविले.

खरे तर आय आय टी प्रवेश परीक्षा एव्हढया गुणवत्तेची हि परीक्षा आहे.

पारंपरिक १०वी व १२ वी - जे ई ई -परीक्षा उत्तीर्ण नसल्याने **भारतातील नियमानुसार**, आय आय टी मध्ये तिला प्रवेश मिळू शकला नाही.

परंतु अमेरिकेतील उत्तम अश्या एम आय टी मध्ये मात्र ऑलिम्पियाड उत्तीर्ण असल्याने सहज प्रवेश तर मिळालाच वर स्कॉलरशिप सुद्धा मिळाली.

सध्या ती कम्प्युटर शास्त्र विषयात पुढील शिक्षण घेत आहे.

हाच मुख्य फरक आपल्या अन अमेरिकेतील शिक्षण प्रक्रियेत आहे. त्यामुळेच तिकडे हुशार विद्यार्थ्यांचा लोंढा असतो.

मालविकाची दुसरी बहीण **राधा** हिने हि ताईचा कित्ता गिरविला. तिला गिर्यारोहण व निसर्गात रमणे आवडू लागले. त्या विषयात तिने अभ्यास सुरु केला.

या विषयाला " **अर्थ सायन्स** " असे नाव आहे असेही पुढे समजले. त्यासाठी विविध कॉलेज --व लायब्ररीची मोफत सोय तिला उपलब्ध झाली आहे.

**Earth science** or **geoscience** includes all fields of natural science related to the planet Earth.

This is a branch of science dealing with the physical and chemical constitution of the Earth and its atmosphere.

Earth science can be considered to be a branch of planetary science, but with a much older history.

Earth science encompasses four main branches of study, the lithosphere, the hydrosphere, the atmosphere, and the biosphere,

each of which is further broken down into more specialized fields.

अश्या प्रकारे या विषयात तिची घोड दौड सुरूआहे.

अश्या तर्हेने सुरुवातीस तर्हेवाईक वाटणारा निर्णय यशस्वीपणे फलद्रूपास आला आहे.

आपल्या मुलांमधील आत्मविश्वास ओळखून त्यांच्या मनाप्रमाणे मुक्त पणे अभ्यास करून घेणाऱ्या पालकांची संख्या आता वाढीस लागली आहे

पारंपरिक शाळेच्या वेळेचे --वेळापत्रकाचे झुगारून मानस येईल तेंव्हा अभ्यास --खेळ-- मनोरंजन --सहली याचा पालकांसमवेत ताळमेळ साधला असता असा चमत्कार घडू शकतो

हेच या वरून उमगते. व मुलांमधील प्रज्ञा उदयास येते.

आणि --- या मुक्त शिक्षण पद्धतीमुळे " हे विश्वची माझे घर " याची प्रचिती येते.

******

**व्यन्गचित्रे ---एक नि:शब्द कला... !**

******

‘विनोद ही डोळ्यांत अंजन घालून त्यातील घाण दूर करणारी एक शलाका आहे’ असं साहित्यसम्राट न. चिं. केळकरांनी म्हटलं आहे. यावरुन विनोदी साहित्याचं महतत्व स्पष्टपणे प्रतीत होतं.

विनोदी लेखन, विनोदी कविता अथवा व्यंगचित्रे हेही एक प्रकारे डोळ्यांत अंजन घालण्याचेच काम करतात.

व्यंगचित्रे जशी करमणूक करतात तसंच अंतर्मुखही करतात.

आपल्याकडं व्यंगचित्रांची मोठी परंपरा आहे. दिवाळी अंकांनी या व्यंगचित्रांना कायमस्वरुपी व्यासपीठ मिळवून दिलं आहे.

विनोदी दिवाळी अंकांमध्ये अनेक व्यंगचित्रकार आपल्या शब्दरेषांनी वाचकांना हसवतात.

यामध्ये एक नाव आवर्जून घ्यावं लागेल ते म्हणजे कॉमन मॅन रेखाटणारे आर के लक्ष्मण --शि. द. फडणीस ---हरिश्चन्द्र लचके ----बाळासाहेब ठाकरे ---राज ठाकरे --- चिंटू

फेम वाडेकर --पंडित हे महाराष्ट्रातील आपले ओळखीचे आहेतच.

दैनिकं वर्तमान पत्रात एका ठराविक कोपऱ्यात याचे हमखास स्थानअसते, साप्ताहिकं, मासिकं आणि दिवाळी अंकांमधून विविध विषयांवरआपण व्यंगचित्रं रेखाटलेली पाहतो.

काही हास्यचित्रं अथवा व्यंगचित्रं ही घटकाभर करमणूक करतात. ती पाहिल्यानंतर वाचक खदाखदा हसू लागतात.

पण ते फारसे टिकावू नसतं. याउलट बुध्दीला आणि मनाला आव्हान देणारं व्यंगचित्र हे वाचकाच्या मनावर आपली पकड घट्ट बसवू शकतं.

व्यंगचित्रांची निर्मिती केवळ हसविण्यासाठी, मनोरंजन करण्यासाठीच न करता समाजातील वाईट चाली-रिती,

अनिष्ट रुढी-परंपरा अथवा मानवी स्वभावातील वाईट गोष्टींवर कोरडे ओढण्यासाठी करण्यावर त्यांचा विश्वास आहे.

अशा व्यंगचित्रांतून वरवर दिसणारा विनोद हा मानवी स्वभावाच्या दुर्गुणांवर मार्मिकपणे टीका करतो.

दक्षिण भारतात त्यातही कर्नाटक--- मधील एक साधा नागरिक **बी व्ही राममूर्ती** "मिस्टर सिटीझन "हा एक दुबळा वाटतो, चार्ली चॅप्लिन सारखा.

कमीत कमी रेषा हे त्यांचे खास वैशिष्टय त्यातील मोकळ्या जागेने रेषांचे सौन्दर्य वाढते हेही तितकच खरे.

दहा मिनिटात ते टाक शाईत बुडवून ते थेट चित्र काढतात. चित्रातील उत्स्फूर्तता व सहजता जपण्यासाठी मी हे करतो असे ते म्हणतात.

दैनंदिन व्यन्ग चित्र काढणारे ते दक्षिण भारतातील एकमेव कलाकार आहेत. त्यांचा विनोद हा नर्म विनोदी, सूक्ष्म, बुद्धिवादी परंतु दंश करणारा असणार नाही असा असतो.

उत्तर भारतातील असेच एक वयंगचित्रकार सुधीर दार. मूळचे काश्मिरी असलेले यांचा जन्म अलाहाबाद येथील.

१९६१ दिल्लीच्या स्टेट्स्मन वृत्तपत्र कार्यालयात पाच शब्द रहित हास्य चित्र घेऊन प्रवेश केला.

संपादक एक ब्रिटिश गृहस्थ होते.. त्यांची चित्रे ठेवून घेतली. फारशी दखल घेतली नाही.

परंतु ती सर्व चित्रे त्यांना त्याच पत्रात दुसऱ्या दिवशी पाहवयास मिळाली.

अशा प्रकारे ते अचानकपणे त्याना यश मिळाले.

पुढे ७ वर्ष ते आऊट ऑफ द माईंड हा निःशब्द नॉन पोलिटिकल कॉलम चालवीत होते.

पुढे ते हिंदुस्थान टाईम्स मध्ये गेले. तेथे त्यांना राजकीय विषय हाताळण्याची सुद्धा मुभा मिळाली.

वरील दोघांची चित्रे परदेशी नियतकालिकात तर आलीच परंतु इंग्लंडची राणी, हेन्री किसिंजर इ. लोकांच्या संग्रही सुद्धा या भारतीयांची चित्रे आहेत.

हे खूप मानाचे असे चिन्ह आहे.

थोडक्यात, व्यंगचित्र हे मनाला आनंद देणारे एक प्रभावी माध्यम आहे.

तथापि , बोधामृताचे कडू कोयनेल 'हास्यरुपी साखरेच्या' आवेष्टनातून दिल्यास त्याचा योग्य परिणाम होतो.

******

**निस्वार्थ प्रेमाचे---" नूतनीकरणच जणू " -----!**

******

भारत हा वार्षिक विपुल सणा समारंभाचा देश आहे.

माणसा माणसातील तील स्नेहभाव -बंधुभाव जागृत करण्यासाठी हे सण साजरे केले जातात.

हिरव्यागार शालूने नटलेल्या श्रावणात येणारी राखी पौर्णिमा हीच नारळी पौर्णिमा, याच दिवसाला **'रक्षाबंधन'** म्हणतात.

हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे.

श्रावण पोर्णिमेस भावाचे औक्षण करून बहीण राखी बांधते -- भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो.

या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

राखी बांधताना बहिणीने म्हणावे, ----

******

येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल ॥

(दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होत तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे.)

"राखी' ह्या शब्दातच "रक्षण कर' - "राख म्हणजे सांभाळ' हा संकेत आहे. कुठल्याही कर्तबगार, धाडसी शूरवीराने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, असहाय, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे.

यातला गर्भित अर्थ नात्याचे रक्षण करणे हाच आहे.

एका अर्थाने बहीण भावांच्या प्रेमाचा आनंदाने हा " नूतनीकरण " साजरा करण्याचा सोहळाच जणू .

यंदाचे २०२० वर्षी मात्र " **घरात सुरक्षित राहूनच ----" रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा. "...** !

*****

**दैनंदिन परिचितांचा... संवाद ----!**

******

सध्याचा काळ हा प्रत्येकाने अंतर्मुख होऊन आपला आपल्याशीच संवाद करण्याचा असा आहे.

गेले तीन चार महिने घरातील कामवाली नसल्याने सौ. वर घरगुती कामाची जबाबदारी वाढली.

तसेच घरात बसून हे नुसतेच पहात बसणे हे सुद्धा अति होऊ लागले.

आणि मी सुद्धा थोडा हातभार लावावा म्हणून झाडू-पोचा व भांडी धुणे यात खारीचा वाटा उचलण्यास सुरुवात केली.

आणि काय... ?

हे ग्याजेट्स च चक्क माझ्याशी बोलू लागली की... !

**झाडू --**

*****

" अरे, तू भले डॉक्टर असशील. स्वछता आणि साफ सफाई हा तर तुमच्या शाखेचा मूल मंत्र.

पण आज पर्यंत मला हात लावल्याचे कधी. दिसले नाही.

कोपऱ्यात उभा असताना मला दिसत होतेच की

आता तुला समजले असेल माझा हात धरून घरातील काना कोपरे जाळी जळमटे कसे साफ करावेत.

अन घर कसे स्वच्छ करावे हे समजलेच असेल.

अन घर साफ करताना हात कसे दुखतात याचाही अनुभव सुद्धा आला असेलच आता तुला.

लादी.. फरशी पुसताना आपण न घसरता करावयाची कसरत, हे अनुभवून बायकोने आज पर्यंत कसे निमूटपणे कंबर दुखण्याची तक्रार न करता केली असेल. ? याची नुसती कल्पना तर करून बघ. .

**बेसिन ----**

*****

अरे, भल्या माणसा माझ्या पुढ्यात चमचा, वाटी पासून ते कढई पातेल्या पर्यंत नाना तर्हेची भांडी सतत तुम्ही टाकतच असता सारखी.

आताशा दिवसातून दोन वेळा माझ्या समोर निमूटपणे उभे रहाताना व माझी ओटी खाली करताना कळले असेलच खरकटी भांडी कशी प्रथम विसळून घेऊन त्यातील सर्व खरकटे व्यवस्थित बाजूला करून, साबण लावून मन लावून हळुवार पणे भांड्याचा आवाज न करता कशी साफ करावीत ते.

कढई --तवा अशी लोखंडी भांडी वेगळ्या घासणीने कशी घास घास घासावी लागतात व त्याने बावळे असे दुखू लागतात हेही उमगले असेलच तुला चांगले.

याचे बाळकडू या... लॉक डाऊनच्या काळात तुला चांगलेच मिळालेलं दिसून येतय

.

अशीच प्रगती चालू ठेव व बायकोला हातभार लाव ती पण दमून जाते रे बिचारी हे लक्षात घे.

आणि हो नाहीतरी हात वारंवार हात धुवायला अन कोरोनाच्या मागे हात धुवून लागायला माझे कडे यावेच लागते ना.

अन मदत केल्याचे समाधानही मिळते .

मग चालू दे असेच

भांड्यांचे कपाट ---

******

पोटोबा करण्यापूर्वी ताट अन पाट पाणी घेण्याची जबाबदारी आताशा तूला चांगली जमू लागली आहे.

धुतलेली भांडी लावताना. आमची मांडणी जेथल्या तेथे कशी करायची याची जरा तारांबळ उडत असे तुझी.

अन त्यामुळे पुन्हा भांडी शोधताना बायकोचीच भंबेरी उडत असे

आताशा भाजीची भांडी. --दुधाची पातेली -- ताक दह्याचे भांडे -- तवा -कढई-वेग वेगळया जागी पुन्हा सापडेल अशी कशी ठेवायची हे पण कळले असेलच.

अंथरून -पांघरून --

******

आताशा निवांतच उठता आपण महाशय.

अंथरून पांघरून टाकायची व काढायची सवय चांगलीच रुळलेली दिसते.

अधून मधून उशीचे अभ्रे --पांघरुणे धुवायला टाकावी लागतात हे ही कळू लागलेले दिसतंय.

नाहीतर या अगोदर फ्रेश पांघरून घेऊन डाराडूर झोपण्याची मात्र मोठी हौस.

**वॉशिंग मशीन ---**

*****

मला सुरु करण्यास... दोन तीन बटणाचा खेळ त्यास लागतातही दोन मिनिटे.

पण या बाबानी आतापर्यंत ढुंकून माझ्याकडे कधी नजर फिरविली नव्हती.

आता भिजविलेले कपडे माझ्या मार्फत धुवून घेऊन, ड्रायर झाल्यानंतर इझी ड्राय च्या दोर्यावर वर्गवारीने वाळू घालण्याचे तंत्र चांगलेच जमलंय की या डागदर बाबाला अन वर बायकोबी खुश.

फक्कडसा चहा करून द्यायला मोकळीच.

चहाचे भांडे ---

*****

सायंकाळचा ५ - ६ चे दरम्यानचा आले --विलायची मिसळून केलेला बायकोपेक्षा.. " स्वतंत्र चवीचा " चहा करण्याचा मूल मंत्र जपत विविध भारतीवरची सांज धारा ची मराठी गाणी ऐकत एकत्रित पणे चहा पिऊन नाट्य रंग चे नाट्यसंगीत झाल्यावर ची पायपीट करणायचा नियम चांगलाच अंगवळणी पडलाय जणू..

**रेडिओ -----**

टी. व्ही. वरील अंगावर येणाऱ्या बातम्यांना कंटाळून तू माझा कान हळुवार पिळून जवळ येऊन बसू लागला व कान देऊन ऐकू लागला. भारतकी एक खोज,

अगदी सकाळच्या त्रिवेणी पासून सुरु होणारी मराठी गाणी, विशेष गीत गंगा, सांज धारा व नाट्य रंग मधील नाट्य गीते आवडीने पूर्वीच्या रसिकतेने ऐकू लागला अन त्यावरील टिपण काढण्यास सुद्धा सुरुवात केलीस कि पुन्हा एक वार.

लॉक डाऊनचा काळ अनलॉक होई पर्यंत हे असच चालायचं असं दिसतंय जणू.

ना कोणी पाहुणे ना कोणी मित्र मंडळी..

मिया बिबी.. अनुभवा.

लग्ना नंतरच्या सुखद आठवणींना उजाळा देत

नवा ज्येष्ठ नागरिक काळातील..

नूतन संसाराचा शुभारंभ... !

शुभास्ते पंथान:|

आम्हा सर्वांच्या तुम्हा दोघांना शुभेच्छा... !

******

**रामेश्वरमंदिर --पण कोकणातील रत्नागिरी येथील..!**

******

**श्रावण** महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे.

या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो, त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव मिळाले आहे.

भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेतला श्रावण महिना हा २३ जुले ते २२ ऑगस्ट या तारखांदरम्यान असतो.

श्रावणाला हिंदीत सावन म्हणतात, संस्कृतमध्ये श्रावण आणि नभ(स्) असे कमीतकमी दोन शब्द आहेत.

श्रावणामध्ये पावसाच्या दोन जोरदार सरींच्या दरम्यान चक्क ऊन्ह पडते. दिवसभर हा ऊन-पावसाचा खेळ चालू असतो.

श्रावणाचे ऊन नेहमीच कोवळे असते. ते ज्याला सोसत नाही ती व्यक्ती खरोखरच नाजूक असली पाहिजे.

या श्रावणातल्या उन्हाचा कोवळेपणा आणि स्त्रीचा नाजूकपणा एकत्रितपणे दर्शवणारी कवी ना. धों. महानोर यांची लावणी

'श्रावणाचं ऊन्ह मला झेपेना' आशा भोसले यांनी 'एक होता विदूषक' या चित्रपटासाठी गायली आहे.

श्रावण महिन्याला सर्व व्रतांचा/सणांचा राजा म्हटले जाते.

श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे.

या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे.

त्यामुळेच शंकराचे मंदिरात भाविकांची गर्दी होते.

व्रत म्हणजे व्रतवैकल्ये! वैकल्यांचा अर्थ विकलता ! म्हणजे बारीक होणे. स्वार्थ व परमार्थ साधणारे हे व्रत आहे.

सोमवार- श्रावणातील सोमवारी शंकराची पूजा व उपासना करण्याची पद्धत आहे.

नवविवाहित वधू लग्नानंतर पाच वर्षेपर्यंत श्रावणातल्या दर सोमवारी शिवामूठ वाहतात.

मूठभर तांदूळ व तीळ, मूग, जवस, व सातूची शिवामूठ एकेका सोमवारी एकेक याप्रमाणे शिवाला वाहतात.

असेच एक सुंदर निसर्ग रम्य सभोवताल, एका बाजूस खाडी दुसऱ्या बाजूस अथान्ग समुद्र,

जणू हिरव्या गार बेटावर असलेले हे देखणे असे रामेश्वर मंदिर आम्हास यंदा गवसले,

ते म्हणजे **रत्नागिरी जवळील काळबादेवी गावातील --- रामेश्वर मंदिर.**

येथे श्रावणात रामेश्वर कालिका सप्ताह साजरा केला जातो. गावोगाव विखुरलेले गावकरी जमतात.

पूर्वी एकदा प्लेगचीसाथ गावात आली होती. तेंव्हापासून हा सप्ताह येथे सुरु झाला आहे..

पहिला सोमवार ते दुसरा सोमवार असा हा सप्ताह चालतो. २०० वर्षांपासून येथे हि परंपरा सुरु आहे.

या दिवसात गावामध्ये दारू पिणे वर्ज्य मानले आहे.

शिव हरी रे शिव हरी रे सांब सदाशिव शिव हरी रे च गाजर केला जातो.

सप्ताह सांगता मूर्तीच्या पालखी मिरवणुकीने होते.

*****

**उत्सुकतेच्या डॉक्टर ---**

******

शारदा (**सरस्वती** --) ही ज्ञान, संगीत, कला, विद्या आणि शिक्षणाची हिंदू देवी आहे ; ती या त्रिदेवीपैकी(सरस्वती लक्ष्मी आणि पार्वती) एक आहे.

चित्रात सरस्वती शुभ्र वस्त्रे नेसलेली आणि अनेकदा कमळावर बसलेली दाखवतात आणि मोर तिच्या बाजूला असतो. हातात वीणा असते. सरस्वतीचे वाहन हंस आहे ;

पण जैन पुराणांमधून आणि लोककथांमधून सरस्वती वाहन मोर असल्याचे सांगितले जाते. (कार्तिकस्वामीचे वाहनही मोर आहे.)

हिंदू पुराणांनुसार **सरस्वती** ही विद्येची देवता मानली जाते. माघ महिन्यातल्या शुद्ध पंचमीला वसंत पंचमी वा श्रीपंचमी म्हणतात.

या दिवशी सरस्वतीचा जन्म झाल्याने हा दिवस सरस्वती जयंती म्हणून साजरा केला जातो.

आपल्या नावाला साजेशी अशी शैक्षणिक कारकीर्द जगणाऱ्या पुण्याच्या **डॉ. सौ. शारदा बापट** एक झपाटलेले असे व्यक्तिमत्व.

केवळ वैद्यकीय ज्ञानाचे उत्सुकते पोटी वयाच्या ४५ व्या वर्षी फिलिपिन्स येथे जाऊन एम. बी. बी. एस. डॉक्टर झालेल्या,

आय टी क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र कंपनी तसेच व्यावसायिक कायद्याची पदवी असलेल्या - पियानो वादन -तसेच
विमान उडविण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या,

तसेच निसर्ग आवडीमुळे सेंद्रिय शेती सुद्धा करणाऱ्या अश्या पुण्याच्या डॉ. शारदा बापट यांचा थक्क करणारा जीवन प्रवास जाणून घेणे तेव्हडेच रोमांचकारी आहे.

स्वतःच्या नावातच इतकी सकारात्मक ऊर्जा असल्याने त्यांनी आपले नाव आज यथार्थ पणे सार्थ केले आहे असेच दिसून येते.

पुण्यातील शारदा ताई या सर्व सामान्य घरातील आहेत.
बालपणापासून विविध विषयांची उत्सुकता त्यांना होती.

त्यांनी त्यांचे कलानुसार कॅम्पुटर अप्लिकेशनचे प्रशिक्षण घेतले व स्वतःची कंपनी सुरू केली.

त्यांची आई वयोमानानुसार आजारी असे व त्यांची सुश्रुषा त्या करीत असत. त्यांच्यासाठी अनेकवेळा डॉक्टरांकडे जाणे होई.

डॉक्टरांच्या तपासण्याची पद्धत त्यावरून अनुमान करून दिली जाणारी औषधे. निदानासाठी केलेल्या विविध चाचण्या,

पाहून त्यांच्यातील वैद्यकीय शास्त्रा बद्दलची उत्सुकता जागी झाली,

एंडोक्राइनॉलॉजी जाणून घेण्याचा त्यांनी पुस्तकातून प्रयत्न केला परंतु वैद्यकीच्या अभ्यासाशिवाय गत्यंतर नसल्याचे त्यांना समजले.

आपणच यासाठी डॉक्टर का होऊ नये... ? असा धाडशी निश्चय मनाशी केला.

एका मुलाची आई व सहकार्य करणारा पती यांचे समवेत संसारात चांगल्या रमल्या सुद्धा होत्या.

त्यावेळी त्यांचे वय होते ३५ वर्ष सुखी संसारात स्थिरावलेल्या असलेल्या शारदा ताईंनी घरच्यांची संमती मिळविली

आणि सुरू झाली त्यांनी डॉक्टर होण्याच्या मोहिमेची ---- तुतारी फुंकली देखील.

**अन सुरू झाली अनेकविध अडथळ्यांची शर्यत.. ती अशी ----**

त्यासाठी त्यांना मूलतः १२ वी सायन्स उत्तीर्ण होणे आवश्यक होते.

चौकशी अंती एकदा १२ वी (आर्ट्स) झालेल्याना पुन्हा १२वी करता येत नाही असे सांगण्यात आले.

परंतु त्यांना शास्त्र शाखेत १२ वी करण्यास कोणतीही कायदेशीर-- अडचण नसल्याचे त्यांनी दाखवून दिले.

व त्यांच्याच हुजूरपागा शाळेतून १२ वी शास्त्र शाखेतून उत्तीर्ण (७५ टक्के)  झाल्या

आपल्याला शिकविणाऱ्या बाईचं आहेत असे वाटणाऱ्या मुलां बरोबर शिक्षण घेतले.

आता या पुढील वैद्यकीय प्रवेशास वयाचे कांही बंधन आहे का---?.

याचे चौकशी साठी त्यांनी बी जे मेडिकल कॉलेज गाठले.

अन तो अडथळा सुद्धा दूर झाला.

सी. ई. टी. ---परीक्षा न दिल्याने येथे त्यानां प्रवेश मिळू शकला नाही.

परंतु पुण्याच्या वाडिया हॉस्पिटल मध्ये त्यावर्षी आंतर राष्ट्रीय परदेशी वैद्यकीय संस्थेच्या विद्यमाने तेथे एक पूर्व मेडिकल कोर्स सुरू झाला होता. त्यास त्यांनी प्रवेश घेतला.

पुढील प्रात्यक्षिक २ वर्षासाठी त्याना फिलिपिन्स या बेटावर जावे लागले.

फिलिपाईन्स हा आग्नेय आशियामधील एक देश आहे. प्रशांत महासागरातील ७, १०७ बेटांवर वसलेला फिलिपाईन्स

हा लुझॉन, विसायस व मिंदानाओ ह्या तीन भौगोलिक प्रदेशांमध्ये विभागला गेला आहे.

मनिला ही फिलिपाईन्सची राजधानी व त्या देशातले सर्वांत मोठे शहर आहे.

फिलिपिन्स या निसर्ग सुंदर अश्या बेटावर शाकाहारी असलेल्या सौ. शारदा ताई यांनी राहून दोन वर्ष राहून एम. बी. बी. एस. मध्ये १ले येऊन पूर्ण केले व अखेर डॉ. शारदा बापट झाल्या.

तेथील वास्तव्यात दर शनिवार -रविवारी सुटी असल्याने त्याचा उपयोग त्यांनी विमान उड्डाणाचे शिक्षण घेण्यात घालविला.

तेथे विमान उड्डाणाचा अनुभवसुद्धा घेतला.

पुण्यात आलयावर येथील नियमानुसार प्र्याक्टीस करणे साठीची चाचणी परीक्षा द्यावी लागते ती दिली.

ती हि सहज पणे पार केली. अधिकृत पणे व्यवसाय करण्यास ४४ व्या वर्षी सुरुवात केली.

सध्या त्यास काम्पुटर - मेडिकल अश्या दोन्हीच्या समन्व्ययाने त्या या क्षेत्रात कार्यरत आहेत.

लंडनच्या ट्रिनिटी कॉलेज मधून एक छन्द म्हणून पियानोवादनाचे प्रशिक्षणही घेतले.

**शिक्षण म्हणजे स्वतःच्या अज्ञानाची टप्प्या टप्प्या ने विकसित होणारी जाणीव. ----असे त्याना वाटते.**

वैद्यकीय शिक्षणाने आपल्या शरीरातीलच असंख्य गुंतगुंतीच्या अश्या विशाल विश्वाची जाणीव त्यांना झाली.

अगणित पेशींनी बनलेला मानवी देह व त्याची दैनंदिन होणारी सुसंबंध हालचाली मागील शरीरशास्त्र जाणून त्या अवाक झाल्या.

शरीरामध्ये असंख्य पेशींची सहकारी सोसायटीचं असल्याचे त्यांना जाणवले.

अश्या या **अबला... ?** म्हणविल्या जाणाऱ्या पुण्यातील एका महिलेने अभूतपूर्व अशी कामगिरी केली आहे.

सध्या पेशंट आणि डॉक्टर यांच्यात सलोखा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु आहे.

**डॉ. शारदा बापट**

**B. C. A. - L. L. B. - M. B. B. S.**

४५ व्या वर्षी अशी पदवी धारण करणारी जगात कदाचित एकमेव महिला असावी.

डॉ. आनंदीबाई जोशी या अश्याच अमेरिकेत जाऊन सर्वात कमी वयाच्या प्रथम महिला ड़ॉक्टर झाल्या याची प्रकर्षाने जाणीव झाली.

या दोन्ही महिला अर्थात पुण्यातीलच आहेत हे विशेष.

निसर्ग हा त्यांचा अजून एकआवडता विषय.

निसर्ग --प्राणी पक्षी --व माणूस यांचा ऋणानुबंध असतो याची जाणीव लहान मुलाना करून देण्यासाठी त्यांनी वानप्रस्थाश्रमातील आयुष्यात वेळ काढून ठेवला आहे.

कोणालाही कृती व शब्दाने दुखवू नये असे त्यांना वाटते.

कुतूहलाला धैर्याची जोड देऊन त्यांनी घेतलेली उत्तुंग भरारी हि अचंबित करणारी अशीच आहे.

आपल्याला हाडाचे शिक्षक असतात हे माहित आहे. हाडाचे --डोळयांचे --कान नाक घशाचे डॉक्टर्स हि परिचयाचे आहेत.

या मात्र झाल्या---- उत्सुकतेच्या डॉक्टर.

******

**आषाढस्य प्रथम दिवसे ----!**

******

वैशाख वणवा संपताच वेध लागतात ते सुखद असा मृदगंध दरवळणाऱ्या पावसाचे.

चातकाप्रमाणे आपण सर्वच जण अबालवृद्ध बळीराजा समवेत त्या पावसाच्या आगमनाची मोठ्या आशेने वाट पाहत असतो.

अन आपसूकसच पहिल्या वाहिल्या पावसा बरोबरच गत जीवनातील --"पहिल्या " वहिल्या सुखद प्रसंगाची आठवण येत रहाते.

पहिली शाळा --नवीन पुस्तकाचा सुगंध --पहिले प्रेम --पहिली वर्षा सहल---प्रेमिकेचा पहिला स्पर्श तेथे सेवन केलेली गरमागरम चहा सोबतची भजी.

आपणा जेष्ठ नागरिकाना सध्याचा निवांत वेळ हा गतकाळ आठविण्यास सुखद काळ वाटतो.

याच दिवसात नुकताच निसर्गातील धुंद वातावरण, आकाशात झालेली काळया-सावळया मेघांची दाटी, हवेतील गारवा आणि अशा या रम्य वातावरणात दूरदेशी असलेल्या प्रेयसीच्या आठवणींनी व्याकूळ झालेला शापीत यक्ष या सावळया मेघालाच आपला दूत बनवून त्याच्याकडून तिला संदेश पाठवितो, या मेघदूताची कल्पना आषाढाच्या पहिल्या दिवशी रामगिरीवरील मेघांना पाहून---- महाकवी कुलगुरू कालिदासांना सुचली.

त्यातूनच 'मेघदूत' या अजरामर खंडकाव्याची निर्मिती झाली.

या काव्यामुळे प्रेमीजनांची व्यथा-कथा तर कायम ताजी राहिलीच पण ज्या दिवशी महाकवी कालिदासांना हे काव्य स्फुरले, तो आषाढाचा पहिला दिवसही शतकानुशतके कालिदासांची आठवण देत राहिला म्हणूनच हा दिवस 'महाकवी कालिदास दिन' या नावाने साजरा केला जातो.

कालिदास कालिमातेच्या मंदिरात जाऊन कालिमातेची मनोभावे उपासना करतात.

कालिमातेच्या आशिर्वादाने ते सर्व शास्त्रांत, विद्येत पारंगत होतात.

कालिमातेच्या उपासनेमुळे विद्या मिळाल्यामुळे त्यांचे नाव 'कालिदास' असे पडले.

पुढे ते राजा विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक रत्न म्हणून प्रसिद्ध झाले.

'मालविकाग्निमित्रम्:', 'अभिज्ञान शाकुंतलम्', 'विकमोर्वशीयमः' इ. नाटके.. कुमारसंभवम्, रघुवंशम्, मेघदूतम्, ऋतूसंहारम इ. आणि अशा अजरामर काव्य रचना त्यांच्या लेखणीतून अवतरल्या आहेत.

एक जर्मन महाकवी म्हणतात की, मनुष्यलोक व देवलोक या दोन्ही लोकांचा एकत्र समावेश पाहायचा असेल, अनुभवायचा असेल तर कालिदासांचे 'अभिज्ञान शाकुंतलम्' हे नाटक रसिकांनी नक्की वाचावे.

कालिदासांच्या रचना काव्यसौंदर्यासाठी जितक्या प्रसिद्ध आहेत तितक्या शास्त्रज्ञानासाठीसुध्दा प्रसिद्ध आहेत. या रचनांमध्ये भाषाविज्ञान, सौंदर्यशास्त्र, राजकीयशास्त्र, भौगोलिकशास्त्र, ललित कला, योग शास्त्र इत्यादी शास्त्रेही आहेत.

हे महा कवीकुलगुरू कालिदास कुठे होते, भारतातील कोणत्या प्रदेशातील होते, हे आजही गूढच आहे.

त्यांनी स्वतःबद्दल कुठेच, काहीच लिहून ठेवले नाही. पण त्यांनी आपल्या भारत देशाची संस्कृती, सभ्यता, भौगोलिक सौंदर्य इत्यादीची माहिती आपल्या काव्यांतून अमर केली आहे.

म्हणूनच आज भारताच्या वेगवेगळया प्रदेशांतील साहित्य रसिकांना कालिदास 'आमचाच' आहे, असा आदर व अभिमान आहे.

विना वेदं विना जितां
विना रामायणी कथाम् ।
विना कविं कालिदासं
कीदृशी भारतीयता ।।

यामुळेच आचार्य प्र के. अत्रे यांनाही ----आषाढस्य प्रथम दिवसे.. !

असा खणखणीत शब्दालंकृत अग्रलेख --- त्यांच्या मराठा या वर्तमान पत्रात लिहिण्याचा मोह आवरत नसे

त्या कालिदासाच्या स्मृतीस ----आषाढस्य प्रथम दिवसे ---- त्रिवार वंदन... !



**शब्द पुष्पांची गुरुदक्षिणा ---!**

*****

**आयुष्यात भेटलेले,**

**समस्त -- गुरुजन वर्ग ----''**

******

**शि. सा. न. वि. वि. ----**

एखाद्या शिस्तप्रिय शिक्षक प्रमाणे शिक्षक दिन हा ५ सप्टेंबरला वेळेवर आलासुद्धा.

खरे तर गुरुजींनी दिलेल्या विद्येची शिदोरी हि जन्म भर पुरणारी अशीच असते.

त्यांच्या छत्र छायेखाली संचित केलेलं ज्ञान हे अमोल असेच असते.

प्रत्येकाची आई हि प्रथम गुरु असते. गर्भात असल्या पासूनच नाळेवाटे पौष्टिक पदार्थ व सद्विचारांचे ठिबक सिंचन नऊ महिने सुरु असते.

त्यातूनच आपल्या विद्यार्जनाचा पाया तेथेच सुरु होतो.

हाताचे बोट धरून ती नंतर आपल्याला पायावर उभे राहण्याचे धडे देत असते .

अन ते बोट सोडून आपण कधी बाह्य जगतात धावू लागतो हे काळत सुद्धा नाही.

पुढे शाळेत, मैदानात, एखाद्या कलेच्या दालनात आपणास अनेक गुरु भेटत जातात.

प्रत्येक जण आपणास भरपूर देण्याचा प्रयत्न करतात. आपलीच झोळी किती मोठी अन मजबूत आहे याचाच प्रश्न बाकी असतो.

शाळामाता सुटते अन शिक्षक --गुरुजन यांच्या प्रेमाचा मायेचा झराही आटू लागतो. शाळेतील शिक्षक
चिरकाल समरणात राहतात.

पुढील काळात तेव्हड्या मायेने शिकविणारे व वैयक्तिक ओळख जाणणारे फारच कमी शिक्षक भेटतात.

त्यामुळे आपणच ---- शिक्षकांचे लक्षात कसे राहू याचीच धडपड सुरु असते.

काहीं मोजक्याच मुलांना ते जमते.

आपले आयुष्य हे एखाद्या " निर्झराप्रमाणे प्रवाहित असते ".

आपल्या पुढील वाटचालीत आपण कसे रममाण होतो हे प्रत्येकाचे कुवतीनुसार ठरते.

आपल्या पुढील आयुष्यात वाहन चालविण्यासाठी -- नोकरीच्या मार्गदर्शनासाठी --परकीय भाषा शिकण्यासाठी -- आपले दोनाचे चार होईपर्यंत अनेक मार्गदर्शक गुरु आपणास भेटतात.

एव्हड्या वेळात एखादा जिवलग मित्रच गुरु म्हणून आपल्याला भावतो देखील

// **''अनंत ''... हस्ते कमलावराने -----घेशील किती दो कराने----**/

.

मागे वळून पहाताना... आपण वेळोवेळी घेतलेले कष्ट.. -अचूक निर्णय व या बरोबरच---- एकसे भले दो / ---- याप्रमाणे आपल्या समवेत, -----

दोन हातांनी जुळणाऱ्या 'अंजली ' प्रमाणे सतत आपल्या पाठीशी असणारी आपली पत्नी सुद्धा कधी काळी आपणास गुरुस्थानी दिसून येते.

आता यापुढे आपल्या सोबत राहतील त्या असंख्य गुरूकडून घेतलेल्या विद्यादानाच्या असंख्य स्मृती.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा / गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः //

गुरु- वीण----कोण दाखवील वाट... ?असे ही म्हटलेच आहे ना... !!

या स्मृतींच्या नव्हे --- बँक ब्यालंस पेक्षाही-- " अमुल्य "असणाऱ्या अश्या ----

**ठेव्यांवर '** आपले भावी आयुष्य अधिकच सुखी - समाधानाचे व समृद्धीचे असणार आहे.

धीर धरीरे.. धीर धरी --

धीरापोटी, असती" फळे. ".. रसाळ गोमटी

याची खात्री म्हणूनच तर पटते नाही का... ?

खरे तर शिक्षण हे ... कधीच पूर्ण होत नाही सतत नवनवीन गोष्टी शिकण्यास वाव हा असतोच.

त्यामुळेच आताच्या स्मार्ट --प्रगतिशील दुनियेत आपल्या पेक्षा---" कमी वयाचे सक्षम - समर्थ असे गुरुही " भेटतात.

आता त्यांचेच बोट धरून आधुनिक जगतातील इ - भवसागर पार करण्यास आपणास ते मदत करतात.

मानवी जीवन ही एक अखंड अशी कार्यशाळाच आहे. त्यात आपले आवडीचे नवनवे विषय शोधीत विद्यार्थीपण जपण्यातही एक वेगळा आनंद असतो..

अश्या या **आपल्या जीवनास सुखी -समृद्ध करणाऱ्या आयुष्यात भेटलेल्या---" सर्व गुरूंना " आजच्या २०२० शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा... !...**

*****

**शब्द पुष्पांची गुरुदक्षिणा ---!**

*****

**आयुष्यात भेटलेले,**

**समस्त -- गुरुजन वर्ग ----''**

******

**शि. सा. न. वि. वि. ----**

एखाद्या शिस्तप्रिय शिक्षक प्रमाणे शिक्षक दिन हा ५ सप्टेंबरला वेळेवर आलासुद्धा.

खरे तर गुरुजींनी दिलेल्या विद्येची शिदोरी हि जन्म भर पुरणारी अशीच असते.

त्यांच्या छत्र छायेखाली संचित केलेलं ज्ञान हे अमोल असेच असते.

प्रत्येकाची आई हि प्रथम गुरु असते. गर्भात असल्या पासूनच नाळेवाटे पौष्टिक पदार्थ व सद्विचारांचे ठिबक सिंचन नऊ महिने सुरु असते.

त्यातूनच आपल्या विद्यार्जनाचा पाया तेथेच सुरु होतो.

हाताचे बोट धरून ती नंतर आपल्याला पायावर उभे राहण्याचे धडे देत असते .

अन ते बोट सोडून आपण कधी बाह्य जगतात धावू लागतो हे काळत सुद्धा नाही.

पुढे शाळेत, मैदानात, एखाद्या कलेच्या दालनात आपणास अनेक गुरु भेटत जातात.

प्रत्येक जण आपणास भरपूर देण्याचा प्रयत्न करतात. आपलीच झोळी किती मोठी अन मजबूत आहे याचाच प्रश्न बाकी असतो.

शाळामाता सुटते अन शिक्षक --गुरुजन यांच्या प्रेमाचा मायेचा झराही आटू लागतो. शाळेतील शिक्षक
चिरकाल समरणात राहतात.

पुढील काळात तेव्हड्या मायेने शिकविणारे व वैयक्तिक ओळख जाणणारे फारच कमी शिक्षक भेटतात.

त्यामुळे आपणच ---- शिक्षकांचे लक्षात कसे राहू याचीच धडपड सुरु असते.

काहीं मोजक्याच मुलांना ते जमते.

आपले आयुष्य हे एखाद्या " निर्झराप्रमाणे प्रवाहित असते ".

आपल्या पुढील वाटचालीत आपण कसे रममाण होतो हे प्रत्येकाचे कुवतीनुसार ठरते.

आपल्या पुढील आयुष्यात वाहन चालविण्यासाठी -- नोकरीच्या मार्गदर्शनासाठी --परकीय भाषा शिकण्यासाठी -- आपले दोनाचे चार होईपर्यंत अनेक मार्गदर्शक गुरु आपणास भेटतात.

एव्हड्या वेळात एखादा जिवलग मित्रच गुरु म्हणून आपल्याला भावतो देखील

**// ''अनंत ''... हस्ते कमलावराने -----घेशील किती दो कराने----/**

.

मागे वळून पहाताना... आपण वेळोवेळी घेतलेले कष्ट.. -अचूक निर्णय व या बरोबरच---- एकसे भले दो / ---- याप्रमाणे आपल्या समवेत, -----

दोन हातांनी जुळणाऱ्या 'अंजली ' प्रमाणे सतत आपल्या पाठीशी असणारी आपली पत्नी सुद्धा कधी काळी आपणास गुरुस्थानी दिसून येते.

आता यापुढे आपल्या सोबत राहतील त्या असंख्य गुरूकडून घेतलेल्या विद्यादानाच्या असंख्य स्मृती.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा / गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः //

गुरु- वीण----कोण दाखवील वाट... ?असे ही म्हटलेच आहे

ना... !!

या स्मृतींच्या नव्हे --- बँक ब्यालंस पेक्षाही-- " अमुल्य "असणाऱ्या अश्या ----

**ठेव्यांवर '** आपले भावी आयुष्य अधिकच सुखी - समाधानाचे व समृद्धीचे असणार आहे.

धीर धरीरे.. धीर धरी --

धीरापोटी, असती" फळे. ".. रसाळ गोमटी

याची खात्री म्हणूनच तर पटते नाही का... ?

खरे तर शिक्षण हे ... कधीच पूर्ण होत नाही सतत नवनवीन गोष्टी शिकण्यास वाव हा असतोच.

त्यामुळेच आताच्या स्मार्ट --प्रगतिशील दुनियेत आपल्या पेक्षा---" कमी वयाचे सक्षम - समर्थ असे गुरुही " भेटतात.

आता त्यांचेच बोट धरून आधुनिक जगतातील इ -भवसागर पार करण्यास आपणास ते मदत करतात.

मानवी जीवन ही एक अखंड अशी कार्यशाळाच आहे. त्यात आपले आवडीचे नवनवे विषय शोधीत विद्यार्थीपण जपण्यातही एक वेगळा आनंद असतो..

अश्या या **आपल्या जीवनास सुखी -समृद्ध करणाऱ्या आयुष्यात भेटलेल्या---" सर्व गुरूंना " आजच्या २०२० शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा... !...**

*****

**संगीत --उपचार.. !**

**एक रामबाण उपाय.. !**

*****

(संगीताची दुसरी बाजू ---)

******

गायकाचे पोर हि सुरात रडते असे समजले जाते.

एका हिंदी गाण्याच्या ओळी प्रमाणे ---

-ठंडे ठंडे पानीसे नहाना चाहिए --गाना आए ना आए गाणं चाहिये..

गाणे अर्थात --संगीत हि अशी गोष्ट आहे. याची उत्पत्ती मेंदू या महत्वाच्या अवयवापासून होते.

त्यामुळेच संगीताचा उपयोग अनेक शारीरिक विकारांवर औषधा बरोबरच, लवकर बरे होण्यासाठी करण्यात येतो व उपयुक्तहि ठरत आहे.

याचाच घेतलेला हा मागोवा -----!

प्रत्येकाचा स्वतःचा आवाज हि एक दैवी देणगी असते. त्याचाच उपयोग आपणास रोग प्रतिबंधक अश्यासाठी होऊ शकतो.

त्यामुळे संगीताचे सखोल ज्ञान, एखादे वाद्य वाजवीत येणे, गाता येणे असण्याची खरेतर कांहीच गरज नसते.

आपला डावा मेंदू ----सांख्यिकी --भाषा -शास्त्र --डिसिजन घेणे हे काम करतो.

उजवा मेंदू ---आर्ट --क्रिएटिव्हिटी-- सिक्स्थ सेन्स ----इंट्यूशन --या कामासाठी उपयोगी असतो.

सध्याचे लॉक डाऊन चे काळात बऱ्याच लोकांचा उजवा मेंदू कार्यरत झाला व नवनव्या कल्पनांचा उदय झाला.

संगीताने---- मात्र दोन्ही मेंदूची वाढ होत रहाते. त्यातील १७ केंद्रे जागृत होतात.

अशी जादू इतर कोणत्याच कलेने होत नाही असे शास्त्रीय संशोधन झाले आहे.

त्यामुळे संगीत हे एक... पॉवर हाऊस आहे. त्यामुळेच आपल्या आयुष्यात संगीत असणे महत्वाचे असते.

तसे पहाता संगीत न आवडणारा मनुष्य सापडणे बहुदा अवघडच आहे.

त्यामुळेच म्युझिक थिअरपी ---चा नव्याने उदय होत आहे.

शालेय जीवनात आपणास संगीताचा एक तास असे. पण त्यावेळी त्याचे महत्व आपल्या ध्यानात येत नाही.

आता ते शिकण्यासाठी भाऊ गर्दी होत आहे.

हॉस्पिटल मध्ये या उपायाचा प्रयोग अपुऱ्या दिवसांच्या जन्मलेल्या आई पासून विलगीकरण केलेल्या बालकावर करण्यात आला.

त्यावेळी त्यांचे दोन गट करण्यात आले.

ज्यां बालकांना " प्री डिझाईन --विशिष्ट प्रकारचे संगीत " ऐकविले गेले त्या बालकांचे वजन ३६ टक्क्यांनी जास्त वाढल्याची नोंद झाली आहे.

रेडिओ ऐकविणे --हि कांही म्युझिक थीअरपी होऊ शकत नाही. कारण त्यावर रॅन्डम पद्धतीने गाणी लावली जातात.

संगीत --- म्हणजे मेंदूचे अभ्यंग स्नान, सकस खाद्य, सकारात्मक विचारांना चालना, तसेच एखादे उद्दिष्ट साध्य करण्याचे माध्यम,

आध्यात्मिक. भावनिक तसेच विविध विषय आत्मसात करून घेण्यास उपयुक्त असे साधन होय.

भारतातील ९५ टक्के लोकांना संगीत आवडते परंतु.

त्यामुळे संगीताचा उपचार सहजपणे होऊ शकतो.

इतर ५ टक्के लोकांवर सुद्धा तो लागू पडतो.

एखादे पहाडी रागातील धून (म्युझिक) डोळे मिटून ऐकले असता आपणास त्या वातावरणात गेल्याचा भास व आनंद मिळू शकतो.

एकाग्रता वाढीस लागते, ऑपरेशन पूर्वी संगीत ऐकविल्यास रुग्णाची मानसिक भीती कमी होते.

संगीतातील रागदारी मनुष्याचे जीवनातील रागावर चांगल्या प्रकारे काम करते.

ऑपरेशन नंतर च्या वेदना मेंदूत जाणवतात पण संगीत ऐकविल्यास त्या पासून सुटका होऊ शकते.

ताण - तणावाचे प्रक्रियेत संगीत प्रभावीपणे कार्य करते व ताण नाहीसा करते.

एव्हडेच काय पण प्रतिकारशक्ती सुद्धा वाढीस लागते..

शालेय जीवनात लय बद्ध पाढे --कविता -कांही गणिती सूत्रे --शास्त्र विषयातील अवघड वाटणारी सूत्रे आपण ठराविक चालीत पाठ केल्याचे आपणास आठवत असेलच.

आपल्या स्वतःचा आवाज हा आपल्या मेंदूसाठी जास्त जवळचा व परिणाम कारक असतो.

वयाचे १० वर्षा पर्यंत संगीताचे चांगले आकलन होते.

लहान बालकांना गाण्यांचे कार्टून्स व्हिडीओ दाखवून खाऊ घालणे हे--- तत्वतः चुकीचे आहे.

गाणे हे प्रथमतः ऐकण्याचे व म्हणण्यासाठीची प्रक्रिया आहे. तर कधी कधीच पहावे.

या मुळे आपला आय क्यू वाढतो.

पूर्वी आपण गाणी रेडिओवर ऐकायचो --सांग सांग भोलानाथ --हे गाणे ऐकत असता त्यातील दृष्य डोळयासमोर चित्रित करायचो.

त्यामुळे मेंदूस चालना मिळते. व ऐकण्याचा आनंद हि मिळतो.

संगीताचे हे महत्व जाणून परदेशात बऱ्याच हॉस्पिटल मध्ये --म्युझिक थीअरपिस्ट ची नेमणूक केलेली दिसून येते.

संगीत हे बऱ्याच शारीरिक तक्रारींवर उपयोगी पडते.

त्याचे विविध पद्धती आहेत..

संगीत ऐकणे --

त्यावर चर्चा करणे --त्यातील शब्द --चाली बाबत)

संगीतावर नृत्य करणे.

प्रत्यक्ष एखादे वाद्य वाजविणे..

त्यामुळेच आरती म्हणताना --भजन म्हणताना --उपस्थितांची लगेच एकाग्रता तयार होते.

संगीताचा परिणाम सजीव असणाऱ्या प्राण्यांचे दूध तसेच पिके --फलोत्पादन वाढीस होतो.

संगीतोपचाराचा फायदा ---

डिप्रेशन--चिंता---राग -- कमी करणे, एकाग्रता --आत्मविश्वास -सकारात्मकता वाढीस लागणे. . तसेच आत्महत्या विचारांपासून दूर करणे अश्या साठी होतो.

सध्याचे वातावरणात मानसिक रुग्ण वाढत आहेत.

परंतु त्यातील १ टक्का लोकच पुढे येऊन त्याबाबत व्यक्त होतात.

शारीरिक दुखण्यास लगेच डॉक्टरांकडे धाव घेतली जाते.

संगीतातील इम्यॅजरी थिअरी--टेक्निक ----

संगीतातून दृष्यात्मक प्रकटीकरण होते.

स्पेशली डिझाईन --संगीतोपचार --प्रभावी ठरलेले व बरे झालेले काही मानसिक रुग्ण ---

१) आईवर रागावून घर सोडून गेलेला मुलगा.

२) न्याशनल नॅशनल ब्याडमिंटन चॅम्पियन सलग दोन म्याच हरल्याने ब्याडमिंटनच सोडून देण्यापर्यंत केलेला विचार.

३) पुण्यात शिकण्यास आलेला विद्यार्थी ---आत्महत्या करण्याचे विचार करू लागलेला विद्यार्थी.

४) अमेरिकेत वैद्यकीय सेवा महाग असल्याने --
बीपी असलेली शिक्षिका तिकडे जाण्यास घाबरत असे.

तिने दररोज म्युझिक सी डी ऐकून तेथील वास्तव्य सुखकर केले.

संगीत प्रकाराच्या कांही योजना ---

******

१) नकारात्मक विचारांच्या गर्तेत अडकलेल्या रुग्णांना --- त्यांनी वयाचे **१८ ते २५** या वयात ऐकलेली गाणी ऐकवून आराम पडला.

२) हृदय रुग्णांना --मध्य लयीतील भजनी ठेका ऐकवून आराम मिळाला.

३) सकाळचे वेळी --संथ लयीतून व सायंकाळी जलद गतीच्या संगीताने नवी ऊर्जा मिळते.

४) दररोजच्या मनशांती साठी २० मिनिटे ठराविक पद्धतीचे संगीत ऐकावे.

अश्या प्रकारे संगीत उपचार हा सुद्धा एक---औषधाऐवजी --रामबाण उपाय ठरू शकतो हे सिद्ध झाले आहे. .

*****

**आमच्या --फिटनेसचे सीमोल्लंघन... !**

******

दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा.. !

याच दिवशी आपण सर्वांनी श्री शारदेची पूजा करून बालपणी अ -आ -इ -ई चे प्राथमिक धडे गिरविले.

अन आजवरचा जीवन प्रवास यशस्वी केला.

जन्मास येण्यापूर्वी लहान बालक सुद्धा आपला नवू महिन्यांचा बंदिवांस झुगारून बाहेर पडते.

त्यानंतरचा त्याचा प्रवासच रडण्यापासून सुरु होतो -- त्यानंतर हसणे --बोलणे--रांगणे --बोबडे बोल बोलणे

बोटाला धरून चालणे व हळूहळू स्वतंत्रपणे जीवनाच्या राजमार्गावर पाऊल ठेवतो. या सर्व अवस्था पाहण्यास आईसह सर्वच जण उत्सुक असतात.

. यासच वैद्यकीय भाषेत **--माईल स्टोन्स** असे म्हणतात.

आम्ही सुद्धा नुकताच प्रथम २१ दिवस --व त्या नंतरचा ९० दिवस शारीरिक बदलाचे आव्हान.. !

अशा आशयाचा फिटनेस मास्टर सौरभ कुलकर्णी याचे मार्गदर्शन खाली व्यायाम उपक्रमात भाग घेतला.

सिनिअर सिटिझन्स साठीची भल्या पहाटेची बॅच सुद्धा जॉईन केली.

या व्यायामात सुद्धा असे ----माईल स्टोन्स असतात असे ध्यानात आले.

पहिले --२१ मोदक (**दिवस**)  गणपतीस अर्पण करून या फिटनेस उपक्रमाचा श्री गणेशा केला.

त्यातील रुची वाढू लागली ३० दिवस --आणि आता ६० दिवस ही उलटून गेले.

सौरभ सरानी आपणात काय बदल झाले हे पाहून तसे २ मिनिटाचे व्हिडीओ पाठविण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही मागे वळून पाहताना आम्हांस सुद्धा शरीरात होत असलेली प्रगती दिसून आली.

गुडघे दुखी कमी झाली. मांडी घालण्यात प्रगती दिसून आली. , झोप छान लागू लागली . विशेष म्हणजे

गजर न लावता सकाळी वेळेत जाग येऊ लागली, उत्साही वाटू लागले.

सध्याचे घरातील बंदिवासाचा खरे तर. " उबग " आला होता. त्यावरचा हा चांगलाच रामबाण उपाय गवसला अन मन हरखून गेले.

**याचे निमित्त झाले ते नेट भेटचे---- सलील चौधरी यांनी फिटनेस मास्टर--- सौरभ कुलकर्णी याना इंटरनेट माध्यमातून घरोघरी पोहोचविल्या मुळे.**

त्यांनी स्वतः--- देश -विदेशातील १२ महिन्यात १२ विविध--- फिटनेस कोर्स आत्मसात केले. आणि आजच्या... योग्य वेळी ते आता देश विदेशातील घरा घरात पोहोचले आहेत.

सौरभ सरांचे " शास्त्र शुद्ध --व्यायाम शिकविण्याची हातोटी "--सूचना देण्याची पद्धत तसेच कोणतीही शंका निरसन करण्याची पद्धत फारच भावली.

आभासी पद्धतीने का होईना ते आपल्या समोर व्यायाम करून दाखवितात व आपल्याकडून करवून घेतात यातच मोठा आनंद आहे. व तो आजच्या दिवसाला साजेसा असाच आहे.

आपले शरीर ही एक... व्यवस्थिशीर परंतु गुंतागुंतीची रचना आहे. त्यास पद्धतशीर व्यायामाची जोड दिली तरच ती तंदुरुस्त रहाणार आहे हे सुद्धा तितकेच महत्वाचे.

दररोज वेगवेगळा व्यायाम, वॉर्म अप चे... स्टार्टर त्याची असणारी आवश्यकता --सूर्यनमस्कार --कार्डिओ--अप्पर बॉडी --लोअर बॉडी ---सिक्स प्याक चे पोटाचे व्यायाम --लंजेस --दोरीच्या उड्या ---ऍरोबिक्स ---व शेवटी ओंकार --प्राणायामाचे... डेझर्ट अशी फुल्ल--- भरपेट डिश असल्या प्रमाणे जणू व्यायामाची मेजवानीच असते आठवडाभर.

हे सर्व काही पाहून आपल्या शरीरालाहि ---- " **चक्क घाम फुटतो** बर का ---!".

बी पी, शुगर हे आंगतुक पाहुणे सुद्धा हळूहळू आपापल्या वळचणीला जाण्याचे तयारीस लागतात. आणि वजन काटाही सुस्थिर राहतो हे जाणवते.

.

आणि... रविवारी---- अभ्यंग स्नानास व... व्यायामापासूनच्या एक दिवस विश्रांतीसाठी शरीर तयार होते अन रिलॅक्स व रिफ्रेश होते.

व्यायाम करवून घेताना सौरभ सर त्याची शास्त्र शुद्ध पद्धत समजावून तर देतातच पण सिनिअर सिटिझन्स ची ब्याच व उत्साही महिलांचाही समावेश असल्याने -----

गो- गो -गो ----थांबायचं नाही गड्या थांबायचं नाही -- अश्या प्रोत्साहन पूर्वक--- मंत्र घोष सुरु असतोच.

त्यामुळे व्यायाम पूर्णपणे करण्याची उर्मी निर्माण होते.

आणि अरे वा -- आपण सुद्धा हे करू शकतो असा नवा आत्मविश्वास वाढीस लागतो. आपली फक्त आपल्याशी च तुलना करावयाची.

या मध्ये सातत्य असणे मात्र आवश्यक आहे.

**पिंडे पिंडे मतिर्भिना --!**

या प्रमाणे कोणास वजन वाढवायचे --तर कोणास कमी करायचे --तर कोणास तब्येत राखावयाची. --तर कोणाला आपणच ओढवून घेतलेले बी पी.. शुगरची समस्या.

यावर एकच " रामबाण उपाय " म्हणजे नियमित दैनंदिन " **घाम फुटे पर्यंत "** व्यायाम करणे हाच आहे. यास पर्याय नाही हे उमगते.

याचे महत्व पटवून देण्यास प्रत्येक प्रकारच्या व्यायामाचा... **" वेबिनार "** पहावयास अन अभ्यासवयास मिळतो.

न्यूट्रिशन -- वेबिनार मध्ये आपल्या गरजेप्रमाणे (बॉडी इंडेक्स मास नुसार) आहार कसा निवडावयाच्या याबाबत मुद्देसूद माहिती मिळते.

प्रत्येक व्यायाम शास्त्र शुद्ध--- कसा करावयाचा त्यात ढोबळ मानाने होणाऱ्या चुकां या सर्वांचे यथायोग्य मार्गदर्शन मिळते.

त्यामुळे वेबिनार म्हणजे शाळेतील---- " हाडाच्या शिक्षकांनी " जादा गुण मिळविण्यासाठी घेतलेले, एकवीस अपेक्षित तसेच विद्यार्थ्यांचे जादा बौद्धिक तासच जणू.

बरेच जण व्यायामाचे बाबतीत ----आरंभ शूर असतात. व्यायामात सातत्य ठेवीत नाहीत, आहारावर नियंत्रण नाही पण अपेक्षा मात्र वजन घटविण्याची किंवा वाढविण्याची.

तसेच सुरवातीस सवय नसेल तर व्यायाम केल्याने अंग दुखणे हा प्रकार सुरू होतो. त्यास--- पेन किलर गोळया घेणे-- उचित नाही,

तर व्यायाम कमी प्रमाणात पण चालूच ठेवावा व आहारात प्रोटीन्स चा समावेश अधिक प्रमाणात करावा. यासाठी

अंडी--चिकन --अथवा --पनीर --सोयाचंक्स -डाळी -- फुटाणे याचा समावेश करण्याचा उचित सल्ला दिला जातो.

या सर्व गोष्टींचे अनन्य साधारण महत्व असते---- हे या वेबिनार मधून आपणास व्यवस्थित अवगत होते.

त्याची पारायणे करण्यास आपणास ती ऑन लाईन पहाण्यास उपलब्ध असतात. हेही नसे थोडके.

आम्ही गुरु-- शिष्य.. " एकमेकांना प्रत्यक्ष न दिसता " सुद्धा **Chat window** चे माध्यमातून संवाद साधत असतो व लाईव्ह व्यायाम उपक्रमाचा आनंद घेतो.

**सारांशाने --**

नियमित व्यायामाने आपले शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुधारते..

व्यायामानानंतर शरीर दुखणे हे --- न्यू नॉर्मल ---असते तसेच ते उद्याची ताकद असते..

दररोज एक तास व्यायाम हि प्रत्येकाच्या शरीराची दैनंदिन गरज असते.

त्यास योग्य कॅलरीजच्या आहाराची जोड आवश्यकच असते .

कम्फर्ट झोनच्या बाहेर व्यायाम केल्याने---- (**सीमोल्लंघन**) शरीर अधिक बळकट बनते.

यातील पहिल्या २१ दिवसात शास्त्र शद्ध व्यायामाची माहिती मिळते.

पुढील ३० दिवसात... आपल्यालाच शरीरात बदल होत असल्याचे जाणवते. (शुगर कमी.. वजन कमी... जास्त.. इंच लॉस.. इ.)

पुढील ६० दिवसानी.. इतरांना आपल्यातील बदल जाणवतो... पर्वतीवर जाण्यास सक्षम होतो.

पुढील ९० दिवसानी सिंहगडावर जाण्यास सक्षम होतो.

अश्या प्रकारे कले कलेने चन्द्र जसजसा मोठं होतो तसेच या व्यायामाचा आवाकाहि आणि आपला आत्मविश्वास वाढत जातो.

यापुढे मात्र सर्वस्वी ---मेन्टेन करणे हे आपल्याच हातात असते... त्यासाठी या पुढे व्यायाम--- न कंटाळता चालू ठेवणे व फिट रहाणे शक्य होते.

अश्या प्रकारे --

**" सर्वांग सुंदर व्यायाम करण्याची तसेच शारीरिक फिटनेसाठीचे माईल स्टोन्स गाठण्यासाठी, नवनवीन... ? " प्राथमिक धड्यांच्या "---**

**--- सीमोल्लंघनाचे... " सुवर्णक्षण " लुटण्यात या " नव्या जेष्ठावस्थेतील बालपणात "आम्ही सध्या व्यस्त आहोत ".**

**त्यामुळेच आजच्या ---**

**" दसरा सण मोठा आनंदा नाही तोटा... !**

**याची सत्यता पटते.**

आपले सुद्धा बहुदा असेच असेल----. हो ना... ?

*****



**मधुमेह --अर्थात डायबेटीस चे अंतरंग ---!**

*****

(न्यू-नॉर्मल)

मधुमेह -- हे नाव ऐकले नाही असा माणूस आज शोधूनही सापडणार नाही.

इतका हा विकार जगभर पसरला आहे.

लहान मुले हि त्यातून सुटलेली नाहीत.

मधुमेह --डायबेटीस हा एक गुंतागुंतीचा अन उपचार करण्यास कठीण असा विकार आहे --आजार नव्हे नव्हे.

आपल्या जीवनशैलीतील दोषांमुळे आपणच ओढवून घेतलेला हा एक विकार आहे.

मधुमेह --थायरॉईड --बी पी -- कोलेस्टेरॉल -- पी सी ओ डी (गर्भाशय विकार) . , हे एकमेकांचे जणू जुळे भाऊच आहेत.

यानाचा नॉन कम्युनिकेबल विकार म्हणतात. म्हणजे हे सांसर्गिक नसतात. अश्या व्यक्तीच्या सहवासाने आपणास तो विकार होत नाही.

कोणत्याही प्याथीची औषधे हा विकार पूर्णपणे बरा करू शकत नाही.

त्यामुळे विविध प्याथी तसेच निसर्ग उपचाराचाही समावेश त्यात असला पाहिजे.. हे जाणवते.

**त्याचाच " मधुमेह " बद्दलच्या वर्कशॉप मध्ये तज्ज्ञांनी घेतलेला आढावा.**

******

या मधुमेहा मुळे शारीरिक --आर्थिक --मानसिक - खच्चीकरण होत जाते . व त्याचेच पुढे दुसऱ्यावर अवलंबून रहाण्यापर्यंत प्रसंग ओढवतो.

आजारपण हे सावकारी कर्जा प्रमाणे असते

त्यामुळेच आपल्या दैनंदिन आहार- विहारात योग्य ते बदल व जोडीला औषधें घेतल्यास हे विकार आटोक्यात राहतात. .

**या मधुमेह विकाराचे समाजात काही गैरसमज आहेत व त्याचे मूळ कारण ----**

१) हा आनुवंशिक आहे ----प्रत्यक्षात तो ----(आहार व जीवनशैली बदलाने होणारा विकार आहे.)

२) हा जुनाट व वाढतजाणारा आहे --- --- (दुरुस्त करता येणारा --व पूर्ववत होणार आहे)

३)रक्तातील साखर वाढणे म्हणजे मधुमेह ----- (शरीरातील इन्शुलिन प्रतिरोध हे प्रमुख कारण) .

४) रक्तातील साखर कमी करणे हा प्रमुख उद्देश ---- (इन्शुलिन प्रतिरोध कमी करणे हा खरा उपाय)

आपल्या शरीराला साखर --चरबी --ची आवश्यकता असतेच पण त्याचे योग्य ते प्रमाणात असणे आवश्यक आहे.

मधुमेहाची साखर -- १४ तासाचे उपवासानंतर --सकाळी उठल्यावर फास्टिंग १०० पर्यंत व जेवणानंतर दोन तासांनी पीपी १४० पर्यन्त असावी.

या पेक्षा जास्त प्रमाण असेल तर आपले मधुमेही म्हणून निदान होते व आपणास -- प्राथमिक डोस --मेटफोर्मीन ५०० एम जी सुरूकेली जाते.

आपण गोड खाण्यावर नियंत्रण व त्यास नियमित व्यायामाची जोड न दिल्यास व वजन नियंत्रणात न ठेवल्यास आपली रक्तातील साखर गोळी घेऊन देखील वाढतच जाते.

अश्या वेळी डॉक्टर डोस वाढवून देतात. हा डोस---- १५०० मिग्रॅ पेक्षा अधिक असता कामा नये याची दक्षता आपणासच घ्यावी लागते.

औषधाचे गोळीने साखर कमी झाल्याचे दिसून येते. व आपण--- सुखावतो.

**मग हि जादा साखर कोठे जाते... ?**

.

आपल्या शरीरातील अतिरिक्त साखर प्रामुख्याने लिव्हर मध्ये, स्नायूंमध्ये मध्ये साठविली जाते. जरुरी प्रमाणे ती त्यांचेकडून लागेल तशी घेतली जाते.

या कामासाठी --" **इन्शुलिन ची किल्ली** " आवश्यक असते. पण याचाच अभाव असेल तर मात्र आपणास बाहेरून---- इन्शुलिन घ्यावे लागते.

आपण आहार- विहार योग्य न ठेवल्यास हे जादा साखरेचे ओझे किडनी--डोळा --अश्या अवयवांकडे सोपविले जाते अनावश्यक साखरअति लघवीवाटे बाहेर पडते. दृष्टीवर परिणाम होऊ लागतो.

त्यामुळे आहार -विहार कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे.

या साठी आपल्या फ्यामिली डॉक्टरांची मदत घ्यावी.

डॉक्टर प्रामुख्याने तुमचे आजारावर तक्रारींवर लक्ष देऊन औषध योजना करतात त्यांचे कडे फार वेळ नसतो. .

पण तुमच्या शरीराची सुव्यवस्था आपली आपणच ठेवली पाहिजे.

हे प्रामुख्याने ध्यानात घ्यावे.

विकार होण्याची प्रमुख कारणे ----

*****

१) फ्याट ---फास्ट फूड --फास्ट लाईफ.

२) ऍसिडिक बॉडी ---सूज ---टाईप --A मधुमेह (शरीरात इंश्युलीनचा अभाव)

३) आहारातील कमतरता ---कॅल्शियम -- व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन D

४) स्ट्रेसफुल लाईफ ---अपुरी झोप

५)आपला कमर घेर---- ३४----३६ इंचापेक्षा जास्त असणे.

(आपली उंची इंचात मोजावी त्याचे निम्मी आपली कमर असणे आवश्यक आहे.)

६)वाढत जाणारे वजन...

यासाठी करावयाच्या तपासण्या...

*****

Fasting Insulin..

HbA1C

Fasting.. PP... blood sugar

दर ६ महिन्यांनी डोळे... पावले.. याची तपासणी.

त्यावरचे उपाय -----

*****

शारीरिक शुद्धीकरण करणे ---पंचकर्म करावे. एनिमा घ्यावा.

अन्न पचन प्रक्रिया व्यवस्थित असावी.

मूळ कारणांकडे लक्ष द्यावे.

तणाव कमी करावा. --त्यासाठी मेडिटेशन करावे.

आहार --वर्ज्य-

*****

दूध व दुधाचे पदार्थ पूर्ण व्यर्ज --

(आईचे दूध मानसिक वाढीसाठी आवश्यक असते)

मांस (मुख्यतः-- मटण) व्यर्ज

सर्व--- रिफाईंड फूड --टाळावे.

पोहे --उप्पीट ---उपमा टाळावा.

डबाबंद अन्न टाळावे.

साखर // मीठ (जादा) व्यर्ज-----

गोड पदार्थ.. आईसक्रीम..

चिकू -अननस--- कलिंगड --सीताफळ --खाणे टाळावे.

आवळा... भेंडी... गवार... कारली... भज्या खाव्यात.

उपयुक्त --आहार

******

खपली गहू पीठ --बेसन पीठ -- ज्वरी -- ब्राऊन राईस वापरावा

नाश्ता --तीन रंगांची तीन फळे --(केळी --मोसम्बी -संत्र -- पेअर --पेरू --जांभळे-- सफरचंद)

जेवणाअगोदर सूप-- कच्चे स्यालेड (दही नसलेले)

उपचार --

*****

सकाळी --गंधर्व हरितकी चूर्ण १--२ गोळया कोमट पाण्यातून

हळद -+-दालचिनी -+-लिंबूरस --एकत्रित असे पाणी प्यावे.

काळा (दुधाशिवाय) -- चहा उत्तम.

स्टिव्हीया (मधुपर्णी वनस्पती) ड्रॉप्स.. गोड चवी साठी...

कर्पूरादी तेल (भीमसेनी कपूर) तळपायास लावावे)

आपल्या डॉक्टरानीं दिलेली औषधें नियमित घेणे.

विहार --

*****

भरपूर चालणे --१ तासभर (१० हजार पावले रोज)

२०० टाळया मोठ्याने वाजविणे.

घाम येईपर्यंत व्यायाम --सूर्यनमस्कार ---आसने --प्राणायाम --जोर ---दोरीच्या उड्या इ.

कोवळया उन्हात बसणे.

तणावमुक्त रहाणें.

वजन आटोक्यात ठेवणे..

डोन्ट सफर बट रिकव्हर ---

या मुळेच आपण ड्रग --डायबेटीस --डिसॉर्डर्स पासून दूर राहू शकू..

अशी आहे या.. " गोड स्वभावाच्या आजाराची.. कटू कहाणी. ". !

*****

**कानालाही जेंव्हा कान लागतात...!**

******

हाताची हाताशी मिळवणी होते तेंव्हा मैत्री घट्ट होत जाते. पणतीच्या ज्योतीला ज्योत मिळाली कि सगळीकडे लक्ख्ह प्रकाश पडतो. चाळीशीला डोळ्यावर कृत्रिम चष्म्याची साथ मिळते अन नवी दृष्टी साफ (प्राप्त)  होते.

अन गाडी उतारवयाकडे वृधत्वाकडे झुकते त्यावेळी पाठीला बाक येवून हाताशी काठी येवून मिळते. जीवनातील जगण्याचा अर्थ जाणीवपूर्वक कळू लागतो अन देवाने दिलेल्या धडधाकट अवयवांची अनमोल देणगीची महती कळत जाते.

हल्लीच्या प्रगत काळात अवयवांचे दान सुद्धा गरजवंताचे जीवन सुसह्य करून जाते. हाता तोंडाची मिळवणी करीत प्रत्येक मनुष्य जीवनाची मार्गक्रमणा करीत असतो.

एकेक निकामी होत जाणारया अवयवांना" लाख मोलाची" किंमत मोजण्याची वेळ येवून ठेपते. आधुनिक वैद्यकीय ज्ञान व

विकसित तंत्रज्ञान यांच्या गट्टीने तर अवयव जोडणी बेमालूमपणे करण्यात मानव आघाडीवर राहिला आहे.

अश्याच एका वळणावर आपले कानही आपल्याकडे कानाडोळा करू लागतात. घरातील एकमेकांशी असलेला संवाद कानाच्या अधूपणाने विसंवादाकडे झुकू लागतो. आवाजाची पट्टी नकळत उंचावली जाते. हीच वेळ असते ती आपले कान व्यवस्थित आहेत का...? हे कान - नाक - घसा तज्ञांकडे जावून तपासून घेण्याची.

आमचे पिताश्री वय वर्ष **८७** पूर्ण यांचे बाबतीत याची चाहूल लागताच त्या बाबतची योग्य ती कानाची तपासणी करून आली. त्यात ५० टक्के बहिरेपणा असल्याचे निदान झाले. अन कर्णयंत्र लावण्याची लावण्याची हीच ती योग्य वेळ असल्याचा सल्ला मिळाला.

**कर्णयंत्र** व त्या बाबतची पूर्व तपासणी ----**स्कूल ऑफ ऑडीओलोजी अंड स्पीच लँग्वेज प्याथोलोजी** ---या संस्थे मार्फत केली जाते. या संस्थेमार्फत BASLP व MASLP असे

१२ वी नंतरचे ४ व २ वर्षाचे PG ---DOCTORATE पर्यंतचे कोर्सेस असतात. BACHELOR / MASTER ---OF AUDIOLOGY अंड SPEECH LANGUAGE PATHOLOGY

-----ही एक चांगला " आर्थिक " मोबदला देणारी समांतर अशी आव्हानात्मक वैद्यकीय शाखा आहे. लहान मुलां पासून वयोवृद्ध अश्या विविध थरातील लोकांचे कमी ऐकू येण्या बाबतचे कर्ण दोष जाणून घेवून त्या दोषानुरूप कर्ण यंत्र बसवून देण्याची व्यवस्था करण्यात तरबेज होता येते. या वेगळ्या शाखेचा अवश्य विचार नवोदित----- १२वी पास विद्यार्थ्यांनी करावा असे सुचवावेसे वाटते. अशी कॉलेजेस नेहमीच्या वैद्यकीय कॉलेज संस्थेशीच निगडीत असतात. देश परदेशात चांगला स्कोप आहे.

तर अश्या या संस्थे मार्फत योग्य ती तपासणी होवून आपापल्या कर्ण दोषानुरूप

कर्णयंत्र मिळते.

कानात सहज सुलभ बसेल असे यंत्र म्हणजे दुसर्यांचा आवाज मोठा करून देणारी कृत्रिम व्यवस्था. सुरवातीस याची सवय होई पर्यंत काही काळ जावा लागतो. कारण हा कृत्रिम आवाज ऐकण्याची सवय मेंदूस व्हावी लागते. व हळू हळू सवयीचे होवून जाते आणि आपल्याच कर्ण दोषावर मात करता येते.

एका कानात दोष असला तरी सुस्पष्ट ऐकू येण्यास दोन्ही कानात यंत्र बसविणेच श्रेयस्कर असते कारण काही दिवसांनी दुसरा कानही पहिल्याच्या वळणावर जाण्याचे बेतात असतो. तेंव्हा शुभस्य शीघ्रम…! अश्या प्रकारे उतार वयातील या अलंकाराशी दोस्ती करावी लागते.

भांड्याला भांडे लागते, हाताला हात लागतो तसेच कानालाही कान लावण्याची वेळ येवून ठेपते त्याचेही आनंदात स्वागत करावे हे बरे नव्हे का …! त्यामुळेच आपल्यालासुद्धा भिंतीला कान लावण्याची वेळ येणार नाही हेच खरे. ----

******

हरहुन्नरी संगीतकार --जगदीश खेबुडकर... !

*****

गदिमा नंतर प्रदीर्घ काव्य लिहिणारा असा हा मूळ शिक्षकी पेशातील एक निर्व्यसनी प्रतिभावंत गीतकार --निर्माता कलाकार.

विविध भारतीवरील --" आमच्या संग्रहातून " या सदरात विश्वास मेहेंदळे यांनी घेतलेली मुलाखती मधून त्यांचा जीवनपट हळुवार पणे उलगडत गेला.

स्वातंत्र्य संग्रामात म. गांधींचे खुनानंतर त्यांचे शिक्षक असलेल्या वडिलांचे घर जळताना पाहून १६ व्या वर्षीच.. मानवते तू विधवा झाली.. ! हे प्रदीर्घ असे काव्य लिहून झाले.

त्यानंतर दररोज १० --१५ कविता लिहिण्याचा छंदच जडला. मासिकात छपाईस पाठवीत परंतु साभार परत येत असत.

ग. दि. मा. --कुसुमाग्रज --ना धो महानोर --भा. रा तांबे -
- वि. स. खांडेकर --सुमती क्षेत्रमाडे --पु. ल. देशपांडे - शांता शेळके यांच्या साहित्य प्रेमात व संपर्कात आले व यांच्या प्रतिभेला झळाळी लाभली.

शिक्षकी हा त्यांचा आवडता धर्म. कवी सहृदयी असावा लागतो असे त्यांचे मत. गीत आणि कविता या वेगळ्या प्रतिभा आहेत. असे ते मानत.

चित्रपट गीतातील प्रसंगोचित प्रेम गीत लिहिताना.. परकाया प्रवेशाचा अनुभव ते घेत असत. त्यामुळेच त्यांची गाणी सहज सुंदर व चपखल शब्दबद्ध होत गेली.

.

त्यांचा गाणी लिहिण्याचा त्यांचा मूड हा २४ तास कायम असे..

एखाद्या गजबजलेल्या मंडईच्या कोलाहलात आपला मित्र भेटला तर त्याच्याशी गप्पा मारताना आपल्याला सभोवतालच्या वातावरणाचा यत्किंचितही त्रास होत नाही.

तसेच गाणी लिहिताना त्यांना कसलाही त्रास जाणवत नाही. असे ते म्हणाले.

त्याना प्रदीर्घ गाणी लिहिण्याची सवय होती. चित्रपटात ३-४ मिनिटांची गाणी लिहिण्यास त्यांना थोडी कसरत करावी लागे.

धनगराची मेंढर ग धनगराची मेंढर ----संगीत राम कदम --पहिला ब्रेक दिला

नाव गाव कशाला पुसता मी आहे कोल्हापूरची -----

ऐरणाच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे ---

सत्य शिवाहुन सुंदर ----(सुविचारा वरून सुचलेले गाणे.

रंगल्या रात्री अश्या --घुंगरू --पिंजरा ---ज्योतिबाचा नवस --असे चित्रपट

देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा उघड दार देवा आता उघड दार देवा ---आवडते काव्य

कोणतेही वाद्य त्याना वाजवीता येत नव्हते तरी स्वरांची जाण पक्की होती.

ते शीघ्र कवी होते.

खेड्या पाड्यातील लोकांची करमणूक करण्यास त्यांनी -- नाटक कंपनी --गावरान मेवा ---लावणी-- भजन --पोवाडे. यांची रचना केली

रेडिओवरील केवळ अर्ध्या तासाच्या या मुलाखतीमध्ये गतकाळातील नामवंत प्रतिभावंत असे कवी जणू काल डोहातून अलगद वर आले अन् भेटल्याचा मनस्वी आनंद मिळाला.

आणि त्यांनीच घालून दिलेल्या पायवाटेवर आधुनिक काव्याचे शिंपण करणाऱ्या अलीकडच्या काळातील अरुणा ढेरे.. प्रवीण दवणे.. स्वानंद किरकिरे... दासू वैद्य... ते नवोदित असे गुरु ठाकूर... संदीप खरे... सलील कुलकर्णी.. या तरुणाई विश्वात कविता ऐकण्याचे अन् गुणगुणायला लावण्याचे वेड निर्माण करणाऱ्या शब्द जादुगरांची देखील आठवण झाली ती वेगळीच अशी टाईमपास मजा.. !

*****

**आकाश भरारी घेणारी... !**

*****

**अंतराळ वीरांगणा ---- सुनीता विल्यम --**

आषाढ अमावस्या म्हणजेच दिव्यांची अमावस्या.

**काय करावे----**

घरातील दिव्यांना दूध पाण्याने धुऊन स्वच्छ करावेत
पाटावर वस्त्र घालून त्यावर दिवे ठेवावेत. त्यांची पूजा करावी
आज पासूनच पत्रीचे महत्त्व सुरू होते
आघाडा, दूर्वा, पिवळी फुले यांनी दिव्यांची पुजा करावी
गोडाचा नैवेद्य अर्पण करावा
आपल्या घरातील लहान मुलाचे औक्षण करावे

दूर्वा ही वंश वृद्धीचे प्रतीक आहे, त्यामुळे ते ही अर्पण करून प्रार्थना करावी

या दिवशी सुवासिनी स्त्रिया घरातले दिवे घासून-पुसून एकत्र मांडतात

त्याच्या भोवती रांगोळ्या घालतात व ते दिवे प्रज्वलित करून त्याची पूजा केली जाते

पूजेमध्ये पक्वान्नांचा महानैवेद्य दाखविला जातो. त्यावेळी पुढील मंत्राने दिव्याची प्रार्थना करतात

ती प्रार्थना अशी

‘‘दीप सूर्याग्निरुपस्त्वं तेजसां तेज उत्तमम्| गृहाण मत्कृतां पूजां सर्वकामप्रदो भव॥

अर्थ:

‘‘हे दीपा, तू सूर्यरूप व अग्निरूप आहेस.

तेजा मध्ये तू उत्तम तेज आहेस.

माझ्या पूजेचा तू स्वीकार कर आणि माझ्या सर्व इच्छा पूर्ण कर. ’’.

घरोघरचे वंशाच्या दिव्यानकडूनही पालकांच्या काही अपेक्षा असतात. त्यांनी केलेल्या पराक्रमांना जर जागतिक महत्व असेल तर पालकांनाही आनंदच होतो.

अश्याच एका भारतीय वंशाच्या महिलेची हि अनोखी अशी कथा.

*नारी तूं नारायणी*... हे आपण जाणतोच.

यत्र नार्यस्तु पूज्यंते।
रमन्ते तत्र देवताः॥

भारतीय इतिहासात पूर्वी पासूनच स्त्रियांनी सार्वजनिक जीवनात सहभाग घेऊन रणरागिणींचा ठसा उमटविलाआहे.

काळाबरोबर राहून त्यांनी---" अबला " म्हणून पुरुषांनी लावलेला शिक्का पुसण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

आणि आपण अबला नसून सबलाच असल्याचे आपल्या कर्तृत्वातून सिद्धहि केले आहे.

पौराणिक काळातील अष्टभुजा दुर्गा... कमळ फुलावर अलगद उभी असलेली श्री लक्ष्मी देवी...

मयुर वाहनावर आरूढ झालेली चतुर्भुज विद्यादेवी शारदा असू द्या की...

अगदी प्रभू रामचंद्राच्या सीतामाई पासून... शूर छत्रपतींना घडविणाऱ्या जिजाऊ ---अहिल्याबाई होळकर ---झाशीची राणी ----रमाबाई रानडे ----रमाबाई पेशवे ----

ते आधुनिक काळातील भारत रत्न इंदिरा गांधी --किरण बेदी. ----सिंधुताई सपकाळ ---सुधा मूर्ती ---पी. टी. उषा ---सिंधू ---अशी भली मोठी शृंखला होईल.

आता पर्यंत चूल अन मूल सांभाळणाऱ्या स्त्रीयानी वेळ व काळानुसार नुसार घराचा उंबरा ओलांडूनच आपण पुरुषांपेक्षा तसूभरही कमी नसल्याचे दाखवून दिले आहे.

कांही भारतीय वंशाच्या महिलांनी तर आता अवकाशालाच गवसणी घातली आहे.

त्या पैकीच पहिले नाव समोर येते ते -- **सुनीता विल्यम** यांचे.

सुनीताचे वडील ---गुजराथचे डॉ. दीपक पंड्या हे जन्माचे भारतीय आणि आई बोनी ही स्लोव्हियन.

अभ्यासात सुनिता काही फार हुशार विद्यार्थिनी नव्हती.

पण तिला लहानपणापासूनच पोहण्याची आवड होती.

एक जलतरणपटू म्हणून ती मोठी होऊ लागली.

सुनीता नीडहॅम, मॅसाच्युसेट्स येथील नीडहॅम हायस्कुल मधून पदवीधर झाली.

तिला १९८७ साली युनायटेड स्टेट्स नेव्हल अकादमी कडून भौतिक विज्ञान ह्या विषयात बॅचलर ऑफ सायन्सची पदवी मिळाली.

आणि १९९५ मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून अभियांत्रिकी प्रबंधन ह्या विषयात मास्टर ऑफ सायन्सची पदवी मिळाली.

सुनीता विल्यम्स मे १९८७ ला अमेरिकन नौदलात मध्ये रुजू झाल्या.

नेव्हल कोस्टल सिस्टिम कमांडमध्ये सहा महिन्यांच्या तात्पुरत्या नियुक्तीनंतर त्यांची बेसिक डायविंग ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली.

पुढे त्यांची जुलै १९८९ मध्ये नेव्हल एव्हिएटर म्हणून नियुक्ती झाली आणि त्यांनी

सप्टेंबर १९९२ मध्ये अँड्र्यू चक्रीवादळाच्या वेळी मियामी, फ्लोरिडा येथे झालेल्या रिलीफ ऑपेरेशनमध्ये महत्वाची कामगिरी बजावली.

पुढे त्यांनी पायलट पद भूषविले.

जून १९९८ मध्ये त्या सैपान येथे नियुक्त असतांना त्यांची अवकाश मोहिमेकरिता नासा मध्ये निवड झाली.

**सुनीता विल्यम्स** (जन्म: सप्टेंबर १९, इ. स. १९६५) ही भारतीय वंशाची अमेरिकन नौसेनेतील अधिकारी व नासा अंतराळयात्री आहेत.

तिला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या १४ व्या मोहिमेवर व १५ व्या मोहिमेवर पाठवण्यात आले.

महिला अंतराळयात्रीने केलेल्या आजवरच्या सर्वाधिक प्रदीर्घ अंतराळयात्रेचा (१९५ दिवस) विक्रम तिच्या नावावर नोंदवला गेला आहे.

तिच्या नावावर सगळ्यात जास्त वेळा (७ वेळा) आणि जास्त वेळ (५० तास, ४० मिनिटे) अंतराळात चाललेली महिला असण्याचा विक्रम आहे.

२०१२ मध्ये तिने ३२ व्या मोहिमेची फ्लाईट इंजिनिअर तसेच ३३ व्या मोहिमेची कमांडर म्हणून काम केले.

सप्टेंबर २०१२ मध्ये अवकाशामध्ये---" ट्रायथलॉन " (रनिंग --सायकलिंग-- स्विमिंग)  चा अनुभव घेणारी ती पहिली महिला आहे.

परंतु स्विमिंग या ऐवजी अद्ययावत असे Advanced Resistive Exercise Device (ARED) केले आहेत.

ज्याची तुलना सूक्ष्म दृष्टीने पोहोण्याशी होऊ शकते.

अंतराळात " **आयर्न वूमन " कसोटीस उतरणारी सुनीता हि पहिलीच स्त्री असावी.**

. (After swimming half a mile (0. 8 km), biking 18 miles (29 km), and running 4 miles (6. 4 km),

Williams finished with a time of one hour, 48 minutes and 33 seconds, as she reported.)

अश्या वेगळ्या साहसी महिलांना जीवनातील कांही स्त्री सुलभ सुखांपासून वंचित राहावे लागते.

यास सुनिता विल्यम अपवाद ठरल्या नाहीत.

सुनीता विल्यम यांनी मायकल विल्यम या पोलीस ऑफिसर बरोबर संसार थाटला, आहे.

अमेरिकेत राहून सुद्धा भारतीय परंपरेनुसार दोघेही गेली २० वर्षांपासून अधिक काळ एकनिष्ठ पणे पती - पत्नी म्हणून रहात आहेत. दोघांनाही हेलिकॉप्टर उडविण्याचा छंद आहे.

परंतु ---स्वतःला मूल - बाळ होऊ न देता आपल्या भारतातीलच -- अहमदाबाद येथून छोट्या मुलीस दत्तक घेणार असल्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

हे विशेष.

२००७ सप्टेंबर मध्ये दोघांनी साबरमती आश्रम तसेच तसेच पूर्वजांच्या गुजराथ मधील झुलसान खेड्यास भेट दिली.

सुनीत विल्यम इस **सरदार वल्लभ भाई पटेल विश्व प्रतिभा** या पदकाने गौरविण्यात आले आहे.

भारतीय... नागरिकत्व... नसलेल्या व हे पारितोषिक मिळविणाऱ्या त्या पहिल्या भारतीय वंशाच्या महिला आहेत.

अमेरिकेतील एका शाळेला --सुनीता विल्यम एलिमेंटरी स्कुल असे नाव देऊन त्यांचा गौरव केला आहे.

अगदी अलीकडेच... मे २०२० मध्ये सुमारे ५ लाख भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यां समोर,

कोविड -१९ च्या जगभरच्या साथी मुळे इंटरनेट प्रक्षेपण माध्यमातून प्रोत्साहनपर भाषण दिले आहे.

अन् नव्या पिढीला अवकाशाला गवसणी घालण्याची साद दिली आहे.

अश्या दैदिप्यमान वंशाच्या अनोख्या दिव्याच्या पराक्रमास त्रिवार वंदन... !

******

**मी अनुभवेलला -- " वजीर "... !**

******

बुद्धिबळातील ६४ घरांचा राजा खरे तर---- **वजीरच--**
**-** असतो. कारण त्यालाच असते कसेही अन कोठेही चौफेर चाल करून जाण्याची मुभा.

उंट तिरका --तर हत्ती सरळच - तर घोडा आपल्या दुडक्या अडीच घराचे चालीत.

राजा अन प्यादे आपले मंद गती गोलंदाज एक एक घराचे मालक

माझी पत्नी, सौ.. जयश्री इच्या वाढ दिवसा -दिवशी **७ नोव्हेंबर १९८४** रोजी पुणे महानगर पालिकेत

आरोग्य खात्यात आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी म्हणून **मा. आयुक्त अरुण बों ंगीरवार** याचे काळात रुजू झालो.

शनिवार पेठ कै. मुकुंद लेले दवाखाना.. शनिवार वाडा लगत असलेल्या एकमेव असलेल्या आयुर्वेदिक बाह्य रुग्ण विभागात प्रथम नेमणूक झाली.

परंतु दुसऱ्याच दिवशी सकाळी भवानी पेठ दवाख्यान्यात कामास जावे असा वरिष्ठांचा आदेश आला.

मला वाटले तेथेही आयुर्वेदिक दवाखाना असेल. पण तसे नव्हते.

तेथील वैद्यकीय अधिकारी रजेवर असलेलने मला तेथे पाठविण्यात आले. होते.

नवीन लागलेल्या बहुतांशी सगळयांनाच असा खो खो चा अनुभव येत राहतो. हे नंतर अनुभवांती समजले.

त्यावेळी साधारण पणे मी रहात असलेल्या स्वारगेट येथील घरापासून चौफेर १०---१५ किलो मीटर अंतरापर्यंतच पुणे महानगर पालिकेची हद्द होती.

थोड्याच दिवसात माझी बदली दक्षिण टोकाकडील -- कोंढवा या (८ कि. मी) या दवाखान्यात करणेत आली.

येथे साधारण २ वर्ष छान बस्तान बसले होते.

अचानक पणे एके दिवशी गाडीखान्यातील **शालेय आरोग्य विभाग प्रमुख** म्हणून घरांपासून २ कि. मी. अंतरावर रुजू होण्याचे आदेश आले.

हाच तो मंडई जवळील डॉ. कोटणीस दवाखाना.

येथे पॉली क्लिनिक --प्रयोग शाळा -- मेडिकल बोर्ड ---क्ष किरण विभाग --क्षय रोग विभाग --स्त्री. रोग बाह्य रुग्ण विभाग --आणि त्वचा रोग व एड्स विभाग--व

कुत्रा चावल्यानंतर लस देण्याची सोय असलेला विभाग अश्या गोतावळयातील माझा एक---- **शालेय आरोग्य विभाग.**

येथील कामाचे स्वरूप म्हणजे पुणे म. न. पा. चे प्राथमिक शाळेस भेट देऊन १ली ते ४थी तील मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांचे लसी करण करणे व पुढील उपचारासाठी तज्ञांकडे पाठविणे.

पुण्यातील म. न. पा. हद्दीत सुमारे सकाळ - दुपार मिळून २०० च्या वर शाळेत लाख भर मुले असत.

बहुतेक बाह्य रुग्ण विभागाजवळ एखादी शाळा असेच. त्यातील विद्यार्थी तपासण्याची जबाबदारी त्या त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची असे.

आमचा विभाग दूरवर असलेल्या शाळेत जाऊन लसीकरण करत असू. त्यासाठी २ नर्सेस २ मदतनीस असत.

आमचे विभागा मार्फतच नारायण पेठ दवाखाना व कमला नेहरू हॉस्पिटल येथील **दंत विभागाचे बाह्य रुग्ण विभाग** - नियोजनाची पण जबाबदारी होती.

मानद दंत चिकित्सक येऊन ठराविक दिवशी हि तपासणी करत असत. तसेच आमचे विभागात बाल रोग चिकित्साही आठवड्यातून बालरोग तज्ज्ञांकडून दोन वेळा होत असे.

पुण्यातील कुटुंब कल्याण विभाग चालविणाऱ्या एन जी ओ संस्थांनाही त्यांचे जवळील शाळेच्या मुलांची तपासणी व लसीकरण करण्याची जबाबदारी असे.

या सर्व कारभाराचे नियोजन व एकत्रित मासिक अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्याची जबाबदारी आमचे विभागाची असे.

तसेच महिन्यातून एकदा " मेडिकल बोर्ड " सभासद म्हणून चेअरमन (पॅथॉलॉजिस्ट) , क्षय रोग विभाग प्रमुख यांचे समवेत

मीटिंगला हजर राहून मेडिकल बोर्ड पुढील प्रकरणे, नवीन भरती साठी आलेल्याना फिटनेस प्रमाणपत्र देणे,

अश्या कामात सहकार्य करावे लागत. . .

.

पुढे शासकीय स्तरावर दरवर्षी कुटुंब कल्याण व शालेय आरोग्य विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांचे तपासणीचे.

मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन होऊन त्यातून जन्मतःच हृदय विकार अन्य विकारांच्या उपचाराची व्यवस्था होत असे.

या विभागाची माझी जबाबदारी बाह्य स्वरूपाची असलेने या विभागास करमुक्त असा--- **वाहन भत्ता लागू असे.**

त्याचा थोडा आर्थिक फायदा होत असे.

परंतु या साठी अनेक वेळा मला अन्य वैद्यकीय अधिकारी रजेवर असलेल्या, पुण्यातील चौफेर असलेल्या

मुंढवा --येरवडा --विश्रांतवाडी --दापोडी--- औंध ---- पाषाण --हिंगणे येथे तसेच शहर पेठेतील बाह्य रुग्ण विभागात - तसेच

लसी करण केंद्र... विश्रामबागवाडा, तसेच कमला नेहरू हॉस्पिटल, नायडू सांसर्गिक रुग्णालयातही जावे लागे.

या निमित्ताने त्या त्या भागातील शाळांना भेटीही देणे सोईचे होई व माझ्या शालेय आरोग्य विभागाचे कामही सुरु राही.

एके वेळी टेल्को / बजाज यांचे संप काळात शनिवार वाडा येथे उपोषणास बसलेल्यांसाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी शनिवार पेठ दवाखान्यात रात्रभर जागरण देखील केली.

या शिवाय अग्निशमन - पी एम टी सेवक भरती - राष्ट्रीय खेळांचे सामने असताना बालेवाडी येथे - मुष्टियोद्धा स्पर्धा -पुणे म्यॅरेथॉन स्पर्धा - पंढरपूर पालखी सोहळा - २६ जानेवारी झेंडावंदन नेहरू स्टेडियम येथील कार्यक्रम -

तसेच अथवा एखाद्या झोपडपट्टीत आकस्मित उदभवलेल्या उलट्या जुलाब -आदी साथीचे वेळी अँब्युलन्स
सह माझी **हक्काने** वरिष्ठांकडून अश्या ठिकाणी रवानगी होत असे.

पुणे म. न. पा. मधील सुमारे **२०० शाळेत प्रत्यक्ष भेट देऊन** प्रत्येक वेळी माझ्या भेटीचा उद्देश शाळेतील मुख्याध्यापक यांचेकडे असलेल्या " **भेट नोंदवही '' मध्ये** आवर्जून करीत असे.

शाळेतील स्वच्छते बाबत व त्याचे वरील उपायांबाबत प्रदीर्घ असा अहवाल शिक्षण प्रमुख तसेच आरोग्य प्रमुख याना एकदा सादर केला केला होता.

या मध्ये प्रामुख्याने शाळेतील **स्वछता गृहाची दूरअवस्था** व **पिण्याच्या पाण्याच्या टंचाई** बाबत शिक्षकांचे वतीने मी वर्णन केलेली होती व त्याबाबत सुधारणा होणे जरुरीचे असल्याचे नमूद केले होते.

परंतु हा विषय पुढे बरेच वर्षांनंतर चांगलाच गाजला व पेपरमध्येही त्याची बरीच चर्चा झाली.

मध्यंतरीच्या काळात " **१९८८** " मध्ये आमच्यातील **२८** डॉक्टरांची एक " **डेमको** " (**D**octors **A**ssociation of **M**unicipal **Co**rporation) -

सहकारी गृहरचना कोरेगाव पार्क, पुणे १ येथे स्थापन झाली.

त्यात वरिष्ठांसमवेत मी सर्वात --नवखा असा प्रविष्ठ झालो.

पुढे आमची प्रत्येकाची स्वतंत्र अशी हक्काची घरकुले यथावकाश उभी राहिली.

आरोग्य प्रमुख... उपआयुक्त.. उप आरोग्य प्रमुख.. -- मेडिकल सुप्रीटेंडेंट --निवासी वैद्यकीय अधिकारी... वैद्यकीय अधिकारी असे सारेजण एकत्र कुटुंबा प्रमाणे

एकेकाळचे कार्यालयीन सेवक, **शासकीय स्थावर मिळकत प्रमाणपत्र अर्थात " ७/१२ चे कागदावर** " एका मोळी प्रमाणे कायमचेच बांधले गेलो. अन् धन्य झालो

. " **वरं जन हित ध्येयम !** " या पुणे महानगर पालिकेच्या ब्रीद वाक्याचा पाठपुरावा केल्याचं समाधानही पदरी पडलं.

शालेय विभागात सलगपणे सुमारे १४ वर्ष काम केल्यानंतर **मा. श्री. अरुण भाटिया** हे आयुक्त म्हणून आल्यानंतर

त्यांनी सर्व विभागातील अधिकाऱ्यांची, नियमानुसार **३ वर्षांनंतर बदलीचा** नियम लागू केल्याने सर्व पुणे कार्पोरेशन ढवळून निघाले होते.

माझी पुनःश्च शनिवार पेठ आयुर्वेदिक दवाखाना येथे मूळ जागी बदली झाली.

पुढील काळात **२००३** नंतर **मा. नूतन आयुक्त डॉ. नितीन करीर** यांचे कार्य काळात,

माझी **क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी** या पदावर टिळक रोड क्षेत्रीय कार्यालयात

इतर १४ सहकार्यांसमवेत आरोग्य विषयक **चकाचक मोहीम** व इतर प्रशासकीय कामासाठी बदली झाली.

हे काम संपूर्ण वॉर्ड भर फिरून नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या दूर करण्याचे व आव्हानात्मक असे होते.

कचरा --साफसफाई --पी. सी. एन. डी. टी. बाबत सोनोगाफी सेंटर्स तपासणी भेट - पल्स पोलिओ राष्ट्रीय कार्यक्रमाचे नियोजन.

चकाचक मोहिमे अंतर्गत ओला सुका कचऱ्याचे नियोजनाबाबत बाबत वॉर्ड मधील नागरिकांचे प्रबोधन करणे. , सकाळीच वॉर्डची स्वच्छते बाबत आरोग्य निरीक्षका समवेत पाहणी करणे.

फुरसुंगी कचरा डेपोस आग लागली असता रात्री दिलेली भेट --- स्मशानभूमी पहाणी --हॉटेल परवाने नूतनीकरण -- सिनेमा थिएटर पहाणी. -- आपत्कालीन नियोजन -- अशी एक ना अनेक कामासाठी वॉर्ड चे हद्दीत भटकंती होई.

गणपती उत्सव- काळात गणेश मूर्तींची **विसर्जन व्यवस्था** पाहण्यात रात्रभर जागरण करीत गणरायास,

त्याचे गावास सुखरूप पोहोच करून पुढील वर्षी लवकर याचे आमंत्रण देऊन आशीर्वाद ही मिळविले.

या पदासाठी सुद्धा " **मोटारकार भत्ता "** असल्याने " कार " घेण्याचा प्रथमच योग देखील गणेश कृपेने आला.

याच काळात झालेल्या विधान सभा तसेच

कार्पोरेशन **निवडणूक काळात क्षेत्रीय अधिकारी** म्हणून नवीनच जबाबदारी सुद्धा अचानक पणे

**(शक्यतो डॉक्टरांना वर्ज्य असणारी)** अंगावर येऊन पडली होती.

त्यावेळी निवडणूक साहित्य --इलेक्ट्रॉनिक मशीन ट्रेनिंग घेणे तसेच आपल्या ग्रुपला देणे. , दिलेल्या केंद्राची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया राबविणे,

निवडणूक निकाल लागे पर्यन्त अडकून रहाण्याचा सुद्धा अनुभव घेतला.

अश्या **भरगच्च कार्यक्रमाचा अनुभव घेऊन** सेवा निवृत्ती पूर्वी पुन्हा एकदा बाह्य रुग्ण विभागात बदली झाली.

आमच्या सर्वच वरिष्ठांची (**राजाची**) भेट वेळेनुसार होवून योग्य ते मार्गदर्शनपर चर्चा - चहापाणी होत असे

व कार्यभाग सहजपणे निभावून जात असे व केलेल्या कामाचे कौतुकही अधून मधून होत असे.

निवृत्ती पूर्वीचे शेवटचे **२-३ महिने तर चक्क नव्याने होऊ घातलेल्या एका बाह्य रुग्ण विभागाचे उदघाटन पूर्व चालू असलेल्या फर्निचर --फिनिशिंग याची देखरेख**

करण्याची जबाबदारी येऊन पडली होती.

अश्या प्रकारे **२४ वर्षाचा प्रदीर्घ काळ वरिष्ठांच्या आज्ञेचे इमाने इतबारे पालन करीत,**

आरोग्य विभागातील विविध खाती सांभाळत आनंदात बुद्धिबळातील **वजीराप्रमाणे चौफेर भटकंती** करीत शांतपणे व्यतीत झाला.

सेवा निवृत्ती समाप्ती नंतरच्या-- **पेन्शन रुपी ठिबक सिंचनाच्या शुभारंभाने ---- फेब्रवारी २००९ अखेर फलद्रुप देखील झाला.**

त्यास सुद्धा आज ११ वर्ष झाली आहेत.

**सेवा निवृत्ती नंतरच्या गेल्या १०---११ वर्षाचे काळात मात्र स्वाईनफ्लू --डेंग्यू ---चिकन गुनिया --आणि आता जगभरात पसरलेला " कोरोना " साथ आल्याने**

**आरोग्य यंत्रणेवर खूपच ताण आल्याचे दिसून येते.**

लवकरच यातून सर्वांची सुटका व्हावी ही '' परमेश्वरचरणी '' इच्छा.

*****



**" ऐन तारुण्यातील " वैद्यकीय महाविद्यालयातील '**

**(५० वर्ष्या मागील) आठवणींचा मागोवा----!(१)**

******

१९६९-७० मध्ये " बी ग्रुप " घेऊन उत्तीर्ण झाल्याने " फर्ग्युसन कॉलेजचे " प्रांगण सोडून नगरच्या

कै. वैद्य गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला.

आयुर्वेद अभ्रासक्रमात संस्कृतचा समावेश असल्याने, शालान्त परीक्षेचे वेळी संस्कृत विषय असल्याने सहज पणे प्रवेश मिळाला देखील.

आयुर्वेदाच्या -मिश्र वैद्यक -" बी. ए. एम. एस. " पदवी घेण्यासाठीच्या कोर्सला एकदाचा प्रवेश मिळाला. आता डॉक्टर होणारच---

या कल्पनेने अंगावर मुठभर-- मांस चढले. घरातसुद्धा आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

विविध गावचे वारकरी जसे आषाढी वारीचे निमित्ताने चालत पंढरीला जमतात,

तसेच अहमदनगर या महाराष्ट्रातील मध्यवर्ती कॉलेजमध्ये आजूबाजूच्या राहुरी, श्रीरामपूर, प्रमाणेच खान्देश - विदर्भ-- अकोला ते सातारा -कराड -कोल्हापूर

व सोलापूर- पुणे ते कल्याण -कर्जत- मुंबई -डहाणू पलीकडील वाडा या गावाहून आपण सर्व विद्यार्थी भावी डॉक्टर होण्यासाठी जमलो.

मुलांचे हॉस्टेलचा नवीन परिसर मागे कोरडी सीना नदी, डासांचे साम्राज्य अश्या वातावरणात आवश्यक असणाऱ्या

मच्छरदाणीच्या संरक्षक कवच लेवून आमची " वैद्य " बनण्याच्या प्रक्रियेस सुरुवातझाली.

होस्टेलच्या तळमजल्यावरील कोपऱ्यातच " राजाभाऊन "ची मेस असल्याने सकाळचा गरमागरम फक्कड चहा व पोटपूजेची उत्तम गरमागरम व्यवस्था होती.

वरच्या मजल्यावरील बलोपासनेसाठी सुसज्ज छोटी व्यायाम शाळा तसेच आंघोळीच्या गरम पाण्यासाठी बंब सुद्धा आवारात होता.

अन होस्टेलची स्वच्छता देखभाल पाहणारा बाळू व पुंडलिक कि पंढरी असे दोन सेवक आमच्या दिमतीला असत.

आजच्या तुलनेत पहाता अगदीच अल्प अश्या मूल्यामध्ये (हॉस्टेल सहामाही शुल्क ६०/-रु. तर मेस ४५/- रु.)

आमची व्यवस्था डॉ. वाकळे या हॉस्टेल रेक्टरांच्या अधिपत्याखाली सुरू झाली.

विश्रामबागवाडा हा हॉस्टेल परिसर व प्रत्यक्ष माळीवाडा येथील लेक्चर हॉल यामध्ये १५ ते-२० मिनिटाचे अंतर होते.

लाकडी जिन्याची जुनीच इमारत पण प्राचार्यांचे दालन -- कार्यालय --लायब्ररी व वर्ग भरणाऱ्या खोल्या पहिल्या मजल्यावर व

तळ मजल्यावर आयुर्वेदिक बाह्यरुग्ण विभाग, प्रयोग शाळा, औषधालय तसेच अंतर रुग्ण व्यवस्था असे आवार असलेली छोटीशीच इमारत.

वर्गात मुलांचे प्रमाण जास्तच होते नावालाच " हिरवळीची " स्थानीय किनार होती.

.

पहिल्याच वर्षी --संस्कृत -आयुर्वेदाचा इतिहास -डि. डि. एम. व्ही. (दोष -धातू -मल -विज्ञान) हे खास आयुर्वेदाची तोंड ओळख होण्यासाठीचे--

स्टार्टर---विषय. त्यामुळे संस्कृत श्लोक व इतर माहिती मराठीतून त्यामुळे सहज सोपे गेले. देवांचे धन्वंतरी "अश्विनीकुमार "वगैरे बाबीची ओळख झाली.

आयुर्वेदाच्या इत्तमभूत इतिहासाचा मागोवा अभ्यासावा लागला. ऋषी मुनींच्या द्रष्टे पणाची कल्पना आली.

वैद्यास आवश्यक अश्या शंभर गुणांची ओळख झाली.

शरीरात असणारे त्रिदोष --वात-- पित्त--कफ, सप्त धातू -रस -रक्त -मांस -मेद -अस्थी -मज्जा - ओज. मल -मूत्र -घाम या बाबतची मूलतः ओळख झाली.

त्यापैकी नवीन होते ते --ओज --

म्हणजे आपल्या अन्न -- सेवनाचा शरीरावर दिसणारा शेवटी दिसणारा परिणाम.

अथवा चेहऱ्यावर दिसणारे तेज -प्रसन्नता -निरोगीपणाचे लक्षण. माणसाचा चेहरा पाहूनच त्यांचे आरोग्य कसे आहे हे ओळखण्याची गुरुकिल्लीच म्हणा ना

. ते कमी असेल तर अवर सत्व ---योग्य असेल तर प्रवर सत्व अशीही माहिती मिळाली.

त्यासच आपण-- सात्विक--असे म्हणतो.

संत - महंत - मुनी -आचार्य -ब्रह्मकुमारीच्या दादी-दीदी यांच्या चेहऱ्या वरून त्या सत्वाची आपणास आता कल्पना येते.

निरागस -निर्लोभी --प्रसन्न --आनंदी माणसाचे चेहरे असे असतात.

संस्कृत मध्ये--- रघुवंश अभ्यासावा लागला. त्यासाठी सुटीत खास पुण्याचा पेशवे आणि मी विशेष क्लास लावला होता.

प्रथम वर्षी वर्गात आम्ही पुण्याचे नाव व शान आघाडीवर राहून राखले.

संस्कृत साठी वयोवृद्ध फाटक शास्त्री धोतर -सदरा वेशातील अनुभवी शिक्षक, दोष धातू मलविज्ञान विषयासाठी नाजूक आवाजाचे डॉ. शिंत्रे तर आयुर्वेदाचा इतिहास,

यासाठी खुद्द प्राचार्य रा. शं. देवचके होते. यांच्या वर्गास उपस्थिती शंभर टक्के असे. हजेरी देताना --" उपस्थित "असे म्हणून द्यावी असा त्यांचा शिरस्ता होता.

त्याची स्वाक्षरी देखील लपेटदार अश्या मराठीतच होती.

पहिल्या -- वर्ष्याचे स्टार्टर विषय एक वर्षात लगेचच संपविले. पेशवे महाशयांना मात्र --- डि. डि एम. व्ही. ह्या विषयाचा -- मिठाचा खडा लागला.

असो टर्म वाया जाण्याचा प्रश्न नव्हता म्हणा. त्यामुळे बचावले.

आणि आम्ही -- सहजपणे दुसऱ्या वर्ष्यात सहज सुलभ प्रवेश केला. -----(१) ----

----

**मल्हार माचीची मौज मजा ---!**

******

नात्यातील गोडवा वाढवणारी व जवळीक व स्नेह निर्माण करणारी मकर संक्रांतीच्या तिळगुळाची चव जीभेवर अजूनहि रेंगाळताच होती. तोच आमचे स्नेही डॉ. चंद्रशेखर पेशवे यांनी मल्हार माचीची एकदिवसीय सहलीचा प्रस्ताव ठेवला अन आम्ही क्षणाचाही विलंब न लावता त्यास होकार देऊन निघालो देखील.

२०१९ च्या नव्यावर्षातील शनिवार १९ जानेवारीचा दिवस मुकर्रर झाला.

आपापल्या कारने चांदणी चौक -अप अँड अबाव्ह जवळ जमण्याचे ठरले.

सकाळचे कोवळे ऊन अंगावर घेत आम्ही पौडच्या दिशेने निघालो. आम्ही दोघे -पेशवे पती पत्नी त्यांची ऑस्ट्रेलियातून सुटीनिमित्ताने भारतात आलेली लाडकी ९ वीत शिकत असलेली नातं ईशा , आणि पेशव्याचे स्नेही अजय, नीलम व चि. ऋग्वेद

पाटील, त्यांचे सासरे निवृत्त प्राचार्य श्री अशोक पाटील असे अष्ट प्रधान मंडळच जणू थाटात मल्हार माचीचा वेध घेण्यास निघालो झाले.

नागमोडी वळणे घेत पुण्यापासून दूर निसर्गयरम्य झाडीचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात येऊ लागला सिमिंटचे जंगल मागे पडले अन हायसे वाटले.

**जलसृष्टी पाण्याने वेढलेला रिसॉर्ट** --हा मल्हार माचीच्या पायथ्याशी असलेल. पुणे मुळशीतील एकमेव असे निसर्गरम्य ठिकाण. डॉ. चंद्रशेखर पेशव्याचे परिचित श्री. आदित्य परांजपे यांनी स्वागत केले. . मुळा नदीच्या पाण्याने वेढलेल्या रिसॉर्ट कडे जाण्यासाठी नदीचे काठ ओलांडून जाण्यास मचव्याचा आधार घ्यावा लागतो अन नकळत युरोप मधील व्हेनिसचा परिसर डोळ्यासमोर येऊन जातो.

पाच मिनिटाचे जलप्रवासाने आम्ही हिरव्याकंच झाडाझुडुपांनी व नारळाच्या झाडांनी वेढलेल्या व मनमोहक अश्या वातावरणात येऊन ठेपतो. ठीक ठिकाणी ठेवलेले अँटिक

वस्तू, फुलांच्या रांगोळ्या, निळ्याशार पाण्याचा पोहण्याचा तलाव. भव्य असे फूड जॉईंट - उपहार गृह. अन त्या वातावरणात तेथे मिळालेला गरमागरम मसालेदार चहाची मजा और असा आनंद देऊन गेली. तेथे फेरफटका मारताना तेथील वनश्री, टुमदार अश्या लाकडी निवासस्थान असलेल्या खोल्या, निरव शांतता आणि ऑरग्यानिक शेतीचे वाफे पाहून आपण कोकणात असल्याचाच भास होत होता.

. तेथील नांदीचा आस्वाद घेऊन आम्ही मुख्य रस्त्याचे उजवीकडील मल्हार माचीकडील छोट्याश्या घाट रस्त्याला लागलो. अवघ्या १/२ तासाचे प्रवासात डोगर माथ्यावरील मल्हार माचीवर पोहोचलो देखील. भव्य अश्या लाकडी शामियानात आम्ही प्रवेश केला. वेलकम ड्रिंक म्हणून कोकम सरबत दिल्याने त्याचे आंबट गोड चवीने व तेथे जमलेल्या हौशी पर्यटकांचे दर्शनाने मन तृप्त झाले.

आजू बाजूस फेरफटका मारताना डोंगर उताराची योग्यती बूज राखीत केलेल्या दगडी पायऱ्यांची उतरंड, दगडी नक्षी काम केलेले तुळशीवृन्दावन, कासवे, उंच उंच अशी नारळ बांबूची

झाडे. मागे काळ्या कातळाचा भव्य असा डोंगर, तर दुसऱ्या बाजूस मुळशी धरणाच्या पाण्याचा भव्य असा अर्धवर्तुळाकार दूरवर दिसणारा जलाशय डोळ्यांचे पारणे फेडतो. आणि सर्वजण हि मनमोहक दृशे आपल्या मोबाईलमध्ये बंदिस्त करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत राहतो.

आम्हा दोघांचे फोटो काढण्यात ईशाने चांगलाच उत्साह दाखविला.

आता पोट पूजेचे वेध लागले. भव्य, उंच असे बांबूने व लाकडांनी बांधलेल्या दालनात बुफे पद्धतीचे जेवण तयार होतेच. स्टार्टर --गरमागरम सूप, अन विविध चवीच्या डिशेसने आम्हा पर्यटकांची भूक चांगलीच शमली.

डॉ. पेशव्याचे मित्रत्वाचे संबंधाने आम्हाला वामकुक्षी साठी एक वातानुकूलित खोली मिळाली. सर्वांनी यथेच्छ भोजनोत्तर डुलकी तेथे घेऊन फ्रेश झालो अन पुढील मध्यंतरोत्तर फेरफटक्यास सज्ज झालो

.

तेथील बागेतील झोके --घसरगुंडी --सायकल सफरी --ट्रॅक्टरचा सैराट सदृश्य फेरफटका, रोप वे वरील अधांतरी सफर

अश्या विविध प्रकारच्या खेळाचा आनंद पर्यटक संक्रांतीच्या वाणा प्रमाणे लुटण्यात गर्क असलेले दिसत होते.

आम्ही सुद्धा त्याचा आनंद अनुभवला.

तेथेच झाडांच्या गराड्यात मांडलेल्या हाय टी चा आस्वाद घेण्याची सोय केलेली असल्याने.. वडापाव --प्याटीस.. भेळ तसेच गरम सुगंधित चहा व कॉफी याचा आपापल्या चवीप्रमाणे असाद घेत पर्यटक गुंग झाले.

दिवस मावळतीकडे कधी कलू लागला हेही कळले नाही..

मल्हार माचीची एक दिवसाची मौज मजा आतां अस्तास चालली होती. तेथील सेवक रात्रीच्या रंगीबे रंगी तसेच ऑर्केस्ट्र्यासहित असलेल्या डिनरच्या तयारीस जुंपल्याचे दिसत होते

.

आम्हास मात्र पुण्याकडे परतीचे वेध लागले.

आजच्या एकदिवसीय सहलीने आमचे, शाडूच्या सुबक मूर्तीसाठी गणपती साठी प्रसिद्ध असलेल्या पेणच्या अशोक

पाटील कुटुंबियांशी नव्यास्नेहाचे धागे कायम स्वरूपी जोडले गेले ते. पुण्याजवळील प्रति कोकणचा आनंद देणाऱ्या मल्हार माची या पर्यटन स्थळाचे भेटीचे निमित्ताने.

त्या स्नेह बंधाच्या गाठी व मल्हार माचीच्या अनुभवलेल्या मौज मजेच्या स्मृती मनात रुजवत आम्ही एकमेकांचा हृद्य असा निरोप घेतला तो पुनश्च्य भेटीच्या आशेनेच.

. ******



**फुलवेड्या डेंटिस्ट. !**

*****

पुण्याच्या एम्प्रेस गार्डन मध्ये दरवर्षी २६ जानेवारीच्या सुमारास भरणारे फुलांचे मनमोहक प्रदर्शन डोळ्यांचे पारणे फेडणारे असेच असते.

त्या फुलांना फुलविण्यासाठी लागणारे खतपाणी --हवामान --व त्यांचे संवर्धनासाठी लागणारे अतोनात कष्ट याची जाणीव त्या मधून होते.

त्याचीच मिनी आवृत्ती आम्हास आज आमच्या कोरेगाव पार्क मधील ड्यामको सोसायटीच्या गच्चीवर फुलवलेली पहावयास मिळाली.

अन नेत्रसुख पुनःश्च प्रत्यक्ष अनुभवले.

निमित्त झाले ---

Dear all, you are invited for cup of tea at Smita's, terrace garden on 09/02/2019 Saturday, at 7. 30 a. m. after laughing club gets over. please Do come.

या वोट्स ऍप वरील डॉ. रणजित वाघ यांच्या मेसेजचे.

आमच्या सोसायटीच्या जेम तेम १७५० चौ. फूट असलेल्या प्लॉटवर आपापले स्वप्न शिल्प प्रत्येकानी सत्यात उतरवले आणि तेथे आपले आयुष्य निवांतपणे व्यतीत करत आहेत.

प्लॉटचे प्रवेश द्वाराजवळच डी आकाराची हिरवळ असलेली बाग आहे. तसेच प्रत्येकाचे अंगणात व परसदारी सुद्धा विविध फुल झाडे फुलवून आपापली हौस भागविली आहे.

त्यासाठी कितीतरी उपदव्याप करावे लागतात हेही अनुभवतो आहोत.

परंतु आपल्या गच्चीवर फुलवलेली मनमोहक, कल्पकतापूर्वक सजविलेली एकमेव अशी भरगच्च " टेरेस गार्डन " पाहण्याचा योग्य आज आला.

नावानेच " वाघ " असलेल्या डेंटिस्ट स्मितातार्ड --- डॉ. रणजित वाघ यांच्या सौ. नीं मोठ्या मेहनीतीने ते साकारले आहे.

आमच्या पुणे महानगर पालिकेतील आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी पदावरील एकेकाळच्या सहकारी स्व. डॉ. वाघ यांच्या त्या स्नुषा.

आमच्या सोसायटीत आनंदाने नांदणारी त्यांची पुढची तरुण पिढी.

आपला डेंटिस्टचा व्यवसाय, दोन मुले तसेच घरातील जेष्ठ प्रेमळ सासरे याना सांभाळून घेत त्यांनी आपली गच्चीवरील बाग अनेक विविध रंगाच्या फुलांनी मनापासून अगदी जीव ओतून फुलविलेली पहावयास मिळाली.

आम्ही सुमारे १५ वर्षांपासून सुरू केलेल्या हास्यक्लबचे रोपटे अजूनही सोसायटीचे बागेत डोलत असल्याचे पाहून आम्हालाही आनंद झाला.

त्याचा उल्लेख आमंत्रणात असल्याने आम्ही दोघांनी सुद्धा उत्सुकतेने सहकारनगर भागातून तेथे जाऊन तातडीने तेथे हजेरी लावली.

गच्चीवरील थंडगार वातावरणात रंगीबेरंगी आकर्षक फुलझाडांचे मधोमध, हास्य क्लबचे मेम्बर्स मधोमध मांडलेल्या खुर्च्यांवर स्थनापन्न झाले. सूर्याच्या कोवळया उन्हाचा आल्हाददायक उबदारपणा सोबतीला होताच.

थोड्याच वेळात रुचकर खमंग साबुदाणा खिचडी --अन वाफाळलेल्या गरमागरम चहाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

आजूबाजूची नेत्रसुखद रंगीत फुलझाडे त्यांची केलेली आकर्षक मांडणी सर्वांनाच भुरळ पाडून गेली. अन फुलवेड्या सौ. स्मिता वाघ याना सर्वांनी मनःपूर्वक धन्यवाद दिले.

असावे घर ते अपुले छान --
पुढे असावा बाग बगीचा ---
वेळ मंडपी जाईजुईचा---
आम्रतरूवर मधुमासाचा ---
फुलावा मोहर पानोपान--

संगमरवरी ती पुष्कर्णी --
त्यात असावे गुलाबपाणी ---
पाण्या मधुनी कारंजाची --
फुटावी सुरेल सुंदर तान --

फुलासारखे मूल असावे ---
नित्य नांदणे घरी हसावे --
तीर्थरुपे ओवाळावे --

आपुले जीवन पंचप्राण ---

पी. सावळाराम यांचे गीत --दशरथ पुजारी यांचे संगीत व मधुर गळयाच्या गायिका -- सुमन कल्याणपूरकर यांनी गायिलेल्या

या कर्ण मधुर गाण्याचे जणू प्रतिबिंबीत रूपच पहात असल्याचे आज जाणवले व आजचा दिवस पुष्प सुगंधाप्रमाणेच फुलमय झाला.

बेळगावी माहेर असलेल्या व आपल्या डॉक्टर वडिलांच्या फुलांचा, आवडीचा वारसा तन्मयतेने पुढे चालविणारी त्यांची हि ' फुलवेडी डेंटिस्ट ' कन्या पाहून आम्ही देखील --

**दातोतले उंगली दबानेका मौका नही छोडा... !**

******

**(भर उन्हाळ्यात-)-- सुस्वरांनी सुखावलेले --'' गीत रामायण** ''

******

चैत्र मासात आम्र तरुवर लगडलेल्या मनोहारी कैर्या पाहून मन हरखून जाते. त्यामुळेच त्यापासून बनविलेला मुरंबा -पन्हे - कैरीची डाळ - लोणचे इ. पदार्थ वर्षभर आपल्या रसनेची साथ संगत करतात अन त्याचे मधुर चवीने आपणही त्यात गुंगून जातो.

असाच ऐन उन्हाळ्यात आपल्या अवीट कर्ण मधुर हृद्य अश्या **गीत रामायणाच्या हिरक महोत्सवी कार्यक्रमाने** आमचा आजचा उन्हाळाही कांहीसा सुसह्य झाला. सकाळ माध्यम आयोजित तसेच गार्डियन कंस्त्रक्षण व मराठे ज्वेलर्स प्रायोजित असा हा कार्यक्रम आमचे साठीहि प्रायोजित केला तो आमच्या रसिक व्याही - विहीणबाई श्री. चंद्रकांत व सौ. उषा भसाळे यांनी.

पुण्यातील गणेश कला क्रीडा मंदिरात हा कार्यक्रम -- शिवशाहीर ब. मो. पुरंदरे, संगीतकार प्रभाकर जोग, श्रीधर फडके, श्रीधर माडगुळकर, आनंद माडगुळकर यांचे उपस्थित पार पडला.

आधुनिक वाल्मिकी गदिमा व बाबूजी या प्रतिभावंत दिगजान्च्या मुशीत तयार झालेले हे गीत रामायणाचे शिव धनुष्य श्री. श्रीधर फडके यांनी लीलया पेलले व सोबत सौ. लेले यांचे समय सूचक निवेदनाने कार्यक्रम संपूच नये असे वाटत होते.

**स्वये श्री राम प्रभू ऐकती**
**लवकुश रामायण गती //-----**

या भावपूर्ण शब्दांनी मैफिल सुरु झाली. प्रेक्षागृह पुणेकरांनी तुडुंब भरले होते. व गाण्यांचे स्वर आपापल्या कर्ण कुपात साठवू लागले आणि रामायण कथा गायनाची गुंफण सुरू झाली. २० फेब्रुवारची इस्टर संडे ची सायंकाळ संगीतमय होऊ लागली.

**चैत्रमास, त्यात शुद्ध नवमी हि तिथी**
**गंध युक्त तरीही वात उष्ण हे ----!**

**दोन प्रहरी का ग शिरी सूर्य थांबला ।**

**राम जन्मला ग सखे राम जन्मला // ----**

नाव ठेवण्यापूर्वीच ' राम ' कसा काय जन्मला बुवा .... ? अशी हि शंका काहींनी व्यक्त केली. सर्वाना रमवितो तो राम. रा--- म्हणताच आपल्या शरीरातील अशुद्ध वायू बाहेर पडतो व आपण शुद्ध होतो त्या नंतर अशुद्ध वायू पोटात जावू नये म्हणूनच त्यापुढे म.... अक्षर येवून ओठांची दारे बंद होतात. तोच खरा राम. त्यावाचून ज्यात काही अर्थ नाही त्यात काही---' राम ' नसतोच हे आपण सर्वजण जाणतोच की !

राम नवमी आपण पारंपारिक पद्धतीने साजरी करतो. तो रामाचा' वाढ दिवस '----- नसतो तर ती असते--- राम नवमी. त्यामुळेच राम हा कायम " चिरंजीव " बनून राहिला आहे.

गीत रामायणाची मुळ कल्पना आकाशवाणी पुणे केंद्राचे संचालक सीताकांत लाड यांची. त्यांनी बाबूजी व गदिमा याना प्रत्येक आठवड्यात एक -- गीत रचून संपूर्ण रामायण एक वर्षात **५२ आठवड्यात** पूर्ण करावे असे सुचविले. त्या प्रमाणे श्री गणेशा झाला देखील.

तो दिवस होता--- **१ एप्रिल १९५५ चैत्र पाडवा -----**

**१ एप्रिल** ---- तसा लोकाना **' फूल'** बनविण्याचा दिवस पण याच गीत रामायणाने सर्व मराठी रसिकाना अक्षरशहा -- खरेच **वेड** लावले की ...!

याच वर्षी ---पुरुषोत्तम मास म्हणजेच अधिक मास आला. व रामायण हि त्यामुळे **वर्षाच्या अपवादाने ---५६ गाण्यातच बद्ध झाले आहे.**

**माता न तू वैरिणी ...**

या गाण्यातून भरताचा राग व्यक्त करताना गायक श्रीधर फडके यांची चांगलीच दमछाक झाल्याचे दिसून आले व तो राग प्रत्यक्ष गाण्यातून हुबेहूब व्यक्त झाला.

**आकाशासी जडले नाते धरणीमातेचे**

**स्वयंवर झाले सीतेचे ----**//

या गाण्यातून लग्न मंडपातील चित्र सहजपणे डोळ्यापुढे साक्षात उभे राहते.

**सेतू बांधारे सागरी -----** //

या गाण्याने आपण हिंदीमहासागर लीलया पार करून-- अशोक वनात केंव्हा येवून पाहोचतो हे कळले देखील नाही.

**रघुराजाच्या नगरी जावून**
**गा बाळानो, श्री रामायण-----**//

हे गाणे गाताना श्रीधर फडके यांचा स्वर तसेच उर भरून आला

या गाण्याने गीत रामायणाचे एक वर्तुळ पूर्ण होवून नव्यास जन्म देतो.

त्यातही शेवटी----

**नच स्वीकारा धन कांचना**

**नको दान रे नको दक्षिणा**

**काय धनाचे मूल्य मुनिजना**

**अवघ्या आशा---- श्रीरामार्पण** //

असा **लाख मोलाचा** मार्गदर्शक सल्ला आपणा सर्वांना मिळून आपणहि आजच्या जीवनाकडे पाहून न कळात अंतर्मुख होवून जातो.

श्री -राम----- हे दशरथ पुत्र--- राम -----सीतेचे पती सीताराम ---- हनुमंत हे तर रामदूत...। लव - कुशांचे प्रेमळ पिता---- रामचंद्र यामुळेच --- आपल्या सर्वांना -
आपल्यातील **आत्माराम**---- शोधण्यास प्रवृत्त करतो.

**गीत रामायण** हे सुद्धा आता --आमच्या प्रमाणेच ' **जेष्ठ** ' सदरात ६० व्या वर्षातील **हिरक महोत्सवात** पदार्पण करत असले तरी ते मराठी भाषा असे पर्यंत चिरंजीवच राहील ते मराठी

- संस्कृत प्रचुर भाषेने सजलेल्या शब्दांनी व त्यास संगीत माध्यमातून जिवंतपणा देवून व्यक्त झालेल्या अर्थांनी.

अश्या काही मोजक्याच गाण्याच्या मैफलीचा आस्वाद आम्ही बाटलीतील पाणी पिऊन व सौ. उषा ताईनी आवर्जून आणलेल्या खारवलेल्या काजू व काळया मनुकांच्या मधुर चवीने अधून मधून तहान भागवीत घेतला.

त्यामुळेच कार्यक्रम स्वरमधुर अन उन्हाळाहि काही काळ सुसह्य न झाला तरच नवल नाही का----!

******

// **वाचाल तर वाचाल...** //

******

क्रियेवीण वाचाळता... व्यर्थ आहे... !!!!!

खरोखरच कांही छोट्याश्या शब्दात भलामोठा अर्थ दडलेला असतो. आज काल वेळ नाही हो वाचायला .. असेच ऐकावे लागते.

आजच्या धावपळीच्या युगात मोबाईल वरील... एस एम एस हीच खरी मूक -- बोली भाषा तयार झालेली दिसून येते आहे.

मागील पिढी घडली ती... सुलेखन पद्धतीच्या लेखनाने. त्यामुळे अक्षर कसे बाळबोध वळणदार असे. त्यामध्ये एक जिवंत पणा -- आपले पणा असे. पत्रलेखनातून... तर ती विशेष खुलत असे. वाचतानाही ती... मनाला भिडत असे.

आणि हल्लीची तरुणाई रमली आहे ती ---इ.. लेखनाच्या, इ-मेलच्या, इनस्टंट कॉफीच्या... वाफाळलेल्या क्षणभंगुर जगात. सर्व काही झटपट... चटपट आणि पटापट च्या पायऱ्या ओलांडण्यात. त्यामुळे त्यालेखनात नि वाचनात एकसुरीपणा जाणवतो. सर्वच पत्रातील मजकूर एकाच छापाचा. पण ब्रेड -- बर्गर च्या बाजारात त्याचाच बडेजाव चालतो आहे. याची प्रचीती येते. कालाय तस्मै:नमः ! दुसरे काय ?

चुटकी सरशी क्लिक च्या चावीने उघडणारे "गुगलचे विश्व "जोडीला असल्यावर----- कशाचीच चिंता नाही. त्यमुळे या नव्या विश्वात रमून घ्यावेच लागते. अन्यथा प्रत्यक्ष्य" लिहिता वाचता " येत असूनही याची जोड नसेल तर... संगणक निरक्षरचा... शिक्का ठरलेलाच.

याचे सहाय्याने आपण क्षणात जगाच्या या कोपऱ्यातून त्या कोनापर्यंत लीलया संचार करू शकतो. हे ही नसे थोडके.

आणि या वाचून... फार काल दूर राहणे... चालणारही नाही. चला तर आपणही या नव्या जगाचे वास्तवात रममाण होऊ या. आनंद लुटू यात. व नवा मंत्र जपू यात... **शिकाल तर वाचाल... !!**

सायोनारा --पुन्हा भेटूच --
*******************************

प्रति --
समस्त-- सुमीत वासीय
(---सख्ये शेजारी )
सहकार नगर --२

स.न.वि वि.

गेली ३ वर्ष् आम्ही सुमीत -- फ्लॅट -क्रमांक २०१ मध्ये वास्तव्यास आहोत . आमचे येथील वास्तव्य आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आपुलकीच्या नात्याने , शांततेत ,व सुखेनैव समाधानपूर्वक पार पडत आहे .येथे जेष्ठ नागरिकांचा मेळावाच असल्याने आम्हासही घरच्या प्रमाणेच वाटते . ऋणानुबंधाच्या, -- गाठी पडल्याचा अनुभव मिळाला आणि आम्हीही धन्य झालो आहोत .

**सुमीत मध्ये ---**

*************

सु-सह्य अश्या ...सुखसोयी, मीत भाषी .....असे शेजारी..
त-त्पर ....मदतीस सदैव तयार असे शेजारी -- याचा आम्ही अनुभव घेतला
सुमी त.. मधील वास्तव्याचे काळातच --

" माझे अमेरिकाटन " ...हे ई - पुस्तक प्रकाशीत झाल्याने आनंद द्विगुणित झाला .

याच पुस्तकाची सस्नेह ई -भेट आपणा सर्वांसाठी सोबत सविनय सादर करीत आहे .

यथावकाश त्याचे अवलोकन करून अभिप्राय कळवावा हि अपेक्षा .

२०२०-- सालापासुनच्या आरंभापासून सर्व जगावरच एक नवे संकट ओढवले . त्यातून अजूनही आपण सावरलेलो नाही . भविष्यात काय वाढून ठेवले आहे याची काहीच कल्पना सुस्पष्ट होत नाही..त्यामुळे आपण सर्वजण-- एकाच बोटीत विहार करत असल्याचे भासते आहे .

असो सद्य परिस्थितीत आम्ही देखील आमच्या--- नूतनीकरण केलेल्या ----

**" निर्झर "--**

**-प्लॉट क्रमांक २४,**

**" ड्यामको सोसायटी ,"**

**कोरेगावपार्क ,**

**पुणे ४११००१**

येथील-- स्वगृही जाण्याचे निश्चित केलेले आहे . २०२१ --या
नवं वर्षाचा " प्रजासत्ताक दिन " आम्ही आमच्या स्वगृहात
राहून .....
साजरा करणार आहोत. आमची " फ्लॅटमध्ये-"-- राहण्याची
तशी --आयुष्यातील ही पहिलीच वेळ होती
. त्यामुळे आमच्या येथील वास्तव्यात-- कळत न कळत
आमचे कडून येथील सोसायटीच्या नियमाविरुद्ध अनवधानाने
काही चुका घडल्या असतील वा कोणी दुखावले गेले असेल
तर त्या बद्दल--- क्षमस्व ..!
आपल्या सर्वांचा परिचय झाला आहेच , ओळख व लोभ
असू द्यावा .
न्यू नॉर्मल नुसार --परस्पर ई -संपर्कात राहूच .,
सर्वांना नवागत..२०२१ या नवं वर्ष्याच्या तसेच
नव्या आशेच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा ...!
देवूनच... सुमितचा निरोप घेतो, तो पुन्हा भेटण्यासाठी.

आपलेच स्नेहांकित --
*********************
डॉ.अरविंद वैद्य
सौ. जयश्री वैद्य
पुणे




२४,
जानेवारी
२०२१

9420175803

e.mail ---

arvind.vaidya51@gmail.com

## केवळ ज्येष्ठांसाठी

ई साहित्य एक नवीन पुस्तक मालिका सुरू करत आहे.

## “आमच्यावेळी...”

त्याचं असं आहे. आताच्या पिढ्यांना गेल्या शतकात लोक कसे जगत याचे अनुभव अविश्वसनीय वाटतील. म्हणजे “आणे” आणि “पैसे” व्यवहारात होते? मुलं शाळेत चालत जात? मोठ्या भावाबहिणीचे कपडे लहान भावंडं वापरत? आजारी माणसांना तपासायला डॉक्टर घरी येत? एक न अनेक. असंख्य गोष्टी. ज्या आताच्या मुलांना पटणारच नाहीत. तुम्ही लिहा. तुमचे खरे साधे अनुभव. मसाला न मारता. अतिशयोक्ती न करता. साध्या सोप्या भाषेत. आपण त्याची ई पुस्तकं प्रकाशित करू.

ई पुस्तकाची गंमत ही की ती नैअनं छिंदन्ति शस्त्राणि, नैनं दहती पावकः. नष्ट होतच नाहीत. म्हणजे तुम्च्या नातवंडांची नातवंडं आणि त्यांचीही नातवंडं तुमचं पुस्तक वाचतील.

चला तर. तुमच्या भावी पिढ्यांसाठी खजिना तयार करू.

“आमच्यावेळी...”- माझे बालपण, तरुणपण, नोकरी, शिक्षण लग्न जे जे लिहावे वाटेल ते ते लिहा आणि पाठवा.

esahity@gmail.com